# महाराष्ट्राचा इतिहास
# प्रागैतिहासिक महाराष्ट्र

खंड पहिला भाग १



लेखक

शांताराम भालचंद्र देव

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# महाराष्ट्राचा इतिहास

खंड पहिला

भाग १

प्रागैतिहासिक महाराष्ट्र

लेखक
शांताराम भालचंद्र देव

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

प्रथमावृत्ती : २००२

प्रती : १,११५

प्रकाशक : अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि
संस्कृती मंडळ, मुंबई.

मुद्रक : व्यवस्थापक,
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय,
पुणे - ४११००१.

मूल्य : रुपये १२७/-

# अनुक्रमणिका


| | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| | अध्यक्षांचे निवेदन | ... | पाच |
| | लेखकाचे निवेदन | ... | सात |
| | ऋणनिर्देश | ... | नऊ |
| | चित्रसूची | ... | अकरा ते पंधरा |
| प्रकरण १ | महाराष्ट्र – भूगोल, व्यक्तिमत्व, वैशिष्ट्ये | ... | १ |
| प्रकरण २ | पाषाणयुगीन महाराष्ट्र | ... | १६ |
| प्रकरण ३ | महाराष्ट्रातील आद्य शेतकरी | ... | ३४ |
| प्रकरण ४ | महापाषाण संस्कृति : लोहयुगाचा उदय | ... | ९३ |
| | निवडक संदर्भ ग्रंथ व लेख | ... | १२९ |
| परिशिष्ट १ | पाषाणयुगीन अवशेष सापडलेली स्थले | ... | १४० |
| परिशिष्ट १अ | प्राण्यांची अश्मीभूत अवस्थेतील हाडे सापडलेली स्थले | ... | १४२ |
| परिशिष्ट २ | महाराष्ट्रातील ताम्रपाषाणयुगीन अवशेष सापडलेली स्थले | ... | १४४ |
| परिशिष्ट ३ | महाराष्ट्रातील महापाषाण संस्कृतीची अवशेष सापडलेली स्थले | ... | १४८ |
| परिशिष्ट ४ | महाराष्ट्रातील उत्खनित स्थलाबद्दलची प्रकाशने | ... | १५० |

# निवेदन

बदलत्या काळाबरोबर इतिहासाकडे बदलण्याची दृष्टीही बदलते. नवे संदर्भ, नवीन आधारभूत साधनेही हाताशी घेतात. अशा परिस्थितीत हा इतिहास नव्याने लिहिण्याची आवश्यकता निर्माण होते.

महाराष्ट्राचा इतिहास नव्याने लिहून घेण्याची योजना त्याचमुळे निर्माण झाली. ही योजना मंडळाने १९६३ मध्ये हाती घेतली. सुरूवातीस या इतिहासाचे दोन खंडांत प्रकाशन करण्याचे ठरले. जुलै १९६३ मध्ये या योजनेत बदल करून महाराष्ट्राचा इतिहास पाच खंडांमध्ये लिहून / संपादित करून घेण्याचे ठरले. या नवीन योजनेनुसार १) प्राचीन कालखंड, २) मध्ययुगीन कालखंड, ३) मराठा कालखंड भाग - १, ४ ) मराठा कालखंड, भाग - २, ५ ) आधुनिक कालखंड अशा पाच खंडांत विभागणी करुन त्याचे काम अनुक्रमे डॉ. शां. भा. देव, प्रा. ग. ह. खरे, प्रा. न. र. फाटक, डॉ. वि. गो. खोबरेकर व प्रा. गो. ध. पारीख यांच्याकडे सोपविण्यात आले. दरम्यानच्या काळात प्रा. खरे व प्रा. पारीख यांचे निधन झाले. त्यामुळे प्रा. फाटक यांच्याकडे असलेल्या मराठा कालखंड भाग- १ च्या लेखनाचे काम डॉ. खोबरेकर यांच्याकडे सोपविण्यात आले.

प्रस्तुत खंडाचे लेखन डॉ. शां. भा. देव, नागपूर यांनी केले असून कालखंडाची मर्यादा प्रागैतिहासिक कालापासून इ. स. १३१७ पर्यन्त आहे.

सदर ग्रंथ इतिहासाचे अध्ययन व अध्यापन करणाऱ्यांना उपयुक्त होईल असा मंडळास विश्वास आहे.

मुंबई

(रा. रं. बोराडे)

दिनांक : ३१ ऑक्टोबर २००१

अध्यक्ष,

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

# लेखकाचे निवेदन

महाराष्ट्रांच्या इतिहासाचा पहिला खंड (पाषाणयुग ते यादव अखेर) लिहिण्याचे काम माझ्याकडे साहित्य आणि संस्कृति मंडळाने काही वर्षापूर्वी सोपविले होते. डेक्कन कॉलेजचे संचालकपदाचे काम, अध्यापन, उत्खनने आणि संशोधन, परदेशगमन त्याचप्रमाणे इतर संशोधन व व्याख्याने या व्यापात हे काम मागे पडले. याला संपूर्णपणे मी जबाबदार आहे. यामुळे मला अनेक नामवंतांचा आणि हितचिंतकांचा रोष पत्करावा लागला. हा माझा व्यक्तिशः मोठा तोटा झाला. इतर अनेक पुस्तकांच्या लिखाणाच्या व्यापामुळे हे इतिहास लेखनाचे काम मागे पडले हे मात्र खरे ! परंतु पहिल्या खंडाच्या पहिल्या भागाचे लिखाण (पाषाणयुग ते लोहयुग) यात अंतर्भूत केले आहे. दरवर्षी नवनवीन पुरातत्वीय पुरावा उपलब्ध होत असल्याने कालांतराने यात अंतर्भूत केलेल्या माहितीत बदल होणे अपरिहार्य आहे. तरीही पूर्वसुरींच्या लिखाणाचा उपयोग पायाभूत ठरलेला आहे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आणि डॉ. य. दि. फडके यांची प्रेरणा शब्दातीत आहे.

डेक्कन कॉलेज, नागपूर विद्यापीठ, आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया, महाराष्ट्र राज्य पुरातत्व व संग्रहालय खाते, जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया, डॉ. सी. डी. देशपांडे व डॉ. के. आर. दीक्षित यांनी प्रसिद्ध केलेल्या लिखाणांचा, नकाशांचा व चित्रांचा मी उपयोग केला आहे. या सर्वांचा मी ऋणी आहे.

डेक्कन कॉलेजमधील माझे मित्र व सहकारी डॉ. गो. बं. देगलूरकर, डॉ. गौरी लाड, डॉ. वाळिंबे, डॉ. थॉमस, डॉ. बदाम, डॉ. काजळे, डॉ. गोगटे डॉ. जोशी, डॉ. मिश्र, डॉ. राजगुरू, डॉ. पप्पू, डॉ. क्षीरसागर व डॉ. ढवळीकर, त्याचप्रमाणे गुरुवर्य डॉ. सांकलिया यांच्या लिखाणाची मला मोठी मदत झाली. डॉ. सुनीती दुबळे, डॉ. प्रकाश जोशी व डॉ. रवी मोहंती यांची मदत मोलाची ठरली. प्रकाश जोशी यांची मदत इतकी झाली की हे पुस्तक मी त्यांनाच 'विद्याभेट' म्हणून द्यावे असे मनोमन वाटते.

श्री. र. मो. पुराणिक यांनी केलेल्या टंकलेखनाबद्दल धन्यवाद!

पुणे १९९२ शांताराम भालचंद्र देव.

# ऋणनिर्देश

(चित्रे आणि नकाशे)

१. आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया, नवी दिल्ली.

२. महाराष्ट्र राज्य पुरातत्व आणि संग्रहालये विभाग, मुंबई.

३. डेक्कन कॉलेज पोस्ट-ग्रॅज्युएट ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, पुणे.

४. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ, मुंबई.

५. डॉ. सी. डी. देशपांडे, डॉ. के. आर. दीक्षित, पुणे.

* * *

# चित्रसूची

फलक १ : महाराष्ट्र.

फलक २ : महाराष्ट्र भूरचना.

फलक ३ : पूर्व - पुराश्मयुगीन हत्यारे, नेवासे (१ - ३ हातकुऱ्हाडी; ४ - ५ फरशा; ६ - ८ तासण्या).

फलक ४ : मध्य - पुराश्मयुगीन हत्यारे (तासण्या आणि टोचे).

फलक ५ : नवाश्मयुगीन हत्यारे (१ - २ कुऱ्हाडी; ३ छिन्नी);
गारगोटीच्या छिलक्यांची हत्यारे (क्रमांक ४ पासून).

फलक ६ : ताम्रपाषाणयुगीन खापरे : सावल्डा वर्ग (१ - ८), उत्तर हडाप्पा वर्ग (९ - १३).

फलक ७ : माळवा वर्गाची मडकी.

फलक ८ : जोर्वे वर्गाची मडकी (१ - ५), राखी रंगाचे दफनकुंभ (६- - ७).

फलक ९ : ताम्रपाषाणयुगीन वस्तू : तांब्याची कट्यार, चांडोली (१); कुऱ्हाड, चांडोली (२); छिन्नी, चांडोली (३); वाळा सोनगाव (४); गळ, नेवासे (५); 'बैल - बाटली', चांडोली (६); तांब्याची छिन्नी, चांडोली (७).

फलक १० : ताम्रपाषाणय - महापाषाण संस्कृती यांचा संपर्क दर्शविणारी दफनातील मडकी, टेकवडा.

फलक ११ : महापाषाण संस्कृती अवशेष : चित्रित खापरे (१ - ३); अभ्रकयुक्त तांबडी खापरे (४ - ५); काळी - आणि - तांबडी खापरे (६ - ७); तांब्याची भांडी (८ - १०).

फलक १२ : (अ) आद्य बैलाच्या कवटीचा अश्मीभूत अवशेष, घोड खोरे, इनामगाव.
(ब) आद्य पाणघोडा, खालच्या जबड्याचे दात, घोड खोरे, इनामगाव.

**फलक १३ :** (अ) आद्य रेडा, कवटीचा भाग, मांजरा खोरे, लातूर जिल्हा.

(ब) आद्य हत्ती, खालचा दात, मांजरा खोरे, लातूर जिल्हा.

**फलक १४ :** ताम्रपाषाणयुग, माळवा संस्कृतीच्या घराचे अवशेष, इसवी सनपूर्व सुमारे १,६०० ते १,४०० इनामगाव.

**फलक १५ :** (अ) ताम्रपाषाणयुग, मडकी भाजण्याची भट्टी, पूर्व - जोर्वे कालखंड, इनामगाव.

(ब) ताम्रपाषाणयुग, माळवा वर्गाचा चित्रित घडा, प्रकाश.

**फलक १६ :** (अ) ताम्रपाषाणयुग, गारगोटीच्या छिलक्यांची हत्यारे, प्रकाश.

(ब) ताम्रपाषाणयुग, तांब्याच्या कुऱ्हाडी, चांडोली.

**फलक १७ :** (अ) ताम्रपाषाणयुग, खापरावर कोरलेली बैलगाडी, पूर्व - जोर्वे कालखंड, इनामगाव.

(ब) ताम्रपाषाणयुग, जोर्वे वर्गाच्या तोटीच्या मडक्यावर चितारलेली नाव, इनामगाव.

**फलक १८ :** (अ) ताम्रपाषाणयुग, उत्तर हडाप्पा कालातील प्रौढाचे दफन, दायमाबाद.

(ब) ताम्रपाषाणयुग, चार पायाच्या कच्च्या रांजणातील दफन, पूर्व - जोर्वे कालखंड, इनामगाव.

**फलक १९ :** (अ) ताम्रपाषाणयुग, पूर्व - जोर्वे कालखंडातील प्रौढाचे दफन, इनामगाव.

(ब) ताम्रपाषाणयुग, उत्तर - जोर्वे कालखंडातील प्रौढाचे दफन, इनामगाव.

(क) ताम्रपाषाणयुग, जोर्वे कालखंड, राखी रंगाच्या मडक्यातील मुलाचे दफन, दायमाबाद.

फलक २० : (अ) ताम्रपाषाणयुग, विविध प्राण्यांसह मानवाचे चित्रण असलेला माळवा वर्गाचा रांजण, दायमाबाद.

(ब) ताम्रपाषाणयुग, मातीच्या डबीतील 'मातृका' मूर्ती : पूर्व - जोर्वे कालखंड, इनामगाव.

(क) ताम्रपाषाणयुग, 'मातृका' : पूर्व - जोर्वे कालखंड, नेवासे.

(ड) ताम्रपाषाणयुग, बैलावर आरूढ होणारी 'मातृका' : पूर्व - जोर्वे कालखंड, इनामगाव.

फलक २१ : (अ) ताम्रपाषाणयुग, 'रथ', दायमाबाद.

(ब) चाकावरील हत्ती, दायमाबाद.

(क) चाकावरील रेडा, दायमाबाद.

(ड) चाकावरील गेंडा, दायमाबाद.

फलक २२ : (अ) ताम्रपाषाणयुग, जोर्वे कालखंड लहान मुलाच्या दफनातील वाखाच्या धाग्यात ओवलेली तांब्याच्या मण्यांची माळ, चांडोली.

(ब) ताम्रपाषाणयुग, जळालेले सातूचे दाणे, इनामगाव.

(क) ताम्रपाषाणयुग, जळालेला वाटाणा, इनामगाव.

(ड) ताम्रपाषाणयुग, जळालेली खेसरी डाळ, इनामगाव.

फलक २३ : महापाषाण संस्कृती पांढरीचे टेकाड, टाकळघाट.

फलक २४ : (अ) महापाषाण संस्कृती शिळावर्तुळ, खैरवाडा.

(ब) महापाषाण संस्कृती, शिळेवरील उथळ गोल चिन्हे, रायपूर.

फलक २५ : (अ) महापाषाण संस्कृती, शिळावर्तुळातील वर्तुळ, भागीमाहरी.

(ब) महापाषाण संस्कृती, शिळावर्तुळातील चौकोन व मार्ग, भागीमाहरी.

**फलक २६ :** (अ) महापाषाण संस्कृती, शिळावर्तुळातील दगडी हौद (३), बोरगाव.

(ब) महापाषाण संस्कृती, शिळावर्तुळातील फरशांची पेटिका, रायपूर.

(क) फरशांच्या पेटीचे जवळून घेतलेले चित्र, रायपूर.

**फलक २७ :** (अ) महापाषाण संस्कृती, शिळावर्तुळातील शिळांची कुंडी रचना, रायपूर.

(ब) महापाषाण संस्कृती, मांडीवर कट्यार ठेऊन पुरलेला प्रौढ, माहूरझरी.

(क) महापाषाण संस्कृती, शळावर्तुळात बळी देऊन पुरलेल्या घोड्याचे दात व लोखंडी 'व्हटाळी', माहूरझरी.

**फलक २८ :** (अ) महापाषाण संस्कृती, काळी आणि तांबडी मडकी रंजाळे.

(ब) महापाषाण संस्कृती, काळी आणि तांबडी झाकणी, रंजाळे.

(क) महापाषाण संस्कृती, खापरावर कोरलेली चिन्हे, टाकळघाट - खापा.

**फलक २९ :** (अ) महापाषाण संस्कृती, एडक्याची आकृती माथ्यावर असलेली झाकणी, माहूरझरी.

(ब) महापाषाण संस्कृती, पक्ष्यांची आकृती असलेली झाकणी, माहूरझरी.

(क) १ ते ५ महापाषाणसंस्कृती, रंगीत खापरे, नैकुंड.

(ड) महापाषाण संस्कृती, खापरावर कोरलेला प्राणी, रायपूर.

**फलक ३० :** (अ) महापाषाण संस्कृती, शुध्द लोखंड तयार करण्याची भट्टी, नैंकुंड.

(ब) महापाषाण संस्कृती, दांड्यावर बसविण्यासाठी पट्टे असलेल्या लोखंडी कुऱ्हाडी, बोरगाव.

फलक ३१ : (अ) महापाषाण संस्कृती, लोखंडी छिन्न्या व पटाशी, माहूरझरी.
(ब) महापाषाण संस्कृती, लोखंडी खनित्रे, माहूरझरी.
(क) महापाषाण संस्कृती, लोखंडी विळा व रापी, बोरगाव.
(ड) महापाषाण संस्कृती, घोड्याच्या तोंडात बसविली जाणारी 'व्हटाळी', माहूरझरी.

फलक ३२ : (अ) महापाषाण संस्कृती, तांब्याचा वाडगा व कळ्या बसविलेली झाकणी, माहूरझरी.
(ब) महापाषाण संस्कृती, तांब्याची थाळी आणि 'पक्षी' झाकण, खापा.
(क) महापाषाण संस्कृती, लोखंडी पाते आणि तांब्याची मूठ असलेली कट्यार, माहूरझरी.
(ड) महापाषाण संस्कृती, तांब्याच्या झाकणीचे 'पुष्पशीर्ष', माहूरझरी.

फलक ३३ : महापाषाण संस्कृती, तांब्याच्या पत्र्याचे घोड्याच्या मुखावरील साज - (अ) रायपूर, (ब) खापा (टाकळघाट), (क) माहूरझरी,

फलक ३४ : (अ) महापाषाण संस्कृती, लोखंडी पिनांनी तीन भाग जोडलेला तांब्याचा गडवा, माहूरझरी.
(ब) महापाषाण संस्कृती, लोखंडी लोलक असलेल्या तांब्याच्या घंटा, माहूरझरी.
(क) महापाषाण संस्कृती, कोरीव नक्षी असलेल्या तांब्याच्या बांगड्या, माहूरझरी.
(ड) महापाषाण संस्कृती, सोन्याची गळसरी, माहूरझरी.
(इ) महापाषाण संस्कृती, सोन्याचा हार आणि पेंड, माहूरझरी.

फलक ३५ : (अ) पांढऱ्या रंगात नक्षी केलेले कार्नेलियनचे मणी, कौंडिण्यपूर.
(ब) महापाषाण संस्कृती, दगडी वत्ते, बोरगाव.
(क) महापाषाण संस्कृती, जळालेला तांदूळ, भागीमाहरी.

* * *

# प्रकरण १

# भूगोल, व्यक्तिमत्त्व, वैशिष्ट्ये

**म**हाराष्ट्राचा इतिहास आणि सांस्कृतिक जडणघडण समजून घ्यावयाची झाल्यास महाराष्ट्राचा भूगोल आणि भूरचनेची वैशिष्ट्ये लक्षत घेणे आवश्यक आहे. प्रत्येक प्रदेशाची आणि त्या प्रदेशात राहणाऱ्या लोकांची लक्षात येण्याजोगी काही वैशिष्ट्ये असतात. ही वैशिष्ट्ये त्या त्या प्रदेशातील नैसर्गिक घटकांशी संबध्द असतात. आजही आपण निरनिराळ्या प्रांतातल्या लोकांबद्दल काही समज त्याचप्रमाणे गैरसमज - मनात बाळगून असतो. यातील गैर भाग काढून टाकला तरी उरलेले समज कोणत्या कारणाने दृढ झालेले असतात याची पार्श्वभूमी जाणून घेणे आवश्यक असते. किंबहुना १९६० साली सध्याच्या महाराष्ट्र राज्याची निर्मिती मराठी भाषेच्या भावबंधाने झाली तरी महाराष्ट्रातल्या विविध भागातील लोकांचे एकमेकांबद्दल काही ठाम समज आजही दिसून येतात. कोकण, देश, मराठवाडा, विदर्भ आणि खानदेश या प्रदेशातील लोकांच्या काही लकबी किंवा त्यांची स्वभाव वैशिष्ट्ये (मनोमय संस्कृति) यांच्याबद्दल काही स्थूल, बरेवाईट समज आपल्यात घर करून आहेत. याचे कारण असे की, महाराष्ट्रातील जे वर उल्लेखिलेले स्थूल विभाग पडतात त्यांच्यामध्ये काही भौगोलिक म्हणजेच नैसर्गिक वैशिष्ट्ये आढळून येतात. सभोवतालच्या नैसर्गिक वातावरणामुळे त्या त्या विभागातील जीवनपद्धती आकार घेऊ लागतात आणि त्यातूनच प्रादेशिक, सांस्कृतिक वैशिष्ट्ये दृढ होत जातात.

दुसऱ्या शब्दात सांगावयाचे म्हणजे एखाद्या प्रदेशाची संस्कृति त्या भागाच्या भौगोलिक आणि भूशास्त्रीय वैशिष्ट्यांशी बऱ्याच प्रमाणात निगडीत असते. हे सूत्र ध्यानात ठेवून महाराष्ट्राच्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घ्यायचा

झाल्यास महाराष्ट्राच्या भौगोलिक वैशिष्ट्यांची विस्ताराने दखल घेणे आवश्यक आहे.

केवळ भौगोलिक दृष्टिकोनामुळे नव्हे तर इतरही काही बाबतीत महाराष्ट्राची काही उल्लेखनीय वैशिष्ट्ये आहेत. महाराष्ट्र विस्ताराने जसा मोठा आहे तसाच तो विविधतेनेही वैशिष्ट्यपूर्ण आहे. या राज्याचे क्षेत्रफळ ३,०७,६०९ चौ. कि. मी. इतके असून भूविस्ताराच्या दृष्टीने भारतातील हे तिसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. २२.१ आणि १६.४ अक्षंश (उत्तर) व ७२.६ आणि ८०.९ रेखांश (पूर्व) या मर्यादांमध्ये याचा प्रदेश सामावला असून याची लांबी उत्तर-दक्षिण ७२० कि. मी. आणि पूर्व-पश्चिम ८०० कि. मी. आहे. या विस्तृत प्रदेशामध्ये ७, ८९, ३७, १८७ लोक रहातात असे १९९१ ची जनगणना नोंद करते. सध्या हे राज्य तीस जिल्ह्यात वर्गीकृत करण्यात आलेले आहे. याशिवाय भारतातील, एक अत्यंत मोठ्या प्रमाणात औद्योगीकरण झालेले, नागरीकरण झालेले आणि देशांतर्गत अर्थकारणाचे केंद्र म्हणून महाराष्ट्राने लौकिक मिळविला आहे. ( India 1993 P.- 10 : Govt. of India )

स्थूलमानाने महाराष्ट्राच्या उत्तरेस गुजरात आणि मध्य प्रदेश, ईशान्येस आणि पूर्वेस अनुक्रमे मध्यप्रदेश आणि आंध्रप्रदेश, अग्नेयेस आणि दक्षिणेस आंध्रप्रदेश, आणि दक्षिणेस कर्नाटक आणि गोवा ही राज्ये येतात. पश्चिमेस अरबी समुद्र असून, किनारपट्टीची लांबी जवळजवळ ५६० कि. मी. आहे. महाराष्ट्राचे चटकन ध्यानात येणारे वैशिष्ट्य म्हणजे सह्याद्रीची रांग. सह्याद्री हा महाराष्ट्राचा कणा असून त्याने प्रागैतिहासिक काळापासून महाराष्ट्राच्या संस्कृतीला विविधांगी वळण दिले आहे. सह्याद्रीची मोजमापे इतकी विलक्षण, आहेत – ६४० कि. मी. लांबी, समुद्रसपाटीपासूनची उंची ८०० ते १००० मीटर – की त्याने महाराष्ट्राच्या नियतीची सूत्रे जणू काही आपल्यापाशीच ठेवलेली आहेत. कारण महाराष्ट्रातील पर्जन्यमान, झाड-झाडोरा आणि शेती यावर त्याची विलक्षण पकड आहे. त्याचप्रमाणे वास्तुशिल्पांनाही सह्याद्रीने आधार दिला आहे. शेकडो लेणी आणि अनेक किल्ले याने सामावून घेऊन जपले आहेत. ( देशपांडे १९७६ ; जोगळेकर १९५२; Dikshit 1986)

सर्वसाधारणपणे महाराष्ट्राचे दोन विभाग भूरचनेच्या संदर्भात पडतात. यातील पहिला म्हणजे पश्चिमेची कोकणची काहीशी अरूंद पट्टी आणि तिच्या पूर्वेला, ज्याला देश असे म्हटले जाते, असा पठाराचा दुसरा विभाग. किनारपट्टी सुमारे ५० ते ६५ कि. मी. रूंद आहे, तर तिच्या मानाने पठारी प्रदेश फारच विस्तृत आहे. या पठाराची उत्तर मर्यादा पूर्व-पश्चिम पसरलेल्या सातपुडा पर्वतराजींनी सीमित केली आहे. सह्याद्रीच्या मानाने सातपुडा रांग खूपच लहान आहे. महाराष्ट्रातील सातपुड्याची लांबी सह्याद्रीच्या लांबीच्या जवळ जवळ एक तृतीयांश आहे आणि सर्वसाधारण उंची ६०० - ७०० मीटर या परिमाणामध्ये स्थिरावली आहे. भारताची प्राचीन काळात 'उत्तरापथ' आणि 'दक्षिणापथ' अशी विभागणी करणारी नर्मदा सातपुडा पर्वतराजीच्या उत्तरेस आहे.

महाराष्ट्राची भूरचना पाहिली तर असे लक्षात येते की या राज्याचा बराच मोठा भाग, विशेषतः पठाराचा भाग 'ट्रॅप' किंवा कृष्णप्रस्तर प्रकारात समाविष्ट होतो. फरक दिसून येतो तो प्रामुख्याने पूर्व विदर्भामध्ये, म्हणजे भंडारा, नागपूर, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यात. वर्धा नदीच्या तीराजवळ ट्रॅप संपतो. या प्रदेशात विविध तऱ्हेचे प्रस्तर आढळून येतात. धारवाड वर्गाचे, ग्रॅनाईट-नीस वर्गांचे, गोंडवन वर्गाचे, कलडगी वर्गाचे, विंध्य वर्गाचे असे विविध प्रस्तरप्रकार येथे आढळून येतात. यामुळे हा भाग दख्खनच्या पठारापेक्षा प्रस्तररचनेच्या दृष्टीने वेगळा वाटतो. ट्रॅप आणि या प्रदेशातील प्राचीन खडक यांच्या 'संधिप्रदेशात' विविध खाणी आढळतात. या विविध प्रस्तरांचा उपयोग महापाषाणयुगीन लोकांनी (इसवी सन पूर्व सुमारे १०००) दफनांच्या रचनेमध्ये करून घेतला हे पुढे स्पष्ट केले जाईल. (फलक १) (देशपांडे १९७६ ; जोगळेकर १९५२; Dikshit 1986 )

महाराष्ट्राचा बराच भाग ट्रॅप (कृष्ण) प्रस्तरांचा असला तरी महाराष्ट्राचे दोन स्पष्ट विभाग दिसून येतात, याचा उल्लेख याआधी केलेला आहेच. कोकणची पट्टी आणि देश हे ते दोन विभाग होत. पठारी विभागामध्ये प्रामुख्याने उल्लेखनीय अशा चार नद्यांच्या (तापी, वैनगंगा, गोदावरी, कृष्णा)

खोऱ्यांचा समावेश होतो. प्राचीन महाराष्ट्रातील मानवी वस्ती या नद्यांच्या खोऱ्यात झाल्याचे आढळते. पाषाणकाळापासून ते इ. पू. सातव्या-आठव्या शतकापर्यंत आणि त्यानंतरच्या ऐतिहासिक कालातही निरनिराळ्या नद्यांची खोरी वसाहतीसाठी उपयुक्त ठरल्याचे दिसून येते. महाराष्ट्राचा पठारी प्रदेश लाव्हानिर्मित असून जवळजवळ ५ लक्ष चौरस मीटर व्याप्तीचा आहे. हा ट्रॅप वर्गांचा खडक सर्वसाधारणपणे ६५० ते १,५०० मीटर जाडीचा असला तरी काही ठिकाणी तो ३,००० मीटर इतका जाड असल्याचे दिसून येते. या प्रस्तरातून अनेक नद्या नागमोडी वळणे घेत बहुतांशी पूर्वेकडे आणि दक्षिणेकडे वाहतात. याला अपवाद फक्त तापी नदीचा. ही नदी पश्चिम-वाहिनी असून, याचे कारण की ही पश्चिम समुद्राला मिळण्यात सह्याद्रीची अडचण येत नाही. या उलट कोकणपट्टीतील नद्या पश्चिम वाहिनी असून त्या क्वचितच बारमाही वाहणाऱ्या आहेत. कोकण विभागामध्ये पाषाणयुगात आणि त्यानंतरही बऱ्याच काळापर्यंत वस्ती झाली नाही, हे या संदर्भात समजून घेणे आवश्यक आहे. ( Dikshit 1986 ; देशपांडे १९७६ )

## कोकण

अरबी समुद्र एका बाजूस आणि उत्तुंग सह्याद्रीच्या रांगा दुसऱ्या बाजूला अशा दोन नैसर्गिक घटकांमध्ये कोकणची किनारपट्टी अडकली आहे. कोकणपट्टीचे सर्वसाधारणपणे दोन विभाग करण्यात येतात. 'उत्तर-कोकण' ५६० कि. मी. लांबीचे असून, दमण ते वेंगुर्ले या भागाचा यात समावेश होतो. वेंगुर्ल्याच्या दक्षिणेस असणारा कोकणचा भाग महाराष्ट्रात समाविष्ट होत नाही. विषम, उंचसखल जमीन, खोल दऱ्या आणि बहुतांशी पावसाळी नद्या ही कोकणची वैशिष्ट्ये सांगता येतील. कोकणपट्टी गाळ - निर्मित असून यातील मुख्य नद्या वैतरणा आणि उल्हास या आहेत. समुद्रावरून येणारे मोसमी वारे सह्याद्रीची भिंत थोपवून धरते आणि त्यामुळे कोकण हा महाराष्ट्रातला सगळयात जास्त पावसाचा (सुमारे १,५०० ते ३,५०० मि. मी. - दक्षिणेकडे जास्त ) प्रदेश ठरलेला आहे. सह्याद्रीतील घाट आणि खिंडी यांच्या साहाय्याने देश आणि कोकण जोडले जातात. यातील सर्वात उल्लेखनीय घाट जुन्नर जवळील नाणेघाट असून या घाटातून सरळ

तळकोकणात उतरता येते. सातवाहनांच्या काळामध्ये याचा वापर सार्थवाहांचे तांडे करीत असत. उत्तर कोकण अथवा 'अपरान्त' यामध्ये कलियान (कल्याण), चेऊल (चौल), शूर्पारक (सोपारा) ही प्रख्यात बंदरे होती आणि यांच्यातून देशांतर्गत आणि परदेशी व्यापार होत असे.

**पठारी देश विभाग**

सह्याद्री आणि सातपुडा पर्वतराजी धुळ्याच्या वायव्येला एकमेकांशी मिळतात. सह्याद्रीच्या शाखा-प्रशाखा अनेक असल्या तरी त्यांची पूर्व-पश्चिम लांबी फारशी आढळून येत नाही. याला अपवाद फक्त बालाघाटचा आहे. नाशिकच्या उत्तरेपासून ते पूर्वेकडे पार यवतमाळ - चंद्रपूर पर्यंत बालाघाटच्या शाखा पसरलेल्या दिसतात. मात्र ही श्रेणी सह्याद्रीशी निगडीत आहे. या पठाराच्या नद्यांच्या खोऱ्यात फार प्राचीन काळापासून मानवी वसाहती झाल्या, यातील प्रमुख नद्यांची खोरी खालीलप्रमाणे आहेत :– (फलक २)

**तापी-पूर्णा खोरे**

दक्षिणेला सह्याद्री आणि उत्तरेला सातपुडा यांच्यामध्ये हा विभाग येतो. तापीच्या खोऱ्यामध्ये सध्याचा खानदेश आणि पश्चिम विदर्भाचा काही भाग येतो. दख्खनचे पठार आणि मध्य भारत (माळवा) या दोहोमधली ही संक्रमण भूमी आहे. पूर्णेचे खोरे मात्र विदर्भातच समाविष्ट होते. तापी-पूर्णा खोरे उत्कृष्ट काळ्या सुपीक जमिनीने समृध्द असल्याने तापीच्या खोऱ्यात वसाहती करण्यास विविध संस्कृतीचे लोक प्राचीन कालापासून आकृष्ट झाले. तापीच्या खोऱ्यामध्ये उत्तर - हडप्पा संस्कृतीच्या, गुजरातमधील रंगपूर संस्कृतीच्या त्याचप्रमाणे मध्य प्रदेशातील माळवा संस्कृतीच्या लोकांनी वसाहती केल्या. आजही हा भाग शेतीच्या दृष्टीने समृध्द आहे.

**वर्धा-वैनगंगा खोरे**

अमरावतीच्या पूर्वेचा भाग यात समाविष्ट होतो. वर्धा नदी ही या खोऱ्याची सीमा असून ट्रॅप प्रस्ताराचीसुध्दा ही पूर्वेकडील सीमा आहे. याच्या पूर्वेस विविध प्रकारचे प्राचीन प्रस्तर दिसून येतात. पूर्व - विदर्भ, प्रस्तररचनेच्या

दृष्टीने, दख्खनच्या एकसंघ ट्रॅप प्रस्तराच्या पठारापासून वेगळा आहे. यामुळेच हा भाग विविध खनिज संपत्तीने समृध्द आहे. वर्धा-वैनगंगा खोरे प्रदेश - ठेवणीच्या दृष्टीनेही पठारी प्रदेशापेक्षा वेगळा आहे. हा प्रदेश उंचसखल असून यामध्ये अनेक कृत्रिम तळी आढळून येतात. पर्जन्यमानाच्या दृष्टीनेही या खोऱ्यात पठारी प्रदेशापेक्ष जास्त पाऊस पडतो. आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या प्रदेशात आदिवासींची - गोंड, हळबी, कोलाम - संख्या मोठी आहे.

### गोदावरी-प्रवरा खोरे

पठारी प्रदेशात गोदावरी आणि कृष्णा या दोन प्रमुख नद्या आहेत. यांना अनेक छोट्या-छोट्या नद्या येऊन मिळतात. यातील गोदावरी ही खऱ्या अर्थाने 'महाराष्ट्राची' आहे. याचे कारण असे की ही नाशिकजवळ उगम पावली तरी पार मराठवाड्यातील नांदेडपर्यंत वाहात जाऊन, पुढे आंध्रात जाते. वर्धा, वैनगंगा, प्रवरा इत्यादी नद्या गोदावरीशी निगडीत आहेत. गोदावरीच्या काठी पैठण (प्राचीन प्रतिष्ठान) सारखी विख्यात नगरे होती. पैठण सातवाहनांची राजधानी, व्यापार उद्योगाचे केंद्र आणि समृध्द नगर म्हणून वाङ्मयामध्ये ख्याती पावलेले आहे.

गोदावरी खोरे सुपीक असले तरी पर्जन्यमानाच्या दृष्टीने ते फारसे समृध्द नाही. परंतु तापी-पूर्णा खोरे किंवा वर्धा-वैनगंगा खोरे यांच्या मानाने ते सांस्कृतिकदृष्ट्या जास्त एकसंध आहे. गोदावरी आणि प्रतिष्ठान (पैठण) यांचे अद्वैत प्रख्यात आहे. गोदावरी खोरे पाषाण कालापासून ते ऐतिहासिक कालापर्यंत मानवी वस्त्यांच्या स्थलांच्या संख्येत विख्यात झालेले आहे. पाषाणयुगीन मानवाची दगडी हत्यारे, नामशेष झालेल्या प्राण्यांचे अश्मीभूत अवशेष आणि ताम्रपाषाणयुगीन कालातल्या असंख्य वस्त्या याची साक्ष देतात.

### कृष्णा खोरे

वर उल्लेखिल्याप्रमाणे गोदावरी आणि कृष्णा या महाराष्ट्राच्या मुख्य नद्या असल्या तरी कृष्णा ही दक्षिणेला असल्यामुळे तिचा गोदावरीप्रमाणे

महाराष्ट्राच्या विस्तृत भूभागाशी संबंध येत नाही. घोड, मुळा-मुठा, भीमा, कोयना या कृष्णेशी संबद्ध असल्यातरी कृष्णेचा प्रभाव प्रामुख्याने सातारा, सांगली, कोल्हापूर या दक्षिण महाराष्ट्रातील भागाशी जास्त आहे. गोदावरी खोऱ्याच्या मानाने कृष्णेच्या खोऱ्यातील पर्जन्यमान जास्त आहे. त्यामुळे हा भाग तुलनात्मकदृष्ट्या समृध्द वाटतो. (देशपांडे १९७६)

महाराष्ट्रात पठारी ट्रॅप प्रस्तराव्यतिरिक्त एक-दोन वैशिष्ट्यपूर्ण प्रस्तर प्रकार आढळून येतात. यातील एक 'जांभाचा' (लॅटराईट) खडक म्हणून ओळखला जातो. हा लाल रंगाचा दगड बांधकामामध्ये उपयुक्त ठरतो. त्याचप्रमाणे यामध्ये लोखंड आणि ॲल्युमिनियमसुध्दा उपलब्ध होते. प्रामुख्याने कोकणपट्टीत आणि पूर्णेच्या खोऱ्यात हा प्रस्तर सापडतो. ट्रॅप प्रस्तराचे आणखी एक वैशिष्ट्य महाराष्ट्रात आढळून येते. याला इंग्रजीमध्ये 'डाइक' आणि मराठीमध्ये 'कार' अशी संज्ञा आहे. शिलारसाने - लाव्हा - भरलेली भेग असे याचे वर्णन केले जाते. या प्रस्तराचा पोत उत्कृष्ट असल्याने, याच्या बाजूचे निकृष्ट खडक वाहून गेले तरी 'कारी' अभेद्य राहातात. या कारी डोलेराईट किंवा 'बसाल्ट' या वर्गाच्या असतात. यांचा उपयोग महाराष्ट्रातील पाषाणयुगीन मानवाने हत्यारे बनविण्यासाठी केला.

### हवामान व पर्जन्यमान

महाराष्ट्राच्या विविध भागामध्ये हवामान व पर्जन्यमान यांच्यामध्ये बरीच विविधता आढळून येते. कोकणामध्ये दमट परंतु समशीतोष्ण, पठरावर कोरडी, तर तापी खोरे आणि वर्धा वैनगंगा खोरे म्हणजे खानदेश आणि विदर्भ यामध्ये तीव्र फरकाचे हवामान आढळून येते. खानदेश आणि विदर्भात तीव्र उन्हाळा, तीव्र हिवाळा त्याचप्रमाणे जास्त पावसाळा आढळून येतो. कोकणामध्ये पावसाळ्यात जास्त पर्जन्यमान तर पठारावर एकदम कमी. याउलट विदर्भात पूर्वेकडील आणि पश्चिमेकडील अशा दोन्ही मोसमी वाऱ्यापासून पाऊस पडतो. परंतु सर्वसाधारणपणे, महाराष्ट्रातील पर्जन्यमान अत्यंत अनियमित आणि लहरी आहे. त्यामुळे मोसमी वारे आणि सह्याद्री हे दोन घटक महाराष्ट्रातील लोकजीवन नियंत्रित करीत आलेले आहेत.

पुरा-पर्यावरण शास्त्रज्ञांनी असे मत मांडले आहे की ४० ते ५० हजार वर्षांपूर्वीसुध्दा महाराष्ट्रातील विविध भागामध्ये सर्वसाधारणपणे आजच्या इतकेच पर्जन्यमान होते. दुसरे असे की हिमयुगातील घटनांचा महाराष्ट्रामध्ये काहीही परिणाम झालेला नाही. आणि तिसरे म्हणजे पश्चिम किनारपट्टीचा समुद्र काहीसा मागे हटला आहे. कारण, नालासोपारा, कल्याण आणि चौल सारखी प्राचीन कालातील बंदरे आता बंदरे राहिली नाहीत. ( Rajaguru 1969, 1971 ; पप्पू १९८३-८४ )

वर उल्लेखिलेल्या भौगोलिक वैशिष्ट्यांचा विचार केला तर सध्याचा महाराष्ट्र 'उत्तरापथ' आणि 'दक्षिणापथ' या दोहोतील सांस्कृतिक वैशिष्ट्ये आत्मसात केलेला आढळून येतो. उत्तरेकडून त्याचप्रमाणे पूर्वेकडून आणि दक्षिणेकडून महाराष्ट्रात लोक आणि लोकरीती येत राहिल्या. यांचे प्रत्यंतर महाराष्ट्रीय लोकांच्या चालीरीती, सण-उत्सव, क्रियाकाण्ड, भाषिक भेद आणि वांशिक गटांची पखरण यामध्ये दिसून येते. ही वैशिष्ट्ये आजही दिसून येतात. कोकण, देश, खानदेश आणि विदर्भ या महाराष्ट्राच्या भागात काही प्रादेशिक वैशिष्ट्ये दिसून येतात. याचे स्पष्टीकरण करण्याचे प्रयोजन नाही. १९६० साली भाषावार प्रांतरचनेत मराठी भाषेचे हे विविध प्रादेशिक घटक एकत्र आणले गेले तरी मराठी भाषासुध्दा प्रादेशिक वैशिष्ट्ये दाखविते. याचे प्रत्यंतर उत्तरेकडील खानदेशचा विभाग व पूर्वेकडील विदर्भ प्रदेश, दक्षिण विदर्भात आंध्रला लागून असलेला विभाग, मराठवाड्यातील जुन्या हैद्राबादमध्ये असलेला प्रदेश आणि सोलापूर-अक्कलकोट वगैरे कर्नाटकला लागून असलेला प्रदेश यात अनुभवता येते. या प्रभावांची प्राचीनता केवळ ऐतिहासिक काळातील नसून, ती ताम्रपाषाणयुगाइतकी मागे नेता येते. याशिवाय महाराष्ट्रातील विविध घटकांच्या भौगोलिक वैशिष्ट्यांनीही त्या त्या प्रदेशातील लोकांच्या जीवनपध्दतीवर प्रभाव पाडल्यामुळे आणखी काही सांस्कृतिक वैशिष्ट्ये स्पष्ट होतात. आधी उल्लेखिल्याप्रमाणे कोकणातील लोक, देशावरील लोक, विदर्भातील लोक आणि खानदेशमधील लोक यांच्या भाषेची, सवयींची, स्वभावाची आणि चालीरितींची वैशिष्ट्ये असली तरी ती अकारण फुगविण्याचे काहीही प्रयोजन दिसत नाही. इरावती कर्वे म्हणतात

त्याप्रमाणे वस्तुरूप संस्कृति आणि मनोमय संस्कृति ही दोन अंगे परस्परपूरकच असतात.

आजचा मराठी भाषेने एकत्र बांधलेला महाराष्ट्र प्राचीन काळात राजकीयदृष्ट्या एकसंध नव्हता हे लक्षात घेतले पाहिजे. अपरान्त, अश्मक, विदर्भ, मूलक वगैरे निरनिराळे विभाग ऐतिहासिक काळातील पुराभिलेखात त्याचप्रमाणे प्राचीन वाङ्मयामध्ये उल्लेखिलेले आहेत. त्यामुळे गुजरातपेक्षा महाराष्ट्रातील लोकांची शारीरीय मापे विभिन्न असून त्यामध्ये अनेक वंशाचे आणि वांशिक वैशिष्ट्यांचे मिश्रण झाल्याचे दिसून येते, असे इरावती कर्वे सांगतात, (कर्वे १९६२)

हे मिश्रण महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणावर दिसून येते. महाराष्ट्रामध्ये अडीचशेहून जास्त जाती-पोटजातीचे लोक आढळून येतात. यावरून महाराष्ट्रातील सरमिसळीची कल्पना येऊ शकते. यातील अगदी लहान घटक आदिवासींचा आहे. वारली, भिल्ल, गोंड, कोलाम, कोरकू इत्यादी आदिवासी बहुतांशी सध्याच्या महाराष्ट्राच्या सीमाभागात जास्त आढळून येतात. यातले वारली ठाणे, नाशिक आणि खानदेश यामध्ये, भिल्ल प्रामुख्याने सातपुडा विभागामध्ये, कोलाम आणि गोंड विदर्भात व कोरकू हे सातपुड्याच्या पठारी प्रदेशात आढळतात. याशिवाय वंजारी हीही एक जमात महाराष्ट्रात आणि आंध्रमध्ये आढळून येते. यांच्या भाषाही वेगवेगळ्या भाषागटांच्या आहेत. उदाहरणार्थ, विदर्भातले कोलाम द्रवीड गटातील बोलीभाषा वापरतात. कोरकू हा मुंडा आदिवासींचा गट समजला जातो आणि त्यांची भाषाही मुंडा भाषेशी संलग्न आहे. भिल्ल, वारली, कोळी, ठाकूर या उत्तर कोकणात आणि सातपुडा विभागात राहणाऱ्या जमातींची भाषा इण्डोआर्यन भाषागटाशी संबध्द आहे, असे काही भाषातज्ञांचे मत आहे. खानदेशातल्या अहिराणी भाषेबद्दल त्याप्रमाणे डांगीबद्दल असे दिसून येते की त्यांच्यामध्ये गुजराती आणि मराठी यांचे मिश्रण आहे. कोकणातल्या कोकणीबद्दलही मतभेद आहेत. 'रत्नागिरी कोकणी' आणि 'कारवारी कोकणी' असे कोकणीचे भेद आहेत. प्राकृतातील महाराष्ट्रीचा मराठीशी निकटचा संबंध आहे. महाराष्ट्रीत लिहिलेले अनेक ग्रंथ उपलब्ध आहेत. इसवी सनाच्या सुमारे आठशेच्या सुमारास होऊन गेलेल्या

कोऊहल या लेखकाने महाराष्ट्रीचा 'मरहट्ट-देसी भाषा' असा उल्लेख केलेला आहे. श्रवणबेळगोळ (कर्नाटक) येथे इसवी सन ९८३ मध्ये कोरलेला मराठीतील आद्य लेख प्रख्यात आहे.

या विविधतेमुळे 'महाराष्ट्राचा' उल्लेख फारसा प्राचीन नाही. 'महाराष्ट्र धर्म' ही संज्ञा १७ व्या शतकाच्या आधी आढळून येत नाही. असे असले तरी सध्याच्या महाराष्ट्राचा समावेश दक्षिणापथातच केला जात होता याबद्दल शंका घेण्याचे कारण नाही. रामायण-महाभारतामध्ये महाराष्ट्राचा उल्लेख नाही. विदर्भाचे उल्लेख मात्र प्राचीन आहेत. अथर्ववेदाच्या एका परिशिष्टामध्ये 'महाराष्ट्र' ही संज्ञा आलेली असली तरी हे परिशिष्ट नंतर जोडण्यात आलेले आहे. याउलट विदर्भ, अश्मक, मूलक, कुन्तल, अपरान्त यांचे उल्लेख महाभारतामध्ये आढळून येतात. महाराष्ट्राचा उल्लेख मार्कण्डेय आणि वायु पुराणात येत असला तरी या पुराणांची कालनिश्चिती करणे अवघड आहे. कारण यांचे लिखाण एककालिक नाही.

यादृष्टीने पाहता आपल्याला मौर्य काळामध्ये म्हणजे इसवी सनपूर्व ३ ऱ्या शतकामध्ये जावे लागते. अशोकाच्या प्रस्तर लेखात 'रट्ठिक' (राष्ट्रीक) यांचा उल्लेख येतो. यानंतर 'महावंश' या प्राचीन बौध्द ग्रंथामध्ये (इसवीचे ५ वे शतक) असे नमूद केलेले आहे की पाटलीपुत्र संगीतीने बौद्धधर्माचा प्रसार करण्यासाठी 'महारट्ट' विभागात महाधर्मरक्षक या प्रचारकाला, तर धर्मरक्षित या यवनाला (आयोनियन ग्रीक) 'अपरान्तात' (उत्तर कोकण) पाठविले. सातवाहनांच्या कालातील 'महारठी' ही संज्ञा अधिकाऱ्यांच्या संदर्भात वापरली गेली असे दिसते. मध्यप्रदेशातील सागर जिल्ह्यात असलेल्या एरण येथे इसवी सन ३६५ या वर्षातील एक स्तंभलेख आहे. त्यामध्ये सेनापती सत्यनाग याने स्वतःला महाराष्ट्राचा प्रमुख असे म्हटलेले आहे. यानंतरचा उल्लेख वराहमिहिराच्या (इसवीचे सहावे शतक) बृहत्संहितेत येतो. महाराष्ट्राचा निर्विवाद असा निर्देश बदामी चालुक्य राजघराण्यातील पुलकेशी, दुसरा याच्या कर्नाटकातील ऐहोळे येथील इसवी ६४३ च्या शिलालेखामध्ये आलेला आहे. या लेखामध्ये 'तीन महाराष्ट्रकांचा' उल्लेख आहे. या तीन महाराष्ट्रकांबद्दल विद्वानात एकमत नाही. काहींच्या मते विदर्भ, अपरान्तक

आणि दण्डकारण्य असे हे तीन विभाग असावेत, तर काहींच्या मते विदर्भ, कोकण वगळून पश्चिम महाराष्ट्र आणि कुंतल हे ते तीन विभाग असावेत. विदर्भ आणि 'अपरान्तक' यांचे उल्लेख बऱ्याच वेळा स्वतंत्रपणे येतात हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र हा शब्द कसा बनला याबद्दल विविध मते मांडली गेली आहेत. महाराष्ट्राचा जरी नाही तरी त्यातील काही भागांचा, स्थलांचा, लोकांचा आणि काही वैशिष्ट्यांचा उल्लेख वाङ्मयात आणि शिलालेखात आढळून येतो. प्राचीन लेखात 'रट्ठि', 'महारठी', 'महारठिणी' यांचे उल्लेख येतात हे या आधी सांगितले आहेच. मध्यप्रदेशातील भारहूत, सांची इत्यादी ठिकाणच्या उत्कीर्ण लेखात नाशिक, भोगवर्धन (भोकरधन) इत्यादींचा उल्लेख आढळतो. पतञ्जलीच्या महाभाष्यामध्ये नाशिक आणि विदर्भ यांचा उल्लेख आहे, तर 'पेरिप्लस' या ग्रंथात आणि टॉलेमीच्या भूगोलविषयक वर्णनात पैठण, कल्याण, तेर, सोपारा इत्यादी स्थलांचा व्यापारी मार्गाच्या संदर्भात उल्लेख केलेला आहे. युआन श्वांग (सातवे शतक) आणि कोऊहल (इसवी सुमारे आठशे) यांच्या लिखाणात महाराष्ट्र, महाराष्ट्रातील लोक आणि महाराष्ट्रातील भाषा याबद्दल मजेदार उल्लेख आहेत. 'महाराष्ट्र' या शब्दाच्या उत्पत्तीबद्दल डिसकळकर सांगतात् : महाराष्ट्र यातील राष्ट्र हा शब्द देशवाचक नाही, समाजवाचक आहे. मूळ शब्द रट्ट किंवा रठ्ठ हा आर्येतर देशी शब्द आहे व तो जातिवाचक आहे ..... पुढे रट्ट, रठ्ठ याचे महारट्ट, महारठ्ठ असे रूप झाले, जसे भोज याचे महाभोज. महारठ्ठ याचे संस्कृतीकरण होऊन महाराष्ट्र असे रूप झाले. महाराष्ट्रांचा म्हणजे महाराष्ट्र लोकांचा जो देश तो महाराष्ट्र. प्रथम महारठ्ठ किंवा महाराष्ट्र देशालाच महाराष्ट्र म्हणत. तो देश लहान होता ..... विदर्भ, भोगवर्धन, मूलक, अश्मक, शूर्पारक, नासिक्य ही जनपदे त्यावेळच्या महाराष्ट्राच्या बाहेर होती. त्यावेळी अपरान्त म्हणजे कोकण व कुन्तल म्हणजे दक्षिण महाराष्ट्र हे भाग तर महाराष्ट्रात मोडले जात नव्हते. तेव्हा रठ्ठांचा महाराष्ट्र किती लहान होता याची कल्पना येईल. याच्याउलट मोल्सवर्थ (मराठी शब्दकोश) आणि विल्सन (Ind. Ant. 3, p. 211) महाराष्ट्राची व्युत्पत्ती 'महार' या संज्ञेशी लावतात. महाराष्ट्र म्हणजे महार

लोकांचे राष्ट्र किंवा देश अशी फोड केली जाते. परंतु 'महारराष्ट्र' आणि 'महाराष्ट्र' यांची भाषिक दृष्ट्या सुसंगती लावता येत नाही.

महाराष्ट्रात राहणाऱ्या लोकांच्याबद्दल प्राचीन वाङ्मयात त्याचप्रमाणे प्राचीन ऐतिहासिक काळात आलेल्या प्रवाशांनी काही वर्णने लिहून ठेवली आहेत. 'पेरीप्लस' या ग्रंथात त्याचप्रमाणे टॉलेमी याने (इसवी सन दुसरे शतक) लिहिलेल्या ग्रंथामध्ये महाराष्ट्रातील प्राचीन बंदरांची , व्यापारी मार्गांची त्याचप्रमाणे अंतर्गत व्यापारी केंद्रांची माहिती दिलेली आहे. यानंतर वात्स्यायन (इसवी सन तिसरे शतक), भरतमुनि (इसवी सन दुसरे शतक ते इसवी सन तिसरे शतक), वराहमिहीर (इसवी सन सातवे शतक), दण्डिन् (इसवी सन आठवे शतक) आणि राजशेखर (इसवी सन नववे - दहावे शतक) यांच्या ग्रंथामध्ये महाराष्ट्राबद्दलचे काही उल्लेख आढळून येतात. (केतकर १९३५ ; जोगळेकर १९५२ ; डिसकळकर १९६४ ; Bhagwat 1977 )

यापैकी दोन लेखकांचे उल्लेख येथे विस्ताराने करणे मनोरंजक ठरेल. इसवी सन सातव्या शतकामध्ये भारतात आलेल्या युवान श्वांग याने महाराष्ट्रात राहणाऱ्या लोकांबद्दल आपले मत लिहून ठेवले आहे. हा प्रवासी महाराष्ट्रामध्ये इसवी सन ६४१ च्या सुमारास आला. त्यावेळी बदामी चालुक्य घराण्याचा पुलकेशी दुसरा राज्य करीत होता. युवान श्वांग लिहितो –

> "राजधानीचा घेर तीस ली म्हणजे सहा मैल असून तिच्या पश्चिमेला एक मोठी नदी आहे. या प्रदेशातील जमीन अत्यंत सुपीक आणि समृध्द आहे. तिची मशागत नियमितपणे केली जाते आणि तिच्यातून भरपूर पीक येते. येथील हवामान उष्ण आहे. येथील लोक स्वभावाने साधे आणि प्रामाणिक आहेत. ते उंच बांध्याचें असून स्वभावाने तापट आणि खुनशी आहेत. उपकारकर्त्याबद्दल ते कृतज्ञ असतात, परंतु शत्रूच्या बाबतीत निर्दय असतात. त्यांचा अपमान झाला तर त्याचा बदला घेण्यासाठी ते आपला प्राणही धोक्यात घालतात. आपद्ग्रस्ताला मदत करताना ते स्वतःलाही विसरून जातात .... युध्दामध्ये एखाद्या सेनापतीचा पराभव झाला तर त्याला शिक्षा करण्याऐवजी स्त्रियांची वस्त्रे अर्पण करतात .... लढाई सुरू

करण्याआधी ते मद्य पितात आणि मग एक एक माणूस भाल्याच्या सहाय्याने दहा हजार शत्रूंशी मुकाबला करतो .... (राजा) क्षत्रीय जातीचा असून त्याचे नाव पुलोकिशे (पुलकेशी) असे आहे .... या राज्यात सुमारे शंभर संघाराम असून त्यामध्ये पाच हजार श्रमण रहातात. ते महायान आणि हीनयान या पंथांची उपासना करतात .... या प्रदेशात सुमारे शंभर देवमंदिरे असून त्यामध्ये अनेक निरनिराळ्या पंथाचे अनेक उपासक राहतात. ''

इसवी सन सुमारे ८०० मध्ये कोऊहल या कवीनेहि महाराष्ट्राबद्दल माहिती लिहिलेली आहे. त्याने स्वतः रचलेल्या ' लिलावई ' या काव्याची भाषा ' मरहट्ट-देसी-भासा ' आहे असे सांगून तो पुढे म्हणतो की महाराष्ट्र धान्याच्या विपुलतेमुळे सर्व जनांना आनंद देणारा देश आहे. चांगली घरे, पुष्ट गोधन, मद्यपान करणारे लोक आणि स्वच्छ चांदण्या रात्री, ही इतर वैशिष्ट्ये सांगून गवळ्यांचा देश असे महाराष्ट्राचे वर्णन त्याने केलेले आहे. याउलट आठव्या शतकातील 'कुवलयमाला' हा ग्रंथ लिहिणारा जैन पंडित उद्योतनसूरि असे सांगतो की 'बळकट, ठेंगणे, सावळे, अभिमानी, भांडखोर आणि दिण्णले-गहिले' असे बोलणारे म्हणजे मरहट्ठे. जैनांच्या प्राकृत वाङ्मयामध्येसुध्दा पैठणच्या सातवाहनांची, त्याचप्रमाणे महाराष्ट्र,आणि कोकण येथील रहिवाश्यांची काही वैशिष्ट्ये उल्लेखिलेली आहेत. कोकणात पाऊस खूप पडतो आणि तेथे डास खूप आहेत अशी माहिती 'आचारांग चूर्णि' आणि ' सूत्रकृतांग टीका ' देतात. महाराष्ट्रात दारूची दुकाने ( रसापण ) खूप आहेत आणि ती ओळखू येण्यासाठी त्यावर निशाणे लावण्याची पध्दत आहे असे ' बृहत्कल्पसूत्रभाष्य ' सांगते. सगळ्यात लक्षात राहणारा शेरा व्यवहारसूत्रभाष्यामधे आढळतो. महाराष्ट्रात जन्मलेल्या लोकांपैकी शंभरात एखादाच बडबड्या नसलेला आढळतो असे उल्लेखिलेले आहे. हीच परंपरा सतराव्या शतकापर्यंतही प्रचलित होती, असे दिसते. आठराव्या शतकातील ' विश्वगुणादर्शचंपू ' या ग्रंथाचा लेखक व्यंकटाध्वरी सांगतो की महाराष्ट्रातील लोक धार्मिक वृतीचे, आतिथ्य दाखविणारे तसेच शूर आहेत .... लोकांना जेवू घालणे आणि काहीतरी निमित्त शोधून उत्सव साजरे करणे हे यांचे

वैशिष्ट्य .... महाराष्ट्रात अगदी थोड्या प्रयत्नाने खूप मोठी प्रतिष्ठा मिळविता येते आणि म्हणून अल्पबुध्दीचे लोकही येथे विद्वान म्हणून प्रतिष्ठा मिळवितात. ( Jain 1947 ; Inf. from Bahulkar )

अशा या महाराष्ट्राच्या इतिहासाची मांडणी करण्यासाठी निरनिराळ्या प्रकारची विपुल साधने उपलब्ध आहेत. संस्कृत, प्राकृत – विशेषतः महाराष्ट्री व अपभ्रंश वाङ्मय, सह्याद्रीच्या लेण्यामध्ये कोरलेले शेकडो लेख, त्याचप्रमाणे उपलब्ध अनेक ताम्रपट, विविध राजघराण्यांची नाणी, इसवीच्या प्रारंभीच्या काळात लिहिली गेलेली ग्रीक आणि रोमन प्रवाशाची प्रवासवर्णने त्याचप्रमाणे नंतरच्या काळातील फाहियान, युवान श्वांग आणि अल् मसूदी, अल् बेरूणी, इब्न बतूता इत्यादींचे ग्रंथ विपुल माहिती उपलब्ध करून देतात.

परंतु या सर्वात गेल्या ४०-५० वर्षांमध्ये जे पुरातत्वीय संशोधन झाले ते महाराष्ट्राचा सलग इतिहास उभा करण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठरलेले आहे. पाषाण काळापासून ते लिखित पुरावा उपलब्ध होण्याच्या कालापर्यंत मानवाच्या सांस्कृतिक जीवनाचा आलेख विविध उत्खननांनी आणि समन्वेषणाने. उपलब्ध करून दिलेला आहे. त्यामुळे सुमारे दीड लाख वर्षांपासूनचा वृत्तान्त जवळजवळ सलगपणे उभा करता आलेला आहे. ही सर्व साधने इतकी विपुल आहेत की त्यांची स्थूलमानाने दखल घेण्याशिवाय पर्याय उरत नाही.

महाराष्ट्राच्या इतिहास लेखनामध्ये अनेक विद्वानांनी योगदान केलेले आहे. याची सुरवात जवळजवळ इसवी सन १७९५ इतकी मागे नेता येते. या साली सर चार्लस मॅलेट यांनी कार्ल्याच्या लेण्यातील उत्कीर्ण लेखांचे ठसे घेऊन त्यांचे वाचन करण्याचा प्रयत्न केला. यानंतर गेल्या दोनशे वर्षांमध्ये अनेक नामवंत विद्वानांनी यात भर घातलेली आहे. त्या सर्वांचा उल्लेख करणे अपुरेच होईल. परंतु प्रिन्सेप, स्टीव्हन्सन, फ्लीट, बर्जेस, ब्यूल्हर, पीटरसन, कझिन्स् त्याचप्रमाणे विष्णुशास्त्री पंडित डॉ. भाऊ दाजी, न्यायमूर्ती तेलंग, रा. गो. भांडारकर, दे. रा. भाण्डारकर, भगवानलाल इंद्रजी, का. बा. पाठक, चिं. वि. वैद्य, रावबहादूर का. ना. दीक्षित, डॉ. श्री. व्यं. केतकर,

महामहोपाध्याय पां. वा. काणे, डॉ. अ. स. अळतेकर, डॉ. यजदानी, महामहोपाध्याय वा. वि. मिराशी, ग. ह. खरे, डॉ. मो. गं. दीक्षित, डॉ. ह. धी. सांकलिया, इरावती कर्वे, स. आ. जोगळेकर, गं. बा. सरदार व इतर अनेक नामवंत पंडितांनी केलेले संशोधन मूलगामी स्वरूपाचे आहे. या सर्व पूर्व-सूरींच्या लिखाणावरच महाराष्ट्राच्या इतिहासाची उभारणी करता येते.

* * *

# प्रकरण २
# पाषाणयुगीन महाराष्ट्र

महाराष्ट्राला 'दगडांचा देश' असे कवीने नाव दिलेले आहे आणि ते महाराष्ट्राची भूरचना लक्षात घेता यथार्थही आहे. त्यामुळेच कदाचित पाषाणयुगीन मानव महाराष्ट्राकडे आकृष्ट झाला असावा. कोकणपट्टी सोडली तर महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागामध्ये पाषाणयुगाच्या विविध कालखंडाची दगडाची बनविलेली निरनिराळ्या प्रकारची हत्यारे विपुल प्रमाणात सापडली आहेत.

पाषाणयुगीन मानव किंवा त्याचे अस्तित्व दाखविणारा इतर पुरावा मिळविण्याच्या दृष्टीने जवळजवळ सव्वाशे वर्षापासून निरनिराळ्या संशोधकांनी प्रयत्न केल्याचे दिसून येते. त्यादृष्टीने पाहता पाषाणयुगाचा पहिला पुरावा १८६३ साली मराठवाड्यातील गोदावरीच्या काठी असलेल्या मुंगीपैठण येथे वायने (Wynne) यांना सापडला. या ठिकाणी त्यांना 'अकीक' वर्गाच्या पाषाणाच्या छिलक्यापासून केलेले एक हत्यार गोदावरीकाठच्या थरांच्या छेदामध्ये आढळून आले. सुमारे सात सें. मी. लांब आणि अडीच सें. मी. रूंद असलेले हे हत्यार काहीसे वक्र असून त्याचे एक टोक बहिर्वक्र होते, दुसरे टोक काहीसे दांड्याच्या स्वरूपातले असून हे हत्यार हाडाच्या किंवा लाकडाच्या तुकड्यात बसवून त्याचा चाकूसारखा उपयोग केला जात असावा, असे वायने यांनी मत मांडले आहे. अर्थात सुरूवातीच्या या मतामध्ये नंतरच्या काळामध्ये झालेल्या विस्तृत संशोधनामुळे बदल करणे अपरिहार्य ठरले.

या शोधाने संशोधनाला फारशी चालना दिल्याचे दिसून येत नाही, कारण या क्षेत्रातला दुसरा शोध लागण्यासाठी जवळजवळ चाळीस वर्षांचा अवधी जावा लागला. हा दुसरा शोध १९०४ साली पैठणजवळ गोदावरीकाठी

घट्ट वाळूच्या थरात जंगली हत्तीचे (एलेफस नॅमॅडिकस) अश्मीभूत झालेले अवशेष सापडले. हा हत्ती महाकाय स्वरूपाचा असावा हे, या हत्तीचा जो अश्मीभूत सुळा सापडला त्याचा परीघ १४५ सें. मी. होता यावरून स्पष्ट झाले. याच वर्षी आणखी एका पुराव्याचा शोध महत्वपूर्ण ठरला. पैनगंगेच्याकाठी अश्मीभूत झालेली प्राचीन जनावरांची हाडे सापडली. याचवेळी भारतीय भूविज्ञान सर्वेक्षण खात्यामधील पिलग्रिम यांना नाशिक जिल्ह्यातील नांदूर - मधमेश्वर येथे हत्ती आणि पाणघोड्याची अश्मीभूत स्वरूपातील हाडे उपलब्ध झाली. हाही हत्ती प्रचंड स्वरूपाचा असावा हे सुळ्याच्या १२५ सें.मी. परीघावरून सिद्ध झाले. नांदूरमधमेश्वरचा हत्ती आणि पैठण येथे सापडलेला हत्ती आकाराने एकाच वर्गाचे असावेत असे सूचित केले गेले. पिलग्रिम यांच्या मते या हत्तीची उंची सुमारे ५ मीटर असावी. हा हत्ती एलेफस ॲन्टीकस (नॅमॅडिकस) या वर्गाचा असावा असे मत पिलग्रिम यांनी व्यक्त केले. त्यांनी या हत्तीचे मूळ युरोपमध्ये शोधले. नर्मदाकाठी सापडलेल्या अश्मीभूत पुराव्यानुसार या हत्तीचा काळ पुर्व - प्लायस्टोसीन ' असावा असेही मत त्यांनी व्यक्त केले. गोदावरीकाठी सापडलेली पाषाणाची हत्यारे आणि नामशेष झालेल्या प्राणीवर्गाची अश्मीभूत हाडे यावरून महाराष्ट्रामध्ये प्राचीन अश्मयुगामध्ये मानवाचेही अस्तित्व असावे, असे अनुमान करता आले. ( सांकलिया १९७६ )

या शोधांनी पाषाणयुगीन महाराष्ट्राबद्दल नवीन माहिती उपलब्ध केली तरी पाषाणयुगीन संशोधनाला फारशी चालना मिळालेली दिसत नाही. मात्र १९४० पासून गेल्या पन्नास वर्षात महाराष्ट्रामध्ये पाषाणयुगीन मानवी जीवनाबद्दल त्याचप्रमाणे पुरापर्यावरणाबद्दल विस्तृत पुरावा शोधण्याचे श्रेय प्रामुख्याने प्रा. सांकलिया आणि त्यांच्या सहकाऱ्यांना दिले पाहिजे. गेल्या पन्नास वर्षामध्ये महाराष्ट्रातील विविध भागामध्ये लहानमोठ्या नद्यांच्या काठी आणि काठाच्या परिसरामध्ये पाषाणयुगाची शेकडो हत्यारे त्याचप्रमाणे नामशेष झालेल्या प्राण्यांची अश्मीभूत हाडे सापडली आहेत. त्याचप्रमाणे ज्याठिकाणी अशी हत्यारे पाषाणयुगीन मानव बनवीत होता अशीही काही कार्यशाळांची (वर्क शॉप) स्थले सापडली आहेत. तापी, गोदावरी, प्रवरा, भीमा, मुळा, घोड,

कृष्णा, पूर्णा, पैनगंगा, वैनगंगा, वर्धा, कन्हान, मांजरा इत्यादी नद्यांच्या आणि त्यांच्या उपनद्यांच्या तसेच काही प्राचीन नाल्यामध्ये पाषाणयुगीन हत्यारे फार मोठ्या प्रमाणावर सापडलेली आहेत. यामुळे असे म्हणता येते की कोकण विभाग वगळता महाराष्ट्राच्या इतर भागामध्ये मानवाच्या अस्तित्वाचा पुरावा उपलब्ध झालेला आहे. महाराष्ट्रातील पाषाणयुगाचे कालखंड वर्गीकृत करण्याच्या दृष्टीने १९३९ साली मुंबईजवळ कांदीवली येथे टॉड यांनी केलेले काम आणि त्यामध्ये प्रा. सांकलियांनी अव्याहतपणे घातलेली भर यामुळे पाषाणयुगाचे निरनिराळे खंड करण्यात आले आणि ते आता पाषाणयुगाच्या अभ्यासात रूढ झाले आहेत. याचे विवेचन करण्याआधी एक गोष्ट स्पष्ट करणे जरूर आहे, ती ही की पाषाणयुगाच्या मानवाची हत्यारे फार मोठ्या संख्येने वरवर पृष्ठसंशोधनामध्ये सापडली आहेत. मात्र जी काही स्तरीय संदर्भामध्ये यथार्थजागी (in - situ) मिळालेली आहेत त्यामुळे या वर्गीकरणाला शास्त्रीय बैठक प्राप्त झाली आहे. (Sankalia 1977)

सर्वसाधारणपणे मानवाच्या इतिहासाचे तीन कालखंड पाडले जातात. यातील पहिला प्रागितिहास; दुसरा इतिहासाचा उषःकाल आणि तिसरा इतिहासकाल. यातील प्रागितिहासाचे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये कोणत्याही तऱ्हेच्या लिखाणाचा पुरावा उपलब्ध नाही. दुसऱ्या कालखंडामध्ये कुठल्या ना कुठल्या स्वरूपात लिखाणाचा पुरावा मिळाला असला तरी त्याची उकल-वाचन करता आलेले नाही. इतिहासकालात मानवी लिखाणाचा भरपूर पुरावा उपलब्ध होतो. यातील मधला कालखंड (इतिहासाचा उषःकाल) काहीसा 'संक्रमण' स्वरूपाचा आहे. या कालखंडातल्या लिखाणाचे वाचन करता आल्यास हा कालखंड इतिहासकालात समाविष्ट होईल. भारतामध्ये लिखाणाचा पहिला पुरावा अशोक मौर्याच्या प्रस्तर-लेखांच्या स्वरूपात उपलब्ध आहे. तेथपासूनचा काळ इतिहासामध्ये जमा होतो. याआधीचा सगळा काळ स्थूलमानाने प्रागितिहासामध्ये समाविष्ट होत असला तरी प्रागितिहासामध्ये बहुतांशी पाषाण अथवा अश्मयुगीन कालखंडांचा अंतर्भाव होतो. या कालखंडाची कालमर्यादा इतिहासकालाच्या कितीतरी पट मोठी आहे. भारतापुरते बोलावयाचे झाल्यास या युगाची कालदृष्ट्या व्याप्ती १ लक्ष ते

१० हजार वर्षे (सध्यापासून मागे) अशी स्थूलमानाने मांडली गेली आहे. पाषाणयुगाचा अभ्यास भूवैज्ञानिकांनी मांडलेल्या कालखंडाशी निगडीत आहे. या पाषाणयुगातील मानवी जीवनावर 'प्लायस्टोसीन' कालखंडात झालेली 'हिमयुगे' आणि त्यांचा हवामान आणि समुद्राच्या पाण्याच्या पातळीत झालेल्या बदलाचा प्रभाव पडला. अर्थात अशातऱ्हेचे निष्कर्ष युरोपखंडाशी जास्त निगडीत आहेत. 'हिमयुगे' आणि त्यांच्याशी संबध्द असलेल्या घटनांचा भारताशी कितपत संबंध आला याबद्दल निरनिराळ्या विद्वानात एकमत नाही. काहींच्या मते काश्मीरसारख्या प्रदेशात या प्रकारचा पुरावा सापडतो. महाराष्ट्रापुरते बोलायचे झाल्यास अशातऱ्हेच्या घटनांचा महाराष्ट्रांच्या भूप्रदेशाशी संबंध आला असावा, असे समजणे धाडसाचे ठरेल. ( Rajaguru 1969, 1971; Misra 1989 )

अश्मयुगाचा पुरावा भारतात आणि महाराष्ट्रात तत्कालीन मानवाने वापरलेल्या हत्यारांच्या रूपात आणि त्यांच्याशी निगडीत असलेल्या पण आता नामशेष झालेल्या प्राण्यांच्या अश्मीभूत हाडांच्या स्वरूपात मिळतो. महाराष्ट्रातही अशा तऱ्हेचा पुरावा उपलब्ध झाल्याचे याआधी उल्लेखिले आहे. पाषाणयुगाचे तीन प्रमुख खंड पाडले जातात –

१) पुराश्मयुग ( Palaeolithic )

२) मध्याश्मयुग ( Mesolithic )

३) नवाश्मयुग ( Neolithic )

यातील पहिल्या कालखंडाची विभागणी तीन उपखंडामध्ये करण्यात येते –

१) पूर्व-पुराश्मयुग (लोअर पॅलिओलिथिक : Lower/Early, Palaeolithic )

२) मध्य - पुराश्मयुग ( मिडल पॅलिओलिथिक : Middle Palaeolithic )

३) उत्तर - पुराश्मयुग (अपर पॅलिओलिथिक : Upper Palaeolithic )

यातील पूर्व-पुराश्मयुगाची प्राचीनता कार्बन - १४ त्याचप्रमाणे युरेनियम-थोरियम आयसोटोप पद्धतीचा वापर करून सुमारे १ लक्ष २० हजार

वर्षांहूनही प्राचीन असावी असे सिद्ध करता आले आहे. महाराष्ट्रातही अशा तऱ्हेचे शास्त्रीय कालमापन करण्यात आलेले आहे, त्याचा उल्लेख योग्य संदर्भात पुढे करण्यात येईल. महाराष्ट्रात बहुतेक सर्व नद्यांच्या परिसरात पाषाणधुगाच्या विविध कालखंडातील हत्यारे सापडलेली आहेत. नवाश्मयुगाचा अंतर्भाव तांत्रिकदृष्ट्या पाषाणयुगात केला असला तरी या कालातील मानवी जीवन स्थिर होऊन पशुपालन आणि अन्नोत्पादन या वैशिष्ट्यांमुळे पुरापाषाणयुगापासून हा कालखंड सांस्कृतिकदृष्ट्या वेगळा आहे. लेखनाचा अभाव आणि दगडी हत्यारांचा वापर यामुळेच या कालखंडाला 'नवाश्मयुग' असे नाव दिले गेले आहे. महाराष्ट्रामध्ये केवळ नवाश्मयुगाचे विशुध्द स्वरूपाचे स्थल अजून उपलब्ध नाही.

**पूर्व - पुराश्मयुग** ( लोअर पॅलिओलिथिक )

या कालखंडाशी निगडीत दगडाची हत्यारे महाराष्ट्रातील बहुतेक मोठ्या आणि मध्यम स्वरूपाच्या नद्यांच्या परिसरामध्ये गेल्या पन्नास वर्षांमध्ये सापडली आहेत. या कालखंडाचे अथवा त्यातील हत्यारांचे वर्णन करण्याआधी एक बाब स्पष्ट करणे आवश्यक आहे. याआधी उल्लेखिलेले पाषाणयुगाचे कालखंड म्हणजे एकमेकांशी संबंध नसलेले बंद कप्पे आहेत असे मात्र नाही. हत्यार बनविण्याच्या तंत्रामध्ये त्याचप्रमाणे त्यांच्या आकारात आणि प्रकारात बदल आढळून येत असला तरी पुराश्मयुगातील विशिष्ट कालखंडातील हत्यारे एकदम उपयोगातून पार गेली आणि नव्या तऱ्हेची हत्यारे निर्माण झाली अशा तऱ्हेचा समज करून घेणे बरोबर ठरणार नाही. पाषाणयुगातील हत्यारे प्रामुख्याने दोन वर्गांची आढळतात. यातील पहिला प्रकार मूळ गोट्यावर प्रक्रिया करून बनविलेली दगडगोट्यांची हत्यारे आणि दुसरा प्रकार म्हणजे गोट्यांचे छिलके काढून त्या छिलक्यापासून बनविलेली हत्यारे. या दोन्ही प्रकारची हत्यारे महाराष्ट्रात सापडली आहेत. महाराष्ट्राच्या पाषाणयुगाचा अभ्यास, महाराष्ट्राचा अलग विचार करून करता येणे चूक ठरते. महाराष्ट्रात सापडलेली हत्यारे इतर प्रदेशातील नद्यांच्या परिसरात सापडलेल्या हत्यारांशी मिळतीजुळती आहेत.

पाषाणयुगीन कालखंडाचा अभ्यास करताना एक बाब लक्षात घेणे आवश्यक आहे. ही बाब महाराष्ट्रालाही लागू आहे. भारतापेक्षा कितीतरी आधी पाषाणयुगाचा शोध आणि अभ्यास युरोपमध्ये सुरू केला गेल्याने त्या संदर्भात युरोपमध्ये वापरल्या जाणाऱ्या संज्ञा आणि तंत्र - वैशिष्ट्यांची नावे भारतातही अशा अभ्यासामध्ये उपयोगात आणली गेली. त्यामुळे त्यांचा वापर करणे अपरिहार्य ठरले आहे. अर्थात अलीकडे यावद्दल विचारमंथन सुरू झाले आहे. १८६३ साली तामिळनाडूतील पल्लावरम येथे रॉबर्ट ब्रुस फूट यांना भारतात पहिल्याप्रथम पाषाणयुगीन हत्याराचा शोध लागला. याआधीही युरोपमध्ये पाषाणयुगाची हत्यारे सापडली असल्याने फूट आणि त्यांच्या नंतरच्या संशोधकांनी युरोपात असलेल्या संज्ञा वापरल्या यात नवल नाही. किंबहुना आजही त्याच संज्ञा पाषाणयुगाच्या संदर्भात प्रचलित आहेत. यादृष्टीने पाषाणयुगाचा महाराष्ट्रातील आढावा घेताना अशा संज्ञाचा वापर करून घेणे अपरिहार्य झालेले आहे.

महाराष्ट्रामध्ये कोकणपट्टीतील कुलावा आणि रत्नागिरी हे प्रदेश सोडल्यास जवळपास सर्व नद्यांच्या खोऱ्यात पूर्व - पुराश्मयुगाचा (अर्ली / लोअर पॅलिओलिथिक) हत्यारांच्या रूपामध्ये पुरावा सापडलेला आहे. विशेषतः नाशिकजवळ गोदावरीकाठचे गंगापूर, अहमदनगर जिल्ह्यातील नेवाशाजवळील चिरकी - नाला, मुळा-मुठेच्या काठी पुण्याच्या डेक्कन कॉलेजचा परिसर व दत्तवाडी विभाग आणि धुळे जिल्ह्यातील धाबरापाडा ही या दृष्टीने महत्वाची स्थळे ठरलेली आहेत. चिरकी - नाला या ठिकाणी या कालखंडातील हातकुऱ्हाड, फरश्या, तासण्या आणि तोडहत्यारे, ही या कालाच्या मानवी जीवनाची निदर्शक दगडी हत्यारे, 'स्वस्थानी' सापडली. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे म्हणजे ही हत्यारे नदीच्या प्रवाहातून दुसरीकडून येऊन ती येथे पडली असे नव्हे. याचाच अर्थ याठिकाणी पूर्व - पुराश्मयुगाचा मानव काही काळ तरी वास्तव्य करून होता असे सूचित होते. पुण्याच्या डेक्कन कॉलेजच्या परिसरामध्ये अशा प्रकारची बनविलेली हत्यारे आणि त्याचबरोबर हत्यारांच्या बनावटीत उपयोगी ठरतील असे मोठे गोटे सापडले. हा पुरावा ट्रॅप या खडकामध्ये जी दुसऱ्या प्रकारची धमनी (डाईक) डेक्कन कॉलेजच्या

परिसरामध्ये आहे तिच्या शेजारीच मिळाला. यावरून पूर्व - पुराश्मयुगीन मानव या भागामध्ये काही काळ राहात असून त्याने आपल्या वास्तव्यामध्ये ही हत्यारे बनविली, असे स्पष्ट दिसून येते; कारण मोठमोठे छिलके काढलेले गोटेही या स्थळी सापडलेले आहेत. अशाच प्रकारचा कार्यशाळेचा ( वर्कशॉप ) पुरावा धुळे जिल्ह्यातही उपलब्ध झालेला आहे. हत्यारांचे प्रकार आणि महाराष्ट्रामध्ये या कालखंडातील निक्षेपात नामशेष झालेल्या प्राण्यांच्या अश्मीभूत अवशेषांचा आढळ यावरून महाराष्ट्रातील पूर्व - पुराश्ममयुगीन मानवाचे अस्तित्व सुमारे एक ते दीड लाख वर्षपूर्व असावे असे तौलनिकदृष्ट्या अनुमानित केले गेले आहे.

पूर्व - पुराश्मयुगीन हत्यारे सर्वसामान्यपणे तीन - चार प्रकारची आढळून आली आहेत. ( फलक ३ ) त्यातील पहिला प्रकार फरशीसारख्या आकाराच्या हत्याराचा आहे. त्याला इंग्रजीमध्ये 'क्लीव्हर' असे नाव दिले आहे. हे हत्यार बहुतांशी मोठ्या आकाराच्या गोट्यापासून काढलेल्या छिलक्यावर संस्करण करून बनवीत असत. याची एक बाजू रूंद, धारदार, सरळ असून धारेच्या विरूध्द बाजूचा भाग जाडसर, हातात पकडता येण्यासारखा केलेला असतो. रूंद धारदार कड कठीण वस्तू – कच्चे मांस अथवा हाडे – तोडण्यासाठी वापरली जात असे. काही वेळा मोठ्या आकाराचा झाडझाडोरा तोडण्यासाठीही अशा, लोखंडी कुऱ्हाडीसारख्या दिसणाऱ्या, दगडी फरशांचा वापर करण्यात येत असावा. दुसऱ्या प्रकाराच्या हत्याराला हातकुऱ्हाड – ' हॅण्ड ॲक्स ' - असे नाव दिलेले आहे. दिलेल्या नावावरून या हत्याराचा उपयोग हातात धरून कुऱ्हाडीसारखा केला जात असावा असा समज होतो, परंतु फरशी आणि कुऱ्हाड यांच्यामध्ये फरक आहे. या ' हातकुऱ्हाडी ' एका बाजूला टोकदार तर दुसऱ्या बाजूला जाड, फुगीर आणि रूंद असतात. आकाराने यात काही प्रकार आढळून येत असले तरी ही हत्यारे लंबगोल किंवा लंबत्रिकोण या आकाराची सर्वसाधारणपणे आढळून येतात. टोकदार बाजू आणि रूंद - काहीशी बहिर्गोल - विरूध्द बाजू, या व्यतिरिक्त असलेल्या दोन कडावरही लहानलहान छिलके काढून या दोन्ही बाजू काहीशा नागमोडी आणि धारदार करीत असत. कातडी फाडणे अथवा जमीन खणणे यासाठी या हातकुऱ्हाडींचा वापर केला

जात असावा असा समज आहे. तिसऱ्या प्रकारचे हत्यार 'तोड-हत्यार' (चॉपर) या नावाने ओळखले जाते. हे प्रामुख्याने चपट्या गोट्यापासून केलेले असून त्याच्या कडा छिलके काढून अर्धगोलाकृती बनविल्या जात. शिकार केलेल्या जनावराच्या मांसाचे लहानलहान तुकडे करण्यासाठी याचा वापर करण्यात येत असावा, असा अंदाज केला गेला आहे.

महाराष्ट्राचा बराच, विशेषतः पठाराचा, भाग 'बसाल्ट' या प्रकारच्या खडकांनी व्यापलेला आहे. या दगडाचा पोत फारसा चांगला नसल्याने याच्यावर जसे पाहिजे तसे छिलके काढून संस्कार करता येत नाहीत. इतर प्रदेशात ज्याप्रमाणे 'क्वार्टझाईट' या उत्तम प्रतीच्या दगडाचा आढळ होतो, तसा महाराष्ट्रात फारसा होत नाही. म्हणून 'बसाल्ट' खडकामध्ये ज्या उत्तम पोताच्या दगडांचा धमन्या किंवा 'कारी' (dyke) महाराष्ट्रात उपलब्ध आहेत त्यांचा उपयोग हत्यार बनावटीमध्ये मानवाने केला.

ही हत्यारे बनविणारा मानव कसा होता हे सांगणे शक्य होत नाही. कारण या कालातील वर उल्लेखिलेली हत्यारे शेकड्यांच्या संख्येने उपलब्ध असली तरी ज्या मानवाने ही बनविली आणि वापरली त्याचे कोणत्याही स्थितीतले अवशेष अद्याप मिळालेले नाहीत. त्यामुळे त्याचे केवळ अस्तित्व जाणवते. परंतु हा मानव तोडणे, फोडणे, घासणे इत्यादी कामांना उपयुक्त ठरतील अशी हत्यारे बनविण्यात वाकबगार होता यात शंका नाही. पुरापर्यावरण शास्त्रज्ञांनी या कालखंडातील हवामानाबद्दल असे मत दिले आहे की या कालखंडात महाराष्ट्रामध्ये पावसाचे प्रमाण बरेच होते, झाडझाडोरा विपुल होता आणि हवेमध्ये आर्द्रता जास्त होती. या कालातील नद्यांची पात्रे विस्तृत असून त्यामध्ये खूप दगडगोटे होते. या दगडगोट्यापासूनच या कालातील मानवाने हत्यारे तयार केली. ही हत्यारे गुजरात, मध्यप्रदेश, आंध्र, तामिळनाडू आणि कर्नाटक या प्रदेशात सापडलेल्या समकालीन हत्याराप्रमाणेच आहेत.

पूर्व-पुराश्मयुगात हत्यार बनावटीची स्थूलमानाने दोन तंत्रे आढळून येतात. यातील एक 'ॲबीव्हीलियन' या नावाने ओळखले जाते. फ्रान्समध्ये सोम नदीच्या काठी असलेल्या 'ॲबीव्हिले' या गावी ओबडधोबड

हातकुऱ्हाडी प्रथम सापडल्याने या गावाचे नाव या तंत्राला देण्यात आले. यामध्ये हत्यार बनविण्याकरिता काढलेले छिलके काहीसे मोठे आणि अनियंत्रित असतात. दुसऱ्या प्रकारचे तंत्र 'ॲश्युलियन' या नावाने ओळखले जाते. अशाप्रकारची हत्यारे फ्रान्समध्ये सॉं-अश्यूल याठिकाणी सापडल्याने हे स्थलनाम या तंत्राला किंवा या तंत्राने बनविलेल्या हत्यार-वर्गाला दिले जाते. यामध्ये अगदी पातळ आणि लहानलहान छिलके काढून हत्यार कलात्मक केल्याचे दिसून येते. असे छिलके लाकूड, हाड किंवा सांबरशिंगाच्या साहाय्याने काढले जात. यातील काही छिलके तर माश्याच्या खवल्या इतके पातळ आणि लहान असतात. तंत्रदृष्ट्या या दोन प्रकारात फरक आहे. 'ॲश्युलियन' तंत्राची नगर जिल्ह्यातील नेवासे येथे सापडलेली हातकुऱ्हाड प्रख्यात आहे. (Sankalia 1974)

पूर्व-पुराश्मयुगाचा काल निश्चित करणे अवघड आहे. परंतु सर्वसाधारणपणे दीड लाख ते पन्नास हजार वर्षपूर्व असा तो मानला जातो.

**मध्य - पुराश्मयुग (मिडल पॅलिओलिथिक)**

पूर्व-पुराश्मयुगाचा शेवट, हवामानात झालेल्या बदलामुळे झाला असावा, असे पुरापर्यावरणशास्त्रज्ञांचे मत आहे. या नंतरच्या काळातील हत्यारांमध्ये बदल घडून आल्याचे दिसून येते. अर्थात याचा अर्थ पूर्व-पुराश्मयुगातील सर्व हत्यारांचा किंवा तंत्राचा वापर पूर्णपणे थांबला असे मात्र नव्हे. उदाहरणार्थ, 'ॲश्युलियन' तंत्राने सुबक आणि कलात्मक बनविलेल्या परंतु लहान आकाराच्या हातकुऱ्हाडी या कालामध्येही वापरात होत्या. मात्र या कालखंडामध्ये हत्यारांच्या बनावटीसाठी उत्कृष्ट पोताचा जास्पर वगैरे सारखा दगड वापरण्यात आला. हत्यारांचे आकार खूपच लहान झाले, हत्यार निर्माण करण्याच्या तंत्रामध्ये बदल झाला आणि छोट्या तासण्या, गिरमिटे आणि बाणाग्रे यांच्यासारख्या हत्यारांची निर्मिती झाली. (फलक ४)

या हत्यारांचा शोध महाराष्ट्रामध्ये प्रथम अहमदनगर जिल्ह्यातील प्रवराकाठी नेवाश्याच्या परिसरामध्ये १९५४ साली लागला. त्यावेळी त्यांना 'वर्ग-२' ची हत्यारे (सिरीज-टू) असे नाव दिले गेले. परंतु त्यानंतर

झालेल्या विस्तृत पाहाणीमध्ये या वर्गाच्या हत्यारांचा आढळ अनेक ठिकाणी नदीच्या काठच्या स्तरीय संदर्भात झाल्याने, या वर्गाच्या हत्यारांची उत्क्रांती (evolution) आणि त्यांचे स्तरसंबध्दस्थान (stratigraphic context) याबद्दल निश्चिती झाली व त्यांना 'मध्य-पुराश्मयुगीन' असे नाव रूढ झाले आहे. प्रवराकाठी प्रथम सापडलेल्या या हत्यारांचा आढळ आता महाराष्ट्रामध्ये तापी, गिरणा, वर्धा, पूर्णा, वैनगंगा, मांजरा, भीमा, घोड, कृष्णा, गोदावरी व त्यांच्या अनेक उपनद्यांच्या परिसरामध्ये झाला आहे. मुंबई जवळ कांदिवली-बोरीवली येथेही ही मिळालेली आहेत.

वर उल्लेखिल्याप्रमाणे या कालखंडातील हत्यारांमध्ये प्रामुख्याने तासण्या, गिरमीटे, बाणाग्रे आणि भोके पाडण्यासाठी बनविलेले टोकदार टोचे सापडतात. ही आकाराने लहान तर आहेतच परंतु त्यांच्यावरील काढलेले छिलके अत्यंत बारीकबारीक आहेत. पूर्व-पुराश्मयुगाच्या बनावटीमध्ये 'बसाल्ट' आणि डोलेराईट' यांचा वापर होत होता, परंतु मध्य - पुराश्मयुगाच्या हत्यारांसाठी जास्पर, चर्ट, कार्नेलियन, ॲगेट, ब्लडस्टोन इत्यादी उत्कृष्ट पोताच्या दगडाचा वापर केला जाई. दक्खनच्या कातळामध्ये वर उल्लेखिलेल्या दगडांच्या 'धमन्या' (veins) आढळून येतात. त्यांचाच वापर या हत्यारांच्या बनावटीमध्ये केलेला आहे. याप्रकारचे दगड मूलतः लहान आकारात उपलब्ध असल्याने हत्यारांचे आकार लहान असणे अपरिहार्य होते. या हत्यार-निर्मितीच्या काही जागाही महाराष्ट्रामध्ये सापडलेल्या आहेत. त्यापैकी अहमदनगर जिल्ह्यातील पैठणगुंजाळे आणि नागपूर जिल्ह्यातील कोराडी या उल्लेखनीय आहेत. औरंगाबाद जिल्ह्यातील वाघोडी-वडोळी येथे या कालखंडातील मानवाचे काही काळ तरी वास्तव्य असावे, असा पुरावा उपलब्ध झालेला आहे.

या हत्यारांच्या तंत्रामध्ये एक नाविन्य आढळून येते. ही हत्यारे सपाट परंतु काहीशा टोकदार गोट्यापासून केलेली आढळतात. गाभ्यापासून छिलका काढण्याच्या आधी बरीच प्रक्रिया करून योग्य असा पातळ छिलका काढला जाई आणि अशा छिलक्यावर संस्करण करून त्यापासून वर उल्लेखिलेली हत्यारे बनविली जात. दुसरे असे की पूर्व - पुराश्मयुगाची हत्यारे घट्ट झालेल्या

मोठ्या दगडगोट्यांच्या थरामध्ये आढळतात, तर मध्य - पुराश्मयुगातील हत्यारे जाड्याभरड्या वाळूच्या आणि लहान गोट्यांच्या घट्ट झालेल्या थरामध्ये आढळतात. याचा अर्थ या काळी पर्जन्यमान वाढले तरी ते पूर्व - पुराश्मयुगाइतके नव्हते. (Rajaguru 1971 ; Misra 1989)

हत्यारांच्या प्रकारावरून असे अनुमान करता येते की ही हत्यारे कातड्यात भोके पाडण्यासाठी त्याचप्रमाणे लाकूड अथवा हाड तासण्यासाठी वापरली जात असावीत. बाणाग्रांचा वापर शिकारीसाठी केला जात असला पाहिजे. या कालातील मानवाचे अवशेष कुठल्याही स्वरूपामध्ये अद्याप उपलब्ध झालेले नाहीत. परंतु रानटी बैलाची अश्मीभूत झालेली हाडे गोदावरीकाठी काळेगाव आणि गंगापूर, घोडकाठी इनामगाव, प्रवराकाठी नेवासे, येथे त्याचप्रमाणे वर्धा आणि पूर्णा या विदर्भातील नद्यांच्या आणि मराठवाड्यातील मांजरा नदीच्या परिसरातही सापडली आहेत. (फलक १२, १३)

या कालखंडाची कालमर्यादा सर्वसाधारणपणे सुमारे ४० ते २० हजार वर्षपूर्व अशी अनुमानित करण्यात आलेली आहे. यास दुजोरा देणाऱ्या कार्बन - १४ पद्धतीनुसार आलेल्या तारखा खालील प्रमाणे आहेत :

मुळा धरण

टी. एफ. २१७ : ३९,०००

टी. एफ. ३४५ : ३०,०३० + ५,७१५
− ३,३४०

धोम धरण

टी. एफ.१,००४ : ३७,६४० + ९,२००
− ४,२४५

इनामगाव, घोडनदी

टी. एफ. १,००३ : १९,७७५ + ६३०
− ५८०

टी. एफ. १,१७७ : १७,३४० + ३६०

उत्तर - पुराश्मयुग (अपर पॉलिओलिथिक)

पातळ छिलक्यापासून हत्यारे बनविण्याचे तंत्र आणि कौशल्य मध्य - पुराश्मयुगीन मानवाने आत्मसात केले होते याचा उल्लेख वर आला आहे. उत्तर - पुराश्मयुगात या तंत्रामध्ये आणखी प्रगती झाली. या कालाचे वैशिष्ट्य म्हणजे चाल्सीडोनी, ॲगेट, कार्नेलियनसारख्या उत्तम पोताच्या दगडापासून समांतर बाजू असलेली पाती, त्याचप्रमाणे एका विशिष्ट तऱ्हेने (काटकोनात) छिलका काढून कोरण्यासाठी कोरके (ब्यूरीन) तयार करण्याची प्रथा रूढ झाली. त्यामुळे या कालखंडातील गारगोटीच्या छिलक्यांच्या हत्यारांना 'ब्लेड ॲण्ड ब्यूरीन इंडस्ट्री' असे नाव दिले गेले आहे. अशी धारदार पाती लाकडाच्या किंवा हाडाच्या खोबणीत सलग बसवून त्यांचा कापण्यासाठी उपयोग करण्यात आला असावा. याप्रकारच्या हत्यारांच्या वापरांच्या मर्यादा लक्षात घेता, अशी हत्यारे अवजड कामासाठी वापरणे शक्य नव्हते. त्यामुळे ही हत्यारे कोरड्या हवामानामध्ये उगवणारा विरळ व हलका झाडोरा अथवा गवत कापण्यासाठी केला जात असावा. ही हत्यारे सर्वसाधारणपणे नदीकाठच्या स्तरीय छेदामध्ये (सेक्शन) आढळून येणाऱ्या बारीक वाळूच्या थरामध्ये सापडतात.

ही हत्यारे महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणी उपलब्ध झाली असली तरी त्यांचे विशुद्ध स्वरूपातील निक्षेप फारसे स्पष्ट नाहीत. मात्र अशा तऱ्हेची हत्यारे गोदावरीकाठी पैठण, घोडकाठी इनामगाव, प्रवरेकाठी संगमनेर येथे आणि चंद्रपूर जिल्ह्यात खोलरा गोडी या ओढ्याच्या काठी त्याचप्रमाणे भंडारा जिल्ह्यात वैनगंगेच्या काठी सापडलेली आहेत. मुंबईजवळ कांदिवली येथेही अश्मयुगाच्या विविध कालखंडातील हत्यारे टॉड यांना १९३६ साली मिळालेली होती. परंतु या हत्यार समूहाबद्दल विविध मते प्रचलित आहेत.

या कालखंडाशी निगडीत दोन महत्वाच्या स्थलांचा उल्लेख करणे जरूर आहे. गोदावरीकाठी पैठण येथे आणि पुणे जिल्ह्यात घोडनदीवरील इनामगावजवळ या कालखंडातील हत्यारांबरोबरच इतर महत्वाचा पुरावा मिळालेला आहे. या ठिकाणी हत्यारांच्या बरोबर शिंपले त्याचप्रमाणे

शहामृगाच्या अंड्यांचे कवच ( पाटणे, जिल्हा जळगाव ) आणि इनामगावजवळ नामशेष झालेला प्राचीन बैल (Leptobos) या प्राण्याचे अश्मीभूत अवशेष मिळाले. या अवशेषांवरून शास्त्रीय पद्धतीने निर्धारित करण्यात आलेले कालखंड खालीलप्रमाणे आहेत –

**संगमनेर, जिल्हा : अहमदनगर**

पी. आर एल. ४७० : १२,८९० ± ३५०

बी. एस. ७८ : २३,४६० ± ७३१

**पाटणे, जिल्हा : जळगाव**

जी. आर. एन. ७,२०० : २३,०४८ ± २००

**पारगाव, जिल्हा : अहमदनगर**

टी. एफ. १,१११ : ८,३७१ ± १५५

उत्तर - पुराश्मयुगाबद्दल वर उल्लेखिलेला पुरावा मांडला असला तरी याबद्दलचे संपूर्ण चित्र फारसे स्पष्ट नाही. ही अवस्था 'मध्य - पुराश्मयुग' आणि 'मध्याश्मयुग' यामध्ये सांस्कृतिक क्रमाच्या दृष्टीने येत असली तरी, याबद्दल हत्यारांचा पुरावा ज्या स्तरीय संदर्भात उपलब्ध होणे आवश्यक आहे तसा पुरावा महाराष्ट्रामध्ये फारसा उपलब्ध नाही. या आधी गुजराथ, राजस्थान, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, तामिळनाडू इत्यादी ठिकाणी तो एका विशिष्ट संदर्भामधे उपलब्ध झालेला आहे. महाराष्ट्रात प्रवरेच्या काठी नेवासे, वर्धा जिल्ह्यात झारपट नाला, पुणे जिल्ह्यात इनामगाव, अहमदनगर जिल्ह्यात ढवळापुरी आणि जळगाव जिल्ह्यात गिरणा नदीच्या काठी पाटणे या ठिकाणी तो मिळाल्याचा उल्लेख याआधी केलेला आहे. या कालखंडाचे वैशिष्ट्य ठरलेली गारगोटींची हत्यारे – लांब पाती, कोरके, लहान तासण्या, नोक असलेली हत्यारे आणि वेधण्या – एका वैशिष्ट्यपूर्ण तंत्राने दगडी गाभ्यावर प्रक्रिया करून आणि लाकडी दांडक्याचा ( सिलिंडर हॅमर ) वापर

करून बनविण्यात आली होती याचाही उल्लेख आधी आलेला आहे. ज्या भागामध्ये आणि ज्या संदर्भामध्ये ही हत्यारे उत्तर प्रदेश, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, तामिळनाडू आणि महाराष्ट्रामध्ये सापडली आहेत त्यावरून या कालात हवामान काहीसे कोरडे असावे असा निष्कर्ष काढला गेला आहे. या हत्यारांबरोबर घोडनदीवरील इनामगाव येथे पाणघोडा, घोडा, बैल, रेडा आणि सांबर यांची अश्मीभूत हाडे अलीकडे सापडली आहेत. यावरून इनामगाव परिसरात तरी बराच झाडझाडोरा आणि काहीशी दलदलीची स्थिती असली पाहिजे असे मत मांडले गेले आहे. कारण त्या शिवाय पाणघोड्यासारखा प्राणी जगू शकणार नाही. महाराष्ट्रात गोदावरीच्या दक्षिणेस सापडलेला पाणघोड्याचा हा पहिला अवशेष आहे. महाराष्ट्रात या कालखंडाचे कार्बन-१४ पद्धतीने करण्यात आलेले कालमापन भारतातील इतर स्थलांशी (उत्तर प्रदेश : बेलन नदी : सुमारे १९,०००) मिळते-जुळते आहे. ( Badam 1979 : पप्पू १९८३-८४ )

**मध्याश्मयुग (मेसोलिथिक)**

उत्तरपुराश्मयुगाच्यानंतर सांस्कृतिक उत्क्रमाच्या दृष्टीने मध्याश्मयुग येते. या कालखंडाचे वैशिष्ट्य म्हणजे अतिशय लहान आकाराची, बहुतांशी भौमितिक आकाराची बनविलेली (त्रिकोण, समान्तर - द्विभुज-चौकोन, चंद्रकोर वगैरे) हत्यारे. ही हत्यारे चाल्सिडोनी, ॲगेट, कार्नेलियन यासारख्या उत्तम पोताच्या गारगोटीच्या छिलक्यापासून बनविली जात. यांचे सविस्तर वर्णन देण्याआधी एक बाब स्पष्ट करणे आवश्यक आहे. मध्याश्मयुग कालदृष्ट्या आणि सांस्कृतिक उत्क्रमाच्या संदर्भात पुराश्मयुग आणि नवाश्मयुग यांच्यामध्ये येते. म्हणून 'पुराश्मयुग' आणि 'नवाश्मयुग' या एका अर्थाने सांस्कृतिक संदर्भाच्या संज्ञा आहेत. परंतु 'मध्याश्मयुग' ही संज्ञा कालनिबध्द म्हणजे 'पुराश्मयुग आणि नवाश्मयुग यांच्यामध्ये असणारा कालखंड' या अर्थाने रूढ झालेली आहे. खापरांचा वापर नसलेली, परंतु शेती व पशुपालन यावर आधारीत ग्रामसंस्कृतीच्या आधीची ही अवस्था आहे. या कालखंडाचे आणखी एक वैशिष्ट्य असे की यात

वापरली जाणारी हत्यारे अश्मयुगाच्या कोणत्याही अवस्थेमध्ये सापडलेल्या हत्यारांच्या संख्येपेक्षा कितीतरी पटीने विपुल आहेत.

मध्याश्मयुगाची स्थले भारतामध्ये गंगा-यमुनादुआब, आसाम आणि कोकणपट्टी सोडून, जवळपास सर्वत्र सापडली आहेत. या कालातील लोक घट्ट झालेल्या वाळूच्या लहान लहान टेकड्यावर (गुजरात, मारवाड), नैसर्गिक गुहात (मध्यप्रदेश), नदीच्या गाळाच्या मैदानावर (पश्चिम बंगाल), खडकाळ परंतु सपाट प्रदेशावर (राजस्थानातील मेवाड), तळ्यांचे काठी (अलाहाबाद आणि प्रतापगढ : उत्तर प्रदेश) त्याचप्रमाणे काही वेळा समुद्रकाठी (सालसेट बेट : महाराष्ट्र ; तामिळनाडू : मद्रास जवळील 'तेरी' स्थळे) – अशा विविध ठिकाणी वस्ती करून राहात असल्याचा पुरावा उपलब्ध झालेला आहे. या कालखंडाची भीमबेटका, आदमगड (मध्यप्रदेश), बागोर (राजस्थान), बिरभानपूर (प. बंगाल), लांघणज (गुजरात), सराई नहर राय (उत्तर प्रदेश) ही महत्वाची ठिकाणे आहेत.

या कालखंडातील मानवी जीवन या आधीच्या कालखंडापेक्षा तौलनिकदृष्ट्या सुस्थिर झाल्याचे दिसते. या कालखंडात मेंढ्या, चितळ, नीलगाय, काळवीट इत्यादी प्राणी अस्तित्वात होते. मृताला पुरण्याची पद्धती या काळात प्रचलित झाली. काही ठिकाणी झोपड्यांचे अवशेष व त्यातील बनविलेली जमीन उत्खननामधे सापडली (पश्चिम बंगाल). परंतु या कालखंडातील मानवाची साधनसामग्री मात्र अत्यंत मर्यादित असल्याचे आढळून येते. तोडण्या-फोडण्याकरिता आणि पिसण्याकरिता खोलगट पाटे आणि लंबगोल गोट्यांचा वापर करण्यात येत असे.

या काळातील गारगोटीच्या छिलक्यापासून बनविलेली हत्यारे आकाराने लहान असली तरी त्यामध्ये खूप विविधता दिसून येते. उत्कृष्ट पन्हाळीदार छिलके काढलेले गाभे (कोअर) आणि समांतर बाजू असलेले सुबक, पातळ छिलके हे या कालातील वैशिष्ट्य समजले जाते. लहानलहान छिलक्यावर अत्यंत सूक्ष्म छिलके काढून त्यापासून विविध तऱ्हेची पाती, वेधण्या, त्रिकोण इत्यादी हत्यारे बनवीत असत. या हत्यारांची लांबी सर्वसाधारणपणे १ ते ३ सें. मी. आढळून येते आणि ही लाकडाच्या

किंवा हाडाच्या खाचेमध्ये नैसर्गिक गोंदाच्या साहाय्याने पक्की बसवून त्यांचा विळे वगैरेसारखा उपयोग केला जाई. ( Sankalia 1977 )

महाराष्ट्रात अशा हत्यारांचा आढळ पुणे, जळगाव, धुळे, चंद्रपूर, अहमदनगर, नांदेड या जिल्ह्यात व इतर अनेक ठिकाणी झालेला आहे. सर्वसाधारणपणे तापी, गोदावरी, प्रवरा व इतर अनेक नद्यांच्या खोऱ्यामध्ये या कालखंडाची हत्यारे सापडली आहेत. त्यांचा काळ कार्बन-१४ कालमापनानुसार १२ ते १३ हजार वर्षे इतका प्राचीन (घोड काठच्या इनामगाव येथील शिंपल्यांच्या कालमापनावर आधारित) असल्याचे सिद्ध झाले आहे. परंतु सर्वसाधारणपणे या कालखंडाची व्याप्ती १२ हजार ते ५ हजार वर्षपूर्व मानली जाते.

### नवाश्मयुग

अश्मयुगातील ही शेवटची अवस्था. हिला 'नवाश्मयुग' असे नाव देण्याचे कारण असे की या युगामध्ये मानवी जीवनात क्रांतीकारक बदल झाले. केवळ दगडी हत्यारांच्या दृष्टीने पाहावयाचे झाल्यास या कालातील दगडी हत्यारांचे तंत्र या आधीच्या अश्मयुगाच्या हत्यारांपेक्षा अत्यंत वेगळे दिसून येते. 'डोलेराईट' या उत्तम पोताच्या काळ्याशार दगडापासून ही हत्यारे बनविली जात. गोट्यावर छिलके काढून योग्य तो आकार दिल्यानंतर या हत्यारांची वापरण्यास योग्य अशी बाजू खडकातील खाचात घासून धारदार करण्यात येत असे. किंबहुना सध्या वापरात असलेल्या लोखंडी कुऱ्हाडी व छिन्न्या इतक्याच नवाश्मयुगातील दगडी कुऱ्हाडी व छिन्न्या उपयोगी ठरतात. (फलक ५ : १ - ३)

भारतातील नवाश्मयुगाचा पुरावा काही विभागीय वैशिष्ट्ये असलेला आहे. त्यामुळे उत्तर भारत, मध्य भारत, पूर्व भारत आणि दक्षिण भारत असा सापडलेला पुरावा वर्गीकृत करता येतो. महाराष्ट्राच्या निकट असलेल्या आंध्र आणि कर्नाटकामध्ये नवाश्मयुगाचा पुरावा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झाला असून या संस्कृतीच्या लोकांच्या वस्त्यांचे अवशेष त्याचप्रमाणे त्यांच्या जीवनाचे विविध पैलू स्पष्ट करणारा पुरावाही सापडलेला आहे. महाराष्ट्रात मात्र विशुद्ध

स्वरूपातील नवाश्मयुगीन संस्कृतीचा किंवा तिच्या स्थलाचा शोध अद्याप तरी लागलेला नाही.

या कालखंडामध्ये मानवी जीवनामध्ये क्रांतीकारक बदल झाला असे वर उल्लेखिले आहे. एके ठिकाणी झोपड्या बांधून स्थिर जीवनाची सुरूवात, पशुपालन, शेतीद्वारे धान्योत्पादन, घासून धारदार बनविलेल्या दगडी हत्यारांचा वापर आणि हातबनावटीच्या राखी रंगाच्या मडक्यांची निर्मिती – या क्रांतीकारक घटना या युगाशी निगडीत आहेत. धान्योत्पादनामुळे या युगात मानव भटके जीवन सोडून स्थिर जीवन जगू लागला. या आधीच्या अश्मयुगीन अवस्थांमध्ये तो 'अन्नोत्पादक' नसून 'अन्न गोळा करणारा', भटका होता.

नवाश्मयुगाचा व्यापक आढावा घेण्याचे प्रयोजन येथे नाही. आंध्र - कर्नाटकामध्ये संगलकल, टेक्कलकोटा, पिकलीहाळ, हल्लूर, नागार्जुनकोण्डा, पालावाय, ब्रह्मगिरी, कोडेकल, उटनूर, इत्यादी ठिकाणी नवाश्मयुगीन अवशेष उत्खननामध्ये विस्तृत स्वरूपामध्ये सापडले आहेत. गोल झोपड्यांची घरे, गायी - बैल, म्हैस, बकऱ्या, डुकरे यांचे कळप पाळणे, हुलगे, रागी इत्यादी धान्याचे उत्पादन करणे, जमिनीवर फरे पाडण्यास योग्य अशा गोल दगडी कडी बसलेल्या काठ्यांचा वापर करणे, काही वेळा (उत्तर काळात) सोने आणि तांब्याचा वापर करणे त्याचप्रमाणे शंख, माती आणि दगडाचे मणी वापरणे, करड्या मडक्यावर लाल गेरूचे पट्टे देऊन रंगकारी करणे त्याचप्रमाणे (काही ठिकाणी) काळी - आणि - तांबडी मडकी वापरणे ही यांची वैशिष्ट्ये आंध्र - कर्नाटकामध्ये दिसून आली आहेत. आंध्र-कर्नाटकातील नवाश्मयुगाची कालव्याप्ती सर्वसाधारणपणे इसवी पूर्व २४०० ते १००० अशी कार्बन - १४ पद्धतीनुसार निश्चित करण्यात आली आहे. महाराष्ट्रामध्ये या संस्कृतीची निदर्शक घासून धारदार केलेली हत्यारे, राखी रंगाचे दफनकुंभ इत्यादी वैशिष्ट्ये ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीच्या अवशेषांबरोबर सापडलेली आहेत. यावरून सध्याच्या महाराष्ट्राचा आंध्र - कर्नाटकाबरोबर संपर्क असावा असे स्पष्ट होते. नवाश्मयुगामध्ये मानव स्थिर जीवनाचा असला तरी, मोठ्या प्रमाणावर शेतीतून

धान्योत्पादन, स्थिर स्वरूपाच्या खेड्यांची स्थापना, तांब्याचा तौलनिकदृष्ट्या मोठ्या प्रमाणावर वापर आणि उत्कृष्ट बनावटीची चाकावर घडविलेली, चित्रकारी असलेली आणि उत्तम भाजणीची मडकी – ही सर्व वैशिष्ट्ये, या नंतरच्या, म्हणजे ताम्रपाषाणयुगामध्ये दिसून येतात. शेती उत्पादनावर आधारीत स्थिर खेड्यांची स्थापना ताम्रपाषाणयुगात महाराष्ट्रात इसवी पूर्व सुमारे १५०० च्या आसपास झाली आणि हे कर्तृत्व 'आद्य शेतकऱ्यांचे' होते. धातुयुगाची सुरूवात याचवेळी झाली.

* * *

प्रकरण ३

# महाराष्ट्रातील आद्य शेतकरी

उत्तर - पाषाणयुगाच्या अस्तानंतर हजारो वर्षे महाराष्ट्राच्या भूभागावर मानवी वस्ती झाल्याचा ठावठिकाणा उपलब्ध झालेला नव्हता. त्यामुळे पाषाणयुगाच्या अस्तानंतर कोणत्या घडामोडी झाल्या याची कल्पना करता येत नव्हती. पाषाणयुगाचा शेवटही कोणत्या कारणामुळे वा कोणत्या परिस्थितीत झाला याची अटकळ बांधता येत नव्हती. या कालखंडानंतर उपलब्ध झालेला मानवी वस्तीचा पुरावा ऐतिहासिक लोहयुगाचाच ज्ञात असल्याने, बऱ्याच मोठ्या कालखंडाचा इतिहास अज्ञातच राहिला होता.

या अज्ञात कालखंडावर प्रकाश पाडणारा पुरातत्वीय पुरावा १९४७-४८ च्या सुमारास अचानकपणे उपलब्ध झाला आणि त्यामुळे पाषाणयुग ते लोहयुग यामधील एका महत्त्वपूर्ण दुव्याचा शोध इतिहास मांडणीच्या संदर्भात अद्वितीय ठरला. अहमदनगर जिल्ह्यातील प्रवरेच्या काठी असलेले संगमनेर जवळचे जोर्वे हे छोटेसे खेडे आणि त्याच्या परिसरात सापडलेली एका नवीन प्रकारची मडकी यांनी सांस्कृतिक इतिहासातील कच्चे दुवे जोडण्याचे काम केले. १९४७ साली प्रवरेला आलेल्या पुरामुळे जोर्वेच्या वस्तीची वाताहात झाली आणि त्यामुळे तिथेच असलेल्या पांढरीच्या टेकाडावर गावकऱ्यांनी वस्ती केली. वस्तीसाठी आणि नांगरटीसाठी खणताना या पांढरीतून तांबड्या पृष्ठभागावर काळ्या रंगात चित्रकारी केलेली तोटीची भांडी व वाडगे अशी, आतापर्यंत माहित नसलेल्या आकाराची, मडकी गावकऱ्यांना सापडली. जोर्वे म्हणजेच महाभारतातील जरासंध राजाची नगरी होती अशी आख्यायिका लोकात प्रचलित असल्याने ही मडकी महाभारतकालीन लोकांची असली पाहिजेत अशी भावना बळावली. काही दिवसांनी जोर्वेला तांब्याच्या सपाट

काटकोन - चौकोनी कुऱ्हाडीही सापडल्या. त्याही जरासंधाच्या काळातील असल्या पाहिजेत अशी गावकऱ्यांची खात्री झाली. अशा स्वरूपाच्या वा आकाराच्या कुऱ्हाडी किंवा अशा प्रकारची वैशिष्ट्यपूर्ण आकाराची मडकी तोपर्यंत महाराष्ट्रात कुठेही सापडलेली नसल्याने ती अद्वितीय ठरली. यांच्या बरोबरच गारगोटीच्या छिलक्यापासून बनविलेली अनेक प्रकारची लहान लहान हत्यारे – पाती, तासण्या, बाणाग्रे, टोचे – वरवर आढळून आल्याने, रंगीत मंडकी, तांब्याचा व गारगोटीच्या छिलक्यांचा वापर करणारे लोक प्राचीन काळात जोर्वे परिसरात प्रवरेच्या काठी रहात असले पाहिजेत असे अनुमान करता आले. १९५०-५१ च्या सुमारास जोर्वेला छोटेसे उत्खनन डेक्कन कॉलेजतर्फे करण्यात आले. उत्खननातही अशाच तऱ्हेचा पुरावा मिळाल्याने या पुराव्याच्या प्राचीनतेची खात्री पटली. याच कालात गोदावरीकाठच्या नाशिक येथेही उत्खनन करण्यात आले आणि येथेही अगदी पहिली वस्ती अशी रंगीत मडकी, गारगोटीची हत्यारे आणि तांब्याच्या वस्तू वापरणाऱ्यांनी म्हणजे ताम्र-पाषाणयुगीन संस्कृतीच्या लोकांनी केली हे सिद्ध झाले. नाशिक आणि जोर्वे येथील आद्य वस्ती करणारे लोक एकाच संस्कृतीचे होते हे स्पष्ट झाले. उत्खननात उपयुक्त ठरणाऱ्या स्तरसिद्धान्तानुसार या ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीचा कालखंड तौलनिक दृष्ट्या इसवी पूर्व सुमारे १५०० ते १००० असावा असे अनुमान केले गेले.

गेल्या चार दशकात महाराष्ट्राच्या विविध भागात जे संशोधन आणि उत्खनन केले गेले, त्यानुसार कोकण व विदर्भाचा बराचसा भाग सोडून, या ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीच्या लोकांनी महाराष्ट्राच्या विस्तृत भूभागावर वस्ती केल्याचा पुरावा फार मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झालेला आहे. अगदी अलीकडे विदर्भातही एक दोन ठिकाणी या संस्कृतीच्या अस्तित्वाचा पुरावा उपलब्ध झाल्याचा दावा केला गेला आहे. एवढे मात्र खरे की पश्चिम महाराष्ट्रातल्या जवळपास सर्व छोट्या-मोठ्या नद्यांच्या काठी आणि खोऱ्यात लहान मोठ्या वस्त्यांचा आढळ झालेला आहे. महाराष्ट्रात शेतीवर आधारित स्थिर जीवनाचा पाया घालणारे महाराष्ट्राचे हे आद्य शेतकरी ठरतात! सुसंस्कृत जीवनाचा पाया घालणारे हे लोक महाराष्ट्राच्या विविध भागात पसरले. यांच्या

वस्त्यांची दोनशेहून जास्त स्थळे शोधली गेली आहेत. उत्कृष्ट बनावटीची, चाकावर घडविलेली, उत्तम भाजल्यामुळे खणखणीत आवाज देणारी आणि काळ्या रंगात रंगविलेली मडकी, तांब्यापासून विविध वस्तू बनविण्याचे तंत्रज्ञान, विविध धान्यांचे उत्पादन आणि वैशिष्ट्यपूर्ण मानवी दफने ही यांची प्रमुख वैशिष्ट्ये सांगता येतात.

तापी, गोदावरी, कृष्णा, गिरणा, प्रवरा, घोड, भीमा, मुळा, निरा, धाम इत्यादी नद्यांच्या काठी या संस्कृतीच्या लोकांच्या वस्त्यांचे अवशेष सापडलेले आहेत. या संस्कृतीच्या लोकांच्या वस्त्यांची भौगोलिक पखरण लक्षात घेतली तर असे दिसून येते की वस्ती करण्यासाठी सर्वसाधारणपणे यांनी दोन नैसर्गिक घटकांचा विचार केला होता. त्यातील पहिला घटक म्हणजे ज्या ठिकाणी नद्यांच्या बारमाही पाण्याचा साठा उपलब्ध असेल अशी जागा निवडणे आणि दुसरे असे की पाण्याबरोबरच शेतीस उपयुक्त ठरेल अशी जमीन वस्तीच्या भोवती वा तिच्या नजिक असेल हे पाहाणे. वस्ती करण्यासाठी या दोन घटकांची नितांत आवश्यकता होती कारण हे लोक शेती करून स्थिर जीवन जगणारे होते. पाषाणयुगातील लोकांप्रमाणे ते भटके नव्हते. पाणवठा आणि शेतजमिनीची उपलब्धी या वैशिष्ट्यांशिवाय आणखी एक वैशिष्ट्य दिसून येते. या ताम्रपाषाणयुगीन वस्त्या सर्वसाधारणपणे समुद्रसपाटीपासून सुमारे १,५०० ते २,००० फूट उंचीवर असलेल्या प्रदेशात झालेल्या आढळून येतात. त्यामुळे यथायोग्य बेताचा पाऊस, काळी माती आणि शेतीस पुरेल इतके पाणी उपलब्ध करून देणाऱ्या नद्या यांचा विचार यामागे असावा असे दिसून येते.

या संस्कृतीच्या लोकांचा शोध महाराष्ट्राच्या संदर्भात प्रवराकाठी जोर्वे या ठिकाणी लागल्याने या संस्कृतीला 'जोर्वे संस्कृती' असे नाव देण्यात आले. हिची व्याप्ती सुरूवातीला प्रवरा (जोर्वे), गोदावरी (नाशिक) खोऱ्यात आढळून आली तरी नंतर झालेल्या समन्वेषण - उत्खननात ती इतर नद्यांच्या खोऱ्यातही – तापी, गिरणा, घोड, कृष्णा, भीमा वगैरे – पसरली होती हे स्पष्ट झाले. मात्र महाराष्ट्रात फक्त जोर्वे संस्कृतीच ताम्रपाषाणयुगाची निदर्शक होती किंवा फक्त याच संस्कृतीचे लोक इसवी पूर्व १५०० ते १००० या काळात येथे

राहात होते असे म्हणता येण्यासारखी परिस्थिती राहिली नाही. जोर्वे संस्कृतीची ओळख पटत असतांनाच, गेल्या २०-२५ वर्षात जी प्रमुख उत्खनने झाली त्यावरून असे स्पष्ट झाले आहे की, जोर्वे व्यतिरिक्त इतरही अनेक ताम्रपाषाणयुगीन संस्कृती महाराष्ट्रात अस्तित्वात होत्या आणि त्या कालदृष्ट्या जोर्वेच्या आधीच्या होत्या. सावल्डा, उत्तर हडाप्पा, माळवा या त्या संस्कृती असून त्या जोर्वेपूर्व तर आहेतच परंतु त्या सांस्कृतिकदृष्ट्या जोर्वेपेक्षा वेगळ्या असल्याचे दिसून आलेले आहे. यामुळे ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीचा काळ जोर्वे येथील पुराव्यानुसार इसवी पूर्व सुमारे १५०० ते १००० असा जो ठरविण्यात आला होता, त्यातही बदल करणे अपरिहार्य झाले. सावल्डा संस्कृती – खानदेशातील तापी काठचे एक स्थळ – ते जोर्वे संस्कृतीचा अस्त या सांस्कृतिक कालाची मर्यादा आता इसवी पूर्व सुमारे २२०० ते इसवी पूर्व सुमारे ७०० अशी स्पष्ट झाली असून तिला कार्बन - १४ कालमापन पद्धतीनुसार दुजोराही मिळाला आहे.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे या कालखंडात महाराष्ट्राचा भारतातील इतर ताम्रपाषाणयुगीन संस्कृतींशीही संपर्क आला हे स्पष्ट झाले आहे. सौराष्ट्र - गुजराथ, राजस्थान, मध्यप्रदेश आणि आंध्र - कर्नाटक या सध्याच्या प्रदेशांशी महाराष्ट्राचा निकटचा संबंध आला, हे या विविध ताम्रपाषाणयुगीन संस्कृतींच्या उपलब्ध पुराव्यावरून सिद्ध झाले आहे. सौराष्ट्र - गुजराथेतून सिंधू अथवा हडाप्पा संस्कृती, राजस्थानातून अहाड अथवा बनास संस्कृती, मध्यप्रदेशातून माळवा संस्कृती आणि आंध्र - कर्नाटकातून नवाश्म संस्कृती या सर्वांचा महाराष्ट्राशी संपर्क आल्याचे दिसून येते. त्यामुळे महाराष्ट्रातील ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीची विविधता तर स्पष्ट होतेच, परंतु या संस्कृतीचे धागे विणण्यात इतर संस्कृतींचे योगदान कशा प्रकारचे आणि गुणात्मकरीत्या किती होते याची कल्पना करता येते. केवळ हडाप्पा संस्कृतीचा विचार करायचा झाला तर असे म्हणता येते की उत्तर महाराष्ट्राच्या तापी-गिरणा खोऱ्यातून पार अहमदनगर जिल्ह्यातील प्रवरा काठच्या दायमाबादपर्यंत या संस्कृतीचा संपर्क झाल्याचा पुरावा – खापरे आणि मडक्यावर चित्रित केली गेलेली लिपी – अलिकडे निर्विवादपणे

उपलब्ध झालेला आहे. महाराष्ट्रातील ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीची जडणघडण एकसंघ नसली तरी तिचा मुख्य गाभा मात्र दोन ठळक घटकांनी घडविला गेला हेही तितकेच खरे !

हे दोन घटक म्हणजे माळवा आणि जोर्वे संस्कृती. यातील पहिली प्रादेशिक नाव असलेली आणि दुसरी स्थलनाम असलेली आहे. मध्यप्रदेशातील माळव्याच्या पठारावर नर्मदा आणि तिच्या उपनद्यांच्या खोऱ्यात या संस्कृतीची स्थळे पहिल्या प्रथम आणि मोठ्या संख्येने सापडल्याने या संस्कृतीला माळवा संस्कृती असे नाव पडले. जोर्वे संस्कृतीला नाव कसे दिले गेले याचा उल्लेख आधी आला आहेच. कालदृष्ट्या या दोहोमध्ये माळवा आधीची व जोर्वे नंतरची असली तरी यांचा काल इसवी पूर्व १६०० ते इसवी पूर्व ८०० - ७०० असा निर्धारित करणे शक्य झालेले आहे.

महाराष्ट्रातील ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीचा उदय कसा झाला हे निश्चितपणे स्पष्ट झालेले नसले तरी त्यामागील काही घटनांची दखल घेतल्यास काही दुव्यांची ओळख पटते. पाषाणयुगाची शेवटची अवस्था 'नवाश्मयुग' या नावाने ओळखली जाते. खुद्द महाराष्ट्रात केवळ याच संस्कृतीचे स्थळ अद्याप अज्ञात असले तरी आंध्र - कर्नाटकात या संस्कृतीची स्थळे ज्ञात असून त्यापैकी काहींचे उत्खननही झालेले आहे. पशुपालन, शेतीतून धान्योत्पादन, घासून गुळगुळीत आणि धारदार केलेली कुऱ्हाडीसारखी दगडाची हत्यारे, वैशिष्ट्यपूर्ण राखी रंगाची मडकी, गोल झोपड्या आणि मानवी दफने ही या संस्कृतीची काही ठळक वैशिष्ट्ये आहेत. नवाश्मयुगाचा कालही माळवा संस्कृतीच्या आधीचा, म्हणजे इसवी पूर्व सुमारे २५०० - २००० असा कार्बन - १४ कालमापन पद्धतीनुसार आलेला आहे. यापेक्षाही महत्त्वाची बाब अशी की माळवा - जोर्वे संस्कृतीच्या स्थळांच्या उत्खननात काही ठिकाणी घासून गुळगुळीत व धारदार केलेल्या दगडी कुऱ्हाडी, राखी रंगाची मडकी आणि दफन पद्धती सापडलेल्या असल्याने नवाश्मयुगीन संस्कृतीची काही वैशिष्ट्ये महाराष्ट्रातील ताम्रपाषाणयुगीन लोकांनी स्वीकारली होती असे स्पष्ट होते.

या शिवाय दायमाबादच्या उत्खननाने एक नवीन पुरावा उजेडात आणला आहे. या ठिकाणी आतापर्यंत तीन वेळा उत्खनन करण्यात आले. १९५८-५९ साली केल्या गेलेल्या पहिल्या उत्खननात नवाश्मयुगीन संस्कृतीशी मिळती-जुळती राखी रंगाची मडकी सापडली आणि ही कर्नाटक मधील ब्रह्मगिरी येथील प्रथम वस्तीशी साम्य दाखविणारी होती. परंतु याच ठिकाणी नंतर जी दोन उत्खनने झाली त्यातून स्पष्ट झालेला सांस्कृतिक क्रम वेगळा असल्याचे स्पष्ट झाले. येथील वस्त्यांचा क्रम खालीलप्रमाणे होता.

पहिला कालखंड – सावल्डा संस्कृती
दुसरा कालखंड – उत्तर हडाप्पा संस्कृती
तिसरा कालखंड – पिंगट आणि पिवळसर मडकी (बफ ॲण्ड क्रीम) वापरणाऱ्यांची संस्कृती
चौथा कालखंड – माळवा संस्कृती
पाचवा कालखंड – जोर्वे संस्कृती

यातील पहिल्या संस्कृतीचे नाव धुळे जिल्ह्यात तापीच्या काठी असलेल्या सावल्डा या ग्राम नावावरून दिले गेले याचा उल्लेख या आधी आलेलाच आहे. मध्यम जाडीची आणि जाड्या भरड्या पोताची ही खापरे लेप दिलेली (Slipped) असून त्यांचा रंग फिकट गुलाबी, फिकट नारिंगी, तपकिरी किंवा पिवळसर असून त्यावर काळ्या किंवा काही वेळा तपकिरी, फिकट जांभळ्या किंवा लाल रंगात प्रामुख्याने रेघांचे चित्रकाम केल्याचे दिसून येते. उंच मानेचे गडवे, थाळी, परात, वाडगा, आलंबयुक्त थाळी ( Dish -- on -- stand ) गोल कडी सारखे स्टँड या सारख्या आकाराची मडकी या प्रकारात बनविण्यात येत असत. ही मडकी फक्त तापीच्या खोऱ्यातच सापडलेली आहेत असे नसून ती दक्षिणेस कर्नाटकात कृष्णा नदीच्या खोऱ्यातील काही ठिकाणी सापडल्याचा दावा केला गेला आहे. असे असले तरी महाराष्ट्रातील नेवासे, चांडोली, सोनगांव, प्रकाश, इनामगाव इत्यादी स्थळांच्या उत्खननात ती सापडलेली नाहीत हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

आधी उल्लेखिल्याप्रमाणे, महाराष्ट्रातील ताम्रपाषाणयुगीन सभ्यतेचा गाभा, माळवा व जोर्वे संस्कृती ठरल्या आहेत. या संस्कृतींचा पुरावा महाराष्ट्रात अनेक नद्यांच्या काठी व खोऱ्यात सापडलेला असला तरी त्यांचे उत्खनन बहुतांशी मर्यादित प्रमाणात झालेले आहे. याला अपवाद फक्त अहमदनगर जिल्ह्यातील प्रवराकाठचे दायमाबाद आणि पुणे जिल्ह्यातील घोडनदीकाठचे इनामगाव यांचा आहे. नगर जिल्ह्यातील प्रवराकाठच्या नेवासे येथेही विस्तृत उत्खनन झालेले असले तरी दायमाबाद व इनामगाव उत्खननात आणि कालमापनात शास्त्रीय पद्धतींचा वापर आणि पुराव्याचे विश्लेषण करण्यासाठी अनेक शास्त्रशाखांची मदत यामुळे ही दोन उत्खनने अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण ठरलेली आहेत. या स्थलांव्यतिरिक्त तापीकाठी प्रकाश, गिरणाकाठी बहाळ आणि टेकवडा, घोडकाठचे चांडोली, निरा-कऱ्हा संगमावरील सोनगाव, भीमा-मुळा संगमावरचे वाळकी आणि गोदावरीकाठचे आपेगाव यांची उत्खनने मर्यादित स्वरूपातील असली तरी त्यांची दखल घेणे अपरिहार्य ठरते.

महाराष्ट्रातील ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीचा आढावा घेण्यासाठी आणि तिची वैशिष्ट्ये कोणती याचे स्थूलमानाने विवेचन करण्यासाठी या संस्कृतीच्या काही निवडक स्थळांचे जे उत्खनन झाले त्याचा गोषवारा देणे उचित ठरेल. यामुळे या संस्कृतीसंबंधीच्या ज्ञानामध्ये भर कशी पडत गेली हे स्पष्ट होईल. ही संस्कृती महाराष्ट्राच्या – कोकण वगळता – जवळपास सगळ्या प्रमुख नद्यांच्या खोऱ्यांमध्ये अस्तित्वात होती याचा उल्लेख या आधी आलेला आहे. त्यामुळे काही वैशिष्ट्यपूर्ण उत्खननांचाच निर्देश केलेला आहे.

### जोर्वे

अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेरपासून आठ किलोमीटर पूर्वेस प्रवरा नदीच्या उत्तर काठावर असलेल्या जोर्वे या लहानशा खेड्यात १९५०-५१ मध्ये उत्खनन करण्यात आले. या मर्यादित उत्खननामध्ये फक्त ताम्रपाषाण संस्कृतीचीच वस्ती झाल्याचे दिसून आले. या ठिकाणी पहिल्या प्रथमच सापडल्यानुसार या मडक्यांना जोर्वे मडकी असे नाव देण्यात आले. ही मडकी

खणखणीत आवाजाची, उत्तम भाजणीची, लाल रंगाची आणि चाकावर घडवलेली असून या मडक्यांवर काळ्या रंगात प्रामुख्याने रेषा, पट्टे, जाळी, जाळीचे त्रिकोण आणि चौकोन असे भौमितिक प्रकाराचे चित्रकाम केलेले आहे. फनेलसारखे तोंड व तोटी असलेली मडकी, त्याचप्रमाणे अंतर्वक्र बाजू असलेले वाडगे हे प्रमुख आकार असून या शिवाय कप, तसराळे, झाकण्या हेही आकार प्रचलित होते. तोटीयुक्त वाडगे त्याचप्रमाणे एकावर एक जोडलेली उतरंडीसारखी मडकी हेही वैशिष्ट्यपूर्ण आकार जोर्व्याच्या उत्खननामध्ये सापडले. काही मडक्यांच्यावर उत्कीर्ण रेषा त्याचप्रमाणे काळ्या रेषात काढलेली काही चिन्हे (ज्यांना कुंभाराच्या निशाण्या असे मानले जाते) दिसून आली. या शिवाय विविध रंगीत दगडाचे मणी, तांब्याच्या चपट्या काटकोन-चौकोनी कुऱ्हाडी व बांगड्या, त्याचप्रमाणे गारगोटीच्या छिलक्यापासून बनलेली विविध तऱ्हेची पाती वापरात होती. उत्खनन मर्यादित असल्याने या लोकांच्या जीवनपद्धतीबद्दल इतर माहिती उपलब्ध झाली नाही. या संस्कृतीचा कालखंड निश्चित करता आला नाही तरी, (कारण यावेळी कार्बन - १४ या पद्धतीने कालनिश्चिती करण्याची पद्धती उपलब्ध नव्हती) या लोकांची संस्कृती, नाशिक येथे पहिली वस्ती करणाऱ्यांशी मिळती-जुळती होती हे नाशिकच्या उत्खननावरून स्पष्ट झाले.

### नाशिक

रामकथेशी निगडीत असलेल्या गोदावरी काठच्या या स्थळाचे उत्खनन १९५०-५१ साली करण्यात आले. नाशिकचे प्राचीनत्व आणि त्याचा रामकथेशी असणारा संबंध या बाबींबद्दल माहिती मिळविण्याच्या दृष्टीने येथे उत्खनन करण्यात आले. उत्खननात ताम्रपाषाणयुगापासून ते मराठाकालापर्यंत विविध कालखंडातील वस्त्यांचा पुरावा उघडकीस आला. परंतु महाराष्ट्राच्या इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरली ती पहिली वस्ती. या वस्तीच्या थरामध्ये जोर्वे पद्धतीची खापरे आणि गारगोटीच्या छिलक्यापासून बनविलेली छोटी छोटी हत्यारे सापडली. यावरून नाशिकची पहिली वस्ती आणि जोर्वे येथील पहिली वस्ती यांचे सारखेपण सिद्ध झाले व ताम्रपाषाणयुगीन लोकांनी गोदावरी आणि प्रवरा या दोन्ही नद्यांच्या काठी वस्ती केली होती हे स्पष्ट झाले. मात्र

जोर्वे संस्कृतीचा कालखंड ठरविण्याच्या दृष्टीने एक पाऊल पुढे टाकले गेले. ताम्रपाषाणयुगाच्या वस्तीनंतर बऱ्याच काळपर्यंत नाशिकला वस्ती झाली नाही. दुसरी वस्ती इसवी सन पूर्व पाचव्या शतकात झाली असे मौर्यकालीन मडक्यांवरून स्पष्ट झाले. म्हणजेच यापेक्षा कितीतरी काळ आधी ताम्रपाषाणयुगीन वस्ती नाशिक येथे झाली असावी, असा तर्क करण्यात आला. यानुसार नाशिक व जोर्वे येथील ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीचा कालखंड इसवी पूर्व सुमारे १५०० ते १००० असावा असे अनुमान करण्यात आले. (देव १९६८)

**नेवासे**

महाराष्ट्रातील सुप्रसिध्द संत श्री ज्ञानेश्वर यांचा नेवाश्याशी निकटचा संबंध आहे. ज्या दगडी खांबाला टेकून ज्ञानेश्वरी लिहिली गेली त्या ठिकाणी सध्या मोठे मंदिर बांधण्यात आले आहे. देवळाच्या नजीकच प्रवरा नदीच्या काठावरच 'लाडमोड' या नावाने ओळखले जाणारे पांढरीचे टेकाड आहे. ज्ञानेश्वरकालीन पुरावा अधिक उपलब्ध करून घेण्याच्या दृष्टीने लाडमोड टेकाडावर १९५४ ते १९५६ आणि १९५९ ते १९६० या कालात विस्तृत प्रमाणावर उत्खनन झाले. या विस्तृत उत्खननामध्ये ताम्रपाषाणयुगीन म्हणजेच जोर्वे संस्कृतीचे विविध पैलू स्पष्ट झाले. केवळ मडकी आणि गारगोटीच्या छिलक्यांची हत्यारे यापुरता येथील पुरावा मर्यादित नव्हता तर ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीच्या लोकांचे जीवन कसे होते याची विस्तृत कल्पना पुराव्याने स्पष्ट केली.

प्रवरेच्या काठी असल्याने पांढरीच्या टेकाडाची धूप मोठ्या प्रमाणावर झाली असली तरी ताम्रपाषाणयुगीन पुराव्याला फारसा धक्का लागल्याचे आढळून आले नाही. नेवाश्याच्या या पहिल्या वस्तीच्या अवशेषात जोर्वे आणि नाशिक येथे सापडली तशीच खापरे वापरीत होते. यांचे आकारही जोर्वे प्रमाणेच होते. ही मडकी चाकावर घडविलेली असली तरी मडक्याचे काही भाग वेगवेगळे बनवून नंतर जोडले जात असत, त्याचप्रमाणे, काही मडकी भाजण्याआधी बांबूच्या चटईवर ठेवली जात असत असा पुरावा उपलब्ध

झाला. रंगकाम प्रामुख्याने भौमितिक आकाराचे असले तरी काही मडक्यांवर कुत्रा, काळवीट, यासारख्या प्राण्यांचीही चित्रे काढली होती. घरादारांचे-झोपड्यांचे अवशेष, चोपून बनविलेली जमीन व तिच्यावर चुन्याचे केलेले सारवण, या स्वरूपात होते. अशा जमिनीमध्ये गोल लाकडी वासे पुरून त्यावर छप्पर उभारले जाई. घरांच्या जमिनीत मोठमोठे साठवणीचे रांजण बसवले जात. मातीच्या चुली, त्यावर चिखल लिंपून, सारवल्या जात. काही ठिकाणी काटकोन चौकोनी कुंडे जमिनीतच केल्याचे आणि त्यांचा वापर अग्नीपूजेसाठी करण्यात आल्याचे स्पष्ट झाले.

नेवाश्याच्या उत्खननामध्ये मानवी दफनांचा पुरावा फार मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झाला. एकूण १३१ दफनापैकी, १२६ लहान मुलांची दफने होती. ती सर्व मुले अडीच ते तीन वर्षाच्या वयाची असून, त्यांचे दफन राखी रंगाच्या मडक्यांमध्ये केलेले होते (फलक ८ : ६-७, ). ही दफने घरातच केलेली होती आणि दफनकुंभ बहुतांशी उत्तर-दक्षिण ठेवून उत्तरेकडील मडक्यात डोक्याचा भाग व दक्षिणेकडील मडक्यात पायाचे भाग ठेवण्यात आले होते. काही दफनात लहान-लहान मातीची बोळकी, मातीची खेळणी त्याचप्रमाणे तांब्याचे वाळे सापडले. काही दफनामध्ये रंगीबेरंगी मण्यांच्या माळा मुलांच्या अंगावर ठेवून मुलाचे दफन केले होते. याउलट प्रौढांचे दफन घरातच, परंतु जमिनीमध्ये खड्डा करून मृताला उत्तर-दक्षिण ठेवून, करण्यात आले होते. काही प्रौढांच्या घोट्याखालील भाग अस्तित्वात नव्हता. (Sankalia *et al.* 1960)

तांब्याच्या बांगड्या, वाळे, अंगठ्या, कुऱ्हाडी व छिन्न्या, त्याचप्रमाणे मासे पकडण्याचे गळ (फलक ९ : ५) वापरात होते. याशिवाय विविध प्रकारच्या दगडांचे व मातीचे भाजलेले मणी, दिवे, पाटे, गोफण-गुंडे आणि लहान बैलगाडीची मातीची बनविलेली चाके हे लोक बनवीत असत.

नेवाश्याच्या वस्तीच्या थरात उपलब्ध झालेल्या कार्बनच्या उपलब्धीनुसार या कालखंडाच्या सर्वात वरच्या थराची म्हणजे शेवटच्या कालखंडाची कालनिश्चिती करता आली आहे. इसवीपूर्व तेरावे शतक अशी ही कालनिश्चिती झालेली असल्या कारणाने या संस्कृतीची पहिली वस्ती नेवाश्याला इसवीपूर्व पंधराशेच्या सुमाराला झाली असे अनुमान करता आले आणि हे अनुमान नाशिक आणि जोर्वे येथील पुराव्याशी सुसंगत ठरले.

**प्रकाश**

गोदावरी - प्रवरा नद्यांच्या खोऱ्याव्यतिरिक्त ताम्रपाषाणयुगीन लोकांनी उत्तर महाराष्ट्रात तापी नदीच्या खोऱ्यात वस्ती केली होती असा पुरावा प्रकाश येथील उत्खननाने हाती आला. तापी आणि गोमई या नद्यांच्या संगमावर, धुळे जिल्ह्यात, प्रकाश हे छोटेसे खेडे आहे. १९५५ साली झालेल्या उत्खननामध्ये या ठिकाणी ताम्रपाषाणयुगापासून ते जवळपास इसवी सनाच्या ११ व्या शतकापर्यंत विविध कालखंडात झालेल्या वस्त्यांचा पुरावा उपलब्ध झाला. यातील पहिली वस्ती ताम्रपाषाणयुगीन असून तिचा कालखंड इसवीपूर्व सुमारे १७ वे ते १३ वे शतक असा निर्धारित करण्यात आला. या पहिल्या वस्तीचे दोन काल - विभाग करण्यात आलेले आहेत. यातील '१ अ' या कालखंडात चार प्रमुख प्रकारची खापरे प्रचलित होती. यातील पहिला प्रकार राखी रंगाच्या मडक्यांचा असून त्यावर मळकट पांढऱ्या रंगात चित्रकारी केलेली आहे. दुसरा प्रकार काळ्या रंगात चित्रकाम केलेली माळवा प्रकारची खापरे (ज्यांचा उत्तर - हडप्पाकालातील खापरांशी संबंध जाणवतो) (फलक १५ : ब). तिसरा प्रकार सावल्डा वर्गाची खापरे होत. ही खापरे हळू फिरणाऱ्या चाकावर घडविलेली, काहीशी भरड पोताची आणि बाहेरील पृष्ट भागावर जाड लेप दिलेली आहेत. भाजणीनंतर या लेपाचा रंग लालसर, गुलावी, नारिंगी, तपकिरी किंवा गडद तपकिरी झाल्याचे दिसून येते. यावरील चित्रकाम प्रामुख्याने काळ्या रंगात किंवा कधीकधी लाल किंवा जांभळ्या रंगामध्ये केलेले आढळते. चौथ्या प्रकारची खापरे कर्बुर राखी रंगाची असून त्यावर कोरून किंवा चिकटवून अलंकरण केलेले आहे. याशिवाय या कालात गारगोटीच्या छिलक्यांची पाती (फलक १६ : अ), दगडी बत्ते आणि तांबे किंवा कांस्य यांचाही वापर होता. या नंतरच्या '१ ब' या कालखंडात या आधीच्या कालखंडातील जीवनपद्धतीमध्ये फारसा बदल झाल्याचे आढळून येत नाही. मात्र या कालखंडात जोर्वे वर्गाची खापरे त्याचप्रमाणे गुजरातमधील रंगपूर येथे पहिल्या प्रथम सापडलेली चमकदार लालभडक खापरे वापरात आली असा पुरावा उपलब्ध झाला आहे. प्रकाशच्या उत्खननामुळे महाराष्ट्रातील ताम्रपाषाणयुगीन संस्कृती आणि गुजरात, मध्यप्रदेश या

विभागातील ताम्रपाषाणयुगीन संस्कृती यांचा संपर्क आल्याचे स्पष्ट झाले. ( Thapar 1964 - 65 )

**बहाळ**

तापीला मिळणाऱ्या गिरणा नदीच्या काठावर जळगाव जिल्ह्यातील बहाळ येथे १९५२ आणि त्यानंतर १९५६-५७ या साली उत्खनन करण्यात आले. मथुरा ते पैठण या प्राचीन महामार्गावर बहाळ वसलेले आहे आणि त्या ठिकाणी इतर अनेक अवशेषांवरोबर नाशिकसारखी ताम्रपाषाणयुगीन रंगीत खापरे सापडल्याने येथील उत्खनन प्रकाशप्रमाणेच महत्त्वपूर्ण ठरले. उत्खननात ताम्रपाषाणयुगापासून ते मराठाकालापर्यंत निरनिराळ्या वस्त्यांचे अवशेष उपलब्ध झाले. यातील पहिली वस्ती ताम्रपाषाणयुगीन होती.

या पहिल्या वस्तीचे सांस्कृतिकदृष्ट्या दोन विभाग करता येतात. यातील पहिल्या उपकालखंडात कर्नाटकातील ब्रह्मगिरी येथे नवाश्मयुगीन थरात सापडलेल्या जाड व राखी रंगाच्या खापराप्रमाणे मडकी सापडली. या शिवाय पातळ पोताची आणि लाल गेरूने रंगकाम केलेली राखी रंगाची खापरेही आढळली. हातवनावटीचे मोठमोठे रांजणही सापडले. या रांजणावर चिखलाच्या पट्ट्या चिकटवून अलंकरण केले होते. त्याचप्रमाणे मातृकामूर्तीही चिकटविल्या होत्या. '१ ब' या कालखंडामध्ये उत्कृष्ट बनावटीची लालरंगाची मडकी वापरात आली. यावर काळ्या रंगात विविध प्रकारची नक्षी त्याचप्रमाणे काही जनावरांची चित्रे काढलेली होती. याशिवाय चमकदार भडक रंगाची रंगपूर वर्गाची खापरेही या कालखंडाच्या थरात सापडली. ताम्रपाषाणयुगाच्या शेवटच्या कालामध्ये जोर्वे वर्गाची खापरे वापरात आली. याशिवाय मानवी दफनांचा पुरावाही मर्यादित स्वरूपात उपलब्ध झाला. गारगोटीच्या छिलक्यांची हत्यारे, मातीचे आणि शंखाचे मणी, मातीचे कंगवे आणि तांब्याचा अत्यंत मर्यादित वापर ही इतर वैशिष्ट्ये स्पष्ट झाली. बहाळच्या उत्खननामुळे प्रकाशप्रमाणेच तापी - गिरणा खोऱ्याचे, गुजरात-मध्यप्रदेश इत्यादी प्रदेशांशी आलेल्या संपर्काचे स्वरूप उघड झाले. त्याचप्रमाणे मानवी दफन पद्धतीचे वेगळेपणही निदर्शनास आले. ( *IAR* 1956 - 57 )

**टेकवडा**

जळगाव जिल्ह्यात गिरणा नदीच्या काठी, बहाळच्या समोरील तीरावरील टेकवड्याचे उत्खनन १९५६ - ५७ मध्ये करण्यात आले. उत्खननात प्रामुख्याने मानवी दफनांचा पुरावा उपलब्ध झाला. ही दफने दोन प्रकारची होती. यातील लहान मुलांचे दफन राखी रंगाच्या मडक्यामध्ये आणि प्रौढांचे जमिनीमध्ये खड्डा करून केलेले होते. लहान मुलांच्या दफनात वापरलेल्या काही मडक्यावर काळया - आणि - तांबड्या रंगाचे वाडगे झाकण म्हणून ठेवलेले होते. या वाडग्यावर काही कोरीव चिन्हे आढळून आली. प्रौढांचे दफन खड्ड्यात उत्तरेकडे डोके आणि दक्षिणेकडे पाय असे केलेले होते. मृताच्या पायापाशी राखी रंगाची आणि काळी - आणि - तांबडी मडकी ठेवलेली होती. ही दफने बहाळच्या '१ ब' या कालखंडाशी संलग्न होती. (फलक १०) (*IAR* 1956 - 57)

**सावल्डा**

धुळे जिल्ह्यातील नंदुरबारच्या ईशान्येस २० किलोमीटर अंतरावर तापी नदीच्या काठी सावल्डा वसलेले आहे. या ठिकाणी १९५९ - ६० साली उत्खनन करण्यात आले. उत्खननात काळ्या रंगात चित्रकारी केलेली लाल मडकी त्याचप्रमाणे राखी रंगाची आणि तांबड्या रंगाची मडकी सापडली. आडवे पट्टे, समान्तर नागमोडी रेषा, वर्तुळे, जाळीयुक्त चौकोन आणि त्रिकोण हे अलंकरणाचे प्रमुख प्रकार होते.

खुद्द उत्खननामध्ये ज्याला सावल्डा वर्गाची खापरे असे म्हटले जाते ती योग्य संदर्भात मिळाली नाहीत. परंतु सावल्डाच्या जवळच चिंचोडा, कवठे इत्यादी ठिकाणी ही खापरे आढळून आली. दायमाबादच्या उत्खननामध्ये ही खापरे उत्तर-हडाप्पाकालीन खापरांच्या आधीच्या थरामध्ये मिळाली आहेत. त्यामुळे कालदृष्ट्या ही उत्तर-हडाप्पा खापरापेक्षा आधीची ठरली. परंतु या खापरांचा काल सावल्डा येथे निश्चित करता आला नाही. सावल्डा उत्खननामुळे एका नवीन तऱ्हेच्या खापरांचा पुरावा उपलब्ध झाला. त्याचप्रमाणे तापी खोऱ्यातच उत्तर - हडाप्पा संस्कृतीचे अस्तित्व / संपर्क स्पष्ट झाले. ( *IAR* 1959 - 60 )

## चांडोली

पुणे जिल्ह्यात मंचरच्या पूर्वेस पाच किलोमीटर अंतरावर घोड नदीच्या काठी असलेल्या चांडोली येथे जोर्वे वर्गाची खापरे वरवर सापडल्याने १९६० साली तेथे उत्खनन करण्यात आले. उत्खननामध्ये जोर्वे आणि माळवा वर्गाच्या खापरांव्यतिरिक्त, रंगपूर वर्गाची चमकदार व लालभडक रंगाची खापरे आणि माळवा वर्गात समाविष्ट होणारी दुधट पिवळसर रंगाची मडकी वापरात होती असे दिसून आले. काटकोन - चौकोन आकाराची दुडाची घरे, लाकडी वाश्यांवर आधारित छप्पर, घरामध्ये माती चोपून व सारवलेल्या जमिनी, जमिनीमध्ये बसविलेले रांजण आणि मातीच्या चुली ही या वस्तीची वैशिष्ट्ये होती. घरामध्ये मातीचे गोल ओटे, त्यावर कणगी ठेवण्यासाठी केल्याचे आढळून आले. याशिवाय दगडी पाटे सापडले. घरात रात्रीच्या वेळी उजेडासाठी मातीचे लंबगोल दिवेही मोठ्या संख्येने सापडले. घरातच मृतांना पुरण्याची पद्धत प्रचलित होती. मुलांना राखी रंगाच्या मडक्यात उत्तर - दक्षिण पुरत असत, तर प्रौढांना जमिनीमध्ये खड्डा करून, डोके उत्तरेकडे ठेवून आणि घोट्याखालचे पाय छाटून पुरीत असत. ( ते भूत म्हणून परत येऊ नयेत अशी या मागची कल्पना असावी. ) लहान मुलांना तांब्याच्या आणि रंगीबेरंगी दगडांच्या मण्यांच्या माळा घालून पुरीत असत.

तांब्याच्या विविध वस्तू वापरात होत्या. वाळे, बांगड्या, अंगठ्या या व्यतिरिक्त काटकोन चौकोनी, चपट्या कुऱ्हाडी ( फलक ९ : २ ; १६ : ब ), छिन्न्या ( फलक ९ : ३ , ७ ), मासे पकडण्याचे गळ वापरात होते. उत्कृष्ट पोताच्या काळया दगडाच्या घासून धारदार केलेल्या कुऱ्हाडी, राप्या आणि छिन्न्या वापरल्या जात असत. याशिवाय गारगोटीच्या छिलक्यांची बनविलेली हत्यारेही प्रचलित होती. तांब्याची एक कट्यार वैशिष्ट्यपूर्ण आहे. तिच्या पात्याला मधोमध उठावात कंगोरा असून कट्यारीचा दांडा विभाजित केलेला आहे. कार्बन - १४ कालमापनानुसार चांडोलीच्या वस्तीचा मध्यकाळ इसवी पूर्व १४ व्या शतकात मोडतो. शास्त्रीय कालमापनानुसार निश्चित करण्यात आलेला काळ आणि मध्यप्रदेश, गुजरात - सौराष्ट्र व

आंध्र - कर्नाटक या प्रदेशांशी आलेला संपर्क हे चांडोलीच्या उत्खनित पुराव्याचे वैशिष्ट्य ठरते. काहीच्या मते चांडोलीच्या वैशिष्ट्यपूर्ण कट्यारीची ( फलक ९ : १ ) प्रेरणा पश्चिम आशियात शोधली जावू शकते. या शिवाय बैलाच्या आकाराची चाकावर बसवलेली बाटली अद्वितीय असून तिचेही मूळ पश्चिम आशियात शोधले जावू शकते ( फलक ९ : ६ ) (Deo *et al*. 1965).

**सोनगाव**

तापी, गोदावरी, प्रवरा, घोड या नद्यांच्या खोऱ्यात ज्याप्रमाणे ताम्रपाषाणयुगीन लोकांनी वस्ती केली त्याचप्रमाणे पुणे जिल्ह्यातील नीरा आणि कऱ्हा यांच्या संगमाजवळ या संस्कृतीच्या लोकांनी वस्ती केल्याचा पुरावा बारामती जवळील सोनगाव येथील उत्खननामध्ये १९६५ साली मिळाला. उत्खननामध्ये तीन कालखंडामध्ये वस्ती झाल्याचे दिसून आले. यातील पहिली वस्ती नवाश्मयुगीन ( ? ) लोकांनी केली. राहाण्यासाठी जमिनीत गोल खड्डे करून ( व्यास दोन मीटर ) त्यावर वाश्यांच्या सहाय्याने छप्पर घालणे आणि धान्य साठविण्यासाठी जमिनीत खणून बळद निर्माण करणे ही यांची वैशिष्ट्ये होती. या संस्कृतीचे अस्तित्व आंध्र - कर्नाटकात मोठ्या प्रमाणावर होते. या कालखंडात उपलब्ध झालेली कार्बन - १४ तारीख इसवीपूर्व १५ व्या शतकातील आहे. दुसऱ्या कालखंडातील वस्ती माळवा - जोर्वे संस्कृतीच्या लोकांची होती आणि हे लोक या वर्गाच्या रंगीत खापराव्यतिरिक्त या आधीच्या कालखंडातील राखी रंगाची मडकीही वापरत असत. संपूर्ण घराचा आलेख उपलब्ध झाला नाही तरी घरातील जमिनी माती चोपून व चुन्याने सारवून बनविलेल्या होत्या हे स्पष्ट झाले. नेवासे, चांडोली इत्यादी ठिकाणी उपलब्ध झालेल्या पुराव्याप्रमाणेच सोनगाव येथेही या कालखंडात मुलांना उत्तर - दक्षिण ठेवलेल्या राखी रंगाच्या दोन मडक्यांमध्ये पुरीत असत असे आढळून आले. या शिवाय या कालखंडाच्या थरात जळालेला गहू फार मोठ्या प्रमाणावर सापडला. याचे कार्बन - १४ नुसार कालमापन इसवी पूर्व १३ वे शतक असे करण्यात आलेले आहे. या कालखंडाचा शेवट इसवीपूर्व सुमारे १००० असा अनुमानित करण्यात आला आहे. शेवटच्या, म्हणजे तिसऱ्या

कालखंडामध्ये, जोर्वे वर्गाच्या खापरांच्या बनावटीत आणि आकारात अवनती झाल्याचे आढळून आले. याच कालखंडात काळी - आणि - तांबडी वर्गाची खापरे वापरात आली. ही खापरे आधीच्या कालखंडामध्ये प्रचलित नव्हती. (Deo 1969)

दक्षिणेतील नवाश्मयुगीन संस्कृतीचा वारसा, जमिनीत खणून गोल निवासाची केलेली योजना, बहुधा धान्य साठविण्यासाठी तयार करण्यात आलेली बळदे, शेतीतून उत्पादित केलेला गहू, काळी - आणि - तांबडी खापरे वापरणाऱ्यांशी झालेला संपर्क आणि कार्बन - १४ नुसार निश्चित करण्यात आलेले कालमापन, ही सोनगाव उत्खननाची वैशिष्ट्ये मानावयास हरकत नाही.

**आपेगाव**

पैठण तालुक्यात गोदावरी - वीरभद्रा नदीच्या काठी असलेल्या आपेगाव येथे १९७६ साली उत्खनन करण्यात आले. आपेगावचे पांढरीचे टेकाड गोदावरी आणि वीरभद्रा या नद्यांच्या संगमावर आहे. आपेगाव हे महाराष्ट्रातील विख्यात संत श्री ज्ञानेश्वर यांचे जन्मस्थल मानले जाते. या ठिकाणच्या उत्खननामध्ये पहिली वस्ती ताम्रपाषाणयुगीन लोकांनी केली असे आढळले. या वस्तीचे वैशिष्ट्य असे की या वस्तीमध्ये सुरूवातीच्या काळात एका वेगळया तऱ्हेची मडकी वापरात आली. ही खापरे चाकावर बनविलेली असली तरी ती काहीशी जाड्या - भरड्या पोताची असून त्यावर गडद तपकीरी रंगाचा लेप दिलेला आहे. या लेपावर चिरा पडल्याचे दिसून येते. या मडक्यांवर लाल रंगात बहुतांशी रेघांच्या रूपात चित्रीकरण केलेले आहे. यांना रामतीर्थ वर्गाची (कारण संगमावरील टेकाडाला रामतीर्थ असे नाव आहे) खापरे असे नाव दिले गेलेले आहे. यांची सावल्डा वर्गाच्या खापरांशी जवळीक असावी असे जाणवते. या खापराव्यतिरिक्त माळवा - वर्गाची खापरे, हातबनावटीची राखी खापरे आणि गारगोटीच्या छिलक्यांची हत्यारे या वस्तीशी निगडीत होती. या कालखंडाच्या उत्तरकालात जोर्वे वर्गाची खापरे प्रचलित झाल्याचे आढळून आले. ताम्रपाषाणयुगीन

वस्तीचे कालमापन कार्बन - १४ नुसार इसवीपूर्व १६०० ते १३०० असे करण्यात आलेले आहे. (Deo *et al.* 1976)

**इनामगाव**

घोडनदीच्या काठीच असलेल्या पुणे जिल्ह्यातील चांडोलीच्या उत्खननाचा उल्लेख आधी आला आहेच. याच नदीच्या काठावर पुणे जिल्ह्यातच असलेल्या आणि पुण्यापासून काहीसे ईशान्येस ४५ किलोमीटर अंतरावरील इनामगावचे उत्खनन १९६८ पासून सलग १२ - १३ वर्षे करण्यात आलेले आहे. हे उत्खनन विस्तृत स्वरूपाचे, अत्यंत काळजीपूर्वक केलेले आणि अनेक शास्त्रशाखांतील विद्वानांची मदत घेवून केलेले असल्याने महाराष्ट्रातील ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीच्या संदर्भात अद्वितीय ठरलेले आहे. या उत्खननात सापडलेल्या पुराव्याचे विश्लेषण सखोलपणे नंतर करण्यात येईलच. परंतु माळवा आणि जोर्वे या संस्कृतीचे जवळपास संपूर्ण खेडे, त्याच्या अनेक वैशिष्ट्यांसह, उघडकीस आणण्याचे कार्य या उत्खननामध्ये साध्य झाले. इसवीपूर्व सुमारे १६०० ते ७०० या कालखंडातील लोकजीवनाचे अनेक पैलू स्पष्ट झाले.

ताम्रपाषाणयुगीन वस्त्यांचे तीन 'कालखंड' आढळून आले. यातला पहिला कालखंड माळवा संस्कृतीचा (इसवीपूर्व १६०० ते १४००), दुसरा कालखंड पूर्व - जोर्वे संस्कृतीचा (इसवीपूर्व १४०० ते १२००) आणि तिसरा कालखंड उत्तर - जोर्वे संस्कृतीचा (इसवीपूर्व १२०० - ११११ ते ७००) असे टप्पे दिसून आले.

पहिल्या, म्हणजे माळवा संस्कृतीच्या, कालखंडामध्ये माळवा वर्गाची खापरे वापरात होती. मोठमोठी कुडाची काटकोन चौकोनी घरे (फलक १४) लाकडी वाश्यांच्या आधाराने घातलेले छप्पर, घरामध्ये बहुधा कुडाच्या भिंती घालून केलेल्या खोल्या, मातीच्या बनविलेल्या चुली, घराच्या जमिनीत पुरलेले रांजण, धान्य साठविण्याच्या कणगीकरिता केलेला मातीचा गोल ओटा – ही या घरांची काही वैशिष्ट्ये. या उलट, काही घरे जमिनीत गोल खड्डा करून आणि त्यावर हलके छप्पर टाकून बनविलेली होती. हे लोक शेतीवर, शिकारीवर आणि मासेमारीवर आपला चरितार्थ करीत असत. गारगोटीच्या

छिलक्यांची हत्यारे आणि काही तांब्याच्या वस्तूंचा वापर केला जाई. मुलांना घरात दोन राखी रंगाच्या मडक्यांमध्ये पुरले जाई. अशी दफने नंतरच्या कालखंडामध्ये मोठ्या प्रमाणावर रूढ झाली.

वस्तीचा दुसरा कालखंड पूर्व-जोर्वे संस्कृती म्हणून ओळखला जातो. या कालात इनामगावची भरभराट झाल्याचे चित्र दिसून येते. वसाहतीची काहीशी योजनापूर्ण आखणी, रेखीव काटकोन-चौकोनी कुडाची घरे, वारंवार बनवलेल्या आणि चुन्याने सारवलेल्या घरातील जमिनी, पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी घराच्या पुढे आणि बाजूला खोदलेली पन्हाळी, धान्य साठविण्यासाठी जमिनीत केलेली बळदे आणि जमिनीवर उभ्या केलेल्या कणग्या, अग्निपूजेसाठी केलेली अग्नीकुंडे, शेतीला पाणी पुरविण्यासाठी व पाणी साठविण्यासाठी निर्माण केलेला बंधारा, नदीच्या काठी नावा थांबविण्यासाठी केलेला धक्का, शेतीच्या द्वारे काढलेली निरनिराळी पिके (फलक २२ : ब, क, ड), तत्कालीन लोकवस्तीत असलेले श्रीमंत आणि इतर वर्ग आणि त्यांची घरे – ही या कालखंडातील वैशिष्ट्ये थोडक्यात सांगता येतील. मुलांना घरातच उत्तर-दक्षिण ठेवलेल्या मडक्यांमध्ये ठेवीत असत, मात्र प्रौढांना जमिनीत खड्डा करून किंवा काही विशिष्ट व्यक्तींना चार पायाच्या, न भाजलेल्या आणि तोंड नसलेल्या रांजणात पुरीत असत. मृताबरोबर दागदागिने, मडकी व काही तांब्याच्या वस्तू ठेवल्या जात. प्रौढांचे घोट्यापासून खालचे पाय छाटून टाकले जात. या कालातील समृद्धतेचा पुरावा विविध प्रकारची पिकविलेली धान्ये, सोन्याचे आणि तांब्याचे अलंकार व वस्तू, मोठमोठी समृद्ध घरे, विविध प्रकारच्या मातृदेवतांच्या मूर्ती आणि विपुल पशुधन यावरून मिळतो.

तिसऱ्या कालखंडात म्हणजे उत्तर-जोर्वे कालखंडात मात्र लोक-जीवनात काहीशी अवनती झाल्याचे दिसून आले. या काळात बहुतांशी कुडाच्या गोल झोपड्या बांधल्या गेल्या. जोर्वे वर्गाच्या खापरांच्या आकारात आणि बनावटीत सुबकपणा कमी झाला. शेतीचे उत्पन्न, पाटबंधाऱ्याची योजना विस्कळीत झाल्याने, कमी झाले. वस्तीचा आकार संकोचला आणि इसवीपूर्व ७०० च्या सुमारास येथील वस्ती उजाड झाली असे दिसून आले.

कदाचित हवामानामध्ये पावसाचे प्रमाण कमी झाल्याने, जास्त कोरडेपणा आला आणि त्यामुळे या वस्तीला अवकळा आली असावी असे अनुमान करण्यात आले.

इनामगावच्या वस्त्यांच्या विविध थरांमध्ये सापडलेल्या कर्बाचे कालमापन कार्बन - १४ पद्धतीनुसार करण्यात आल्याने अनेक तारखा उपलब्ध झालेल्या आहेत आणि त्यानुसार जवळजवळ १,००० वर्षांच्या कालखंडातील सांस्कृतिक जीवनाच्या आलेखातील चढ - उतार निश्चित करण्यास यश मिळालेले आहे. (Dhavalikar *et al.* 1988)

**दायमाबाद**

इनामगाव प्रमाणेच प्रवरेच्या काठी असलेल्या, अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर पासून आग्नेयेला १८ किलोमीटर दूर असलेल्या, दायमाबादचे उत्खनन विस्तृत प्रमाणावर केले गेल्याने महत्त्वपूर्ण ठरले आहे. या ठिकाणी १९५८ - ५९, १९७४ - ७५ आणि १९७५ - ७६ ते १९७८ - ७९ मध्ये निरनिराळ्या संशोधकांनी उत्खनन केले. यातील पहिली दोन उत्खनने मर्यादित स्वरूपाची होती. त्यानंतर विस्तृत उत्खननात मिळालेल्या पुराव्यामुळे पुनर्मूल्यांकन केले गेले.

दायमाबाद येथे केवळ ताम्रपाषाणयुगातच वस्ती झाली. त्यानंतरच्या काळात वस्ती झाल्याचा पुरावा उपलब्ध झालेला नाही. परंतु ताम्रपाषाणयुगातील विविध कालखंडांची मांडणी विस्तृत उत्खननानंतरच स्पष्ट झाली. १९५८ - ५९ मध्ये झालेल्या उत्खननामध्ये वस्तीचे एकूण तीन कालखंड उत्खनकाला दिसून आले. पहिल्या कालखंडामध्ये जाड राखी रंगाची खापरे वापरात होती. आकार आणि बनावटीच्या दृष्टीने ही खापरे कर्नाटकातील ब्रह्मगिरी येथे सापडलेल्या नवाश्मयुगीन खापरांशी मिळती - जुळती होती. याशिवाय हात - बनावटीची आणि कोरून त्याचप्रमाणे चिकटवून अलंकरण केलेली खापरे वापरात होती. गारगोटीच्या पात्यापासून हत्यारे तयार करीत, त्याचप्रमाणे मातीचे आणि दगडाचे मणी बनविले जात. दुसऱ्या कालखंडामध्ये माळवा वर्गाची मडकी वापरात आली. या बरोबरच तांब्याच्या कुऱ्हाडी, चाकूचे पाते व शलाका, विविध प्रकारचे मणी व मातीची कुत्रे आणि

बैल या सारखी खेळणी या कालातील लोक वापरीत होते. मृतांना जमीनीमध्ये खड्डा करून उत्तर - दक्षिण असे संपूर्णपणे ठेवले जाई. मात्र मृतांबरोबर इतर काही वस्तू ठेवल्या जात नसत. वस्तीच्या तिसऱ्या कालखंडात जोर्वे वर्गाच्या खापरांचा वापर सुरू झाला. या कालात जोर्वे खापरांबरोबरच गारगोटीच्या छिलक्यांची हत्यारे, खापराच्या चकत्या, मातीची खेळणी व मानवी मूर्ती लोकांच्या वापरात होत्या. या कालात दोन प्रकारची दफने प्रचलित होती. यातील पहिला प्रकार लहान मुलांच्या दफनामध्ये अवलंबिला जात असे. महाराष्ट्रात इतरत्र सापडलेल्या लहान मुलांच्या या कालातील दफनाप्रमाणेच ही दफने होती. मात्र मूल थोडेसे मोठे असले तर त्यासाठी तीन मडकी उपयोगात आणीत. प्रौढांना घराच्या जमिनीवरच उत्तर - दक्षिण असे पूर्णपणे ठेवले जाई. मृतावरोबर मात्र इतर काहीही वस्तू ठेवल्याचे आढळून आले नाही. मृताभोवती लाकडी वासे उभारीत, असे भोकांच्या पुराव्यावरून दिसून आले. अशा मृताला पुरण्याआधी दर्शनार्थ काही दिवस छताखाली ठेवण्यात आले असावे असे मत व्यक्त करण्यात आले आहे. अशातऱ्हेचे दर्शनार्थ ठेवलेले छताखालचे दफन महाराष्ट्रात इतरत्र सापडलेले नाही.

१९७४ साली अचानकपणे दायमावादच्या पांढरीच्या जागी उत्कृष्ट बनावटीच्या आणि वजनदार अशा ब्रॉंझच्या चार मूर्ती वरवर खणताना सापडल्या. दोन बैलांना जोडलेला रथ आणि त्यामध्ये उभा असणारा मानवी सारथी, हत्ती, रेडा आणि गेंडा अशा चार वेगवेगळ्या मूर्ती चाकावर बसविलेल्या होत्या (फलक २१). या कोणत्या काळातील असाव्यात यावद्दल एकमत न झाल्याने आणि काहींच्या मते या हडाप्पा संस्कृतीशी संबंधित असल्याने, या मतांची शहानिशा करण्याच्या उद्देशाने १९७८ साली दायमाबादला पुन्हा उत्खनन करण्यात आले. या उत्खननामध्ये वस्त्यांचे एकूण तीन कालखंड दिसून आले आणि त्यांचा काल तौलनिकदृष्ट्या इसवीपूर्व १९०० ते १७०० असा निर्धारित करण्यात आला. यातील पहिला कालखंड नवाश्मयुगीन संस्कृतीचा असून या संस्कृतीचे लोक हात - बनावटीची, राखी रंगाची मडकी वापरीत असत. या कालखंडाच्या

शेवटीशेवटी तांबड्या पृष्टभागावर काळ्या रंगात रंगविलेली खापरे वापरात आली. यांच्यावरचे चित्रकाम उत्तर - हडाप्पा संस्कृतीशी संपर्क दर्शविते असे मत व्यक्त केले गेले. म्हणजेच पर्यायाने इसवीपूर्व सुमारे १८ व्या शतकात तापी, गोदावरी आणि तिच्या उपनद्या यांच्या खोऱ्यात उत्तर - हडाप्पा संस्कृतीचा संपर्क झाला किंवा प्रभाव पडला असे स्पष्ट झाले. दुसऱ्या कालखंडात माळवा वर्गाची आणि पिवळसर रंगाची मडकी वापरात आली. यांचा कालखंड इसवीपूर्व सुमारे १७०० ते १५०० असा योजला गेला. उत्खनकाच्या मते माळवा वर्गाच्या खापरांवरील चित्रित अलंकरण हे सुद्धा उत्तर - हडाप्पा संस्कृतीच्या प्रभावाचे द्योतक आहे. चित्रकामाव्यतिरिक्त या कालखंडातील खापरांवर आढळून येणारी काही चिन्हे सिंधू संस्कृतीच्या लिपीशी मिळती - जुळती आहेत असे उत्खनकाचे मत होते. तिसऱ्या कालखंडात (इसवीपूर्व १५०० ते १०००) माळवा वर्गाची खापरे कमी झाली परंतु जोर्वे - वर्गाची खापरे संख्येने विपुल झाली. याच कालातील थरात गुजराथेतील रंगपूर येथे सापडलेली चमकदार लालभडक खापरे जोर्वे - वर्गाच्या खापरांबरोबर सापडली. थोडक्यात असे म्हणता येते की या दुसऱ्या उत्खननामध्ये दायमावादचा गुजरात - सौराष्ट्र त्याचप्रमाणे तापी - गोदावरी खोऱ्यात आलेल्या उत्तर - हडाप्पा संस्कृतीचा संपर्क स्पष्ट झाला.

यानंतरचे तिसरे उत्खनन विस्तृत प्रमाणावर झाल्याने आणखी नवीन माहिती उजेडात आली. या उत्खननानुसार आधीच्या उत्खननामध्ये मांडला गेलेला सांस्कृतिक क्रम बदलावा लागला. यानुसार खालील क्रमाने सांस्कृतिक क्रमाची मांडणी करता आली.

१) सावल्डा संस्कृती (सर्व प्रथम) (फलक ६ : १ - ८)

२) उत्तर हडाप्पा (फलक ६ : ९ - १३)

३) बफ् आणि क्रीम (फिकट तपकिरी / पिवळसर) खापरांशी निगडित संस्कृती किंवा दायमाबाद संस्कृती (फलक ७ : १ - ३, १०)

४) माळवा संस्कृती (फलक ७ : ४ - ९, ११ - १२)

५) जोर्वे संस्कृती (सर्वात शेवटी) (फलक ८ : १ - ५)

या संस्कृती व्यतिरिक्त दायमाबादच्या आणखी एका वैशिष्ट्याची नोंद करणे आवश्यक आहे. सावल्डा संस्कृतीच्या वस्तीचा विस्तार जवळजवळ तीन हेक्टर इतका आहे, तर सर्वात शेवटचा म्हणजे जोर्वे संस्कृतीचा विस्तार जवळजवळ वीस हेक्टर इतका असल्याचे आढळून आले. या दृष्टीने पाहाता दायमाबाद महाराष्ट्रातील ताम्रपाषाणयुगीन वस्तीचे सर्वात मोठे ठिकाण ठरलेले आहे.

यापूर्वी सावल्डा वर्गाच्या खापरांचा उल्लेख आलेला आहे. या संस्कृतीच्या लोकांची घरे कुडाची असून ती एक, दोन किंवा तीन खोल्यांची होती. घरातील जमीन काळया आणि पिवळ्या मातीचे थर एकावर एक देवून केलेली होती. अशा जमिनीवर काही वेळा अलंकरणाकरिता शिंपले बसविले होते. या वस्तीचे लोक प्रगत शेतकरी होते असे दिसते. सातू, मसूर, वाटाणे, हरभरा, कुळीथ इत्यादी धान्ये ते पिकवीत असत. तांब्याचा वापर मर्यादित प्रमाणावर करीत असत. धान्य वाटण्यासाठी दगडी पाटे - वरवंटे आणि हत्यारे म्हणून हाडाची बाणाग्रे त्याचप्रमाणे गारगोटीच्या छिलक्यापासून बनविलेली विविध छोटीछोटी शस्त्रे ते वापरीत असत. दुसऱ्या कालखंडात, म्हणजे उत्तर-हडाप्पा कालात, नवीन तऱ्हेच्या खापरांचा वापर सुरू झाला. ही खापरे जाड, जड, जलद फिरणाऱ्या चाकावर घडविलेली, शुद्ध मातीमध्ये रेती आणि चुन्याची भुकटी मिसळून बनविलेली त्याचप्रमाणे विटकरी रंगाची होती. यावर काळ्या रंगात चित्रीकरण केलेले असून या मडक्यांचे आकार उत्तर - हडाप्पा संस्कृतीशी जवळीक दाखवितात. (उदा. स्टॅण्डवरील थाळी, स्टॅण्डवरील वाडगा, जाड काठाचे तसराळे, वगैरे) या काळात मातीच्या कच्च्या विटांचा वापर सुरू झाला. या विटांचा वापर घराच्या भिंतीसाठी त्याचप्रमाणे दफनासाठी केलेल्या खड्ड्याच्या बाजूने लावण्यासाठी केला जात असे. अशा खड्ड्यांमध्ये मृताला ठेवून त्यावर वाखाची चटई ठेवली जाई. मग खड्ड्यात माती आणि विटांचे तुकडे टाकून दफन बंद केले जाई. याच थरामध्ये मातीची बनविलेली बटणाच्या आकाराची मुद्रा सापडली. या मुद्रेवर सिंधूलिपीची दोन चिन्हे होती. या व्यतिरिक्त काही खापरावरही सिंधूलिपीची चिन्हे कोरून किंवा

रंगात काढलेली आढळून आली. याशिवाय सिंधूसंस्कृतीचे व्यवच्छेदक लक्षण ठरलेल्या मातीच्या लंबगोल बटिका या कालातील वस्तीत सापडल्याने सांस्कृतिकदृष्ट्या ही वस्ती हडाप्पा संस्कृतीशी निगडीत होती हे सिद्ध झाले. तिसऱ्या कालखंडामध्ये बफ आणि क्रीम वर्गाची ( फिकट तपकिरी - पिवळसर ) खापरे वापरात आली. यांची बनावट आणि भाजणी फारशी उच्च दर्जाची नव्हती, परंतु या मडक्यावर काळया रंगामध्ये विविध प्रकारचे भौमितिक स्वरूपाचे त्याचप्रमाणे प्राण्यांचे चित्रीकरण करण्यात आले होते. या संस्कृतीच्या लोकांची माहिती त्यांच्या दफनावरून मिळते. या कालात सांकेतिक, त्याचप्रमाणे काही अस्थींचे मर्यादित स्वरूपामध्ये केलेले दफन यांचा प्रघात होता.

चौथ्या कालखंडाची वस्ती माळवा संस्कृतीची होती. या कालात लहान मुलांचे दफन यानंतरच्या कालातील जोर्वे संस्कृतीप्रमाणेच दोन मडक्यांमध्ये करण्याची प्रथा होती. अशा दफनामध्ये काही वेळेला राखी रंगाच्या मडक्याऐवजी माळवा वर्गाचे मडकेही वापरले जाई. या काळातील आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे निवासी कुडाच्या घरांशिवाय, मातीचे बांधलेले ओटे आणि विविध आकाराची अग्निकुंडे. यांचा वापर क्रियाकर्मांशी निगडित असलेल्या स्नानविधी आणि अग्निपूजा यासाठी केला जात असावा.

सगळयात शेवटची वस्ती जोर्वे संस्कृतीची झाली. परंतु माळवा खापरातून जोर्वे - वर्गाची खापरे उत्क्रांत झाली असावी असे मत दायमावादच्या उत्खननातील पुराव्यानुसार मांडण्यात आलेले आहे. इनामगाव येथेही अशातऱ्हेचे अनुमान करण्याजोगा पुरावा मिळाला आहे. या कालखंडामध्ये कुडाची काटकोन - चौकोनी घरे त्याचप्रमाणे गोल झोपड्याही वापरात होत्या. खापरे भाजण्याकरिता बनविण्यात आलेल्या भट्ट्या, ऋषींच्या (?) मातीच्या मूर्ती, छोटी रूळाच्या आकाराची मुद्रा आणि तांब्याच्या विविध वस्तू सापडल्या. चौथ्या आणि पाचव्या कालखंडात विविध प्रकारची धान्ये पिकविली जात.

दायमावादच्या उत्खननाशी निगडीत असलेल्या अनेक कार्बन - १४ तारखा उपलब्ध झालेल्या असल्या तरी त्यांच्यात बराच विरोधाभास आढळून

येतो. तौलनिक कालमापनाचा अवलंब केल्यास दायमावाद येथील विविध वस्त्यांची कालव्याप्ती इसवी पूर्व सुमारे २००० ते १००० अशी मानणे औचित्यपूर्ण ठरेल.

दायमावादचे उत्खनन अनेक दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण ठरलेले आहे. ताम्रपाषाण संस्कृतीचे महाराष्ट्रातील सर्वात मोठे स्थळ, सावल्डा संस्कृतीच्या वस्तीचा पुरावा, हडाप्पा संस्कृतीच्या संपर्काचा स्पष्ट संदर्भ, अग्निपूजेचा पुरावा, माळव्यातून जोर्वे खापरांची उत्क्रांती आणि उत्खननाव्यतिरिक्त सापडलेल्या ब्राँझच्या जनावरांच्या प्रतिमा आणि रथ अशी अनेक वैशिष्ट्ये या संशोधनातून प्रकट झाली. ( Sali 1986 )

### तुळजापूर - गढी

विदर्भामध्ये ताम्रपाषाणयुगीन वस्त्यांची ठिकाणे उपलब्ध झालेली नव्हती, याउलट पश्चिम महाराष्ट्रामध्ये याच कालखंडाच्या अनेक वस्त्यांचा पुरावा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झालेला आहे. यापैकी काही प्रमुख स्थलांची वैशिष्ट्ये वर उल्लेखिलेली आहेत. विदर्भामध्ये ताम्रपाषाणयुगानंतर आलेल्या महापाषाणीय या पूर्णपणे लोहयुगीन असलेल्या संस्कृतीच्या स्थलांचा पुरावा मात्र फार मोठ्या संख्येने उपलब्ध झालेला आहे. असे असूनही विदर्भामध्ये अगदी अलीकडे ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीच्या अस्तित्वाचा पुरावा एक - दोन ठिकाणी थोड्याफार प्रमाणात उपलब्ध झालेला आहे. मात्र या स्थलांचे उत्खनन मर्यादित स्वरूपाचे असल्याने विपुल प्रमाणामध्ये माहिती उपलब्ध झालेली नाही. शिवाय कार्बन - १४ पद्धतीनुसार तारखा फारशा उपलब्ध नसल्याने तौलनिक अभ्यासावर मर्यादा पडल्या आहेत.

तापीला मिळणाऱ्या पूर्णा नदीवर अमरावती जिल्ह्यात असलेल्या तुळजापूर - गढीचे उत्खनन १९८४ - ८५ मध्ये करण्यात आले. येथे फक्त ताम्रपाषाणयुगीन काळात वस्ती झाली. पहिली वस्ती माळवा वर्गाच्या आणि जोर्वे वर्गाच्या खापरांनी दुजोरीत केली होती. गारगोटीच्या छिलक्यांची हत्यारे, तांब्याच्या बांगड्या व अंगठी आणि मासेमारीचे गळ त्याचप्रमाणे विविध दगडाचे निरनिराळ्या आकाराचे मणी हे लोक वापरीत असत. दोन्ही काळात

गोल झोपड्या उभारल्या जात. घरातील जमीन चिखल चोपून, त्याचप्रमाणे वाळू आणि दगडगोट्यांचा वापर करून तयार केली जात असे. उत्खननामध्ये जोर्वे कालखंडातील लहान मुलाचे दफन एका लहान खड्ड्यात केल्याचे आढळून आले. मृताबरोबर काळ्या - आणि - तांबड्या वर्गाचा वाडगा आणि बहुधा कार्नेलियन मण्यांची माळ सापडली. याशिवाय मडकी भाजण्याचा कुंभाराचा आवा जोर्वे कालखंडातील एका घरामध्ये आढळून आला. (*IAR* 1984 - 85)

तुळजापूर - गढी येथे कार्बन - १४ तारखा उपलब्ध झालेल्या आहेत. यातील सर्वात प्राचीन इसवीपूर्व (सुमारे) १३१० ± ६० अशी आहे.

### थारसा

नागपूरपासून ईशान्येस ४२ किलोमीटर अंतरावर, नदीच्या काठी थारसा हे छोटेसे गाव आहे. या ठिकाणी १९८५ - ८६ मध्ये मर्यादित स्वरूपात उत्खनन केले गेले. उत्खननामध्ये काळी - आणि - तांबडी, अभ्रकयुक्त तांबडी, काळ्या रंगात चित्रकाम केलेली, अशी विविध तऱ्हेची खापरे सापडली. या बरोबरच लोखंडी खिळे व लोखंडी चपट्या कुऱ्हाडी दांड्यावर घट्ट बसविण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या लंबगोल लोखंडी पट्ट्या सापडल्या. सर्वात खालच्या थरामध्ये वर उल्लेखिल्याप्रमाणेच खापरे सापडली. या वस्तीचे वैशिष्ट्य असे की यामध्ये दोन मडक्यामध्ये केलेली दफने सापडली. ही दफने ताम्रपाषाणयुगाची निदर्शक असावीत आणि ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीच्या उत्तरकालात लोहयुगीन महापाषाणीय संस्कृतीशी संपर्क आलेला असावा, असे सुचविले जाते. (*IAR* 1984 - 85)

### वाळकी

पुणे जिल्ह्यातील भीमा आणि मुळा यांच्या संगमाजवळ असलेल्या वाळकी या ठिकाणी १९८५ - ८६ साली उत्खनन करण्यात आले. या स्थलाच्या उत्खननामध्ये पूर्व - जोर्वे म्हणजे इसवी पूर्व १५०० ते १००० (जुने कालमापन) या कालखंडातील कुडाची काटकोन - चौकोनी घरे त्याचप्रमाणे अनेक गोल झोपड्या सापडल्या. यापैकी गोल झोपड्या

बिनछताच्या असून यांचा वापर धान्य झोडपण्यासाठी म्हणजेच खळ्यासारखा केला जात असावा. काही झोपड्यांचा उपयोग रात्रीच्या वेळी शेळ्या - मेंढ्या ठेवण्यासाठी केला जात असावा. मोठी काटकोन - चौकोनी घरे कुडाची असून ती बुटकी होती. स्थिर वस्तीचा पुरावा मिळाला नसल्याने वाळकीला वर्षातून काही मर्यादित कालच वस्ती होत असावी असे अनुमान केले गेले आहे. जोर्वे संस्कृतीच्या इतर मोठमोठ्या खेड्यांच्या मानाने वाळकीला सलगपणे फार काळ वस्ती होत नसावी. खेड्यातील स्थिर जीवनापेक्षा निराळ्या प्रकारचे जीवन जोर्वे संस्कृतीमध्ये कसे असावे याचा अंदाज वाळकीच्या उत्खननाने करता आला. ( *IAR* 1985 - 86 ; 1986 - 87 )

कवठे

धुळे जिल्ह्यात तापीला मिळणाऱ्या कान नदीच्या काठी कवठे हे एक लहानसे खेडे आहे. येथे १९८४ - ८५ साली उत्खनन करण्यात आले. कवठ्याच्या उत्खननाची अनेक वैशिष्ट्ये आहेत. तापी नदीच्या खोऱ्यामध्ये गुजरातमार्गे आलेल्या हडाप्पा संस्कृतीचा प्रभाव स्पष्ट होतो याचा उल्लेख आधी आलाच आहे. कवठ्याला हडाप्पा वर्गाची लाल रंगाची जाड आणि टणक खापरे मोठ्या प्रमाणावर सापडली आणि यांचे आकार महाराष्ट्रातील ताम्रपाषाणयुगीन खापरांपेक्षा वेगळे होते. याशिवाय या वस्तीचे लोक सावल्डा वर्गाची, मध्यप्रदेशातील कायथा वर्गाची त्याचप्रमाणे माळवा वर्गाची खापरे वापरीत असत.

या काळातील लोक जमिनीमध्ये गोल किंवा लंबगोल खड्डे करून, त्यावर लाकडी वाश्यांच्या साहाय्याने निमुळते छप्पर उभारून झोपड्या बांधत. अशा घरामध्ये मातीच्या चुली व धान्य साठविण्यासाठी वळदे बनवीत असत. अशा झोपड्यांचा वापर दीर्घकाळपर्यंत केला गेला नसावा.

उत्खननामध्ये दगडाच्या किंवा तांब्याच्या वस्तूंचा पूर्णपणे अभाव होता. या उलट हाडापासून बनविलेल्या सुया, छोट्या छिन्न्या आणि कोरके फार मोठ्या संख्येने सापडले. अशातऱ्हेचा पुरावा महाराष्ट्रात इतरत्र सापडलेला नाही. शेती, पशुपालन, शिकार आणि मासेमारी यावर हे लोक उपजीविका करीत असत. जळलेल्या स्वरूपातील बाजरी आणि तीळ उत्खननात सापडले

असले तरी ते ताम्रपाषाणयुगातील असतील असे निर्विवादपणे म्हणता येत नाही. या ठिकाणी दोन प्रौढांची आणि दोन लहान मुलांची दफने सापडली. यातील एका दफनामध्ये प्रौढाला एका खड्ड्यामध्ये उताणे ठेवल्याचे दिसून आले. मात्र कुठल्याही दफनात मृताबरोबर कोणत्याही वस्तू ठेवल्याचे आढळून आले नाही.

कायथा वर्गाच्या खापरांचा आढळ आणि एक कार्बन - १४ तारीख यांच्या आधारावर कवठ्याचा वस्तीचा कालखंड इसवीपूर्व सुमारे २००० ते १८०० असा सिद्ध झाला आहे. कार्बन - १४ तारीख इसवीपूर्व १९२० ± ७० अशी आली आहे. (Shinde 1985)

वर आढावा घेतलेली उत्खनने मध्यम आणि विस्तृत स्वरूपाची झाल्याने त्यातून बरीच माहिती उपलब्ध झाली आहे. अर्थात नेवासे, इनामगाव आणि दायमाबाद ही तिन्ही उत्खनने बऱ्याच विस्तृत प्रमाणाची असल्याने त्यांच्या आधारे महाराष्ट्रातील ताम्रपाषाणयुगीन संस्कृतींचे अनेक पैलू उजेडात आले. काही उत्खनने लहान असली तरी त्यांच्यातूनही सांस्कृतिक संपर्काची माहिती हाती आली. या दुसऱ्या प्रकारच्या उत्खननाची दखल घेण्याजोगी आणखी काही स्थळे आहेत. त्यांचा आढावा घेणे अप्रस्तुत ठरणार नाही.

### पिंपळदरे

या ठिकाणचे संशोधन १९५७ - ५८ साली झाले. हे स्थळ नाशिक जिल्ह्यात असून या ठिकाणी वरवरच कर्नाटकातील ब्रह्मगिरीप्रमाणे जाड राखी रंगाची त्याचप्रमाणे जोर्वे वर्गाची खापरे उपलब्ध झाली असल्याने येथील वस्त्यांचा क्रम नेवासे - चांडोली प्रमाणेच आहे. (*IAR* 1957 - 58)

### थाळनेर

धुळे जिल्ह्यातील या ठिकाणीही समन्वेषणामध्ये ब्रह्मगिरी आणि बहाळप्रमाणे राखी रंगाची मडकी, काळ्या - आणि - तांबड्या रंगाची खापरे, गारगोटीच्या छिलक्यांची हत्यारे आणि नवाश्मयुग निदर्शक घासून धारदार

केलेली दगडी हत्यारे सापडली. या ठिकाणी मानवी दफनांचाही पुरावा उपलब्ध आहे, अशी नोंद केली गेली आहे. ( *IAR* 1957 - 58 )

### रंजाळे

धुळे जिल्ह्यातील या ठिकाणी समन्वेषणामध्ये ताम्रपाषाणयुगीन वस्ती त्याचप्रमाणे मानवी दफन सापडले. गारगोटीच्या छिलक्यांच्या हत्यारांव्यतिरिक्त काळया रंगात रंगविलेली लाल मडकी आणि चकचकीत राखी रंगाची खापरे सापडली. सर्वात महत्त्वाचा पुरावा खड्ड्यात केलेल्या मानवी दफनाचा होता. यामध्ये मानवी हाडांच्याबरोबर विदर्भातील लोहयुगीन महापाषाण संस्कृतीच्या दफनामध्ये आढळून येतात तशी काळी - आणि - तांबडी मडकी मिळाली. यावरून ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीचा उत्तर - कालामध्ये महापाषाण संस्कृतीशी संपर्क झाला असे म्हणता येते. ( *IAR* 1960 - 61 )

### थेऊर

पुणे जिल्ह्यात पुण्यापासून २४ किलोमीटर उत्तरेला मुळा - मुठेच्याकाठी असलेले थेऊर महाराष्ट्रामध्ये गणेशस्थान आणि माधवराव पेशव्यांची समाधी याकरिता प्रख्यात आहे. या ठिकाणी १९६९ - ७० साली उत्खनन करण्यात आले. येथे एक पांढरीचे टेकाडही आहे. याशिवाय १८ ते २८ मीटर व्यास असलेली शिळावर्तुळे आहेत. अशी शिळावर्तुळे विदर्भामध्ये महापाषाण संस्कृतीच्या लोकांची असून ती फार मोठ्या संख्येने आढळून येतात. परंतु थेऊरच्या शिळावर्तुळांच्या उत्खननात, ही वर्तुळे ताम्रपाषाणयुगीन गोल झोपड्यांच्या भोवती दगडगोटे आणि मुरूम टाकून पावसाने आतील घरांना धोका पोहचू नये म्हणून योजिली होती असे उत्खनकाचे म्हणणे आहे. अशा वर्तुळामध्ये काटकोन - चौकोनी आकाराच्या कुडाच्या घराचे अवशेष सापडले. या उत्खननात प्रामुख्याने पातळ, चांगल्या भाजणीची आणि चकाकी असलेली काळी - आणि - तांबडी खापरे सर्वात जास्त असल्याचे आढळून आले. या शिवाय राखी रंगाची, काळ्या रंगाची आणि तांबड्या रंगाची टणक खापरेही सापडली. यातील काळी - आणि - तांबडी खापरे, त्यांच्या आतील भागावर

कोरलेल्या काही चिन्हांमुळे वैशिष्ट्यपूर्ण ठरतात. उत्खनकाच्या मते ही खापरे गुजराथमधील रंगपूर येथील दुसऱ्या आणि तिसऱ्या कालखंडातील काळ्या - आणि - तांबड्या खापराप्रमाणे आहेत. खापराव्यतिरिक्त दगडी पाटे - वरवंटे, तांब्याच्या बांगड्या, दगडाचे आणि शंखाचे मणी आणि मातीची खेळणी सापडली. गारगोटीची समांतर बाजू असलेली पातीही आढळून आली. थेऊरच्या वस्तीचा कालखंड इसवीपूर्व सुमारे १५०० ते १२०० असा निर्धारित करण्यात आला आहे. (*IAR* 1969 - 70)

आतापर्यंतच्या विवेचनामध्ये महाराष्ट्रातील ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीच्या प्रमुख स्थलांचे उत्खनन आणि त्यातून उपलब्ध झालेल्या पुराव्यानुसार प्रत्येक उत्खननामध्ये कोणत्या तऱ्हेची नवीन माहिती उपलब्ध झाली याचा थोडक्यात गोषवारा देण्याचा प्रयत्न केला आहे. १९५० - ५१ च्या नाशिक - जोर्वे संस्कृतीच्या उत्खननापासून गेल्या चाळीस वर्षांमध्ये ताम्रपाषाणयुगीन माहितीच्या कक्षा रूंदावल्या आहेत आणि या संस्कृतीची जडणघडण कशी झाली त्याचप्रमाणे इतर प्रदेशातील ताम्रपाषाणयुगीन संस्कृतींचा महाराष्ट्रावर प्रभाव केव्हा आणि कसा पडला याची थोडीफार कल्पना यावरून यावी. या संशोधनातून मिळालेली माहिती इसवीपूर्व सुमारे २००० ते ७०० या कालातील लोकजीवनातील विविध पैलू स्पष्ट करते. या एक हजाराहून जास्त कालखंडातील वस्त्यांचे स्वरूप, त्यांची रचना, घरे - दारे, भांडी - कुंडी, सामाजिक वर्ग, शेती व उद्योगधंदे, धर्म व कला, याबद्दलची माहिती नेवासे, इनामगाव व दायमाबाद या तीन प्रमुख उत्खननातून मांडता येते.

ही माहिती मांडताना कालनिश्चितीच्या नव्या शास्त्रीय पद्धतीमुळे मोठी मदत झालेली आहे. इतिहासाचे विवेचन करताना कालाचा निश्चित संदर्भ असणे अत्यंत आवश्यक असते. म्हणून ताम्रपाषाणयुगातील सांस्कृतिक जीवनाची माहिती करून घेण्याआधी विविध उत्खननामध्ये उपलब्ध झालेल्या तारखा लक्षात घेणे अपरिहार्य ठरते. अर्थात कार्बन - १४ कालमापनानुसार उपलब्ध झालेल्या सगळ्या तारखा अचूक असतील असे मात्र नव्हे, कारण

उत्खननातील कर्बाचा नमुना घेताना चुका होऊ शकतात. असे असूनही या पद्धतीचा अवलंब करण्याआधी अनुमानाने किंवा तौलनिक दृष्ट्या मांडलेल्या तारखा फारशा चुकीच्या ठरलेल्या नाहीत हे नमूद करणे आवश्यक आहे. उपलब्ध कार्बन-१४ तारखा खालीलप्रमाणे आहेत –

(हाफ लाईफ : ५७३०)

आपेगाव

पी. आर. एल. ३८४ : १६७५ ± १०३ इ. पू. : सावल्डा कालखंड
पी. आर. एल. ३८३ : १६०५ ± १०३ इ. पू. : माळवा-जोर्वे कालखंड
पी. आर. एल. ३८२ : १६०५ ± १०३ इ. पू. : माळवा-जोर्वे कालखंड

चांडोली

पी. ४७३ : १३३० ± ७० इ. पू. : जोर्वे कालखंड
पी. ३७२ : १३०० ± ७० इ. पू. : जोर्वे कालखंड
पी. ४७४ : १२४० ± १६१ इ. पू. : जोर्वे कालखंड
टी. एफ़. ४२ : ११७५ ± ११८ इ. पू. : जोर्वे कालखंड
सी. एफ. ४३ : १०४० ± १०३ इ. पू. : जोर्वे कालखंड

दायमाबाद (यामध्ये मास्का दुरुस्ती लक्षात घेतलेली नाही)

पी. आर. एल. ४२९ : १५४० इ. पू. : सावल्डा कालखंड
पी. आर. एल. ६५४ : १५१० इ. पू. : सावल्डा कालखंड
बी. एस. १७६ : १७४५ इ. पू. : सावल्डा कालखंड
पी. आर. एल. ४२६ : १७६० इ. पू. : उत्तर-हडाप्पा, खालचा थर
पी. आर. एल. ६५७ : १२५० इ. पू. : उत्तर-हडाप्पा, वरचा थर
पी. आर. एल. ६५७ : ११६० इ. पू. : उत्तर-हडाप्पा, वरचा थर
बी. एस. १८० : १५३० इ. पू. : उत्तर-हडाप्पा, वरचा थर

| | | |
|---|---|---|
| पी. आर. एल. ६५५ | : १६५० इ. पू. | : दायमाबाद संस्कृती, खालचा थर |
| पी. आर. एल. ६५५ | : १५४० इ. पू. | : दायमाबाद संस्कृती, खालचा थर |
| बी. एस. १७७ | : १६१० इ. पू. | : दायमाबाद संस्कृती, खालचा थर |
| पी. ऑर. एल. ४२८ | : १५५० इ. पू. | : दायमाबाद संस्कृती, वरचा थर |
| पी. आर. एल. ४१९ | : ११२० इ. पू. | : दायमाबाद संस्कृती, वरचा थर |
| बी. एस. १८२ | : १२८० इ. पू. | : दायमाबाद संस्कृती, वरचा थर |
| बी. एस. १८१ | : १११० इ. पू. | : माळवा संस्कृती, खालचा थर |
| पी. आर. एल. ४१२ | : १३९० इ. पू. | : माळवा संस्कृती, सर्वात वरचा थर |
| पी. आर. एल. ४११ | : १३७० इ. पू. | : माळवा - जोर्वे संक्रमण |
| पी. आर. एल. ६५६ | : ११०० इ. पू. | : जोर्वे संस्कृती (मडक्यांची भट्टी) |
| बी. एस. १७८ | : १०९० इ. पू. | : जोर्वे संस्कृती (मडक्यांची भट्टी) |
| बी. एस. १७९ | : १११० इ. पू. | : जोर्वे संस्कृती (घर क्रमांक ३८) |

वरील तारखा मास्का पध्दतीने दुरूस्त केल्यानंतर खालील कालमापन निर्धारित केले गेले आहे –

| | |
|---|---|
| कालखंड एक, सावल्डा | : २११० – १६९० इसवी पूर्व |
| कालखंड दोन, उत्तर हडाप्पा | : २११० – १३७० इसवी पूर्व |
| कालखंड तीन, दायमाबाद | : २००० – १२७० इसवी पूर्व |
| कालखंड चार, माळवा | : १६०० – १२९० इसवी पूर्व |
| कालखंड पाच, जोर्वे | : १२७० इसवी पूर्व |

इनामगाव

| | | |
|---|---|---|
| टी. एफ. १००१ | : १५६५ ± ९३ इ. पू. | : कालखंड एक, माळवा |
| टी. एफ. २६२ | : १४५९ ± १३५ इ. पू. | : कालखंड एक, माळवा |
| पी. आर. एल. ७७ | : १४६० ± ११३ इ. पू. | : कालखंड एक, माळवा |

| | | | |
|---|---|---|---|
| टी. एफ. १००० | : | १३७५ ± ८२ इ. पू. | : कालखंड एक, माळवा |
| पी. आर. एल. १३३ | : | १३७५ ± १०८ इ. पू. | : कालखंड एक, माळवा |
| टी. एफ. ९२४ | : | १३७० ± २०६ इ. पू. | : कालखंड एक, माळवा |
| पी. आर. ५९ | : | १३५५ ± ११३ इ. पू. | : कालखंड एक, माळवा |
| बी. एस. २७७ | : | १२२० ± १०५ इ. पू. | : कालखंड एक, माळवा |
| टी. एफ. १०८६ | : | १५३५ ± १५५ इ. पू. | : कालखंड दोन, पूर्व - जोर्वे |
| बी. एस. १०३ | : | १५०५ ± १०८ इ. पू. | : कालखंड दोन, पूर्व - जोर्वे |
| टी. एफ. १०८५ | : | १४४५ ± १०८ इ. पू. | : कालखंड दोन, पूर्व - जोर्वे |
| टी. एफ. १०८७ | : | १४१० ± १०८ इ. पू. | : कालखंड दोन, पूर्व - जोर्वे |
| पी. आर. एल. ७६ | : | १३६५ ± ११३ इ. पू. | : कालखंड दोन, पूर्व - जोर्वे |
| पी. आर. एल. ७८ | : | ८७० ± ११८ इ. पू. | : कालखंड दोन, पूर्व - जोर्वे |
| टी. एफ. ९२२ | : | १३५० ± १०३ इ. पू. | : कालखंड तीन, उत्तर - जोर्वे |
| बी. एस. ५०१ | : | १३०५ ± ८० इ. पू. | : कालखंड तीन, उत्तर - जोर्वे |
| टी. एफ. १३३५ | : | १२८८ ± ९३ इ. पू. | : कालखंड तीन, उत्तर - जोर्वे |
| बी. एस. ५०० | : | १२४३ ± ९० इ. पू. | : कालखंड तीन, उत्तर - जोर्वे |
| टी. एफ. १३३० | : | १२३९ ± १०३ इ. पू. | : कालखंड तीन, उत्तर - जोर्वे |
| बी. एस. ४६१ | : | १२१२ ± १०५ इ. पू. | : कालखंड तीन, उत्तर - जोर्वे |
| बी. एस. ६६६ | : | १२०२ ± १२५ इ. पू. | : कालखंड तीन, उत्तर - जोर्वे |
| पी. आर. एल. ५७ | : | ११९० ± १०८ इ. पू. | : कालखंड तीन, उत्तर - जोर्वे |
| बी. एस. ५०२ | : | ११९२ ± १०५ इ. पू. | : कालखंड तीन, उत्तर - जोर्वे |
| बी. एस. ४८८ | : | ११९२ ± १०५ इ. पू. | : कालखंड तीन, उत्तर - जोर्वे |
| पी. आर. एल. ९४ | : | ११६० ± ११८ इ. पू. | : कालखंड तीन, उत्तर - जोर्वे |
| पी. आर. एल. ९३ | : | ११६९ ± १०८ इ. पू. | : कालखंड तीन, उत्तर - जोर्वे |
| बी. एस. ४८६ | : | ११६१ ± १०५ इ. पू. | : कालखंड तीन, उत्तर - जोर्वे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| बी. एस. ४८६ | : | ११६१ ± १०५ इ. पू. | : | कालखंड तीन, उत्तर - जोर्वे |
| बी. एस. ४८७ | : | ११४० ± १०५ इ. पू. | : | कालखंड तीन, उत्तर - जोर्वे |
| बी. एस. ४६३ | : | १११९ ± ११५ इ. पू. | : | कालखंड तीन, उत्तर - जोर्वे |
| टी. एफ. ९९६ | : | १०७० ± १८५ इ. पू. | : | कालखंड तीन, उत्तर - जोर्वे |
| टी. एफ. ९२३ | : | १०२५ ± १७५ इ. पू. | : | कालखंड तीन, उत्तर - जोर्वे |
| बी. एस. ४६७ | : | ८७२ ± १०५ इ. पू. | : | कालखंड तीन, उत्तर - जोर्वे |

नेवासे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| टी. एफ. ४० | : | १२५५ ± ११३ इ. पू. | : | कालखंड तीन, जोर्वे |
| पी. १८१ | : | १२५० ± १२६ इ. पू. | : | कालखंड तीन, जोर्वे |
| पी. १८४ | : | ९७० ± ११८ इ. पू. | : | कालखंड तीन, जोर्वे |

सोनगाव

| | | | | |
|---|---|---|---|---|
| टी. एफ. ३८४ | : | १५६५ ± १०८ इ. पू. | : | कालखंड एक, राखी - वर्गाची खापरे (नवाश्मयुग ?) |
| टी. एफ. ३८० | : | १३७५ ± १०८ इ. पू. | : | कालखंड दोन, जोर्वे |
| टी. एफ. ३८२ | : | १३४० ± १०३ इ. पू. | : | कालखंड दोन, जोर्वे |
| टी. एफ. ३८३ | : | १३३० ± १०३ इ. पू. | : | कालखंड दोन, जोर्वे |
| टी. एफ. ३७९ | : | १२९५ ± ९३ इ. पू. | : | कालखंड दोन, जोर्वे |

कवठे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| बी. एस. ५६७ | : | २०३५ ± ९५ इ. पू. | : | ताम्रपाषाणयुग |

खेड (जिल्हा पुणे)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| पी. आर. एल. २२१ | : | ११८० ± ६३ इ. पू. | : | जोर्वे संस्कृती |
| पी. आर. एल. २२० | : | १०३५ ± १९५ इ. पू. | : | जोर्वे संस्कृती |

### ताम्रपाषाण - संस्कृतीचे आधिभौतिक स्वरूप

आधी विवेचन केल्याप्रमाणे महाराष्ट्रातील ताम्रपाषाणयुगीन संस्कृतींची वैशिष्ट्ये स्थूलमानाने फारशी विभिन्न नसली तरी त्यामध्ये थोडीशी आधिभौतिक आणि प्रादेशिक विविधता आढळून येते. या संस्कृतींचे ग्रामीण स्वरूप, बहुतांशी शेतीप्रधान अर्थव्यवस्था, तांब्याचा आणि गारगोटीच्या पात्यांचा वापर, इत्यादी वैशिष्ट्ये समान असली तरी इसवी पूर्व २००० ते १००० या कालात सामावलेल्या या संस्कृती, वस्तीच्या रचनेचा विस्तार, दफन पद्धती आणि धर्म या संदर्भात थोडेसे वेगळेपण दाखवितात. दुसरे असे की अनेक ठिकाणची उत्खनने मर्यादित स्वरूपाची असल्याने त्यातून व्यापक निष्कर्ष काढणे व ते सर्व संस्कृतींना लागू करणे चुकीचे ठरते. उदाहरणार्थ, माळवा व जोर्वे संस्कृतींच्या स्थलांचेच उत्खनन महाराष्ट्रात आणि मध्यप्रदेशात विस्तृत झाल्याने या दोन संस्कृतीबद्दल सखोल माहिती उपलब्ध झालेली आहे. तिसरे असे की १९५० ते १९७० या दोन दशकात झालेली उत्खनने व गेल्या वीस वर्षात झालेली उत्खनने यामध्ये उत्खनन पद्धती आणि पुराव्याचे विश्लेषण या दोन क्षेत्रांमध्ये क्रांतीकारक बदल झाले आहेत. त्यामुळे गेल्या १५ - २० वर्षात उत्खनकांनी उपलब्ध केलेल्या पुराव्याचे विश्लेषण करून जी माहिती प्रकाशित केली आहे तीमुळेच या कालखंडातील लोकजीवनाच्या विविध अंगावर प्रकाश टाकण्यास यश मिळाले आहे.

या मर्यादा आणि वैशिष्ट्ये लक्षात घेऊन महाराष्ट्रातील ताम्रपाषाणयुगीन विविध संस्कृतींतील मानवी जीवन कसे होते याचा आढावा खाली घेतलेला आहे.

### (१) सावल्दा संस्कृती

या संस्कृतीचा शोध तापी - गिरणा खोऱ्यामध्ये लागला. या संस्कृतीचा काळ दायमाबादच्या उत्खननानुसार उत्तर - हडाप्पाच्या आधी म्हणजेच पर्यायाने विकसित हडाप्पा संस्कृतीशी समकालीन ठरतो. इसवी सनपूर्व २० वे शतक ते १८ वे शतक असा कार्बन - १४ पद्धतीनुसार तो स्पष्ट झालेला आहे. या

संस्कृतीचा प्रसार मर्यादित नसून ती मराठवाड्यातील गोदावरी खोऱ्यात त्याचप्रमाणे कर्नाटकात कृष्णा नदीच्या खोऱ्यातही पसरली होती असे सिद्ध झाले आहे.

ताम्रपाषाणयुगातील महाराष्ट्रात ही आद्य संस्कृती असली तरी केवळ याच संस्कृतीच्या स्थलांचे विस्तृत उत्खनन फारसे झालेले नाही. मात्र या संस्कृतीबद्दलची बरीचशी माहिती दायमाबादच्या उत्खननात हाती आलेली आहे. या संस्कृतीच्या वस्त्यांच्या विस्तृतपणावर निश्चित विधान करणे कठीण असले तरी धुळे जिल्ह्यातील चिंचोडा, कांग्रा इत्यादी ठिकाणी या संस्कृतीचे अस्तित्व स्पष्ट झाले आहे. खुद्द सावल्डा येथे १२० मीटर लांब आणि ६० मीटर रुंद येवढ्या भूभागावर या संस्कृतीच्या लोकांनी वस्ती केल्याचा पुरावा उपलब्ध झाला आहे. याउलट दायमाबाद येथे याच संस्कृतीच्या वस्तीचा विस्तार तीन हेक्टर असल्याचे नमूद केले गेले आहे. या वस्तीच्या स्थलांचा अभ्यास केल्यास असे दिसते की या संस्कृतीच्या लोकांनी प्रामुख्याने तापी, गिरणा, प्रवरा, गोदावरी यासारख्या बारमाही पाणी उपलब्ध असलेल्या नद्यांच्या काठी वस्ती केली. पाण्याची उपलब्धता, शेतीसाठी योग्य जमीन आणि समतोल हवामान व पाऊस या नैसर्गिक वैशिष्ट्यांचा विचार यामागे असावा.

या लोकांची घरे कुडाची होती आणि यांची एक बाजू गोलाकार असे. काही घरांमध्ये एकच खोली, तर काही घरांमध्ये दोन किंवा तीन खोल्या होत्या. सर्वात लहान घर ३.४० मीटर लांब आणि १.६० मीटर रुंद होते. याउलट सर्वात मोठे घर ७ मीटर लांब आणि ५ मीटर रुंद होते. याचा अर्थ असा की मोठी घरे मोठ्या कुटुंबासाठी किंवा सधन कुटुंबाची असावीत आणि लहान घरे आर्थिकदृष्ट्या सधन नसलेल्या लोकांची असावीत. या घरात सापडलेल्या निरनिराळ्या वस्तूंच्या संख्येवरून असे म्हणता येते की तत्कालीन समाजात आर्थिक विषमता होती.

या कालातील लोक शेती आणि पशुपालन यावर आपला निर्वाह करीत असत. दायमाबाद येथे या कालातील घरात सातू (Barley), मसूर (Lentil), वाटाणे (Common Pea), लाखेची डाळ (Grass Pea), उडीद

(Black Gram), मूग (Green Gram), कुळीथ (Horse Gram). आणि वाल (Hyacinth Bean). ही धान्ये जळालेल्या अवस्थेमध्ये सापडली. यावरून हे लोक प्रामुख्याने उन्हाळी पिके घेत असले तरी हिवाळी पिकेही पिकवीत असत. याशिवाय यांच्या आहारामध्ये प्राण्यांचे मांस, मासे आणि दूधदुभते असावे असा अंदाज करता येतो.

या लोकांची मडकी वैशिष्ट्यपूर्ण होती याचा उल्लेख आधी आलेलाच आहे. ही मडकी हळू फिरणाऱ्या चाकावर बनविलेली आणि भाजण्यापूर्वी मडक्यावर लेप दिलेली होती. रंगकामही मडकी भाजण्याआधी करण्यात येई. भाजल्यानंतर ही मडकी फिकट तपकिरी किंवा गडद तपकिरी, तपकिरी लालसर किंवा गुलाबी दिसत असत. यांचा पृष्ठभाग चिरा पडलेला ( काहीसा तडकलेला ) दिसून येतो. यावरील रंगकाम विटकरी लालरंगाचे किंवा काही वेळा काळ्या आणि पांढरट रंगाचे आहे. चित्रकाम प्रामुख्याने रेघा किंवा पट्टे या स्वरूपात असले व काही भांड्यावर बाणाग्रासारख्या किंवा मस्त्यबाणासारख्या आकृती दिसून येत असल्या तरी काही मडक्यांवर हरणे, मासे आणि गवतासारखी चित्रे आढळतात. याचे आकार मात्र मर्यादित असून त्यात प्रामुख्याने हंडी, गडवे आणि छोट्या घागरी उपलब्ध आहेत. याशिवाय हे लोक चकचकीत राखी रंगाची मडकी, त्याचप्रमाणे चमकदार काळी आणि हात - बनावटीची तांबडी मडकी वापरीत. यातील तांबड्या मडक्यांवर काही वेळा चिखल चिकटवून अलंकरण केले जाई.

या संस्कृतीची स्थले फार मोठ्या संख्येने तापीच्या खोऱ्यात सापडत असली तरी विस्तृत उत्खनन बहुतांशी दायमाबाद या ठिकाणीच झालेले आहे. मात्र या लोकांच्या सांस्कृतिक जीवनाबद्दल इतर माहिती उपलब्ध झालेली नाही. हे लोक तांब्याच्या आंगठ्या, रंगीबेरंगी दगडाचे मणी, हाडापासून बनविलेली बाणाग्रे व गारगोटीच्या छिलक्यांपासून बनविलेली लहान आकाराची पाती विविध कामासाठी वापरत असत असे दिसते.

या संस्कृतीबद्दल एक महत्त्वाची बाब अशी की यांचे समकालीन इतर लोक मात्र उत्तर - हडाप्पाकालात प्रचलित असलेली टणक, जाड आणि लाल रंगाची मडकी वापरीत असत, तर इतर काही जमिनीमध्ये गोल खड्डे करून

व त्यावर लाकडी वाश्यांच्या साहाय्याने वर निमूळते होत गेलेले छप्पर उभे करून त्यात रहात असत असे उत्खनकाने नमूद केले आहे.

या कालात दायमावादला दाट लोकवस्ती होती असा निष्कर्ष मातीच्या पृथःकरणावरून शास्त्रज्ञांनी काढला आहे. (Sali 1986)

### (२) उत्तर - हडाप्पा संस्कृती

महाराष्ट्राच्या ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीमध्ये उत्तर - हडाप्पा संस्कृती हा एक घटक होता व याची जाणीव दायमावाद येथे १९७४ साली जो ब्रॉंझच्या वस्तूंचा निधी सापडला त्यावरून झाली. या निधीतील वस्तू हडाप्पा संस्कृतीशी जवळीक दाखवितात, किंवहुना त्या हडाप्पा संस्कृतीच्या निदर्शक आहेत असे मत काही विद्वानांनी मांडले आहे. त्यानुसार दायमावादला १९७८ साली जे उत्खनन करण्यात आले त्यात सापडलेल्या खापरावरील रंगकाम आणि या खापरांचा पोत उत्तर - हडाप्पा संस्कृतीशी मिळता - जुळता आहे असे स्पष्ट झाले. गेल्या दहा - बारा वर्षांमध्ये जे संशोधन झाले त्यात पन्नासहून जास्त ठिकाणी उत्तर - हडाप्पा संस्कृतीच्या वस्त्यांचा पुरावा मिळाला. सिंधु किंवा हडाप्पा संस्कृतीच्या लोकांनी सौराष्ट्र किंवा गुजरातमध्ये स्थलांतर केल्याचा पुरावा इसवीपूर्व सुमारे २२०० ते १८०० या कालात उपलब्ध झालेला आहे. इसवीपूर्व सुमारे १८ व्या - १९ व्या शतकात हडाप्पा संस्कृतीचे लोक तापी खोऱ्यामध्ये स्थलांतरीत झाले, याबद्दल आता निर्विवाद पुरावा मिळाला आहे. कालांतराने ते आणखी दक्षिणेकडे सरकले आणि गोदावरी - प्रवरा खोऱ्यांमध्ये आल्याचा स्पष्ट पुरावा दायमावादच्या उत्खननामध्ये मिळालेला आहे. दायमावादला या संस्कृतीच्या निदर्शक असलेल्या वटनाच्या आकाराच्या मुद्रा आणि खापरावर उत्कीर्ण केलेली आणि रंगविलेली हडाप्पा लिपि - चिन्हे उपलब्ध झालेली आहेत, हे या आधी उल्लेखिलेले आहे. या संस्कृतीचा कालखंड सर्वसाधारणपणे इसवीपूर्व सुमारे १८०० ते १६०० असा सिध्द झालेला आहे. याच कालातील दायमावाद येथील कार्बन - १४ तारीख (इसवीपूर्व सुमारे १७६० ± २१०) या मताला सहाय्यकारक ठरते.

या लोकांची जीवन पद्धती आणि सांस्कृतिक वैशिष्ट्ये याबद्दलची माहिती बऱ्याच प्रमाणात दायमाबादच्या उत्खननामध्ये उपलब्ध झालेली आहे. या लोकांचे व्यवच्छेदक लक्षण म्हणजे यांनी बनविलेली जाड आणि टणक लाल रंगाची मडकी. शुद्ध माती आणि उत्कृष्ट भाजणी त्याचप्रमाणे जलद फिरणाऱ्या चाकाचा वापर ही या मडक्यांची वैशिष्ट्ये आहेत. यावर केलेले काळ्या रंगातील रंगकाम प्रामुख्याने रेषा आणि पट्टे या स्वरूपाचे असले तरी त्यात विविधता आहे, पण फारशी कलात्मकता दिसून येत नाही. आधी उल्लेखिल्याप्रमाणे स्टँडवरील थाळ्या, स्टँडवरील वाडगे, आतल्या बाजूला काठ असलेल्या थाळ्या हे प्रकार वापरात होते.

या लोकांचे आणखी एक वैशिष्ट्य असे की यांनी घर बांधणीत पहिल्या प्रथम कच्च्या विटांचा वापर सुरू केला. अशा विटांचा वापर या आधी किंवा या नंतरच्या महाराष्ट्रातील ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीमध्ये आढळून येत नाही. या विटांची मोजमापेही प्रमाणित केल्याचे दिसून येते. उदाहरणार्थ, एका दफनात वापरलेल्या विटांची मोजमापे ४ : २ : १ ( ३२ × १६ × ८ सें. मी. ; २८ × १४ × ७ सें. मी. ) या प्रमाणात होती. घरांच्या बांधणीमध्ये या विटा काळ्या चिखलाच्या सहाय्याने बसविल्या होत्या. घरे सर्वसाधारणपणे काटकोन - चौकोनी आकाराची असली तरी संपूर्ण घराचा पुरावा फारसा उपलब्ध झाला नाही. याचबरोबर मातीची म्हणजे कुडाची घरेही बांधली जात असत. अशा विसाहून जास्त घरांचा पुरावा उत्खननात मिळाला. अशा घरांच्या जमिनी माती चोपून व त्यावर सारवण करून तयार केलेल्या होत्या. एका घरामध्ये गोल चूल उघडकीस आली. ती ५० सें. मी. व्यासाची आणि १० सें. मी. खोलीची असून तिच्यात जनावरांची जळलेली हाडे सापडली. याच घरामध्ये बटनाच्या आकाराच्या मुद्राही सापडल्या.

या संस्कृतीच्या लोकांची दफने वैशिष्ट्यपूर्ण होती कारण दफनामध्ये कच्च्या विटांचा वापर केल्याचे दिसून आले. जमिनीमध्ये लंबगोल आकाराचा खड्डा घेऊन त्यामध्ये कच्च्या विटांचे तुकडे, दगड - गोटे आणि माती यांचा पहिला थर दिला जाई. यावर चुनखडी आणि मातीचे भाजलेले गोळे पसरले

जात. यावर मातीचे सारवण केले जाई. खड्ड्याच्या बाजू विटा आणि विटांचे तुकडे वापरून बांधून काढण्यात आल्यावर त्यामध्ये मृताला न मुडपता सरळ ठेवले जाई. दायमाबादच्या दफनामध्ये मृताला गोणपाटामध्ये गुंडाळून पुरलेले होते. मृताला ठेवल्यानंतर माती आणि विटांचे तुकडे टाकून त्याचा त्यावर ढीग केला जाई. ज्या ठिकाणी मृताचे डोके असे त्या जागेवर एक दगड ठेवण्यात येई. या दफनातील मृत २५ ते ३० वर्षांचा पुरुष होता असे निश्चित करता आले आहे. (फलक १८ : अ)

या कालातील शेतीविषयक आणि अन्नपद्धतीचा पुरावा जळलेला गहू, सातू, मसूर, वाटाणे आणि कुळीथ अथवा हुलगे यांच्या स्वरूपात मिळाला.

या कालामध्ये तांब्याचा आणि सोन्याचा वापर थोडाफार होता. तांब्याच्या कुऱ्हाडी आणि सोन्याचे मणी याची साक्ष देतात. विविध खापरांना निरनिराळे आकार देण्यामध्ये या लोकांची कलात्मकता दिसून येते. लंबगोल आकाराच्या वटिका घरांच्या अलंकरणासाठी वापरल्या जात असत. विविध आकाराच्या मण्यासाठी शंख, हस्तीदंत, सोने आणि कार्नेलियनसारखे रंगीत दगड वापरण्यात येत. यातील हस्तीदंतापासून बनविलेले लहान नावेच्या आकाराचे पेंड (Pendant) कलाकुसरीचा उत्कृष्ट नमुना आहे. (Sali 1986)

### (३) दायमाबाद संस्कृती

या संस्कृतीचा पुरावा फक्त दायमाबादमध्ये मिळाला आहे. या कालखंडाच्या खापरांना 'बफ् अँड क्रीम' असे नाव उत्खनकाने दिले होते. परंतु दायमाबादच्या प्रकाशित वृत्तान्तामध्ये हे नाव बदलून दायमाबाद वर्गाची खापरे असा उल्लेख केलेला आहे. ते यासाठी सयुक्तिक ठरते की ही खापरे दायमाबाद येथे पहिल्या प्रथम सापडली. ही खापरे वापरणाऱ्या लोकांनी हडाप्पा संस्कृतीच्या वसाहतींचा शेवट झाल्यानंतर सुमारे पन्नास वर्षांनी वस्ती केली असे उत्खनकाचे म्हणणे आहे.

या दायमाबाद संस्कृतीचे व्यवच्छेदक लक्षण काळ्या रंगात रंगविलेली दुधट पिवळसर खापरे. या खापरांची भाजणी उत्तम दर्जाची नाही. पृष्ठभाग पिवळसर किंवा पांढरट असून यावर विविध प्रकारचे चित्रकाम केलेले आहे.

या चित्रकारीमध्ये पट्टे, रेघांचे समूह, नागमोडी रेषा, जाळीदार चौकोन आणि त्रिकोण, पटासारखी नक्षी इत्यादी प्रकार प्रामुख्याने दिसून येत असले तरी लांबट शरीर असलेले प्राणीही चितारलेले आहेत. काही खापरावर कोरून सूर्य, जनावरे, त्रिशूळ आणि रेषा काढलेल्या आहेत. या वर्गाच्या खापरामध्ये कोनाकृती उंच बाजू असलेले वाडगे, सपाट बुडाची भांडी त्याचप्रमाणे अरुंद तोंडाची मडकीही बनविली जात असत.

असे असले तरी केवळ पिवळसर किंवा पांढरट वर्गाची खापरे या संस्कृतीचे लोक वापरीत होते असे नव्हे. कारण या कालखंडात तांबड्या पृष्ठभागावर काळ्या रंगात रंगविलेली मडकी, काळ्या आणि करड्या रंगाची पन्हाळीदार मडकी त्याचप्रमाणे चमकदार राखी रंगाची मडकी वापरात होती. बहिर्वक्र बाजू असलेले वाडगे, लोटे, खोल वाडगे, स्टँडवर बसविलेला लोटा, सपाट किंवा निमुळत्या होत जाणाऱ्या झाकण्या आणि हात बनावटीचे मोठे रांजण वापरात होते.

या लोकांच्या वस्तीचा विस्तार दायमावादला विस्तृत असल्याचे आढळून आले तरी या कालातील घरादारांचे अवशेष फारसे उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे या कालातील ग्राम-रचना कशी होती याबद्दल निष्कर्ष काढता येत नाही. परंतु हे लोक शेती करत असत याबद्दल निःसंशय पुरावा उत्खननात मिळाला. त्यानुसार शेतीतून हे लोक गहू, सातू, मसूर, हुलगे, वाल, मूग आणि उडीद यांचा खाण्यासाठी वापर करीत असत असे दिसते. म्हणजे उन्हाळी आणि हिवाळी ही दोन्ही पिके हे पिकवीत असत. याआधीच्या संस्कृतीचे लोकही हीच धान्ये पिकवीत असत, याचा उल्लेख याआधी आलेलाच आहे. शेतीच्या आणि शेती उत्पादनाच्या तंत्रामध्ये सातत्य चालू राहिले असा याचा अर्थ होतो.

हे लोक गारगोटीच्या छिलक्यांपासून विविध प्रकारची पाती, तासण्या आणि बाणाग्रे बनवीत असत. याशिवाय तांब्याचाही वापर केला जात असे. उत्खननात सापडलेल्या भट्टीच्या अवशेषावरून तांबे शुद्ध करण्याचे काम या कालात दायमावादला होत होते असे दिसते. याशिवाय हाडावर आणि

हस्तीदंतावर कलाकुसरीचे काम केले जाई. शंखाच्या बांगड्या आणि विविध प्रकारचे रंगीत दगडाचे मणी वापरात होते.

याच संस्कृतीच्या लोकांच्या धर्मविषयक कल्पनांचा थोडासा अंदाज सापडलेल्या पुराव्यानुसार करता येतो. मातीच्या अर्चनाकुंडामध्ये पुरुषाकृती ठेवून तिची पूजा केली जात असावी. मडक्यावर स्त्री-पुरुषांच्या आकृती चिकटविल्या जात. या मागे काही श्रद्धा असाव्यात असे अनुमान करता येते.

या संस्कृतीचे लोक मानवी दफने निरनिराळ्या प्रकारे करीत असत. यापैकी एक प्रकार जमिनीमध्ये खड्डा करून त्यात मृताला ठेवणे असा होता. या दफनात वापरलेल्या काही मडक्यांवर फुलांच्या आकृती चिकटविलेल्या होत्या. दुसरा प्रकार सांकेतिक दफनाचा होता. यामध्ये मानवी अवशेष आढळले नाहीत. तिसरा प्रकार एका मडक्यामध्ये मृताची काही हाडे ठेवून त्यांचे दफन करावयाचे, हा होता. उपलब्ध पुराव्यावरून मृत व्यक्तींबद्दल निश्चितपणे काही सांगणे शक्य झाले नाही.

## (४) माळवा संस्कृती

या संस्कृतीच्या नावाबद्दलचा उल्लेख या आधी आलेला आहेत. मांळवा पठाराच्या विभागात या संस्कृतीच्या स्थलांचा शोध सुमारे ४० - ४५ वर्षांपूर्वी लागला आणि त्या विभागात या संस्कृतीची अनेक स्थले उघडकीस आल्यानंतर त्या विभागाचे नाव या संस्कृतीला देण्यात आले. मध्य प्रदेशातील नावडातोली, नागदा, कायथा आणि एरण या ठिकाणी उत्खननात या संस्कृतीची माहिती उपलब्ध झाली. यापैकी नावडातोली येथे विस्तृत उत्खनन करण्यात आले. कालांतराने या संस्कृतीचा प्रसार महाराष्ट्रातही झाल्याचे उघडकीस आले. नर्मदा, तापी आणि गोदावरी आणि त्यांच्या उपनद्या यांच्या काठी या संस्कृतीच्या वस्त्यांचे अवशेष सापडले आहेत. महाराष्ट्रामध्ये प्रकाश, बहाळ, दायमावादं, इनामगाव, चांडोली आणि सोनगाव, त्याचप्रमाणे इतर अनेक ठिकाणी या संस्कृतीच्या अस्तित्वाचा पुरावा उपलब्ध झाला असला तरी इनामगाव आणि दायमावाद येथे विस्तृत उत्खननामुळे या संस्कृतीची विशेष माहिती हाती आली आहे. ही संस्कृती पूर्णतः ग्रामीण स्वरूपाची असून शेती आणि पशूपालन यावर ती आधारलेली होती. या संस्कृतीचे नमूद

करण्यासारखे वैशिष्ट्य म्हणजे मध्य प्रदेशात (नावडातोली) आणि महाराष्ट्र (चांडोली) येथे सापडलेला काही पुरावा पश्चिम आशिया क्षेत्रातील संस्कृतीशी संपर्क-प्रेरणा दाखवितो. हिचा काल सर्वसाधारणपणे इसवीपूर्व १६०० ते १२०० असा मानला जातो.

ही संस्कृती शेतीवर आधारलेली असल्याने हिच्या वस्त्या बारमाही पाणी पुरवठा असलेल्या नद्यांच्या काठी केल्या गेल्याचे दिसून येते. नर्मदा, तापी, गिरणा, गोदावरी, प्रवरा, घोड, पूर्णा, भीमा आणि इतर उप-नद्यांच्या काठी या संस्कृतीची जवळपास शंभरावर स्थले सापडली आहेत. पाण्याबरोबरच, शेतीला उपयुक्त ठरणारी जमीन आणि पर्जन्यमान यांचाही विचार वस्ती करताना केला गेल्याचे स्पष्ट होते. माळवा संस्कृतीची सर्वात मोठी वस्ती दायमाबाद येथे कमीत कमी २० हेक्टर एवढ्या परिसरामध्ये असून याशिवाय प्रकाश आणि इनामगाव या ठिकाणीही या संस्कृतीच्या विस्तृत वस्त्या आढळलेल्या आहेत. परंतु असे दिसून येते की या संस्कृतीच्या वस्त्या उत्तर महाराष्ट्रात, विशेषतः तापी खोऱ्यामध्ये, संख्येने (सध्यातरी) जास्त आढळून आलेल्या आहेत. जसजसे आपण दक्षिण महाराष्ट्राकडे येतो तसतसे वस्त्यांची संख्या आणि आकार कमी होत जातो. भौगोलिक परिस्थिती आणि पर्जन्यमान यांच्याशी या वैशिष्ट्यांचा संबंध भूगोलतज्ञ आणि पुरातत्वज्ञ यांनी जोडला आहे.

या संस्कृतीचे लोक उत्कृष्ट बनावटीची मडकी तयार करीत असत. इतक्या विविध आकाराची आणि कलात्मक रंगकाम केलेली मडकी दुसऱ्या कोणत्याही ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीमध्ये उपलब्ध झालेली नाहीत. जलद चाकावर घडविलेली ही मडकी जाड लेप दिलेली असून त्यांचा रंग लालसर-पिवळसर-नारिंगी असा विविध छटांमध्ये दिसून येतो. मडकी भाजण्याआधी त्यावर काळ्या रंगात विविध प्रकारचे योजनाबद्ध अलंकरण करण्यात येई. भौमितिक अलंकरणाव्यतिरिक्त हरीण, मोर, चित्ता, मगर, तसेच मानवी आकृती, नृत्य करणाऱ्या मानवांचे समूह व सूर्योदयासारखे देखावे चित्रित करण्यात आलेले आहेत. काही मडक्यांना उथळ भोके पाडून व त्यात पांढरा रंग भरून ठिपक्यांची नक्षी केलेली आहे, तर काहीवर

मांत्रिक - रुद्र - शिव ? ( नावडातोली, मध्य प्रदेश ) यांच्या आकृती काढलेल्या आहेत. विविध आकाराचे वाडगे, थाळ्या, कप, तसराळी, घागरी, गडवे, पराती असे असंख्य प्रकार वापरात होते. यातील काही धार्मिक उपयोगात आणले जात असत. या विविध मडक्यांचा उपयोग कोणकोणत्या कामासाठी केला जात असावा याबद्दल अनुमाने करता येतात. उदाहरणार्थ रांजण साठवणीसाठी, तसराळे पीठ कालवण्यासाठी, तोटीची भांडी पाणी व दूध पिण्यासाठी अथवा धार्मिक क्रियाकांडासाठी वापरली जात असावीत. या खापराबरोबरच इतर निकृष्ट दर्जाची मडकीही वापरात होती. लाल रंगाची, राखी रंगाची, पिवळसर रंगाची आणि हात - बनावटीची विटकरी रंगाची मडकीही उपयोगात होती. माळवा वर्गातील काही पात्रे, उदाहरणार्थ चषक, विशिष्ट प्रसंगी वापरली जात असावीत. ( Sankalia 1970; Sali 1986; Dhavalikar 1988 )

माळवा कालखंडातील घरांचे अवशेष मध्य प्रदेशात नावडातोली, नागदा, एरण, कायथा याठिकाणी उपलब्ध झाले असले तरी महाराष्ट्रात दायमाबाद आणि इनामगाव येथील पुरावा विस्तृत, पूर्ण स्वरूपाचा आणि विविध प्रकारचा आहे. इनामगाव येथे जवळजवळ वीस घरांचे अवशेष सापडले तर दायमाबाद येथील घरे चारपाच प्रमुख प्रकारामध्ये वर्गीकृत करण्यात आली आहेत. यातील काही पुरोहितांची, काही धार्मिक क्रियाकांडाची, काही कारागीरांची तर काही व्यापार - व्यवसायासाठी निर्माण केलेली होती. या व्यतिरिक्तही सर्वसाधारण स्वरूपाची घरे बांधण्यात आलेली होती. ही सर्व घरे कुडाची असून कुठल्याही स्वरूपातील विटा वापरात नव्हत्या. दायमाबादचे एक घर तांबटाची कार्यशाळा म्हणून वापरात होते. यामध्ये दोन भट्टयांचे अवशेषही सापडले. दुसऱ्या एका घरामध्ये मूस सापडली. पुरोहिताचे घर विस्तृत असून त्यामध्ये विविध आकारांची मातीची बनविलेली अग्निकुंडे आढळून आली. एका घरात तर मातीच्या बनविलेल्या ओट्यावरून पाणी वाहून जाण्याकरिता नाली बनवून ते पाणी एका खड्ड्यामध्ये वाहत जाईल अशी योजना केलेली होती. यावरून हे घर धार्मिक स्नानविधी आणि अग्निपूजा यांच्याशी संबंधित असावे असे मत मांडले गेले आहे. ( Sali 1986 )

इनामगावला माळवा कालखंडातील घरे सर्वसाधारणपणे काटकोन-चौकोनी (७ × ५ मीटर) आकाराची असून त्यांची योजना पूर्व-पश्चिम केलेली होती. मोठी घरे गावाच्या मध्यभागी असून आत कुडाच्या भिंती घालून खोल्यांची निर्मिती केलेली होती. घराच्या भिंती मातीच्या असून त्या छपरापर्यंत न जाता बुटक्या उंचीच्या असून घराचे छप्पर या भिंतीमध्ये वासे पुरून त्यावर आधारलेले असे. अशा काटकोन-चौकोनी घरामध्ये धान्य साठवण्यासाठी जमिनीत एक मीटर व्यासाचे गोल खड्डे करून व त्याच्या आतल्या बाजू सारवून बळदे निर्माण केलेली होती. या व्यतिरिक्त घरामध्ये गोल ओटे तयार करून त्यावर विणलेल्या कणग्या ठेवल्या जात असत. काही लोक निमुळत्या छपराच्या गोल झोपड्यांमध्ये रहात असत. तर काही जमिनीमध्ये गोल खड्डा करून व त्यावर हलक्या स्वरूपाचे छप्पर उभारून रहात असत. घरांच्या प्रकारानुसार, तत्कालीन समाजामध्ये विविध आर्थिक वर्ग असावेत असे मत मांडले गेले आहे. याशिवाय दायमावादला वस्तीभोवती मातीची तटबंदी आणि पुरापासून बचाव करण्यासाठी मातीचा बंधारा घातलेला होता. अशातऱ्हेचे सार्वजनिक उपयोगाचे बांधकाम बहुतांशी शासनातर्फेच केले गेले असले पाहिजे. कारण अशा वास्तूंची निर्मिती आणि देखभाल व्यक्तीकडे न राहता शासनातील अधिकाऱ्यांकडे सर्वसाधारणपणे असते. (Dhavalikar *et al.* 1988)

माळवा संस्कृतीचे लोक आपली उपजीविका शेती, पशुपालन, मासेमारी आणि शिकार यांच्या सहाय्याने करीत असत. धान्य साठविण्यासाठी बळदे आणि कणग्या निर्माण केल्या जात याचा उल्लेख वर आला आहेच. शेतीद्वारे सातू (यव Barley), गहू, नाचणी, मसूर, पावटे, हुलगे, लाखेची डाळ इत्यादी पिके पिकविली जात असत. यातील बहुतेक उन्हाळी पिके आहेत. (Kajale 1974)

या लोकांच्या दफनपद्धतीचा पुरावा दायमावाद आणि इनामगाव या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर मिळाला. मात्र तो मध्य प्रदेशातील नावडातोली येथे विस्तृत उत्खनन करून सुद्धा उपलब्ध झालेला नाही. चांडोली येथे दोन राखी रंगाच्या मडक्यांमध्ये मृत मुलाला पुरले जाई. काही वेळेला दफनासाठी वापरलेले एक मडके माळवा वर्गाचे असे. अशा एका दफनात माळवा वर्गाच्या मडक्यावर सूर्य, मोर आणि कुत्रा यांची चित्रे काढलेली दायमावाद येथे

आढळली. काहींमध्ये इतर आकाराची मडकीही मृतांबरोबर ठेवली जात. पुरलेल्या मुलांचे वय दोन ते चार वर्षांपर्यंत असावे असा अंदाज करण्यात आला आहे.

माँळवा संस्कृतीचे लोक गारगोटीच्या छिलक्यापासून विविध आकाराची पाती, टोचे इत्यादी शस्त्रे बनवीत, त्याचप्रमाणे तांब्याचाही वापर ते करीत असत. तांब्याच्या बनविलेल्या बांगड्या, छिन्नी, भाल्याची पाती आणि वस्तऱ्यासारखी पाती या कालखंडातील थरात सापडली.

दायमाबादच्या शोधाचे महत्त्व माळवा - जोर्वे संस्कृतीच्या अस्तित्वा - व्यतिरिक्त तेथे १९७४ साली सापडलेल्या तांब्याच्या वैशिष्ट्यपूर्ण वस्तूंमुळे खूपच वाढले. याचा उल्लेख याआधी आलेलाच आहे. बैल जोडलेल्या रथावरील मानव, हत्ती, रेडा आणि गेंडा वजनदार असून ते चार चाके असलेल्या तांब्याच्या जाड पट्टीवर बसविलेले होते (फलक २१). या स्वरूपाच्या वस्तू सिंधु संस्कृतीच्या कोणत्याही स्थली किंवा महाराष्ट्रातील ताम्रपाषाणयुगीन कोणत्याही स्थली मिळालेल्या नाहीत. खुद्द दायमाबाद येथे कुठल्याही उत्खननामध्ये त्या सापडलेल्या नाहीत. महाराष्ट्रात तांब्याचे साठे नाहीत, त्यामुळेच या निधीतील वस्तू कोणत्या संस्कृतीच्या लोकांनी बनविल्या याबद्दल अगदी विरूद्ध टोकाची मते मांडली गेली आहेत. काहींच्या मते या वस्तू उत्तर - हडाप्पा संस्कृतीच्या असाव्यात, तर काहींच्या मते त्या ऐतिहासिक काळातीलही असू शकतात. या वस्तूंचे केलेले शास्त्रीय पृथःकरण, तापी - गिरणा आणि गोदावरी - प्रवरा या भागात सापडलेला उत्तर - हडाप्पा संस्कृतीचा पुरावा आणि सर्वसाधारपणे महाराष्ट्रातील ताम्रपाषाणयुगीन माळवा - जोर्वे संस्कृतीमध्ये आढळून येणारा तांब्याचा मर्यादित वापर या गोष्टी लक्षात घेतल्या तर या वस्तू उत्तर - हडाप्पा संस्कृतीशी निगडित असाव्यात असे मत आता सर्वसाधारपणे मान्य झालेले आहे. महाराष्ट्राचा गुजरात व मध्य प्रदेश या विभागांशी सांस्कृतिक संबंध आला होता याचे पुरावे उपलब्ध आहेत. सौराष्ट्र - गुजरातमध्ये उपलब्ध असणारी उत्तर - हडाप्पा संस्कृतीची खापरे, त्याचप्रमाणे गुजराथेतील रंगपूर वर्गाची चकचकीत लालभडक खापरे, प्रकाश, दायमाबाद, चांडोली इत्यादी ठिकाणी सापडलेली आहेत. राजस्थान व

मध्य प्रदेशातील ताम्रयुगीन काळी - आणि - तांबडी मडकी आणि दुधट पिवळसर लेप दिलेली आणि काळ्या रंगात चित्रकारी केलेली खापरेसुद्धा महाराष्ट्रात सापडली आहेत.

दायमाबादच्या ताम्रनिधीचा वापर धार्मिक क्रियाकांडासाठी केला गेला असावा असे मत मांडण्यात आलेले आहे. अशाच प्रकारचे धार्मिक कर्मकांडाचे पुरावेही माळवा संस्कृतीशी निगडीत असल्याचे दिसते. मध्य प्रदेशातील नावडातोली येथे अग्निपूजेशी निगडीत काटकोन - चौकोनी कुंडे घरात दिसतात. दायमाबाद आणि इनामगाव येथेही अग्निपूजेचा पुरावा मिळालेला आहे. याशिवाय याच ठिकाणी विविध आकाराच्या वेदिका अग्निपूजेसाठी उपयोगात आणीत असत. पशुपूजासुद्धा प्रचलित होती. धार्मिक क्रियाकांडाबरोबरच जादूटोणा - मंत्रतंत्र यासारख्या प्रकारांचे अस्तित्व असावे. मध्यप्रदेशात आणि महाराष्ट्रामध्ये सापडलेले पन्हाळीदार तोटी असलेले वाडगे दोन हातात धरून वापरण्यात येत असावेत कारण ते नीट स्थिर बसत नाहीत. काही वाडग्यांच्या आतील भागावर केस पिंजारलेला, हातात त्रिशूळ घेतलेला आणि पक्ष्याच्या चोचीसारखे तोंड असलेला - जादूगार चितारलेला आहे. काहींच्या मते हे चित्र रुद्रशिवाचे असावे. अशा वाडग्यांचा उपयोग तर्पणादी क्रियांशी किंवा जादूटोण्याशी किंवा काही रोग बरे करण्याच्या हेतूने केला जात असावा. अशाच प्रकारचे चित्रण दायमाबादच्या पहिल्या उत्खननामध्ये एका मोठ्या रांजणावर आढळून आले. या रांजणावर चित्रीकरणाचे दोन स्तर असून त्यातील वरच्या स्तरात ( फलक २० : अ ) उभ्या माणसाची आकृती आहे. या माणसाने कमरेभोवती झाडाची पाने गुंडाळली असून त्याच्या दोन्ही बाजूला मोर, हरीण, काळवीट आणि वाघ - चित्ता हे प्राणी त्या व्यक्तीला जणू काही आदर दाखविण्यासाठी आलेले आहेत असे वाटते. खालच्या स्तरात हे प्राणी परत जाताना दाखविलेले आहेत. पशुपतीशी निगडित असे हे चित्रण आहे. प्रकाश येथे या कालातील थरात सापडलेले त्रिकोणाकृती ताईत विशिष्ट हेतूने वापरले जात असावेत असे अनुमान करता येते. अथर्ववेदामध्ये अनेक ताईतांचा, वस्तूंचा आणि जादूच्या मंत्रांचा उल्लेख आहे. ( Sankalia *et al.* 1971 )

माळवा संस्कृतीचे आणखी एक वैशिष्ट्य असे की यात मिळालेल्या काही वस्तू पश्चिम आशियाशी साम्य / संपर्क दाखवितात. नावडातोली येथे अग्निकुंडात मिळालेली वैशिष्ट्यपूर्ण मडकी, विविध प्रकारचे चषक, पात्याच्या मधोमध उठावात कड असलेले तांब्याच्या तलवारीचे पाते आणि चांडोली येथे सापडलेली कट्यार व बैलासारखी आकार दिलेली मातीची बाटली पश्चिम आशियाशी संपर्क दाखविते असे काही पुरातत्वज्ञांचे मत आहे. चांडोलीची कट्यार दोन प्रकारे वैशिष्ट्यपूर्ण आहे. हिचे पाते काहीसे लांबट त्रिकोणी पानासारखे असून पात्यावर मधोमध उठावात कड आहे. कट्यारीच्या मुठीची पट्टी टोकाला दुभाजित केली आहे. अशातऱ्हेच्या कट्यारी कॉकेशस विभागात सापडल्या असून त्यांचा आर्यांशी संबंध जोडला जातो. बैलाच्या आकाराची बाटली वैशिष्टपूर्ण आहे. ही बाटली आडवी, चार चाकावर बसविली जात असे. बैलाच्या मुखाचा भाग उघडा असून इतर शरीर गोल आणि पोकळ आहे. वशिंड आणि शेपूट चिकटविलेले असून बैलाच्या अंगावर काळ्या रंगात तिरक्या रेघा रंगविल्या आहेत. त्यामुळे झूल घातल्यासारखे दिसते. अशाच तऱ्हेची बाटली नेवाशालाही सापडली आहे. अशातऱ्हेच्या प्राण्यांच्या आकाराच्या मडक्यांचा वापर मोहेंजोदाडोलाही होता. इराण, ग्रीस, इजिप्त, ॲनातोलिया आणि मेसोपोटेमिया या पश्चिम आशियातील प्रदेशात अशातऱ्हेच्या मडक्यांचा वापर होता. इराणमधल्या आर्यांनी अशातऱ्हेच्या वस्तूंच्या कल्पना प्रसृत केल्या असाव्यात असे मत मांडले गेले आहे. ( Sankalia 1963 )

• माळवा आणि जोर्वे या संस्कृती वेगवेगळ्या आहेत असे जरी सुरुवातीला संशोधकांना वाटले तरी माळव्यातूनच जोर्वे संस्कृती उत्क्रान्त झाली किंवा रूपान्तरीत झाली असे मत आता मूळ धरू लागले आहे. मडक्यांच्या आकारातील साम्य, घरांच्या बांधणीतला सारखेपणा, शेतीतील धान्योत्पादनात आढळून येणारे साम्य, तांब्याच्या वस्तूंच्या आकारातील सारखेपणा इत्यादी घटकांनुसार हे मत ग्राह्य धरण्यास हरकत नाही. हे संक्रमण इसवीपूर्व १५ व्या - १४ व्या शतकात किंवा त्यानंतर झाले असावे.

## जोर्वे संस्कृती

माळवा आणि जोर्वे यांच्या संदर्भातील वर उल्लेखिलेले मत अलीकडील उत्खनित पुराव्यानुसार मांडले गेले असले तरी या दोन वर्गाच्या मडक्यांच्या आकारांचा तौलनिक अभ्यास आधीच्या उत्खननात करता आला नाही, कारण ही उत्खनने मर्यादित स्वरूपाची होती. परंतु दायमावाद येथील उत्खननामध्ये माळवा - जोर्वे संधिकालाची अवस्था स्पष्ट झालेली दिसते. असे असूनही जोर्वे संस्कृतीच्या पूर्व - कालखंडात ताम्रपाषाणयुगीन वसाहतींची भरभराट झाल्याचे चित्र दिसून येते तर उत्तर - कालामध्ये या संस्कृतीची अवनत अवस्था दिसून येते. त्यामुळे इनामगाव येथे पूर्व - जोर्वे काल आणि उत्तर - जोर्वे काल अशी विभागणी करण्यात आलेली आहे.

जोर्वे संस्कृतीची सापडलेली स्थले संख्येने तापी खोऱ्यामध्ये खूप आहेत. मध्य महाराष्ट्रामध्ये त्यांची संख्या कमी झालेली दिसते, तर भीमा खोऱ्यात या संस्कृतीची स्थले विरळपणे आढळून येतात. या सर्व वर्गातील मिळून दोनशेहून अधिक जोर्वे संस्कृतीच्या स्थलांची महाराष्ट्रामध्ये नोंद करण्यात आलेली आहे. या संस्कृतीची सर्वात मोठी वस्ती दायमावाद येथे, जवळपास २० हेक्टर, असल्याचा उल्लेख या आधी केलेलाच आहे. त्या मानाने इनामगाव आणि प्रकाश येथील वस्त्या दायमावादच्या एक षष्ठांश इतक्या लहान आकाराच्या आहेत. यापेक्षाही लहान आकाराच्या जोर्वे संस्कृतीच्या वस्त्या नेवासे, चांडोली, सोनगाव, आपेगाव, कवठे, वाळकी येथे आढळून आलेल्या आहेत. या वर्गीकरणानुसार काही वसाहती प्रमुख केंद्राच्या स्वरूपाच्या तर इतर उपवसाहतीच्या किंवा दुय्यम दर्जाच्या असाव्यात असा विचार मांडला गेला आहे. इनामगाव आणि दायमावाद या ठिकाणच्या वस्त्याभोवती संरक्षणात्मक ( शत्रूचा हल्ला किंवा बहुधा पूर ) भिंती असल्याने ही स्थले आर्थिक आणि शासकीय दृष्ट्या महत्त्वाची असावीत असे दिसते. यातील काही वस्त्या ( वाळकी, जिल्हा पुणे ) अत्यंत तात्पुरत्या स्वरुपाच्या होत्या असे दिसून आले आहे.

या कालातील घरे बहुतांशी काटकोन - चौकोनी आकाराची असून यांच्या मातीच्या भिंती बुटक्या असत. त्यावर कुडाची बांधणी केली जात असावी

आणि यावर हलक्या वजनाचे छप्पर घातले जाई. इनामगाव येथील घरांचे आकार निरनिराळे आढळून आले. यातील सर्वात मोठे घर ७ × ५ मीटर होते आणि मातीच्या भिंतींच्या सहाय्याने खोल्या निर्माण केल्या होत्या. अशा घरामध्ये लंबगोल आकाराचे, सपाट बुडाचे आणि वातीसाठी पन्हाळी असलेले मातीचे दिवे वापरले जात, असे दायमाबाद, चांडोली व नेवासे येथील पुराव्यावरून स्पष्ट होते. घरामध्ये लंबगोल आकाराच्या खड्ड्याच्या चुली तर घराच्या ओसरीमध्ये मोठ्या आकाराच्या चुली होत्या. लहान चुलीच्या मधोमध छोट्या बसक्या मातीच्या उभ्या दांड्यावर खापर-तवे होते. प्रत्येक मोठ्या घरामध्ये धान्य साठवण्यासाठी बळदे आणि कणग्या होत्या. दायमाबाद येथे कार्यशाळा, खाटकाची झोपडी, कुंभाराचे घर, मणीकाराचे घर, व्यापाऱ्याचे घर, अधिकाऱ्याचे घर, धार्मिक क्रीयाकांडासाठी बांधलेली वास्तू इत्यादी विविध प्रकारची घरे सापडल्याचा पुरावा मिळाला आहे. याशिवाय दायमाबादला या कालामध्ये काही धार्मिक स्वरूपाच्या वस्तू मिळाल्याचा उल्लेख आहे. खास उल्लेख करण्यासारखी वास्तु म्हणजे अग्निमंदिर. याची एक बाजू अर्धवर्तुळाकृती आहे. या मंदिराच्या भिंती मातीच्या असून त्यावर मातीचा गिलावा केला आहे. मधोमध अग्निकुंड असून, विविध प्रकारचे धान्य जळालेल्या स्वरूपामध्ये या घराच्या जमिनीवर सापडले. या सारखी दुसरी एक वास्तु म्हणजे पाटलाचे किंवा जमीनदाराचे घर. हे काटकोन-चौकोनी असून सर्वात मोठे आहे. यामध्ये तीन खोल्या, स्वयंपाकघर, बैठकीची खोली आणि ओसरीवरची खोली इतके विभाग पाडलेले आहेत. घराच्या मागे परसही आहे. गावाच्या मध्यभागामध्ये रस्त्यांचे अवशेष त्याचप्रमाणे गल्ल्यांची योजना दर्शविणारा पुरावा उपलब्ध झाला. यातील एक रस्ता दीड मीटर रूंदीचा असून तो बारके दगडगोटे, खापरांचे तुकडे आणि माती यांच्या साहाय्याने तयार करण्यात आलेला आहे. ( Deo 1965; Sali 1986; Dhavalikar 1988 )

सर्वच घरे काटकोन-चौकोनी होती असे मात्र नाही. काही गोल आकाराच्या झोपड्याही उभारीत असत. अशा झोपड्यांचे छप्पर लाकडी वाश्यांच्या सहाय्याने तोलून धरले जाई. असे सर्वात मोठे गोल घर जवळ-जवळ पावणेपाच मीटर व्यासाचे असून त्याच्यामध्ये मातीच्या चुलीही

आढळून आल्या. अशातऱ्हेची घरे सर्वसाधारणपणे आर्थिकदृष्ट्या फार सधन असणाऱ्यांची नसावीत असे अनुमान करता येते.

अशा प्रकारच्या धार्मिक आणि निवासी घरांशिवाय दायमाबादला कुंभाराचे मडके भाजण्याचे आवे सापडले. हे आवे पाच किंवा साडेपाच मीटर चौरस असून यांचे कोपरे मात्र गोलाकार केलेले आहेत. जमिनीमध्ये खड्डा करून त्या खड्ड्यावर मातीचा ओटा बांधून व हा ओटा मातीच्या भिंतीनी बंदिस्त करून या भट्ट्या तयार करण्यात आलेल्या होत्या. भट्टीची आतील बाजू आणि आतला ओटा मातीने सारवला असून एका भट्टीत भिंत घालून तिचे दोन भाग केलेले आहेत. जळण आत सारण्यासाठी भट्टीच्या उत्तरेकडच्या भिंतीत जागा ठेवलेली आहे. या भट्टीमध्ये वाळू, जळलेली लाकडे त्याचप्रमाणे अनेक मडकी सापडली. भट्टीच्या जवळच एक मोठा रांजण ठेवलेला आढळला. या रांजणावर बैल, मानव आणि काही सरपटणाऱ्या प्राण्यांच्या आकृत्या चिकटविल्या आहेत. (Sali 1986; Dhavalikar 1988) इनामगाव येथेही कुंभाराचे आवे सापडले आहेत.

इनामगाव उत्खननामध्ये पूर्व - जोर्वे आणि उत्तर - जोर्वे अशा अवस्था स्पष्ट करणारा पुरावा मिळालेला आहे. महाराष्ट्रात इतरत्र (नेवासे, चांडोली, सोनगाव, प्रकाश, बहाळ, इत्यादी) अशी विभागणी केलेली आढळून येत नाही. या दोन अवस्थांतील महत्त्वाचे फरक घरांचे आकार व ठेवण, मडक्यांच्या आकारांची व त्यावरील चित्रकारीची सुबकता, पाटबंधाऱ्यावर आधारलेली शेती व अन्न पद्धतीतील बदल, या क्षेत्रात आढळून आले. थोडक्यात म्हणजे पूर्व - जोर्वे या कालात इनामगाव हे एक भरभराटीला आलेले मोठे खेडे होते; तर उत्तर - जोर्वे कालखंडामध्ये या खेड्याची अवनत अवस्था दिसून येते.

दायमाबाद आणि इनामगाव या ठिकाणी माळवा त्याचप्रमाणे पूर्व - जोर्वे आणि उत्तर - जोर्वे या कालातील घर बांधणीमध्ये बरेचसे सातत्य दिसून येते. फक्त उत्तर - जोर्वे कालखंडामध्ये गोल झोपड्यांची बांधणी मोठ्या प्रमाणावर आढळून आली.

इनामगाव पूर्व - जोर्वे कालखंड अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण सामाजिक आणि आर्थिक जीवनपद्धती दर्शवितो. या कालात वस्तीच्या मध्य भागात काटकोन - चौकोनी आकाराची मोठ - मोठी घरे केंद्रित झाली होती. या वस्तीच्या पश्चिमेकडील भागात सोनार, तांबट अशासारख्या कारागिरांची छोट्या आकाराची घरे होती. मध्य भागातील घरे दोन किंवा तीन खोल्यांची व पुढे ओसरी असलेली असून या घरांमध्ये धान्य साठविण्यासाठी कणग्या आणि बळदे यांचा वापर होत होता. घरामध्ये अग्निकुंडे होती. मातीच्या चुलींमध्ये खापर - तव्यांचा वापर केला जाई. या घरांमध्ये विविध प्रकारची धान्ये – गहू ( सोनगाव येथेही ), सातू, तांदूळ, रागी, कोद्रा, वाटाणे, हुलगे, मसूर इत्यादी धान्ये त्याचप्रमाणे ज्वारी सापडली. धुळे जिल्ह्यातील कवठे येथे याच कालखंडाच्या थरामध्ये बाजरी सापडली. बाजरी आणि ज्वारी आफ्रिकेतून भारतात आली असावी, असे मत मांडले जाते. त्यादृष्टीने हा पुरावा महत्त्वाचा ठरतो. (Kajale 1974; Dhavalikar 1988 )

या भरभराटीचे रहस्य याच कालात इनामगाव येथे घोड नदीचे पाणी वळवून व साठवून पाटामार्फत शेतीला पुरविणे या यंत्रणेत सापडते. उत्खननामध्ये मुख्य वस्तीच्या पश्चिमेला बंधारा, पाट आणि नाली यांचे अवशेष मिळाले. बंधारा जवळपास अडीच मीटर रूंद व दोनशे चाळीस मीटर लांबीचा असून तो दगडगोटे व मातीच्या भरावाने केलेला होता. नाली साडेतीन मीटर खोल, चार मीटर रूंद आणि ११८ मीटर लांबीची असून या नालीतून पाटामध्ये पाणी सोडण्याची व्यवस्था केली होती. पाट ६ मीटर रूंद आणि १२० मीटर लांबीचा होता. जमिनीचा उतार लक्षात घेऊन त्यानुसार पाणी वाहात जाईल अशी योजना केल्याचे दिसून आले. अशातऱ्हेची कौशल्यपूर्ण योजना महाराष्ट्रात या कालात इतरत्र अद्याप आढळून आलेली नाही. नाली मध्यभागी खोल असल्याने तिच्यामध्ये पाणी साठून राही आणि त्याचा उपयोग बिनपावसाळी दिवसात पिकांना देण्यासाठी केला जात असावा. शेतीचे उत्पन्न वाढल्यामुळे विविध प्रकारची कारागिरी उदयास आल्याचे दिसून येते. तांब्याच्या चपट्या कुऱ्हाडी, मणी, सोनाराचे चिमटे आणि मासेमारीकरिता गळ; रंगीबेरंगी दगडाचे त्याचप्रमाणे तांब्याचे मणी दोऱ्यात ओवलेल्या माळा

(मुलांच्या दफनात इनामगाव, दायमाबाद, चांडोली आणि नेवासे या ठिकाणी) व दगडाचे पाटे - वरवंटे अशा विविध वस्तू या कालात वापरात होत्या. शेतीच्या वाढीमुळे गुरांची संख्या वाढली. या आर्थिक सुबत्तेमुळे इतर प्रदेशांशी संपर्क वाढला. याचे प्रत्यंतर मडक्यावर रंगविलेली नावेचीं चित्रे (फलक १७ : ब), खापरावरील उत्कीर्ण बैलगाडीचे चित्र (फलक १७ : अ) आणि नदीजवळ दगड - गोट्यांनी बांधलेला धक्का यामध्ये दिसून येते. (Dhavalikar 1988)

या सुबत्तेमुळे धान्य साठविण्याची निकड निर्माण झाली. त्यासाठी वस्तीच्या मध्यभागातील घरात निर्माण करण्यात आलेली बळदे आणि कणग्या यांचा उल्लेख याआधी आलेला आहेच. अशाच तऱ्हेच्या कणग्यांचे गोल ओटे, थारसा (जिल्हा नागपूर) व दायमाबाद इत्यादी ठिकाणी सापडलेले आहेत. लहान प्रमाणावरील साठवणीसाठी विविध तऱ्हेचे हातबनावटीचे रांजण, गडवे आणि कळशा बनविल्या जात. ही मडकी इनामगाव, दायमाबाद आणि अमरावती जिल्ह्यात तुळजापूर - गढी येथे सापडलेली आहेत. दायमाबाद येथील खापर - भट्टीचा उल्लेख आधी आलेलाच आहे. इनामगाव येथे माळवा कालातील त्याचप्रमाणे जोर्वे कालातील कुंभाराचे आवे सापडले आहे. यातील उत्तम स्थितीमध्ये असलेली भट्टी गोल आकाराची असून तिचा व्यास १.७५ मीटर आहे. ही भट्टी दगड - गोट्यांच्या पायावर बांधलेली असून तिच्यामध्ये जळण सारण्यासाठी व्यवस्था होती. भट्टीमध्ये लंबगोल आकाराचे मातीचे टेकू असून त्यांना मधोमध भोक आहे. यातून गरम हवा वरपर्यंत जाई (फलक १५ : अ).

जोर्वे संस्कृतीच्या धर्मविषयक कल्पना स्पष्ट करणारा विविध तऱ्हेचा पुरावा नेवासे, चांडोली, दायमाबाद, इनामगाव इत्यादी ठिकाणी उपलब्ध झालेला आहे. यावरून असे स्पष्ट होते की ताम्रपाषाणयुगीन लोक विविध तऱ्हेच्या मातृका मूर्तींची व पुरुष मूर्तींची पूजा करीत असत. याशिवाय अग्निपूजाही मोठ्या प्रमाणावर अस्तित्वात होती. घरातच मृताचे दफन करण्याची पद्धत असल्याने पूर्वज / मृत यांनाही आदर आणि प्रेम दाखविले जात होते. याशिवाय बहुधा मातृकांची, पशूंची आणि जलचरांची आदरयुक्त

संभावना केली जात असावी. काही वस्तूंचे आकार वैशिष्ट्यपूर्ण आढळून येतात. चांडोली येथे बैलाच्या आकाराची चाकावर बसविलेली बाटली (फलक ९ : ६), त्याचप्रमाणे तेथेच सापडलेली वैशिष्ट्यपूर्ण तांब्याची कट्यार (फलक ९ : १) आणि दायमाबाद, इनामगाव, नेवासे इत्यादी ठिकाणी साठवणीच्या रांजणावर चिकटविलेल्या पुरुष आणि स्त्रियांच्या आकृती व कासव, सुसर, नाग इत्यादींच्या आकृती तत्कालीन समाजातील विविध श्रद्धा, समजुती आणि क्रियाकांड यांची कल्पना देतात. यातील नेवासे (फलक २० : क) आणि इनामगाव येथील मातृका मूर्तींचा उल्लेख करणे अगत्याचे ठरेल. या मूर्ती चेहऱ्याची वैशिष्ट्ये नसलेल्या, काही शिरविरहीत, काही मानेवर आणि स्तनप्रदेशावर टोच्याची नक्षी असलेल्या तर काही मोठे स्तन असलेल्या आहेत. यातील बहुतांशी भाजलेल्या नसून त्या कच्च्या मातीच्या आहेत. इनामगावच्या दोन मूर्तींचा उल्लेख करणे अपरिहार्य ठरते. यातील एक मूर्ती मध्यवर्ती वस्तीतील एका मोठ्या घरात लाकडी वाशाच्या नजीक सापडली. ही एका लंबगोल व न भाजलेल्या मातीच्या डबीत ठेवून तिच्यावर मातीचेच बनविलेले झाकण घातलेले होते (फलक २० : ब). दुसरी एक न भाजलेली मूर्ती पोटापासून उभे आरपार भोक पाडलेली होती. तिच्या जवळच, न भाजलेला मातीचा बैल सापडला. त्याच्या पाठीवर भोक असून काडीच्या साहाय्याने ही मातृदेवता बैलावर आरूढ केली जात असे (फलक २० : ड). वाहनावर आरूढ झालेली ही देवता महाराष्ट्रात सर्वात प्राचीन ठरलेली आहे. या देवतांचा जननाशी संबंध लावला जातो. (Dhavalikar 1988)

या कालात महाराष्ट्रातील जवळपास सर्व ताम्रपाषाणयुगीन वसाहतींच्या उत्खननांमध्ये गारगोटीच्या छिलक्यापासून बनविलेली विविध तऱ्हेची समांतर बाजूची धारदार पाती, बाणाग्रे, गिरमीट, चाकूच्या पात्यासारखी पाती, इत्यादी हत्यारे सापडली आहेत. (फलक १६ : अ). ही फार मोठ्या संख्येने सापडतात, कारण यांच्या उत्पादनात योग्य असा चांगल्या पोताचे दगड : कार्नेलीयन, जॅस्पर, अँगेट, चाल्सीडोनी : महाराष्ट्राच्या कातळात उपलब्ध आहेत. याशिवाय 'डोलेराईट' या उत्कृष्ट पोताच्या काळ्याशार

दगडापासून घासून धारदार केलेल्या त्रिकोणी कुऱ्हाडी, राप्या, छिन्न्या इत्यादी वस्तूही वापरात होत्या. तांब्याच्या चपट्या कुऱ्हाडी, छिन्न्या इत्यादी वस्तूही बनविल्या जात. तांबे महाराष्ट्रात काहीसे दुर्मिळ आहे. तीच गोष्ट सोन्याची. हे धातू कदाचित राजस्थान व कर्नाटक या प्रदेशातून येत असावेत.

जोर्वे संस्कृतीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या संस्कृतीच्या लोकांनी अवलंबिलेली मृतांची दफन पध्दती. सर्वसाधारणपणे मुलांचे दफन आणि प्रौढांचे दफन असे दोन मुख्य प्रकार दिसून येतात. यातील मुलांची दफने महाराष्ट्रात नेवासे, चांडोली, सोनगाव, दायमाबाद, इनामगाव अशा जवळपास सर्व ठिकाणी सापडली आहेत. यातील बहुतांशी मुले दोन ते अडीच वर्षांची असून अशा मुलांना घरामध्येच दोन राखी रंगाच्या मडक्यात उत्तरेकडे डोके आणि दक्षिणेकडे पाय अशा अवस्थेमध्ये, पुरले जात असे (फलक १९ : क). अशी लहान मुलांची दफने आतापर्यंत शेकडो सापडली आहेत. दायमाबादला एक ते चार वर्षांपर्यंतच्या मुलांची चौदा दफने, दोन ते सहा वर्षे वयापर्यंतच्या मुलांची आठ दफने आणि सात ते अकरा या वयोगटातील तीन दफने सापडली. चांडोलीला तेवीस मुलांची दफने उघडकीला आली, तर नेवासे आणि इनामगाव या ठिकाणी शंभराहून जास्त दफने मिळाली. या दफनातील मुलांबरोबर लहान - लहान मडकी, तसेच खेळणी, तांब्याचे वाळे आणि मण्यांच्या माळा सापडल्या. नेवासे, चांडोली (फलक २२ : अ), दायमाबाद आणि इनामगाव येथील मण्यांच्या माळा, वाख, कापूस किंवा रेशीम यांच्यापासून बनविलेल्या दोऱ्यात ओवलेल्या होत्या. दायमाबादच्या एका लहान मुलाच्या दफनात जंगली फुलांचा गुच्छ ठेवल्याचे आढळले. साडेसहा ते सात वर्षांच्या मुलांना काही वेळा दोनपेक्षा जास्त मडक्यात किंवा जमिनीमध्ये खड्डा करून सरळ पुरण्यात येई. मुलांच्या दफनाची एकंदर संख्या लक्षात घेता बालमृत्यूचे प्रमाण खूपच होते असे दिसते. (Sankalia *et al.* 1960; Deo *et al.* 1965; Sali 1986; Dhavalikar *et al.* 1988)

याउलट प्रौढांना घराच्या जमिनीत खड्डा करून (फलक १९ : अ, ब) पुरले जाई, किंवा काही वेळेला दोन किंवा अधिक रांजणामध्ये ठेवून दफन केले जाई. मृतांना बहुतांशी उत्तर - दक्षिण ठेवले जाई आणि त्यांच्याबरोबर

जोर्वे वर्गाची तोटीची मडकी, वाडगे, तांब्याच्या वस्तू पुरल्या जात असत. मुलांची आणि प्रौढांची काही दफने काही वेळा सांकेतिक स्वरूपाची असत. यामध्ये दफनास वापरलेली बहुधा राखी वर्गाची मडकीच फक्त आढळून येतात. इनामगाव येथील उत्खननामध्ये एक अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण दफनपद्धती आढळून आली. यामध्ये कच्च्या मातीचे, चार पायाचे आणि वरचा भाग गोल आणि उघडा असलेले रांजण प्रौढाच्या दफनासाठी वापरल्याचे आढळून आले. ऐंशी सेंटीमीटर उंच, पन्नास सेंटीमीटर रूंद आणि तीन सेंटीमीटर जाडीच्या एका रांजणामध्ये एका प्रौढ मृताला पाय मुडपून बसल्या अवस्थेत पुरल्याचे दिसून आले. हा प्रौढ पस्तीस ते चाळीस वर्षे वयाचा असून त्याचे दफन वसाहतीच्या मध्यवर्ती असलेल्या मोठ्या घरामध्ये केलेले होते. प्रौढांच्या दफनामध्ये घोट्याखालचे पाय सर्वसाधारपणे छाटण्याची पद्धत होती. परंतु इनामगावच्या या प्रौढाचे पाय छाटलेले नव्हते. यामुळे हा प्रौढ आर्थिकदृष्ट्या सधन असावा किंवा गावामधला कोणीतरी अधिकारी (मुखिया / पाटील) असावा किंवा तो एखाद्या वेगळ्या टोळीचा किंवा जमातीचा असावा, असे मत मांडले गेले आहे. प्रौढाची आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण पद्धती दायमाबादच्या पहिल्या उत्खननामध्ये आढळून आली. यामध्ये मृताला खड्ड्यामध्ये ठेवून, खड्ड्याच्या कडेने लाकडी वासे रोवून त्यावर छत घालून मृताला दर्शनार्थ ठेवण्यात आले असावे असे दिसते. याचा उल्लेख याआधी आला आहेच. बहुतांशी दफने घरातच केली जात असली तरी बहाळच्या जोर्वे संस्कृतीच्या लोकांची दफनभूमी वस्तीपासून दूर होती असे दिसते. (Dhavalikar 1988)

दफनातील मुलांच्या सांगाड्यावरून वंशविषयक निष्कर्ष काढणे शक्य होत नाही, परंतु इनामगाव आणि कवठे येथील सांगाडे वंशविषयक सर्वसाधारण निष्कर्ष काढण्यास सहाय्यभूत ठरलेले आहेत. इनामगाव येथे 'मेडिटरेनियन' वंशाचे लोक जास्त दिसून येतात, नेवासा येथे प्रोटोऑस्ट्रेलॉईड, तर कवठे येथे मेडिटरेनियन आणि प्रोटोऑस्ट्रेलॉईड यांचे मिश्रण झाल्याचे दिसून येते. (Sankalia 1960; Dhavalikar 1988)

उत्तर - जोर्वे कालखंडामध्ये इनामगाव येथे अवनती झाल्याचे दिसून येते. हा काळ सर्वसाधारणपणे इसवी सनपूर्व सुमारे १००० ते ८०० - ७०० असा निश्चित केलेला आहे. या काळात पूर्व - जोर्वे कालखंडातील पाटबंधारे योजना कुचकामी झाली असे दिसते. काटकोन - चौकोनी घरापेक्षा गोल झोपड्या बांधण्याकडे कल जास्त झाल्याचे दिसून येते. मडक्यांचे आकार सर्वसाधारणपणे लहान झाले आणि त्यांच्यावरील रंगकामाचा सुबकपणा कमी झाला. वसाहतीच्या रचनेमध्ये फेरफार झाले तसेच आणि तांबे आणि इतर सोन्यासारख्या वस्तूंचा वापर कमी झाल्याचे दिसते. शेतीमध्ये धान्योत्पादनात घट झालेली असावी. या काळात गव्हाची लागवड बंद झाली आणि सातू व रागी यासारखी कोरडवाहू पिके जास्त प्रमाणात उपयोगात आली. गुराढोरांचे प्रमाण कमी होऊन शेळ्या आणि मेंढयांचे प्रमाण वाढल्याचे उत्खननात मिळालेल्या हाडांच्या पुराव्यानुसार स्पष्ट झाले. यावरून शेतीतून पिकविलेल्या धान्यापेक्षा मांसाहाराचे प्रमाण वाढल्याचे सूचित होते.

**जोर्वे संस्कृतीचा अंत**

इसवीपूर्व सुमारे १००० आणि त्यानंतरच्या काळामध्ये हवामानामध्ये शुष्कपणा वाढला असे पुरा - पर्यावरण तज्ज्ञांचे मत आहे. त्यामुळे शेतीवर आणि मानवी जीवनाच्या विविध अंगावर प्रतिकूल परिणाम झाला. यामुळे जोर्वे संस्कृतीच्या लोकजीवनावर अनिष्ट प्रभाव पडून मानवी जीवनाचा दर्जा खालावत गेला. इसवीपूर्व ७०० च्या नंतर ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीच्या खुणा उरल्या नाहीत. (Dhavalikar *et al.* 1988)

खुद्द इनामगाव येथे, त्याचप्रमाणे टेकवडा आणि तुळजापूर - गढी या ठिकाणी एका नवीन तऱ्हेच्या खापरांचा आढळ जोर्वे संस्कृतीच्या शेवटी - शेवटी दिसून येतो. ही खापरे काळी - आणि - तांबडी असून त्यावर काही रेषांची उत्कीर्ण चिन्हे आहेत. ही खापरे विदर्भामध्ये इसवीपूर्व आठव्या - सातव्या शतकामध्ये किंवा त्याआधी उदयास आलेल्या महापाषाणयुगीन संस्कृतीच्या खापरांची आठवण करून देतात. या लोकांची दफने वैशिष्ट्यपूर्ण असून अशा दफनांची आठवण करून देणारी दफने इनामगाव जवळील पिंपळसुटी येथे अस्तित्वात आहेत. धुळे जिल्ह्यातील रंजाळे येथे या

महापाषाण संस्कृतीची दफने सापडली नाहीत, तरी या दफनामध्य ठेवली जाणारी वैशिष्ट्यपूर्ण आकाराची काळी - आणि - तांबडी खापरे सापडली आहेत. खुद्द इनामगाव येथे जोर्वे संस्कृतीच्या उत्तरार्धातील शेवटच्या काळात काळी - आणि - तांबडी खापरे उपलब्ध झाली आहेत. हे महापाषाणीय संस्कृतीचे लोक लोखंडाचा वापर फार मोठ्या प्रमाणावर करीत असत, त्यामुळे या नवीन संस्कृतीच्या लोकांनी ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीच्या पतनाला हातभार लावला असावा असे अनुमान करणे अप्रस्तुत ठरणार नाही.

**ताम्रपाषाणयुगीन महाराष्ट्र : समालोचन**

आतापर्यंत केलेल्या विस्तृत विवेचनावरून ताम्रपाषाणयुगीन महाराष्ट्राची काही ठळक वैशिष्ट्ये दिसून येतात. त्यांचा थोडक्यात आढावा घेणे सयुक्तिक ठरेल.

१) १९५० - ५१ च्या सुमारास महाराष्ट्रात उघडकीला आलेल्या ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीचा (निदान जोर्वे संस्कृतीचा) तौलनिक काळ इसवीपूर्व सुमारे १५०० ते १००० असा सुचविला गेला. गेल्या काही दशकामध्ये जी विस्तृत उत्खनने आणि समन्वेषणे झाली त्यानुसार ताम्रपाषाणयुगीन संस्कृती कमीत - कमी इसवीपूर्व सुमारे २००० इतकी मागे नेता आली आहे.

२) सुरुवातीला या संस्कृतीचा शोध गोदावरी - प्रवरा खोऱ्यात आढळून आला तरी आता ही संस्कृती महाराष्ट्राच्या जवळपास सर्व मोठ्या नद्यांच्या खोऱ्यामध्ये पसरली होती असे स्पष्ट झाले आहे.

३) या संस्कृतीच्या जडणघडणीमध्ये महाराष्ट्राबाहेरील प्रदेशातील ताम्रपाषाणयुगीन संस्कृतींचा मोठा "तभार लागला आहे. गुजरात - सौराष्ट्र, मध्य प्रदेश आणि आंध्र - कर्नाटक या विभागांशी महाराष्ट्राचा संपर्क आला, किंबहुना गुजरातेतील सिंधु संस्कृती आणि आंध्र - कर्नाटकातील नवाश्मयुगीन संस्कृती यांनी महाराष्ट्रात मोठे योगदान केले.

४) ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीच्या वसाहती तापी खोऱ्यात सर्वात जास्त आढळून आल्या तरी त्यांची संख्या आणि वसाहतींची व्याप्ती महाराष्ट्रात दक्षिणेकडे जावे तसतसे कमी होत गेल्याचे दिसते. हवामान आणि शेतीयोग्य जमिनीची उपलब्धी त्याचप्रमाणे नद्यांची वैशिष्ट्ये यानुसार हे झाले असे म्हणल्यास वावगे ठरू नये.

५) सर्वसाधारणपणे मध्यम आकाराची केंद्रे आणि या केंद्रांना पूरक अशी छोटी खेडी अशी पखरण आढळून येते. प्रकाश, दायमाबाद, नेवासे आणि इनामगाव येथे आर्थिक आणि प्रगत शेतीचे केंद्रे असावीत. याउलट सोनगाव, चांडोली, वाळकी आणि कवठे ही केंद्रे दुय्यम दर्जाची असावीत. महाराष्ट्रातील सर्वात विस्तृत ताम्रपाषाणयुगीन केंद्र दायमाबाद होते.

६) माळवा संस्कृतीची मडकी आकाराने त्याचप्रमाणे त्यावरील चित्रकामाने अद्वितीय ठरलेली आहेत. तर टणकपणा आणि विशिष्ट आकार हे हडाप्पा संस्कृतीच्या खापरांचे वैशिष्ट्य ठरते. पूर्व - जोर्वे संस्कृतीची खापरे चाकावर घडविलेली आणि अतिशय उत्तम भाजणीची आहेत.

७) ज्या संस्कृतीमध्ये शेतीची सुरुवात झाली अशा नवाश्मयुगीन संस्कृतीच्या विशुद्ध स्वरूपातील स्थलांचा महाराष्ट्रात अभाव आहे. परंतु या संस्कृतीची काही वैशिष्ट्ये महाराष्ट्रातील ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीच्या लोकांनी आत्मसात केली होती.

८) शेतीवर आधारित स्थिर जीवन या ताम्रपाषाणयुगीन लोकांनी महाराष्ट्राला दिले. दायमाबाद आणि इनामगाव येथे उन्हाळी आणि हिवाळी पिकांचा पुरावा उपलब्ध झालेला आहे. बैलगाड्या आणि नावा यांच्या साहाय्याने वाहतूक केली जाई.

९) अग्निपूजा, मातृकापूजा, पशुपूजा प्रचलित होत्या. जलचर प्राण्यांना श्रद्धापूर्वक आदर दाखविला जाई. त्याचप्रमाणे प्रौढांना आणि मुलांना घरातच पुरून मरणोत्तरही त्यांचे साहचर्य मिळावे असे ममत्व दाखविले जाई.

१०) गारगोटीच्या छिलक्यांची प्रक्रिया केलेली पाती हाडामध्ये / लाकडामध्ये खाच करून बसवून कापण्यासाठी / तोडण्यासाठी वापरली जात. तांब्याचा वापर मर्यादित होता.

११) महाराष्ट्रातल्या ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीमध्ये सापडलेल्या काही वस्तू - बैल - बाटली, तांब्याची कट्यार, चषकाकृती मडकी – पश्चिम आशियाशी सांस्कृतिक संपर्क सुचवितात असे मत मांडले गेले आहे. परंतु हे मत सर्वमान्य झालेले नाही.

१२) ताम्रपाषाणयुगातील हे लोक कोण होते याबद्दल वंशविषयक दृष्टिकोणातून काही निर्णायक मते मांडणे बरोबर ठरणार नाही, कारण मानववंशशास्त्रज्ञ जुने वंशविषयक सिद्धांत आता लागू पडत नाहीत अशा मतावर येऊन ठेपले आहेत. परंतु सर्वसाधारणपणे हे ताम्रपाषाणयुगीन लोक साडेपाच फूट उंचीचे, जवळपास सरळ नाकाचे आणि मजबूत वांध्याचे होते असे दिसते. इनामगावच्या पुराव्यानुसार असे सूचित केले आहे की तरुण स्त्रीया आणि लहान बालके यांचे मृत्युचे प्रमाण मोठे होते.

१३) या संस्कृती नष्ट कशा झाल्या याचे निश्चित कारण / कारणे देणे अवघड आहे. परंतु शुष्क हवामान व पर्जन्यमानातील घट यामुळे ही संस्कृती हळूहळू अवनत होत गेली आणि कालाच्या ओघात नष्ट होऊन विस्मृत झाली !

* * *

## प्रकरण ४

# महापाषाण संस्कृति : लोहयुगाचा उदय

इसवी सनपूर्व ८ - ७ व्या शतकाच्या सुमारास महाराष्ट्रामध्ये एका नवीन संस्कृतीचा उदय झाल्याचे दिसून येते. ही संस्कृती ताम्रपाषाणयुगापेक्षा भिन्न आणि पूर्णतः लोहयुगीन होती. अर्थात याचा अर्थ तांब्याचा वापर नाहीसा झाला असे मात्र नव्हे. किंबहुना लोखंडाबरोबरच तांब्याचा वापर या लोकांनी इतका केला की तो महाराष्ट्रातील या आधीच्या ताम्रपाषाणयुगीन संस्कृती - पेक्षाही जास्त असल्याचे जाणवते. असे असूनही हे लोक नागरीकरण झालेले नव्हते. यांची ठळक वैशिष्ट्ये म्हणजे आगळी - वेगळी दफने, लोखंडी आणि तांब्याची विविध हत्यारे, वैशिष्ट्यपूर्ण आकाराची काळी - आणि - तांबडी खापरे, दफनांच्या मानाने वस्त्यांच्या स्थलांची कमतरता आणि (विदर्भात) घोड्याचा वापर. ही वैशिष्ट्ये महाराष्ट्रात तरी जाणवतात.

या संस्कृतीला महाश्मीय अथवा महापाषाणीय संस्कृती असे नाव आता रूढ झालेले आहे. हे नाव इंग्रजीतील मेगॅलिथिक (Megalithic) या शब्दाचे रूपांतर आहे. महापाषाणीय या शब्दावरून याचा पाषाणयुगाशी संबंध होता किंवा काय अशी शंका येणे स्वाभाविक आहे. परंतु मृताच्या दफनाच्या योजनेमध्ये यांनी वापर केलेल्या मोठमोठ्या शिळांमुळे हे नाव या संस्कृतीला देण्यात आलेले आहे. हे लोक संपूर्णपणे धातुयुगातले आणि त्यातही लोहयुगातले असल्याने आणि कालदृष्ट्या स्थूलमानाने इसवीपूर्व १००० इतके प्राचीन असल्याने त्यांचा रूढ अर्थाने पाषाणयुगाशी संबंध जोडता येत नाही. पण ऐतिहासिक कालाचा उषःकाल (Protohistoric) असे या कालखंडाला म्हणणे उचित ठरेल.

या संस्कृतीची दफने महाराष्ट्राव्यतिरिक्त भारत आणि पाकिस्तान अशा खंडप्राय मोठ्या प्रदेशात फार मोठ्या संख्येने आढळून आलेली आहेत. असे

असले तरी, या दफनांची संख्या विदर्भात व दक्षिण भारतात जितकी आहे तितकी इतरत्र कोठेही नाही. विदर्भामध्येही, पूर्व विदर्भात आणि विशेषतः भंडारा, नागपूर, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यात, यांची संख्या सर्वात जास्त आहे. पश्चिम विदर्भामध्ये त्याचप्रमाणे उर्वरित महाराष्ट्रामध्ये यांची संख्या अत्यल्प आहे. असे असले तरी यांचा संपर्क पूर्व विदर्भाव्यतिरिक्त इतर प्रदेशाशी आला असावा असे कौंडिण्यपूर, तुळजापूर - गढी (जिल्हा अमरावती), अर्णी (जिल्हा यवतमाळ), थारसा (जिल्हा नागपूर), रंजाळे (जिल्हा धुळे), पिंपळसुटी आणि भोसरी (जिल्हा पुणे), देगलूर (जिल्हा नांदेड) इत्यादी ठिकाणी मिळालेल्या पुराव्यावरून दिसून येते. (Narain 1969; *IAR* 1964 - 65 ff. ; Dikshit 1968; देव १९६८)

या संस्कृतीचे आणखी एक वैशिष्ट्य लक्षात घेतले पाहिजे. ते असे की आंध्र - कर्नाटकामध्ये ही संस्कृती नवाश्मयुगानंतर आली तर महाराष्ट्रामध्ये ही ताम्रपाषाणयुगानंतर आली असे दिसते. दक्षिणेमध्ये ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीची स्थले संख्येने महाराष्ट्रापेक्षा कमी आहेत. परंतु जसेजसे संशोधन अधिक होत जाईल तसतसे हे चित्र बदलेल असा संभव आहे.

या संस्कृतीविषयी संशोधन गेल्या दीडशे वर्षामध्ये विखुरलेल्या स्वरूपात झालेले असले तरी गेल्या काही वर्षात निवडक उत्खननामुळे आणि सखोल समन्वेषणामुळे बरीच माहिती उपलब्ध झालेली आहे. १८२३ साली बॅबिंग्टन याने 'डिस्क्रिप्शन ऑफ द पांडू कूलीज ऑफ मलबार' या आपल्या प्रकाशनाद्वारे या संस्कृतीच्या दफनांकडे लक्ष वेधले. त्याला आता दीडशेहून जास्त वर्षे होऊन गेली. खुद्द विदर्भामध्ये १८६७ साली नागपूर जवळील जुनापानी येथे या संस्कृतीच्या 'शिळावर्तुळ' या दफनपद्धतीच्या स्थलाचे उत्खनन केले गेले. त्यानंतर अनेक ठिकाणी अशा स्थलांची उत्खनने झाली तरी या संस्कृतीबद्दल बरेच प्रश्न अनुत्तरित राहिले आहेत. (Leshink 1974)

या संस्कृतीच्या संशोधनाने काही महत्त्वाच्या प्रश्नांची उकल केली आहे हेही तितकेच खरे. ब्रह्मगिरी (कर्नाटक) येथे सर मार्टिमर व्हीलर यांनी

१९४७ साली उत्खननात मिळालेल्या पुराव्यानुसार लोखंडाच्या वापराची प्राचीनता इसवी सनपूर्व २०० च्या पूर्वी मागे नेता येत नाही असे मत मांडले. परंतु हे मत आता नवीन मिळालेल्या पुराव्यानुसार बदलले गेले आहे. भारतात लोखंडाच्या वस्तूंच्या वापराची सुरुवात इसवी सनपूर्व १००० किंवा त्याहूनही एक - दोन शतके मागे, इतक्या प्राचीन कालात झाली असे आता निर्विवादपणे सिद्ध झाले आहे. दक्षिण भारतातही लोखंडाचा वापर इतका प्राचीन ठरलेला आहे. निदान तो इसवी सनपूर्व १००० इतका प्राचीन आहे, याबद्दल दुमत नाही. आणि हे कालमापन कार्बन - १४ कालमापनपद्धतीनुसार निश्चित करण्यात आल्याने त्याला पुरातत्वीय त्याचप्रमाणे शास्त्रीय आधार आहे. महाराष्ट्रापुरता विचार करावयाचा झाल्यास महापाषाण म्हणजेच लोहयुगाच्या प्राचीनतेचे कालमापन कार्बन - १४ पद्धतीनुसार करण्यात आलेले आहे आणि त्यानुसार इसवीपूर्व ८ - ७ वे शतक हा कालखंड निश्चित झालेला आहे.

महापाषाण संस्कृतीची दफने प्रामुख्याने आणि फार मोठ्या संख्येने पूर्व विदर्भामध्ये सापडतात असा उल्लेख या आधी करण्यात आलेलाच आहे. आतापर्यंत या संस्कृतीची जी स्थले नोंदण्यात आलेली आहेत त्यातील जवळपास नव्वद टक्के स्थले पूर्व विदर्भात आहेत आणि उरलेली पश्चिम विदर्भ आणि उर्वरित महाराष्ट्रामध्ये (कोकण सोडून) आहेत.

या संस्कृतीचे आणखी एक वैशिष्ट्य असे की यांची दफनस्थले ज्या संख्येने उपलब्ध आहेत त्यामानाने त्यांची वसती स्थले अत्यल्प आहेत. कदाचित या लोकांचे जीवन फार स्थिर स्वरूपाचे नसावे असा कयास यावरून करता येतो. परंतु अलीकडे विदर्भामध्ये यांच्या दफनभूमी बरोबरच वस्त्यांच्या स्थलांचा शोध लागला आहे. तरी देखील काही ठिकाणी दफनांची संख्या आश्चर्यजनक आहे. उदाहरणार्थ वर्धा जिल्ह्यातील खैरवाडा येथे जवळजवळ पंधराशे 'शिळावर्तुळ' प्रकारची दफने आहेत. (फलक २४ : अ). या प्रकारात मोठमोठ्या शिळा वर्तुळाच्या आकारात रचून व मृताला किंवा मृताच्या अवशेषांना विविध वस्तूंसह ठेवून त्यावर माती टाकली जाई. या मातीवर दगडगोटे टाकून वर्तुळामध्ये दगडगोट्यांचा ढिगारा निर्माण केला जात होता. त्यामुळे अशी दफने चटकन नजरेस पडतात.

महापाषाण संस्कृतीच्या लोकांच्या दफन प्रकारात आंध्र-कनार्टक, तामिळनाडू आणि केरळ या प्रदेशात विविधता दिसून येते. पुरातत्व-संशोधकांनी त्यांचे विविध वर्ग आणि उपवर्ग केलेले आहेत. शिळावर्तुळ, वर्तुळात दगडी फरश्यांच्या पेटीमध्ये केलेले दफन, कुंभामध्ये केलेले दफन, ओबडधोबड मोठी शिळा (स्मरणार्थ) उभारून केलेले दफन, इत्यादी अनेक प्रकार या संस्कृतीशी निगडित आहेत. दक्षिण भारतात यातील काही दफन पद्धती इसवीच्या पहिल्या-दुसऱ्या शतकापर्यंत प्रचलित होत्या, असे स्पष्ट झाले आहे. महाराष्ट्रात मात्र या संस्कृतीची दफने बहुतांशी एकाच पद्धतीची (शिळावर्तुळ) आणि इसवी पूर्व ८-७ वे शतक ते इसवी पूर्व ४-३ रे शतक या कालखंडाशी निगडीत असल्याचे दिसून आले आहे.

आधी उल्लेखिल्याप्रमाणे या संस्कृतीबद्दलचे अनेक प्रश्न अनुत्तरित आहेत. हे लोक कोठून आले, यांची शारीरिक वैशिष्ट्ये काय होती, यांची आर्थिक आणि सामाजिक जडणघडण कशी होती, यांचा समकालीन संस्कृतींशी कशा प्रकारचा संबंध होता आणि ही संस्कृती विलयाला कशी गेली या प्रश्नांची निश्चित उत्तरे अजून तरी स्पष्ट झालेली नाहीत. परंतु महाराष्ट्र, मध्य प्रदेश, पूर्वोत्तर भारत आणि कर्नाटक या प्रदेशात काही आदिवासी आणि इतर जमातींमध्ये महापाषाणीय संस्कृतीची आठवण करून देणारी दफन पद्धती आणि दफन संस्कार आजही प्रचलित आहेत हे नमूद करणे आवश्यक आहे. मृतांना आदर दाखविणे, त्यांची स्मृती ठेवणे आणि त्यांना विशिष्ट क्रियाकांडाने किंवा स्मारके उभारून आदर दाखविणे ही वैशिष्ट्ये मानवी समाजात जगात निरनिराळ्या ठिकाणी आजही दिसून येतात.

भारतातील या दफनांशी निगडित असलेले लोक कोण असावेत याबद्दल विविध मते मांडली गेली आहेत. याबद्दल एक मोठी अडचण अशी की या दफनांमध्ये सापडलेले सांगाडे बऱ्याच अंशी अपूर्ण अवस्थेत किंवा छिन्नभिन्न झालेल्या अवस्थेमध्ये सापडतात. शिळावर्तुळासारख्या दफन प्रकारात सांगाड्यावर अथवा हाडांवर टाकण्यात आलेल्या माती आणि दगडगोट्यांच्या वजनामुळे कवटी आणि हाडे यांना नुकसान पोहचते. त्यामुळे

अशा दफनांतून मिळणारा पुरावा अभ्यासाच्या दृष्टीने बऱ्याच वेळा निरुपयोगी ठरलेला आहे. काही प्रकारात मात्र सांगाडे अथवा कवट्या बऱ्याचशा शाबूत सापडल्याने त्यावरून आधीच्या संशोधकांनी काही निष्कर्ष काढले आहेत, पण ते आता अचूक ठरलेले नाहीत. परंतु या क्षेत्रातले सुरूवातीचे संशोधन भारतातील युरोपीयन अधिकाऱ्यांनी केलेले असल्याने त्यांनी आपली मते मांडलेली आहेत. युरोपीयन विद्वानांच्या मते ही दफने केल्टो इईड्स किंवा केल्टो ट्रसिथियन यांची असावीत, तर काहीच्या मते ती सिथा - इराणी. काहींच्या मते या दफनात सापडलेल्या काही वस्तू मध्य आशियाशी संबंध दाखवितात, तर काहींच्या मते ही दफनपद्धती द्रविडांची असावी. ब्रह्मगिरी (कर्नाटक), येल्लेश्वरम् (आंध्र प्रदेश) आणि आदिचनल्लूर (तामिळनाडू) येथील सांगाडे वांशिक मिश्रण दाखवितात. नागपूरजवळील माहूरझरी येथील सांगाडेही वांशिक मिश्रण दाखवितात. काहींच्या मते या दफनांचे काही प्रकार दक्षिण भारतातील कुरुंबार जमातीच्या काही प्रथांशी साम्य दाखवितात, तर काही निलगिरी प्रदेशातील तोडा जमातीच्या परंपरांशी साम्य / जवळीक दाखवितात. काही विद्वानांच्या मते 'मेगॅलिथिक' (महापाषाण) परंपरेचे लोक पश्चिमेकडून भारतात आले, तर काहींच्या मते महापाषाणीय संस्कृती उत्तर भारतातून दक्षिण भारतात स्थलांतरीत झाली. या विविध मतांमुळे या प्रश्नाची उकल करणे अवघड झालेले आहे. शिवाय अलिकडे वंशविषयक कल्पनांचा / सिद्धान्तांचा मूलतः पुनर्विचार होऊ लागल्याने या बाबतीत ठाम निष्कर्ष मांडणे अप्रस्तुत ठरेल. एक वैशिष्ट्य मात्र नमूद करणे आवश्यक आहे जे भावी कालात अभ्यासाला उपयुक्त ठरेल. महापाषाणीय संस्कृतीच्या स्थलांची जी उत्खनने आतापर्यंत झाली आहेत त्यामध्ये प्रामुख्याने प्रौढांचे सांगाडे अथवा अवशेष सापडलेले आहेत. प्रौढेतरांची दफने (लहान मुले व वृद्ध) त्यामानाने नगण्य आहेत. त्यामुळे अधिक संशोधनानुसार निष्कर्ष काढणे शक्य होऊ शकेल. (Deo 1973 a : Leshink 1974)

विदर्भातील महापाषाणीय संस्कृतीचे चित्र दक्षिण भारतातील या संस्कृतीच्या पार्श्वभूमीवर महापाषाणीय मांडणे योग्य ठरेल कारण त्यामुळे

महाराष्ट्रातील या संस्कृतीचे असलेले भावबंध किंवा प्रादेशिक वैशिष्ट्ये स्पष्ट होण्यास मदत होईल. सर्वसाधारणपणे या लोकांच्या जीवनपद्धतीबद्दल जी माहिती दक्षिण भारतामध्ये उपलब्ध झालेली आहे त्यावरून असे दिसून येते की हे लोक शेतकरी आणि पशुपालक अशा मिश्र अवस्थेमध्ये होते. यांच्या वस्तीची ठिकाणे दफनांच्या स्थलांच्या संख्येने कमी असल्याने हे स्थिर जीवनाचे नसावेत असे मत मांडले गेल्याचा उल्लेख या आधी आलाच आहे. तरी देखील दुसरे मत असे आहे की दक्षिणेत हे जवळपास नागरीकरणाच्या अवस्थेपर्यंत पोहोचलेले होते. या संस्कृतीचा विस्तृत कालखंड (सुमारे १००० ते १२०० वर्षे), लक्षात घेता हे लोक एकाच अवस्थेत राहिले असावेत असे समजणे बरोबर ठरणार नाही. यांच्या घरादारांचे जे अवशेष सापडले आहेत ते बहुतांशी कुडाच्या घरांचे असून, यातील काही घरे काटकोन - चौकोनी तर काही लंबगोल आकाराच्या झोपड्यांची होती. कर्नाटकातील ब्रह्मगिरी येथे लाकडी वाशांचा वापर घर बांधणीत झाल्याचा पुरावा उपलब्ध झालेला आहे. घरातील जमीन माती, मुरूम आणि डबर यांचा वापर करून बनविण्यात येत असे आणि तिच्यावर चुन्याचे सारवण दिले जाई. आंध्र प्रदेशातील पैयमपल्ली येथे सापडलेल्या गोल घरांचे व्यास दीड ते तीन मीटर या मर्यादेच होते, तर काटकोन - चौकोनी घरांची मोजमापे १.७० × ४ मीटर अशी आढळून आली. दगडांचा किंवा विटांचा वापर घरबांधणीत केल्याचा पुरावा उपलब्ध नाही. या लोकांनी कुळिथ / हुलगे / रागी, वाटाणे, तृणधान्ये (Cereals) त्याचप्रमाणे तांदूळ, यांचा अन्न म्हणून वापर जसा केला त्याचप्रमाणे जनावरांच्या मासाचा आणि माशांचाही अन्न म्हणून उपयोग करून घेतला. ठिकठिकाणी सापडलेले लोखंडाचे विळे, मासे पकडण्याचे गळ, शेळ्या - मेंढ्या आणि गाय - बैल यांची हाडे त्याचप्रमाणे शेतीस उपयुक्त असणारी हत्यारे (नांगराचे फाळ, कुदळीसारखी हत्यारे) यावरून हे लोक शेती करणारे त्याचप्रमाणे पशुधनाचे पालन करणारे होते असे स्पष्ट होते. (Deo 1973a)

यांचे वैशिष्ट्य म्हणजे यांनी वापरात आणलेली खास बनावटीची काळी - आणि - तांबडी खापरे. ही मडकी संपूर्ण आतला भाग आणि बाहेरील

काठाचा भाग काळ्या रंगाचा असलेली आणि बाहेरचे बूड तांबड्या रंगात असलेली अशी होती. यांच्या बनावटीच्या तंत्राबद्दल निरनिराळी मते मांडली गेली आहेत. या आधीच्या ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीची लाल खापरे उघड्या भट्टीत भाजली जात, परंतु ही काळी - आणि - तांबडी खापरे आव्यामध्ये उलटी ठेवून भाजल्यामुळे त्यांचे बाहेरचे बूड तेवढे लाल आणि बाकीचा भाग काळा झाला असे मत मांडले गेले आहे. ही खापरे मध्यम जाडीची किंवा पातळ असून त्यावर एक प्रकारची चकचकीत झळाळी आहे. झाकण्या, वाडगी, थाळ्या, निमुळत्या बुडाची भांडी इत्यादी प्रकार वापरात होते. याशिवाय इतरही प्रकारची (लाल, काळी, अभ्रकयुक्त लाल) मडकी वापरात होती.

या लोकांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी बनविलेल्या लोखंडाच्या, तांब्याच्या, सोन्याच्या, कांस्याच्या आणि मिश्र धातूच्या विविध वस्तू. लोखंडाच्या वस्तू विविध आणि फार मोठ्या संख्येने दफनात सापडलेल्या आहेत. लोखंडी वस्तूंमध्ये तलवारी, कट्यारी, भाले, बाणाग्रे, शूल इत्यादी हत्यारे; विविध प्रकारच्या तासण्या, छिन्न्या आणि पटाशी अशी सुतारकामास योग्य हत्यारे; फाळ, खनित्र, विळे, अशी शेतीस उपयुक्त औजारे; कढया, दिवे, पळ्या, थाळ्या या सारख्या दररोजच्या वापरातील वस्तू आणि नखण्या, कडी यासारख्या विशिष्ट वापर असलेल्या वस्तू सापडलेल्या आहेत. तांब्यापासून थाळ्या, वाडगे, झाकण्या, बांगड्या आणि कडी बनविली जात. सोन्याचे मणी आणि विविध प्रकारचे दागिने वापरात होते. सोने आणि चांदी यांचे मिश्रण करूनही काही वस्तू बनवित असत. दफनात मृताबरोबर ठेवण्यात आलेल्या या वस्तूंमुळे तत्कालीन समाजामध्ये असलेली आर्थिक संपन्नता त्याचप्रमाणे विषमताही स्पष्ट होते.

दफन निर्मितीचे विविध प्रकार लक्षात घेता या संस्कृतीमध्ये निरनिराळ्या दफनपद्धती प्रचलित होत्या हे उघड आहे. यांचा संबंध विविध सामाजिक घटकांशी, टोळ्यांशी, गटांशी, अथवा संप्रदायांशी होता किंवा कसे हे स्पष्ट होत नाही. दफनामध्ये ठेवलेल्या वस्तूंवरून पुरलेल्या व्यक्तींचे सामाजिक व आर्थिक स्थान कोणते होते याबद्दल निष्कर्ष काढता येऊ शकतात. परंतु

बऱ्याचशा दफनामध्ये मृताचे संपूर्ण सांगाडे सापडत नाहीत; काही दफने तर सांकेतिक स्वरूपाची होती असे दिसते. मृतावशेष एका विशिष्ट पद्धतीने ठेवण्याची योजनाही फारशी दिसून येत नाही. तामिळनाडू आणि केरळमध्ये मृताचे अवशेष काहीवेळा अनेक पाय असलेल्या मातीच्या लंबगोल पेटीमध्ये ठेवून त्यावर झाकण ठेविले जाई. मात्र बहुतांशी सर्व प्रकारच्या दफनांमध्ये मृताबरोबर त्याने वापरलेल्या अथवा त्याला मरणोत्तर जीवनात उपयोगी पडतील अशा विविध प्रकारच्या वस्तू ठेवल्या जात. आंध्रमध्ये प्रामुख्याने सापडणाऱ्या अश्मपेटिकेमध्ये एका फरशीला गोल भोक करण्याची पद्धत आढळून येते. मृताच्या आत्म्याला मुक्तपणे बाहेर येता यावे अथवा पेटिकेमध्ये मृतासाठी अन्न ठेवता यावे अशा प्रकारची काही भावना यामागे असावी, असा केवळ तर्कच करता येतो. ( Deo 1973 a )

या संस्कृतीचा कालखंड हजार ते बाराशे वर्षांचा असला तरी अलीकडे विविध स्थलांच्या उत्खननामध्ये कार्बन - १४ पद्धतीने कालमापन केले गेल्याने कालनिश्चिती करण्यास मदत झाली आहे. ( Possehl 1988 )

| ५७३० हाफ लाईफ | कॅलिब्रेशन (सुधारित कालमापन) |
|---|---|

(१) अप्पुकुल (आंध्र प्रदेश)

बी. एस. ३८ ३५० ± १४४ इ. पू. ४२५ - १५५ इ. पू.

(२) पालावाय (आंध्र प्रदेश)

टी. एफ. ७०० नवाश्मयुग - महापाषाण संस्कृती / लोहयुग संक्रमण

१५४० ± ९८ इ. पू. १८८० - १५९५ इ. पू.

(३) पोलाकोंडा (आंध्र प्रदेश)

बी. एस. ९७ महापाषाण संस्कृती / लोहयुग

१५५ ± ९३ इ. पू. १८५ इ. पू. - ३५ इसवी

(४) सतनीकोटा (आंध्र प्रदेश)

बी. एस. २०४ महापाषाण संस्कृती / लोहयुग

७२८० ± १२४ इ. पू.

बी. एस. २०३ महापाषाण संस्कृती
५७९५ ± १४४ इ. पू.
बी. एस. २०१ महापाषाण संस्कृती
२८० ± १०३ इ. पू. २३५ - ५७५ इसवी

(५) तोगरपल्ली (आंध्र प्रदेश)

पी. आर. एल. १३४ महापाषाण संस्कृती
२९५ ± १०३ इ. पू. ४०० - १५० इ. पू.

(६) बीरापुरम (आंध्र प्रदेश)

पी. आर. एल. ७३० महापाषाण संस्कृती
१२९५ ± १४४ इ. पू. १६७० - १२५५ इ. पू.
पी. आर. एल. ७२८ महापाषाण संस्कृती
१००५ ± १४४ इ. पू. १३४० - ८३० इ. पू.
पी. आर. एल. ७२९ महापाषाण संस्कृती
९६५ ± १४४ इ. पू. १२५५ - ८१५ इ. पू.
पी. आर. एल. ७२७ महापाषाण संस्कृती
२०५ ± १४४ इ. पू. ३६० इ. पू. - ३५ इसवी
पी. आर. एल. ७२५ महापाषाण संस्कृती
११५ ± १४४ इ. पू. ४२० - ३० इसवी

(७) हलिंगली (कर्नाटक)

टी. एफ. ६८५ नवाश्मयुग - महापाषाण संस्कृती / लोहयुग
८० ± ९८ इ. पू. १६० इ. पू. - ७० इसवी

(८) हल्लूर (कर्नाटक)

टी. एफ. ५७० नवाश्मयुग - लोहयुग संक्रमण
१११० ± १०८ इ. पू. १३८५ - १०५० इ. पू.
टी. एफ. ५७५ नवाश्मयुग - लोहयुग संक्रमण
१०३० ± १०३ इ. पू. १३२० - १०१० इ. पू.
टी. एफ. ५७३ नवाश्मयुग - लोहयुग संक्रमण
९५५ ± १०३ इ. पू. ११२५ - ८२५ इ. पू.

(९) नैकुंड ( महाराष्ट्र )

| | | | |
|---|---|---|---|
| बी. एस. ९२ | शिळावर्तुळ ... | ... | ५०५ ± १०० इ. पू. |
| बी. एस. ९३ | शिळावर्तुळ ... | ... | ५४५ ± १०५ इ. पू. |
| बी. एस. २३४ | वस्तीचे टेकाड क्र. - १ | ... | ५२० ± १०० इ. पू. |
| बी. एस. २६४ | वस्तीचे टेकाड क्र. - १ | ... | ५३० ± १२० इ. पू. |
| बी. एस. २३५ | वस्तीचे टेकाड क्र. - १ | ... | १६० ± ११० इ. पू. |
| बी. एस. २३० | वस्तीचे टेकाड क्र. - २ | ... | ४१० ± १०० इ. पू. |
| बी. एस. २३१ | वस्तीचे टेकाड क्र. - २ | ... | ५२० ± ६० इ. पू. |
| बी. एस. २३३ | वस्तीचे टेकाड क्र. - २ | ... | ३०० ± १०० इ. पू. |
| बी. एस. २४२ | वस्तीचे टेकाड क्र. - २ | ... | ३३० ± १०० इ. पू. |
| बी. एस. २४३ | वस्तीचे टेकाड क्र. - २ | ... | ३७० ± १२० इ. पू. |
| बी. एस. २६२ | वस्तीचे टेकाड क्र. - २ | ... | ४५० ± १०० इ. पू. |
| बी. एस. २६५ | वस्तीचे टेकाड क्र. - २ | ... | ६९० ± ११० इ. पू. |
| बी. एस. २६० | वस्तीचे टेकाड क्र. - २ | ... | ४९० ± ११० इ. पू. |
| बी. एस. २३२ | वस्तीचे टेकाड क्र. - २ | ... | ५०० ± १०० इ. पू. |
| बी. एस. २४४ | वस्तीचे टेकाड क्र. - २ | ... | ५१० ± १२० इ. पू. |
| बी. एस. २३९ | वस्तीचे टेकाड क्र. - २ | ... | ५०० ± १२० इ. पू. |

(१०) टाकळघाट ( महाराष्ट्र )

| | | | |
|---|---|---|---|
| टी. एफ. ७८३ | पांढरीचे टेकाड | ६२० ± १०३ ... | इ. पू. ८०० - ४२० इ. पू. |
| टी. एफ. ७८४ | पांढरीचे टेकाड | ५६० ± ९८ ... | इ. पू. ७८० - ४०५ इ. पू. |

(११) भागीमाहरी ( महाराष्ट्र )

| | | | |
|---|---|---|---|
| बी. एस. ५३६ | वस्तीचा थर (९) | ... | ५७० ± १०० इ. पू. |
| बी. एस. ५३७ | वस्तीचा थर (९) | ... | ६९० ± १०० इ. पू. |
| बी. एस. ५३८ | वस्तीचा थर (८) | ... | ६०० ± १०० इ. पू. |

| | | | |
|---|---|---|---|
| बी. एस. ५३६ | वस्तीचा थर (७) | ... | ४५० ± ६० इ. पू. |
| बी. एस. ५४० | वस्तीचा थर (६) | ... | ५०० ± १०० इ. पू. |
| बी. एस. ५४१ | वस्तीचा थर (४) | ... | ४९० ± १०० इ. पू. |
| बी. एस. ५७९ | वस्तीचा थर (२) | ... | ५७० ± १०० इ. पू. |
| (१२) खैरवाडा ( महाराष्ट्र ) | | | |
| बी. एस. ३९४ | महापाषाणकालीन वस्ती | ... | ५१० ± १०० इ. पू. |
| बी. एस. ३९३ | महापाषाणकालीन वस्ती | ... | ४१० ± १०० इ. पू. |
| बी. एस. ३९२ | प्राचीन ऐतिहासिक वस्ती | ... | १४० ± १२० इ. पू. |

वरील तक्त्यावरून दोन गोष्टी स्पष्ट होतात. पहिली म्हणजे दक्षिणेतील महापाषाण संस्कृतीचे कालमापन फारसे सुसंगत नसले तरी त्याची प्राचीनता इसवी सन पूर्व १२०० ते १००० इतकी सर्वसाधारणपणे गृहीत धरण्यास प्रत्यवाय नाही. याउलट महाराष्ट्रातील विदर्भ प्रदेशात उपलब्ध झालेल्या कालमापनानुसार या संस्कृतीची प्राचीनता इसवीपूर्व ८ वे / ७ वे शतक इतकी सिद्ध होते.

महाराष्ट्राच्या महापाषाण संस्कृतीचे वैशिष्ट्य स्पष्ट करण्याआधी या संस्कृतीच्या ज्या प्रमुख स्थलांचे उत्खनन आतापर्यंत करण्यात आले त्यातील पुराव्याचे स्वरूप लक्षात घेणे जरूर आहे. विदर्भात, विशेषतः पूर्व-विदर्भामध्ये, या संस्कृतीच्या ७० हून जास्त स्थलांची नोंदणी झाली असली तरी त्यापैकी फारच थोड्या स्थलांचे उत्खनन करण्यात आले आहे. शिवाय शिळावर्तुळ दफन - प्रकाराचे प्रत्यक्ष उत्खनन केल्याशिवाय पुरावा सापडत नाही. आणि वस्तीच्या स्थानांपेक्षा दफनांची / दफनभूमींची संख्या खूपच मोठी असल्याने या लोकांच्या वस्त्यांच्या अवशेषांची पांढरीची टेकाडे फारशी सापडलेली नाहीत. दुसरे असे की हे लोक फारसे स्थिर नव्हते असे मानले तर त्यांच्या वस्त्यांचे पुरावेही मोठमोठ्या पांढरीच्या स्वरूपात अपेक्षिणे सयुक्तिक ठरणार नाही. तरी देखील विदर्भात टाकळघाट, खैरवाडा, नैकुंड आणि भागीमाहरी या ठिकाणी वस्त्यांचे अवेशष अलीकडे उपलब्ध झालेले आहेत आणि त्यांचे उत्खननही करण्यात आलेले आहे.

महापाषाण संस्कृतीच्या स्थलांचे विदर्भामध्ये सर्वसाधारणपणे तीन वर्ग करता येतात. पहिल्या वर्गात ज्या ठिकाणी फक्त दफनेच आहेत अशा स्थलांचा सामवेश करता येतो, दुसऱ्या वर्गामध्ये दफने आणि वस्ती अशा दोहोंचाही आढळ दिसून येतो. यातील पहिल्या वर्गामध्ये नागपूर, कामठी, रायपूर, बोरगाव, माहूरझरी व इतर कित्येक स्थलांचा समावेश करता येतो. दुसऱ्या वर्गात टाकळघाट, खैरवाडा, भागीमाहरी इत्यादी स्थले समाविष्ट करता येतात. तिसऱ्या वर्गामध्ये या संस्कृतीच्या लोकांच्या वस्तीचे किंवा दफनाचे पुरावे नसले तरी या संस्कृतीची निदर्शके खापरे आणि लोखंडी वस्तू ज्या स्थली सापडलेल्या आहे त्यांचा अंतर्भाव करता येतो. या शेवटच्या वर्गामध्ये पवनार (जिल्हा वर्धा), कौंडिण्यपूर (जिल्हा अमरावती), रंजाळे (जिल्हा धुळे) (फलक २८ : अ / क), अर्णी (जिल्हा यवतमाळ) इत्यादी स्थले प्रातिनिधिक स्वरूपाची ठरतात.

विदर्भामध्ये या वर्गाच्या स्थलांची फलदायी उत्खनने झाली. त्यापैकी खालील महत्वपूर्ण ठरलेली आहेत.

### जुनापानी

नागपूरपासून ११ किलोमीटर वायव्येस जुनापानी आहे. या ठिकाणी फक्त शिळावर्तुळ प्रकारची दफने अस्तित्वात असून येथे सुमारे तीनशे वर्तुळे आहेत. यांची पहिली नोंद १८६७ साली केली गेली आणि १९६१ - ६२ मध्ये तीन शिळावर्तुळांचे उत्खनन करण्यात आले. या वर्तुळांचा व्यास १० ते २१ मीटर होता आणि मृताचे अवशेष पुरून त्यावर जवळजवळ एक मीटरपर्यंत माती आणि दगडगोटे टाकलेले होते. उत्खननामध्ये संपूर्ण मानवी सांगाडे सापडले नाहीत, परंतु मानवी हाडे, दात याचबरोबर काळी - आणि - तांबडी, पूर्णपणे काळी, अभ्रकयुक्त तांबडी आणि साधी तांबडी खापरे सापडली. परंतु ही सगळी अत्यंत तुटक्याफुटक्या अवस्थेत सापडल्याने यांचे आकार संपूर्णपणे जाणता आले नाहीत. यामध्ये एक तांबड्या रंगाचा मातीचा वाडगा उल्लेखनीय आहे. या वाडग्याला तोटी असून वाडग्याच्या काठावर काळ्या रंगात रेघा काढल्या आहेत. आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण पुरावा म्हणजे मृतावरोबर ठेवलेल्या विविध प्रकारच्या कट्यारी, भाले, कुऱ्हाडी, छिन्या व

पळ्या इत्यादी वस्तू. याशिवाय तांब्याचे वाळे, लोखंडाचा लोलक असलेल्या तांब्याच्या घंटा, सोन्याचे चकतीच्या आकाराचे मणी, बांगड्या आणि वळी, त्याचप्रमाणे पांढऱ्या रंगात नक्षीकाम केलेले कार्नेलियनचे मणी सापडले. शिवाय वालुकाश्माचा बत्ताही सापडला. मृताबरोबर घोड्याचे अवशेषही पुरलेले आढळले. मात्र मानवाचे आणि घोड्याचे अवशेष अत्यंत जीर्ण स्वरूपात सापडल्यांने त्यातून काहीही निष्कर्ष काढणे शक्य झाले नाही. (*IAR* 1969 - 70)

**टाकळघाट - खापा**

महापाषाणीय संस्कृतीचे हे एक वैशिष्ट्यपूर्ण स्थल यासाठी प्रसिध्द झालेले आहे की टाकळघाट आणि खापा ही स्थले नागपूरच्या दक्षिणेला ३६ किलोमीटरवर कृष्णा नदीच्या काठी एकमेकासमोर असून यातील टाकळघाट येथे महापाषाणीय लोकांच्या वस्तीचे पांढरीचे टेकाड असून, खापा त्याचप्रमाणे त्याच्या शेजारील गंगापूर येथे शिळावर्तुळ प्रकाराची दफने आहेत. ताम्रपाषाणयुगामध्ये मृतांना घरामध्येच पुरले जात असे. परंतु महापाषाणयुगामध्ये मृतांना घरामध्ये पुरण्याची पध्दत नव्हती. मृताशी निगडित असलेली दफनरचना एका विशिष्ट तऱ्हेने करण्याची पद्धत असल्याने त्यासाठी जागाही बरीच लागत असे. त्यामुळे अशी दफने टाकळघाट येथील वस्तीच्या जागेमध्ये न सापडता ती नदीपलीकडील मोठ्या मोकळ्या जागेत योजिली गेली. यांचे उत्खनन १९६८ - ६९ साली करण्यात आले. टाकळघाट येथील पांढरीचा विस्तार २२,५०० चौरस मीटर येवढ्या मोठ्या प्रदेशामध्ये पसरलेला असला तरी त्यातील बराचसा भाग सध्याच्या वस्तीखाली दबला गेला आहे. (फलक २३)

पांढरीच्या उत्खननामध्ये कुडाच्या घरांचे अवशेष मिळाले. मात्र उत्खननाचे स्वरूप मर्यादित असल्याने संपूर्ण घराची कल्पना येऊ शकली नाही. अशा घरातील जमीन माती चोपून व त्यावर चुन्याचे सारवण करून बनविली जाई. असे सारवण वारंवार केल्याचे दिसून येते. जमिनीत पुरलेल्या लाकडी वाशांच्या आधारावर घराचे छप्पर पेलले जाई. घराच्या भिंतीही मातीच्या असून, त्यातल्या काही जास्तीतजास्त अर्ध्या मीटर जाड

होत्या. घरामध्ये विविध प्रकारची मडकी वापरात होती. यातील काळ्या-आणि-तांबड्या वर्गाच्या मडक्यात प्रामुख्याने वाडगे, थाळ्या आणि झाकण्या हे आकार प्रचलित होते. दुसऱ्या वर्गाची खापरे अभ्रकयुक्त मातीपासून बनविलेली असून ती अत्यंत ठिसूळ होती. या प्रकारात कळश्या, पराती, लोटे, घडे आणि पसरट तोंडाची आणि गोल आकाराची मडकी बनविली जात. आणखी एक प्रकार म्हणजे विटक्या लाल रंगाची मडकी. यावर काळ्या रंगामध्ये साधे रंगकाम केलेले होते. मात्र अशी रंगीत मडकी फार मोठ्या संख्येने वापरात नव्हती. या प्रकारात प्रामुख्याने घडे आणि थाळ्या बनविल्या जात. हे लोक लोखंडी कुऱ्हाडी, भाले, खंजीर, कट्यारी, सुऱ्या, बाणाग्रे त्याचप्रमाणे राप्या वापरीत असत. तांब्याचा वापर प्रामुख्याने बांगड्या, कडी व भांडी करण्याकडे होत होता. रंगीबेरंगी उत्तम पोताचे अकीक, कार्नेलियन इत्यादी दगड वापरून विविध आकाराचे मणी अलंकार म्हणून वापरात होते. यातील काही कार्नेलियन मण्यांवर पांढऱ्या रेषांची नक्षी एका विशिष्ट तंत्राने काढली जाई. या लोकांनी गायी, बैल, बकरे व घोडे पाळलेले होते, असे उत्खननात सापडलेल्या या प्राण्यांच्या हाडांवरून स्पष्ट होते.

खापा येथील शिळावर्तुळांच्या उत्खननामध्ये, टाकळघाट येथील वस्तीच्या थरात सापडलेल्या खापरासारखीच खापरे मृतावरोबर पुरलेली आढळल्याने खापा आणि टाकळघाट यांचा एकमेकांशी असलेला संबंध स्पष्ट झाला; म्हणजेच वस्ती आणि दफने यांचा मेळ घालता आला. बहुसंख्य शिळावर्तुळे १२ ते १५ मीटर व्यासाची असली तरी, उत्खनन केलेल्या एका शिळावर्तुळाचा व्यास २३ मीटर होता. वर्तुळाच्या मध्यभागी काही मानवी हाडे त्याचप्रमाणे घोड्याची काही हाडे व दात सापडले. या अवशेषांबरोबर विविध प्रकारचे मणी, काळी-आणि-तांबडी मडकी व अभ्रकयुक्त तांबडी मडकी फुटलेल्या अवस्थेत सापडली. मृतावरोबर तांब्याच्या बांगड्या त्याचप्रमाणे थाळ्या आणि त्यावरील झाकण्या ठेवलेल्या होत्या. या व्यतिरिक्त लोखंडाचे भाले, तलवारी, चपट्या कुऱ्हाडी व कढया, कान-कोरणे, नखण्या, दाभणे आणि राप्या अशा विविध वस्तू

ठेवलेल्या होत्या. यातील कुऱ्हाडी काटकोन - चौकोनी व चपट्या असून यांची माथ्याकडची बाजू सरळ - सपाट तर धारेकडील बाजू बहिर्गोल आहे. अशा कुऱ्हाडींच्या माथ्यावर फुलीसारख्या दोन पट्ट्या, माथ्याला संपूर्ण वेढून टाकतील अशा पद्धतीने बसविल्या होत्या. यामुळे त्या लाकडी दांड्यावर चढविता येत. दफनातील दोन वस्तू अतिशय कलात्मक होत्या. यातील एक तांब्याची झाकणी असून ती माथ्याकडे निमुळती होत गेली आहे. झाकणीच्या माथ्यावर एकमेकांसमोर एक असे बसलेल्या दोन पक्ष्यांच्या दोन जोड्या आहेत. पक्षी अत्यंत डौलदार दाखविले असून ते आकाराने लहान असले तरी वास्तव आहेत (फलक ११ : १० ). दुसरी अप्रतिम वस्तू म्हणजे घोड्याच्या चेहऱ्यावर बसविण्यासाठी केलेला तांब्याच्या पत्र्याचा अलंकार. तांब्याचा पत्रा, घोड्याच्या चेहऱ्यावर चेहऱ्यानुरूप बसेल असा कापलेला असून त्यावर तांब्याचे कोन, वारक्या लोखंडी पिनांच्या साहाय्याने बसविले आहेत. या दागिन्याच्या कडेवर बारीक भोके पाडली असून हा अलंकार चामड्यावर अथवा जीन कापडासारख्या जाड व मऊ कापडावर बसवून तो घोड्याच्या चेहऱ्यावर ठाकठीक बसविला जात असावा. अशा तऱ्हेचे घोड्याचे अलंकार विदर्भाव्यतिरिक्त इतर कोठेही अद्याप सापडले नाहीत. सध्याच्या काळात वरातीत वापरल्या जाणाऱ्या अलंकृत घोड्याची आठवण अशा अलंकारावरून येते. (फलक ३२ : ब ; ३३ : ब)

टाकळघाट - खापा येथील उत्खननामुळे दोन उद्दिष्टे साध्य झाली. त्यातील पहिले आणि महत्त्वाचे असे की दफने आणि वस्ती यांचा एकमेकांशी असणारा संबंध स्पष्ट झाला आणि दुसरे म्हणजे टाकळघाट येथील वस्तीचा मध्यकाळ कार्बन - १४ पद्धतीनुसार ( इसवीपूर्व ६ वे शतक ) निश्चित करण्यात आला. (Deo 1970)

माहूरझरी

नागपूर - काटोल रस्त्यावर नागपूरच्या पश्चिमेस १५ किलोमीटर अंतरावर माहूरझरीची महापाषाण संस्कृतीची विस्तृत दफनभूमी आहे. वस्तुतः जुनापानी आणि माहूरझरी यांचे क्षेत्र सलग मानावयास हरकत नाही. येथे फक्त शिळावर्तुळ प्रकारची दफने खूप संख्येने आढळून येतात. जुनापानीचा

शोध रिव्हेट कारनॅक यांनी लावला आणि त्यावर १८७९ साली लेख लिहून तेथे मिळालेल्या लोखंडी कुऱ्हाडी, घोड्याच्या तोंडात बसविली जाणारी लोखंडी 'व्हटाळी' आणि इतर वस्तू प्रकाशित केल्या. जुनापानी आणि माहूरझरी हे एकच क्षेत्र असल्याने या वस्तू माहूरझरीच्या संदर्भातही महत्त्वाच्या ठरतात. यानंतर, १९३३ मध्ये, हंटर यांनी माहूरझरी येथे सापडलेल्या, प्रामुख्याने ऐतिहासिक काळातील, अवशेषांचा आढावा प्रसिद्ध केला. यात मुख्यत्वे निर्मितीच्या निरनिराळ्या अवस्थांतील कार्नेलियनचे मणी, गुप्तकालीन विटा, मुद्रा, नागमुद्रा आणि लज्जागौरीचे शिल्प यांचा उल्लेख आढळून येतो. मात्र येथील शिळावर्तुळासंबंधी काहीही माहिती हंटर यांनी दिलेली नाही. यानंतर १९७० - ७२ या कालात या शिळावर्तुळांचे मोठ्या प्रमाणावर उत्खनन करण्यात आले. त्यात सापडलेला पुरावा अत्यंत महत्त्वपूर्ण ठरलेला आहे.

माहूरझरी येथे शिळावर्तुळे चार विभागात केंद्रीत झाल्याचे आढळून येते. यातील काही टेकडीवर तर काही सपाट प्रदेशात असून जवळपास नदी वगैरे नाही. जवळपासच्या टेकड्यात उपलब्ध असलेल्या शिळांचा वापर करून ही दफने रचण्यात आली.

दफन पद्धतीची विविधता, वर्तुळांचे व्यास, त्यात सापडलेले मानवी सांगाडे, मृतावरोबर दागिन्यांसह केलेले घोड्याचे दफन आणि लोखंड, तांबे, सोने यापासून बनविलेल्या असंख्य वस्तू यामुळे माहूरझरीची शिळावर्तुळे महाराष्ट्रात अद्वितीय ठरली आहेत. इतकी समृद्ध दफने दुसरीकडे अद्याप मिळालेली नाहीत. काही दफनात तर विविध प्रकारच्या दोनशेहून जास्त वस्तू मृतांबरोबर ठेवलेल्या आढळून आल्या. काही दफने सांकेतिक स्वरूपाची होती. दफनांची संख्या लक्षात घेता माहूरझरी – जुनापानी ही महापाषाण संस्कृतीच्या लोकांची बहुधा महत्त्वाची दफनभूमी असावी असे दिसते. मृतांबरोबर पुरलेल्या वस्तूंच्या संख्येवरून आणि स्वरूपावरून तत्कालीन लोकांमध्ये निरनिराळे आर्थिक स्तर होते असे स्पष्ट होते. धातूच्या वस्तूंची विविधता असली तरी मडक्यांचे वर्ग मात्र जुनापानी प्रमाणेच – काळी – आणि – तांबडी, अभ्रकयुक्त तांबडी, संपूर्ण काळी – प्रचलित होते.

शिळावर्तुळातील दफनपद्धती जुनापानी प्रमाणेच असली तरी मृताला पुरण्याच्या पद्धतीत विविधता होती. काहीत दोन प्रौढ व्यक्ती शेजारी - शेजारी एकाच वर्तुळात, काहीत वर्तुळात खड्डा करून एक व्यक्ती, काहीत मृताची केवळ काही हाडे, तर काहीमध्ये मृताच्या सांगाड्याचें वरचे भाग पुरल्याचे दिसून आले. मृताला बहुतांशी उत्तर - दक्षिण ठेवले असले तरी सर्वच बाबतीत असे करीत असत असे नाही. काही मोजक्या दफनामध्ये मृत व्यक्तीबरोबर घोड्याचा बळी देऊन तो किंवा त्याचा काही भाग दागिन्यासकट पुरलेला होता (फलक २७ : क). काही दफनामध्ये मृताच्या छातीवर कट्यार (लोखंडी पाते आणि तांब्याची मूठ) ठेवल्याचे आढळून आले. ही व्यक्ती गावातील प्रमुख, सधन अथवा लढाऊ वर्गाची असावी असे अनुमान करता येते. (फलक २७ : ब)

माहूरझरीच्या दफनामध्ये काही अप्रतिम कलाकुसरीच्या तांब्याच्या वस्तू उत्खननात सापडल्या. तांब्याच्या लहान आकाराच्या घंटा, जड आणि भरीव तांब्याच्या बांगड्या आणि कडी, तांब्याच्या थाळ्या आणि त्यावरील अप्रतिम बनावटीची झाकणे (फलक ३२ : ड), यांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. घंटा घुमटाकार असून, त्यांचे लोलक लोखंडाचे आहेत (फलक ३४ : ब). बांगड्या जाड तांब्याच्या सळ्यापासून ठोकून बनविलेल्या असून त्यांच्या तोंडाच्या दोन्ही बाजूला उत्कीर्ण केलेली नक्षी आहे. तांब्याच्या थाळ्या पातळ पत्र्याच्या असून त्यावरील झाकण्या निमुळत्या माथ्याच्या आणि त्यावर सहा कळ्यांचा (फलक ३२ : अ, ड) एक वेगळा घटक बसविलेल्या अशा आहेत. लोखंडाच्या वस्तू विविध स्वरूपाच्या असून त्यातील चपट्या कुऱ्हाडी, भाले, शूल खनित्रे, पटाशा (फलक ३१ : ड) व छिन्न्या (फलक ३१ : अ), राप्या, पळ्या किंवा दिवे आणि नांगरटीसाठी निमुळत्या टोकाचे छोटे फाळ मृतांबरोबर पुरलेले आढळले. याशिवाय घोड्याच्या तोंडात बसविले जाणारे लोखंडी कडीचे 'व्हटाळे' (फलक ३१ : ब) त्याचप्रमाणे घोड्याच्या मुखावर घालण्याकरिता केलेले तांब्याच्या पत्र्याचे दागिने (टाकळघाट - खापा येथे मिळालेल्याप्रमाणे) उल्लेखनीय आहेत. हार, वळी, पेंडेयुक्त कंठहार, कर्णफुले इत्यादी विविध प्रकारचे सोन्याचे दागिने

(फलक ३४ : ड, इ) काही दफनामध्ये मृताच्या अंगावर पुरताना तसेच राहू दिल्याचे आढळून आले. इतर अलंकारांमध्ये रंगीबेरंगी विविध आकाराचे दगडी मणी फार मोठ्या संख्येने सापडले. यातील काही कार्लेनियन या लाल दगडाचे असून त्यावर एका विशिष्ट तंत्राने पांढऱ्या रंगात पक्की नक्षी काढलेली आहे.

दफनामध्ये विविध प्रकारची मडकीही मृताबरोबर ठेवलेली आढळली. टाकळघाट - खापा येथे सापडलेल्या मडक्यांप्रमाणेच ही असून काही दफनामध्ये काळ्या रंगात तांबड्या पृष्ठभागावर चित्रकारी केलेली मडकीही आहेत. मात्र ही ताम्रपाषाणयुगीन रंगीत खापरांपेक्षा अगदी भिन्न आहेत. काळया वर्गाच्या खापरामध्ये विविध आकार असले तरी त्यातील काही झाकण्या माथ्यावर जनावरांच्या आकृती बसवून अलंकृत केलेल्या आहेत. यातील बोकडाची आणि चार पक्षांची आकृती असलेली झाकण्यांची शीर्षे अप्रतिम आहेत (फलक २९ : अ, ब; ३२ : अ, ड). या आकृती केवळ अलंकरणाकरिता बसविल्या असतील असे मानणे बरोबर ठरणार नाही. यामागे काही धार्मिक श्रद्धा असाव्यात.

माहूरझरीच्या दफनामध्ये मानवी सांगाड्यांचे जे अवशेष मिळाले आहेत त्यावरून मानवी - शरीरविज्ञान - शास्त्रज्ञांनी काही महत्त्वाचे निष्कर्ष काढलेले आहेत. येथे उत्खनित दफनातून एकूण १७ ते २१ व्यक्तींचे अवशेष मिळालेले आहेत. बहुतांशी दफनामध्ये एकाच व्यक्तीचे अवशेष मिळत असले तरी एका दफनात दोन व्यक्तींचे आणि दुसऱ्या एका दफनात तीन व्यक्तींचे अवशेष पुरल्याचे आढळून आले. यामध्ये लहान मुलांचे अवशेष अजिबात नव्हते. यावरून लहान मृत बालकांची विल्हेवाट दुसऱ्या कोणत्यातरी पद्धतीने लावली जात असावी असे दिसते. १२ ते १५ वयोगटातील एक, १६ ते २२ वयोगटातील आठ, आणि २२ ते ३२ वयोगटातील चार व्यक्ती, अशी विभागणी स्पष्ट झाली. अगदी लहान मुले त्याचप्रमाणे अगदी वृद्ध व्यक्तींचे सांगाडे सापडले नाहीत. २२ ते ३२ या वयोगटातील सर्व मृत पुरुष होते, तर १६ ते २२ या वयोगटात स्त्रियांची संख्या मोठी होती. पुरुषांपेक्षा स्त्रीयांच्या मृत्यूचे प्रमाण जास्त होते. मात्र या सांगाड्यावरून व्यक्तींची वांशिक ओळख पटू शकली नाही.

माहूरझरी इतकी समृद्ध दफने महाराष्ट्रात दुसरीकडे नाहीत. या दफनामुळे या समाजातील सधन आणि मध्यम वर्गाच्या व्यक्तींची ओळख जशी पटते तशीच दफनात ठेवलेल्या असंख्य वस्तूंवरून त्या समाजामंध्ये कुंभार, तांबट, लोहार, सोनार, सुतार यांच्यासारखे कारागीरही असले पाहिजेत हे उघड होते. दफनात ठेवलेल्या सर्व वस्तू दररोजच्या जीवनात वापरण्याच्या असून त्यांचा साठा (दफनाचे वेळीही) उपलब्ध रहात असला पाहिजे. ताम्रपाषाणयुगीन दफनापेक्षा महापाषाणीय संस्कृतीची दफने समृद्ध आढळतात. ( Deo 1973; Leshnik 1974 )

## नैकुंड

नागपूरपासून ईशान्येला ४२ किलोमीटर अंतरावर पेंच नदीच्या डाव्या तीरावर नैकुंड वसलेले आहे. या ठिकाणी वस्ती आणि दफने एकाच विभागामध्ये आहेत. टाकळघाटला अशी परिस्थिती नाही. नदीच्या एका तीरावर वस्ती आणि दुसऱ्या तीरावर दफने अशी मांडणी आहे. नैकुंड येथे मात्र वस्तीच्या जवळपास व भोवती दफने असली तरी ती वस्तीत नाहीत. या वस्तीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे वस्तीच्या पांढरीची दोन टेकाडे असून या दोन्ही ठिकाणी महापाषाण संस्कृतीच्या लोकांनी वस्ती केलेली होती. या ठिकाणची दफने शिळावर्तुळ या वर्गाची असून त्यांची संख्या सुमारे पाऊणशे इतकी आहे. दफने आणि वस्ती यांनी जवळजवळ १ लक्ष वर्ग मीटर एवढा प्रदेश व्यापलेला आहे. यापैकी काहीचे उत्खनन १९७८ ते ८० या कालात करण्यात आले. यातील सर्वात मोठ्या शिळावर्तुळाचा व्यास २१.५ मीटर व सर्वात लहान १२.८० मीटर इतका होता.

नैकुंड येथील उत्खननामध्ये महापाषाण संस्कृतीबद्दल अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण पुरावा उपलब्ध झाला. पहिले वैशिष्ट्य असे की दफनांचा आणि वस्तीचा समन्वय कार्बन - १४ पद्धतीनुसार केलेल्या कालमापनानुसार करता आला. वस्ती इसवीपूर्व ७ वे शतक ते इसवीपूर्व ४ थे शतक या कालात झाली आणि काही दफनांचा काल इसवीपूर्व ६ वे शतक आहे. या तारखा टाकळघाट येथील याच संस्कृतीच्या तारखांशी मिळत्या - जुळत्या आहेत. दुसरे असे की या ठिकाणी वस्तीच्या जवळच स्थानिक कच्च्या लोखंडाचे

शुद्ध लोखंडामध्ये रूपांतर केले जाई याचा पुरावा या कामाकरिता वापरलेल्या मातीच्या भट्टीसह उपलब्ध झाला. आणखी एक वैशिष्ट्य असे की वस्तीच्या थरामध्ये वाटाणा, मसूर, उडीद, गहू अशी धान्ये सापडली. याशिवाय येथील लोक मासे आणि डुक्कर, मेंढ्या, सांबर आणि चितळ यांचेही मांस खात असले पाहिजेत असे वस्तीत सापडलेल्या या प्राण्यांच्या हाडावरून सिद्ध झाले.

या लोकांची वस्ती नैसर्गिक काळ्या मातीच्या थरावर झाली. उत्खननामध्ये एका गोल झोपडीचे अवशेष मिळाले. झोपडीचा व्यास ४.६० मीटर इतका असून घरातील जमीन काळया जमिनीवर २.५ सेंटीमीटर जाडीचा पक्क्या तपकिरी मातीचा थर घालून व तो चोपून बनविलेली होती. सर्व जमीन चुन्याने सारवलेली होती. झोपडीभोवती लाकडी वासे रोवून त्यावर बहुदा निमुळते व हलके छप्पर घातेलेले असावे. झोपडीमध्ये मातीची, काहीशी लंबगोल आकाराची मातीची चूल होती. चुलीचा आतील भाग आगीमुळे लाल झालेला होता. चुलीमध्ये बरीचशी राख आणि तिच्या जवळपास अर्धवट जळालेली हरीण, डुक्कर, बोकड यांची हाडे मिळाली. याशिवाय चुलीजवळच गव्हाचे दाणे सापडले. शेजारीच लाल वालुकाश्माचे सुबकपणे बनविलेले वत्ते सापडले. घरातील जमीन वारंवार दुरूस्त करून त्यावर चुन्याचे सारवण देण्याचा प्रघात होता असे दिसते. उत्खननात सापडलेल्या विविध धान्यांचे प्रमाण, पाळीव जनावरांच्या सापडलेल्या हाडांची संख्या, गोल झोपडीचा सर्वसाधारण आकार, वस्तीच्या नजीक उपलब्ध असणारी शेतीयोग्य जमीन आणि अशाच प्रकारच्या झोपड्या बांधून सध्या तेथे राहणाऱ्या आदिवासींच्या कुटुंबातील व्यक्तींची सरासरी संख्या ध्यानात घेऊन नैकुंड येथे महापाषाण संस्कृतीचे सुमारे १००० ते १२०० लोक रहात असावेत, असा अंदाज केला गेला आहे.

या लोकांच्या अन्नपद्धतीबद्दल वर उल्लेख आलेलाच आहे. हे लोक शाकाहारी त्याचप्रमाणे मांसाहारी होते असेही वर नमूद केले आहे. जनावरांच्या काही हाडांवर तोडल्याच्या आणि जाळण्याच्या खुणांमुळे असे विधान करता येते. शेतीसाठी जमिनीमध्ये फरे पाडण्यास उपयुक्त ठरतील

अशा यंत्रणेचा वापर होत असावा असा अंदाज करण्याजोगा पुरावा जड दगडी कड्यांच्या स्वरूपामध्ये मिळाला. ही कडी दणकट लाकडी काठीवर बसवून व ती काठी बैल अथवा दुसऱ्या मानवी सहाय्यकाच्या मदतीने ओढत नेऊन जमिनीवर फरे पाडले जात. अशा काठीचे टोक काहीसे अणकुचीदार करून ते टणक व्हावे यासाठी थोडेसे अग्नीच्या संपर्कात आणीत असावेत असे अनुमान करता येते. याशिवाय या संस्कृतीच्या लोकांना नांगराचे फाळ, कुदळी, आणि लोखंडी खनित्रे (Hoe) माहित होती याचा पुरावा उपलब्ध आहे. खुद्द नैकुंड येथे लोखंडाची खनित्रे सापडली आहेत. आणखी एक बाब येथे नमूद करणे आवश्यक आहे. नैकुंड येथील महापाषाण संस्कृतीची पहिली वस्ती काळ्या जमिनीवर झाली असा उल्लेख याआधी केलेला आहे. ही जमीन ऋतुतील हवामानाच्या बदलास एका विशिष्ट तऱ्हेने साथ देते. ही जमीन ओल जशी टिकवून धरते, तशीच उन्हाळ्यामध्ये फाटते. यामुळे या जमिनीला वातावरणातील नायट्रोजनचा पुरवठा नैसर्गिकरित्या होतो. त्यामुळे ही जमीन थोडीशी जरी वरवर नांगरली तरी शेतीस उपयुक्त ठरते. वर उल्लेखिलेल्या बहुतेक पिकांची कापणी फेब्रुवारी - मार्च या उन्हाळ्याच्या सुरुवातीला होते हे या संदर्भात लक्षात घेणे उचित ठरते. पीक कापणीसाठी वापरले जाणारे लोखंडी विळेही उत्खननात सापडले. हे सध्याच्या विळ्यासारखेच आहेत. बकऱ्या, मेंढ्या आणि म्हैस यांची हाडे सापडल्यामुळे या लोकांच्या आहारात दुधाचाही वापर असावा असे म्हणावयास हरकत नाही.

नैकुंडचे महापाषाण संस्कृतीचे लोक लोखंड शुद्ध करून त्याच्यापासून शुद्ध लोखंडाच्या वस्तू बनवीत असत. याचा पुरावा कच्चे लोखंड शुद्ध करण्यास वापरलेली मातीची भट्टी देते. ही भट्टी (फलक ३० : अ) मातीच्या काहीशा बहिर्गोल विटांसारख्या दिसणाऱ्या मातीच्या वळ्यांनी बांधलेली होती. ही आकाराने गोल असून माथ्याकडे थोडीशी निमुळती होत गेली होती. या भट्टीचा व्यास ३० सेंटीमीटर आणि (सध्याची) उंची २५ सेंटीमीटर होती. चिखलाची वळी अशा प्रकारे एकावर ठेवली होती की खालच्या थरातील विटांचा माथा (खोलगट) आणि त्यावरील विटांचे बूड (बहिर्गोल)

एकमेकात घट्ट बसावे. या विटा २ सेंटीमीटर जाड असून या भट्टीचा आतील भाग धूर आणि आगीमुळे काळा पडलेला तर बाहेरचा भाग विटकरी रंगाचा होता. भट्टीच्या बुडाला एक भोक होते ज्याच्यातून खंगार आणि जळलेले जळण बाहेर काढता येई. भट्टीच्या जवळ दोन, मातीच्या बनविलेल्या, ३.५ सेंटीमीटर व्यासाच्या नळ्या सापडल्या. या नळ्या मातीमध्ये क्वार्ट्झ् दगडाचे तुकडे मिसळून केलेल्या होत्या. असे करण्याने या नळ्यांची उष्णता सामावून घेण्याची क्षमता वाढत असे आणि त्या विकृत होत नसत. या नळ्या भात्याला जोडून त्यांच्याद्वारे भट्टीतला विस्तव फुलविला जाई. भट्टीजवळ खंगार आणि जळलेले जळण यांचा फार मोठा साठा सापडला. याशिवाय जवळच लोखंडाचे खनिज आणि लोखंडापासून बनविलेले सळ्यांचे तुकडे सापडले. या भट्टीचा शास्त्रज्ञांनी अभ्यास केल्यानंतर असे मत दिले आहे की या भट्टीतून एक किलो लोह-खनिजापासून सुमारे ३५० ग्रॅम शुद्ध लोखंड मिळत होते. एकावेळी या भट्टीमध्ये १० ते १२ किलो लोह-खनिजापासून जवळजवळ ३ किलो शुद्ध लोखंड मिळू शकते. ही भट्टी निवासी घरापासून जवळजवळ १२५ मीटर अंतरावर असलेल्या कार्यशाळेत सापडली. महाराष्ट्रामध्ये या संस्कृतीची अशी भट्टी दुसरीकडे अद्याप सापडली नाही. शिवाय वापरलेले लोह-खनिज या भागात आजही उपलब्ध असलेल्या लोह-खनिजाशी तंतोतंत जुळते असे याच्या पृथःकरणावरून दिसून आले. लोखंडाची शुद्धता आणि त्यापासून बनविलेल्या विविध वस्तू तत्कालीन तंत्र-कौशल्याची साक्ष देतात.

लोखंडापासून चपट्या, काटकोन चौकोनी कुऱ्हाडीचे फाळ, राप्या, विविध प्रकारची टोके असलेल्या लांब छिन्न्या त्याचप्रमाणे उत्खनक, चाकू, कट्यारी, लांब दांड्याचे शूळ, नखण्या, थाळ्या आणि घोड्याच्या तोंडात (लगामाला जोडून) बसविण्यासाठी केलेल्या आडव्या 'व्हटाळ्या' बनविल्या जात. लोखंडाप्रमाणेच तांब्याच्या विविध वस्तूही वापरात होत्या. यामध्ये थाळ्या, खोल वाडगे, उचलण्यासाठी बाजूला अर्धगोलाकृती लावलेल्या आडव्या कड्यांचे वाडगे (फलक ११ : ८-९) त्याचप्रमाणे लहानलहान तांब्याची बोळकी व बांगड्या यांचा समावेश होतो. याशिवाय घोड्याच्या

अंगावर आणि मुखावर तांब्याच्या पत्र्यापासून बनविलेले विविध अलंकार आणि घंटा, त्याचप्रमाणे माथ्यावर पक्षी बसविलेल्या झाकण्या दफनामध्ये सापडल्या. अशाच तऱ्हेच्या वस्तू माहूरझरी आणि खापा येथील दफनामध्ये उपलब्ध झाल्या आहेत.

या लोकांची दफने विदर्भातील इतर दफनांप्रमाणेच आहेत. उत्खनित केलेले सर्वात मोठे शिळावर्तुळ २९ मीटर व्यासाचे तर सर्वात लहान ६ मीटर व्यासाचे होते. दफनासाठी वर्तुळात मांडलेल्या काही शिळांवर गोल, उथळ खळग्यांच्या रांगा केलेल्या आढळल्या. अशा तऱ्हेच्या निशाण्या इतरत्रही सापडलेल्या असल्या तरी यांचे प्रयोजन काय असावे हे निश्चित सांगता येत नाही (फलक २४ : ब). दफनांमध्ये सापडलेल्या मानवी हाडांचा पुरावा अत्यंत तोकडा आहे. परंतु यातील एका शिळावर्तुळामध्ये सुमारे सात वर्षे वयाच्या एका मुलाच्या जवड्याचे अवशेष, काही दात आणि दाढा यांच्यासकट सापडले. अशा तऱ्हेच्या तोकड्या पुराव्यावरून या लोकांच्या शारीरिक वैशिष्ट्यांची नीटशी कल्पना येत नाही. या दफनांचे, माहूरझरी आणि खापा येथेही आढळून आलेले एक वैशिष्ट्य म्हणजे मृतावरोवर घोड्याची कत्तल करून तो पुरणे हे होय. सापडलेली घोड्यांची हाडे दणकट असली तरी ती संख्येने मात्र कमी आहेत. बळी दिलेले काही घोडे ४ ते ५ वर्षांचे होते. घोड्यांची उपलब्ध असणारी कमी संख्या आणि काही सधन व्यक्तींनाच घोडे बाळगणे वा त्यांचा बळी देणे शक्य असल्यामुळे या बाबतीतील पुरावा फारसा मिळाला नाही. घोड्याच्या अंगावर घालण्यात येणाऱ्या तांब्याच्या पत्र्याच्या दागिन्याचा उल्लेख या आधी आलेला आहे.

या लोकांच्या वापरात पाच वर्गाची मडकी होती. काळी - आणि - तांबडी, चमकदार काळी, अभ्रकयुक्त लाल, करडी आणि काळी व काळ्या रंगात रंगविलेली तांबडी खापरे हे ते प्रकार होत (फलक ११ : १ - ७). आकारांच्या दृष्टीने यांच्यामध्ये फारसे नाविन्य आढळून येत नाही. यातील काळी - आणि - तांबडी खापरे ५४ टक्के असून ती वस्तीत आणि दफनात दोन्हीकडे सापडली. अभ्रकयुक्त मडकी ३२ टक्के असून ही बहुसंख्य दफनामध्ये सापडली. यांच्यापैकी काहीवर काळ्या रंगाने रेघा काढलेल्या आढळतात. फनेलसारखे तोंड असलेली गोल बुडाची मडकी – त्यांचा आकार

ताम्रपाषाणयुगीन लहान मुलाच्या दफनामध्ये वापरात असणाऱ्या राखी रंगाच्या मडक्याप्रमाणेच आहे – आणि पराती हे दोन आकार यामध्ये प्रामुख्याने आढळतात. ही मडकी दफनांमध्ये मोठ्या संख्येने एकत्र ठेवीत. काळ्या रंगात रंगविलेली लाल मडकी फक्त २ टक्के असली तरी त्यांची संख्या वस्तीच्या घरामध्ये मोठी होती (फलक २९ : क). दफनामध्ये ही नैकुंड येथे माहूरझरीप्रमाणे सापडली. यांचेवरील चित्रकाम रेघांच्या स्वरूपातले असून काही वेळा जाळीने भरलेले चौकोन, आडवे पट्टे, जाळी, छोट्या निशाणासारखी चित्रकारी, इत्यादी चित्रकाम आढळून येते. हे चित्रकाम बहुतांशी भांड्याच्या बाहेरील भागावर अथवा काठावर केलेले असून गोल लहान कळशा, वाडगे आणि पसरट तोंडाची भांडी हे आकार यामध्ये दिसून येतात.

नैकुंडच्या उत्खननामध्ये महापाषाण संस्कृतीच्या कालातील वस्ती आणि दफने यांचा कालदृष्ट्या त्याचप्रमाणे सांस्कृतिकदृष्ट्या समन्वय घालता आला. आधी उल्लेखिल्याप्रमाणे लोखंड शुद्ध करण्याचे तंत्र आणि त्याची पद्धती यांचा अद्वितीय पुरावा येथे मिळाला. शेतीस उपयुक्त ठरणारी अवजारे आणि पिकविलेले धान्यप्रकार यांचाही पुरावा येथे मिळाला. याशिवाय येथे रंगविलेली खापरे मोठ्या प्रमाणावर वापरात होती असे दिसून आले. पेंचसारखी बारमाही नदी, शेतीस उपयुक्त काळी जमीन आणि कच्च्या लोखंडाची उपलब्धी या बाबी लक्षात घेऊन येथे मोठी वस्ती झाली असावी असे म्हणणे सयुक्तिक ठरेल. ( Deo, Jamkhedkar 1982 : Kajale 1974 )

### खैरवाडा

वर्धा जिल्ह्यात धाम नदीच्या काठावर असलेले खैरवाडा नागपूरपासून पश्चिमेस ११८ किलोमीटरवर आहे. येथील शिळावर्तुळांचा शोध १८६९ साली कॅरे यांना लागला आणि त्यांनी काही शिळावर्तुळांचे उत्खननही केले. या स्थलाचे वैशिष्ट्य असे की येथे जवळजवळ १५०० शिळावर्तुळ प्रकाराची दफने असून प्राचीन वस्तीचा विस्तार १३ हेक्टर इतका मोठा आहे. महाराष्ट्रातील महापाषाण संस्कृतीचे हे (आतापर्यंत) सर्वात मोठे स्थल ठरले आहे. या ठिकाणी सध्या गोंडांची वस्ती आहे, आणि हे लोक काही शिळावर्तुळांची पूजा करतात.

शिळावर्तुळ दफनांचे दोन प्रकार येथे आढळून आले. यातील पहिला प्रकार म्हणजे गोल ठेवलेल्या शिळांच्या मर्यादितच दगडगोटे आणि माती यांचा ढिगारा करणे, तर दुसऱ्या प्रकारात शिळावर्तुळामध्ये, फक्त मोकळ्या दगडगोट्यांचा ढिगारा करून त्याचा माथा थोडासा खोलगट राखणे. या दोन्ही प्रकारच्या दफनाच्या उत्खननामध्ये फक्त मानवी दात आणि काही लांब हांडे सापडली. मृताबरोबर लोखंडाच्या चपट्या कुऱ्हाडी, विविध तऱ्हेची लोखंडी पाती आणि खनित्रे सापडली. याशिवाय काही दफनामध्ये घोड्याचे अवशेषही, दात आणि काही हाडांच्या स्वरूपामध्ये, मिळाले. तांब्याच्या वस्तूंमध्ये पक्ष्यांच्या आकृती माथ्यावर असलेल्या तांब्याच्या झाकण्या, खापा, माहूरझरी, नैकुंडप्रमाणे येथेही मिळाल्या. दफनामध्ये लाल रंगाची, अभ्रकयुक्त लाल रंगाची आणि काळी - आणि - तांबडी मडकी फुटक्या - तुटक्या अवस्थांमध्ये मिळाली.

वस्तीच्या उत्खननामध्ये दफनांमधील सर्व वर्गाची खापरे सापडली. यांचे आकारही, दफनात व वस्तीत, सारखेच असल्याचे आढळून आले. काळ्या - आणि - तांबड्या वर्गामध्ये विनकाठाचे वाडगे, निमुळत्या बुडाचे वाडगे आणि बुटके स्टँड; चमकदार काळ्या वर्गामध्ये विविध प्रकारच्या झाकण्या; तर अभ्रकयुक्त लाल वर्गामध्ये पसरट तोंडाची गोल आकाराची मडकी, खोल वाडगे, तसराळे आणि पराती हे आकार बनविले जात. याशिवाय तांबड्या पृष्ठभागावर काळ्या रंगात बहुतांशी जाळीच्या स्वरूपातील चित्रकारी केलेली गोल आकाराची मडकी प्रामुख्याने घरात वापरात होती. वस्तीत सापडलेला आणि दफनात सापडलेला विविध पुरावा एकमेकांशी मिळता - जुळता होता; असे असले तरी दफने वस्तीपासून वेगळी होती. (*IAR* 1981 - 82)

वस्तीच्या उत्खननामध्ये महापाषाण संस्कृतीचा तिच्या शेवटच्या काळात प्राचीन ऐतिहासिक काळातील सातवाहनकालीन संस्कृतीशी संपर्क आल्याचा पुरावा खापरांच्या माध्यमातून पहिल्याप्रथम नैकुंड येथे मिळाला. हा पुरावा कार्बन - १४ कालमापनानुसार निश्चित करता आला. महापाषाण संस्कृतीच्या वस्तीच्या शेवटच्या थराचे कालमापन इसवीपूर्व ६ वे - ५ वे शतक

असा आला आहे. प्राचीन ऐतिहासिक कालातील वस्तीचे कालमापन इसवीपूर्व चौथे - तिसरे शतक असा निश्चित करता आले. हे कालखंड नैकुंड, टाकळघाट इत्यादींशी मिळतेजुळते आहेत.

**भागीमाहरी**

नागपूरच्या उत्तरेस ४५ किलोमीटर अंतरावर कोलार नदीच्या काठी नागपूर जिल्ह्यात भागीमाहरी हे एक खेडे आहे. वळणे घेत जाणारी नदी, हिरव्या - करड्या टेकड्या आणि सभोवार झाडी यामुळे हा विभाग देखणा वाटतो. नैकुंडप्रमाणेच येथेही दफने आणि वस्ती या दोहोंचे अवशेष उपलब्ध आहेत. भागीमाहरीला जवळजवळ ७० शिळावर्तुळे असून पांढरीची विस्तृत अशी दोन टेकाडे आहेत. वस्तीची टेकाडे नदीला लागूनच आहेत, परंतु दफने मात्र वस्तीपासून अलग आणि सपाट उंचवट्यावर योजलेली आहेत. या दोन्हींचे उत्खनन १९८२ - ८४ आणि त्या नंतरही १९९० - ९१ व १९९१ - ९२ साली विस्तृत प्रमाणात करण्यात आले.

भागीमाहरी उत्खनन अनेक दृष्टीने उल्लेखनीय ठरलेले आहे. टाकळघाट, खैरवाडा आणि नैकुंडप्रमाणे येथेही दफने आणि वस्ती यांचा समन्वय असल्याचे स्पष्ट झाले. येथे उपलब्ध झालेल्या कार्बन - १४ तारखानुसार येथील वस्त्यांची कालमर्यादा इसवीपूर्व ८ वे शतक ते इसवीपूर्व ५ वे शतक अशी निश्चित करता आली.

इसवीपूर्व ८ व्या - ७ व्या शतकात वस्तीचे स्वरूप भरभराटीचे होते असे स्पष्ट झाले. सर्वसाधारणपणे घरे गोल आकाराची असून त्यांचा व्यास सव्वातीन ते पावणेचार मीटर या दरम्यान होता. झोपडीच्या कडेने लाकडी वासे रोवून त्यावर निमुळते छप्पर घातले जाई. ही घरे कुडाची होती आणि घरातील जमिनी पक्क्या काळ्या मातीच्या थरावर तपकिरी रंगाची माती घालून त्या चोपून आणि चुन्याने सारवून तयार केलेल्या होत्या. जमिनीची देखभाल आणि सारवण वारंवार केले जात असे. याकरिता लागणारा चुना तयार करण्यासाठी लागणारी मातीची आणि दगडाची भट्टी एका घराच्या अवशेषामध्ये सापडली. हा चुना नदीत सापडणाऱ्या शिंपल्यांपासून केला जात असे. ही घरे आगीमुळे अनेक वेळा नष्ट होत असत असे उत्खननात

सापडलेल्या मातीच्या भिंतीच्या जळालेल्या डबरावरून स्पष्ट झाले. अशा घरामध्ये अर्धवर्तुळाकृती मातीच्या चुलींचा वापर होत होता. चुलीच्या शेजारी आणि घरातील जमिनीवर जळलेला तांदूळ (फलक ३५ : क), सातू, रानज्वारी, वाटाणे, मसूर, तृणधान्य, हुलगे, वाल, उडीद, मूग इत्यादी धान्ये सापडली, त्याचप्रमाणे गायी, बैल, शेळ्या - मेंढ्या आणि डुकरे यांची हाडे मिळाली. यांतील काही जळलेल्या अवस्थेमध्ये होती. येथील वस्तीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे वस्तीच्या सुरुवातीच्या कालात पक्ष्यांची हाडे मोठ्या संख्येने सापडली. यातील काही हाडांवर तासून आणि छिलून प्रक्रिया केल्याचे दिसून आले. यांचा सुई, दाभण अथवा टोचे असा वापर होत असावा. असा पुरावा या संस्कृतीच्या इतर स्थली विदर्भात मिळालेला नाही.

या लोकांच्या वापरामध्ये नैकुंड, टाकळघाट आणि खैरवाडा येथे प्रचलित असलेली विविध वर्गाची मडकी होती. याशिवाय तांबड्या पृष्ठभागावर काळ्या रंगात चित्रकारी केलेली मडकीही वापरली जात असत. येथे महापाषाण संस्कृतीच्या वस्तीच्या शेवटीशेवटी अशी रंगीत खापरे वापरातून कमी झाली, असे आढळून आले.

वस्तीमध्ये लोखंडाच्या आणि तांब्याच्या विविध वस्तू सापडल्या. यामध्ये चपट्या कुऱ्हाडी, सुऱ्या, कट्यारी आणि बाणाग्रे त्याचप्रमाणे पळ्या सापडल्या. याशिवाय तांब्याच्या जाड बांगड्याही उपलब्ध झाल्या.

भागीमाहरी येथील दफने वरवर इतर शिळावर्तुळांप्रमाणे दिसत असली तरी प्रत्यक्ष उत्खननामध्ये वर्तुळात वेगवेगळ्या रचनांची निर्मिती केलेली दिसून आली. हे येथील दफनांचे वैशिष्ट्य समजावे लागेल. काही शिळावर्तुळांमध्ये मधोमध मध्यम आकाराच्या दगडांच्या साहाय्याने एक काटकोन चौकोन तयार करून, त्याच्या मधोमध अशाच दगडांनी दुभाजक करून दोन चौरस निर्माण केलेले होते. या चौरसाकडे जाण्यासाठी काळी माती आणि त्यात छोट्या आकाराचे गोटे मिसळून त्यांच्या साहाय्याने अर्धामीटर रुंदीचा मार्ग तयार केलेला होता (फलक २५ : ब). दुसऱ्या एका वर्तुळामध्ये, बरोबर केंद्रजागी मध्यम आकाराच्या गोट्यांच्या सहाय्याने एक अपूर्ण वर्तुळ योजले होते (फलक २५ : अ). हे वर्तुळ दक्षिणेकडे खुले होते.

सर्व गोटे काळ्या मातीमध्ये बसविले होते. तिसऱ्या एका प्रकारात शिळावर्तुळाच्या मधोमध गोंडवन वर्गाची एक प्रचंड शिळा काहीशी कलत्या अवस्थेमध्ये बसविली होती. आणखी उत्खननामध्ये याहीपेक्षा विविधता आढळून येण्याची शक्यता आहे. उत्खनित दफनामध्ये संपूर्ण सांगाड्याऐवजी काही मानवी लांब हाडे आणि दात एवढेच सापडले. काही दफनांमध्ये मृताबरोबर घोड्याचेही अवशेष पुरलेले होते. हा पुरावा टाकळघाट - खापा, माहूरझरी, नैकुंड, खैरवाडा येथील पुराव्याशी मिळताजुळता आहे. मृताबरोबर लोखंडी चपट्या कुऱ्हाडी, बाणाग्रे, कट्यारी त्याचप्रमाणे तांब्याच्या बांगड्या आणि अलंकृत केलेले तांब्याच्या झाकण्यांचे वरचे भाग मिळाले. एका दफनात तर हाताच्या हाडाभोवती अठ्ठावीस तांब्याच्या जाड बांगड्या सापडल्या. याशिवाय वस्तीमध्ये सापडलेली विविध वर्गाची मडकीही दफनात मोठ्या संख्येने सापडली. यामध्ये काळी - आणि - तांबडी व अभ्रकयुक्त तांबडी मडकी संख्येने जास्त होती. (*IAR* 1982 - 83 : 83 - 84)

भागीमाहरी येथे दफनांच्या पद्धतीमध्ये नवनवीन रचना दिसून आल्या. हे लोक सधन शेतकरी असले पाहिजेत असे विविध धान्यावरून म्हणता येते.

### बोरगाव

जुनापानी, माहूरझरीप्रमाणेच, नागपूरपासून ईशान्येला ४२ किलोमीटरवर बोरगाव हे काहीसे उजाड खेडे वसलेले आहे. या ठिकाणी आजूबाजूला फारशा टेकड्या नसल्या तरी सर्वसाधारणपणे कातळावर मातीचा निक्षेप फारसा नसल्याने ठिकठिकाणी खडक उघडे पडलेले आहेत. बोरगाव ही केवळ दफनभूमीच आहे आणि या ठिकाणी जवळजवळ ५० शिळावर्तुळे आहेत. यापैकी काही शिळावर्तुळांचे उत्खनन १९८० - ८१ साली करण्यात आले. सर्वात मोठे शिळावर्तुळ १६.५ मीटर व्यासाचे असून सर्वात लहान ५ मीटरचे आहे.

या दफनांच्या उत्खननामध्ये मानवी अवशेषांचा फारसा पुरावा मिळाला नाही. फक्त मानवी दात सापडले. मात्र मृताबरोबर पुरलेल्या विविध वस्तू सापडल्या. यामध्ये लोखंडी विळे (फलक ३१ : क), छिन्न्या,

राप्या, कुऱ्हाडी (फलक ३० : ब), त्रिशूळ, बाणाग्रे, नखण्या इत्यादी बरोबरच मोराची आकृती माथ्यावर लावलेल्या व माथ्याकडे निमुळत्या होत जाणाऱ्या तांब्याच्या झाकण्या, थाळ्या आणि जाड कडी मिळाली. दफनात इतरत्र सापडलेली सर्व वर्गाची खापरे येथेही ठेवलेली आढळताव, मात्र काळ्या रंगात चित्रकारी केलेली खापरे सापडली नाहीत. अलंकारामध्ये सोन्याची कर्णभूषणे त्याचप्रमाणे कार्नेलियन दगडाचे शेकडो मणी सापडले. यापैकी काहींवर पांढऱ्या रंगात पक्की नक्षी केलेली होती. काही दफनात दगडी बत्तेही (फलक ३५ : ब) मृताच्या अवशेषावरोबर ठेवलेले होते. यातील एका दफनामध्ये, एका प्रचंड अखंड शिळेतून कोरलेला काटकोन-चौकोनी हौद शिळावर्तुळात मधोमध ठेवलेला आढळला. हा छिन्यांच्या साहाय्याने घडविलेला होता हे यावरील खुणांवरून स्पष्ट झाले. याची लांबी १५३ सेंटीमीटर, रुंदी ८२ सेंटीमीटर आणि खोली ७६ सेंटीमीटर असून त्याची जास्तीतजास्त जाडी २० सेंटीमीटर आहे. याच्या तळाच्या आतल्या पृष्ठभागावर तीन काहीसे गोल आणि उथळ खड्डे केलेले आहेत. मात्र ते आरपार नाहीत. याच्यावर कसलेही झाकण नव्हते. या हौदाचा नेमका उपयोग दफनाच्या संदर्भात काय होता हे सांगणे कठीण आहे. हौदामध्ये केवळ माती सापडली. मृताला किंवा मृताचे अवशेष ठेवण्यासाठी याचा पेटिकेसारखा उपयोग केला जात असावा किंवा कसे हे स्पष्ट होत नाही. (फलक २६ : अ).

बोरगावच्या दफनांचे कार्बन-१४ कालमापन करणे शक्य झाले नाही. परंतु या दफनांमध्ये चित्रकारी केलेली खापरे सापडली नाहीत व चार खुरांचा दगडी पाटा आणि त्यावरोबर गोल दंडाकृती वरवंटा सापडल्याने ही दफने विदर्भातील महापाषाण संस्कृतीच्या उत्तर कालातील असावीत असे दिसते. (*IAR* 1980-81)

## रायपूर

बोरगावप्रमाणे नागपूरच्या पश्चिमेस १८ किलोमीटरवर रायपूर येथे महापाषाण संस्कृतीची दफनभूमी आहे. बोरगावप्रमाणेच येथेही कातळ उघडे पडलेले असून जवळच फारशा उंच नसलेल्या टेकड्या आहेत. रायपूरच्या

परिसरातील वानाडोंगरी, नागलवाडी, टाकळी, हिंगणा इत्यादी खेड्यांचा अंतर्भाव केल्यास एकूण ३९१ शिळावर्तुळे जवळजवळ १० हेक्टर इतक्या विस्तृत प्रदेशावर नोंदली गेली आहेत. या ठिकाणच्या शिळावर्तुळांचे उत्खनन १९८४-८५ व त्यानंतरही १९८७-८८, ८८-८९, ८९-९० या साली करण्यात आले.

रायपूरच्या दफनांची काही उल्लेखनीय वैशिष्ट्ये नमूद करणे आवश्यक आहे. सर्वात मोठे शिळावर्तुळ जवळजवळ २३ मीटर तर सर्वात लहान ८ मीटर व्यासाचे असून यातील काहींच्या शिळांवर उथळ, गोल चिन्हांच्या ओळी आढळून येतात. दफनाकरिता वापरलेल्या शिळा स्थानिक खडकात उपलब्ध होत्या. आजही हवामानातील तीव्र फरकामुळे (उन्हाळा - हिवाळा) खडकांना तेथे भेगा पडल्याचे दिसून येते आणि अशा खडकांतून मोठमोठ्या शिळा आजही लोखंडी पहारीच्या साहाय्याने काढल्या जातात. एकूण आठ शिळावर्तुळांचे उत्खनन करण्यात आले. मृतासाठी तयार करून ठेवण्यात आलेली परंतु न वापरलेली दोन - तीन शिळावर्तुळे येथे दिसून आली. चार शिळावर्तुळांमध्ये मानवी अवशेष सापडले तर इतर चारमध्ये ते सापडले नसल्याने कदाचित ते नष्ट झालेले असावेत अथवा ती दफने सांकेतिक स्वरूपाची असावीत असे म्हणता येते. दुसरे वैशिष्ट्य असे की एका शिळावर्तुळात एकच व्यक्ती किंवा त्याचे अवशेष पुरण्यात आलेले नसून काही दफनांमध्ये दोन किंवा तीन व्यक्तींचे अवशेषही ठेवण्यात आलेले होते. एका दफनांमध्ये तर खालच्या स्तरावर प्रौढाचे अवशेष आणि त्याच दफनामध्ये काहीशा वरच्या स्तरावर लहान मुलाचे अवशेष पुरलेले आढळले. एकूण पाच ते सहा व्यक्तींचे अवशेष उपलब्ध झाले. यापैकी एका दफनामध्ये १२ ते १५ वयोगटाच्या व्यक्तीचे अवशेष होते तर दुसऱ्या एका मृताचे वय अंदाजे १० वर्षाचे असावे. लहान मुलाच्या दफनाच्या संदर्भात रायपूरची दफने लक्षणीय ठरली आहेत.

वयोगटातील विविधतेवरोबर शिळावर्तुळातील निरनिराळ्या रचनांचे प्रकारही नमूद करणे आवश्यक आहे. काही शिळावर्तुळांच्या मधोमध चार - पाच प्रचंड शिळा दगडगोट्यांच्या टेकूच्या साहाय्याने लावून त्यांची जणू

काही एक ओबडधोबड पेटिकाच तयार केलेली होती (फलक २७ : अ). हिची खोली जवळजवळ १.५ मीटर असून लांबी - रूंदी प्रत्येकी १ मीटर होती. दुसऱ्या एका दफनामध्ये मधोमध जवळजवळ १.५ मीटर लांबीच्या आणि पाऊण मीटर रूंदीच्या फरशांच्या साहाय्याने पेटिका तयार करण्यात आली. या पेटिकेच्या मधोमध दोन फरशा उभ्या ठेवून दोन कप्पे केलेले होते. या पेटिकेवर फरशीचे झाकण ठेवलेले होते (फलक २६ : ब, क). मात्र या दोन्ही प्रकारच्या पेटिकांच्या आत मानवी अवशेष सापडले नाहीत.

मृतावरोबर, इतर ठिकाणी आढळून आलेल्या वर्गाची मडकी ठेवल्याचे दिसून आले. यांचे आकारही फारसे विभिन्न नव्हते; फक्त लाल वर्गाच्या मडक्यात पसरट बुडाचे स्टँड आणि बाजूला अर्धगोल कड्या (हॅण्डल) असलेले वाडगे उल्लेखनीय आहेत. याशिवाय काळ्या रंगात चित्रकारी केलेली लाल खापरेही मिळाली. या खापरांचा पोत, आकार आणि चित्रकारीचे प्रकार नैकुंडशी मिळतेजुळते आहेत. याशिवाय काही खापरांवर उत्कीर्ण रेषा आहेत (फलक २८ : क). यामध्ये एका घड्यावर कोरून काढलेले जनावराचे चित्र अप्रतिम आहे. या जनावराचे पाय उंच व शरीर काहीसे लांबट असून याची छोटी शेपटी आणि वशिंडही यथार्थपणे दाखवलेले आहे. त्या मानाने तोंड लहान असून डोक्यावर शिंगे दाखविली आहेत. हे बैलाचे चित्र असावे याबद्दल शंका उरत नाही. (फलक २९ : ग).

दफनामध्ये तांब्याच्या जाड बांगड्या (फलक ३४ : क), तारेची वळी, आंगठ्या आणि तांब्याची अनेक लहानलहान वळी एकमेकांत गुंतवून केलेला कंठहार, तांब्याच्या पत्र्याचे वाडगे आणि त्यावरील अलंकृत माथ्याच्या वैशिष्ट्यपूर्ण झाकण्या (या अलंकरणात चार पक्षी व लहान पशूची जोडी यांचा उल्लेख करणे आवश्यक आहे), आणि घोड्याच्या अंगावर घालण्यासाठी बनविलेले उत्कृष्ट अलंकार ठेवलेले होते. यातील घंटा, पत्र्याच्या बनविलेल्या चंद्रकोरी आणि पदके, यांच्या शिवाय घोड्याच्या मुखावर घालण्यासाठी बनविलेला जाड पत्र्याचा दागिना उल्लेखनीय आहे (फलक ३३ : अ) हा दागिना आणि इतर घटक माहूरझरी (फलक ३३ : क)

आणि खापा (फलक ३३ : ब). या ठिकाणी सापडलेल्या घोड्याच्या दागिन्याप्रमाणेच असले तरी रायपूरचा अलंकार अनेक छोट्या घटकांनी आणखी अलंकृत केलेला होता. हा दागिना तांब्याच्या जाड पत्र्यापासून केलेला असला तरी याच्यावर तांब्याच्या गोल चकत्या, मागे लोखंडी छोट्याछोट्या पट्ट्यांच्या साहाय्याने दर्शनी भागावर बसविल्या होत्या. या दागिन्याला वरच्या भागावर दोन उंच होत गेलेले शिंगासारखे घटक असून त्यावर कदाचित गोंडे लटकविले जात असावेत. अशा दागिन्याबरोबरच अनेक लहानलहान तांब्याच्या नळ्या आणि दोन हूक असलेली, पानाच्या आकाराची पदके घोड्याच्या अवशेषावरोवर सापडली. या नळ्या आणि पदके बहुधा एकत्र ओवून घोड्याच्या गळ्यात किंवा पुठ्ठ्यावर दोन्ही बाजूला बसवीत असावेत. या दागिन्यावरोबरच तांब्याच्या पत्र्याची बनविलेली लहान आकाराची कासवाची आकृती या लोकांच्या तंत्र - कौशल्याची त्याचप्रमाणे सौंदर्यदृष्टीची साक्ष पटविते. तांब्याव्यतिरिक्त सोन्याच्या बनविलेल्या अगदी लहानलहान बाळ्या ( ? ) व सोन्याच्या तारेपासून बनविलेले अलंकरण उल्लेखनीय आहे. (Deglurkar & Lad 1992)

मृतावरोबर लोखंडाच्या निरनिराळ्या वस्तू पुरल्या जात. यामध्ये कट्यारी, भाले, बाणाग्रे यांच्यासारखी हत्यारे; कुऱ्हाडी, छिन्न्या, राप्या आणि चाकू यासारखी अवजारे; आणि दिवे आणि कढयासारखी भांडी व नखण्यासारखी प्रसाधनाची साधने होती. घोड्याच्या तोंडात बसविली जाणारी 'व्हटाळी', ज्या दफनामध्ये घोड्याचे अवशेष पुरले होते त्यात सापडली. याशिवाय काही दफनात नैकुंडप्रमाणे दगडी बत्तेही ठेवलेले आढळले. बोरगावप्रमाणेच रायपूरच्या दफनामध्ये विविध रंगीबेरंगी दगडाचे – कार्नेलियन, ॲगेट, जास्पर, स्फटिक वगैरे – विविध आकाराचे १७२ मणी सापडले. कार्नेलियनच्या मण्यामध्ये पांढऱ्या रंगात पक्की नक्षी केलेले मणी संख्येने जास्त होते. रायपूरच्या दफनांचा कालखंड शास्त्रीयदृष्ट्या निश्चित करता आला नाही, परंतु ही दफने विदर्भातील इतर दफनांच्या कालखंडातीलच असावीत याबद्दल संशय असण्याचे काही कारण नाही.

**संपर्क स्थले**

आतापर्यंत दफनभूमींची स्थले व दफनभूमी आणि वस्ती एकाच ठिकाणी असलेली स्थले, या दोन वर्गातील उत्खनित स्थलांचा आढावा घेण्यात आला. ज्या ठिकाणी दफनेही नाहीत आणि वस्तीचा पुरावा उपलब्ध नाही, परंतु जेथे महापाषाण संस्कृतीच्या संपर्काचा आणि प्रभावाचा काही पुरावा मिळाला आहे अशा तिसऱ्या वर्गातील काही उत्खनित स्थलांचा आढावा घेणे सांस्कृतिक संदर्भाच्या दृष्टीने उपयोगी ठरेल. अशा स्थलांमध्ये अमरावती जिल्ह्यातील कौंडिण्यपूर, वर्धा जिल्ह्यातील पवनार, यवतमाळ जिल्ह्यातील अर्णी आणि नागपूर जिल्ह्यातील थारसा यांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. पश्चिम महाराष्ट्रातील रंजाळे, टेकवडा आणि पिंपळसुटी येथील पुराव्याचा उल्लेख ताम्रपाषाणयुगाच्या संदर्भामध्ये आधी केलेला आहेच.

कौंडिण्यपूर येथे अगदी प्रथम वस्तीच्या थरामध्ये उत्कीर्ण चिन्हे असलेली काळी - आणि - तांबडी मडकी, लोखंडाच्या चपट्या कुऱ्हाडी व दफनामध्ये आढळून येणारे पांढऱ्या रंगात नक्षीकाम केलेले गोल लहान वटिकेच्या आकाराचे कार्नेलियनचे मणी सापडल्याचा उल्लेख आहे (फलक ३५ : अ). यावरून उत्खनकाने या कालखंडाला 'महापाषाणीय' असे नाव दिले असले तरी ही वस्ती पूर्णपणे महापाषाणीय संस्कृतीच्या लोकांची होती असे म्हणता येत नाही. पवनार येथील पहिल्या वस्तीच्या थरामध्ये पातळ पोताची काळी - आणि - तांबडी खापरे त्याचप्रमाणे तांबड्या पृष्ठभागावर काळ्या रंगात चित्रकाम केलेली खापरे आढळली. परंतु यांच्याबरोबर लोखंडाची एकही वस्तू सापडली नाही. खापरावरील काळी चित्रकारी मात्र दफनात इतरत्र सापडलेल्या अशाच खापरांची आठवण करून देते. यवतमाळ जिल्ह्यातील अर्णी येथेही पहिली वस्ती महापाषाण संस्कृतीची झाल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. या ठिकाणी या वस्तीमध्ये काळी - आणि - तांबडी खापरे त्याचप्रमाणे तांबड्या पृष्ठभागावर काळ्या रंगात चित्रकाम केलेली मडकी इत्यादी अवशेष मिळाले. थारसाच्या उत्खननाद्वारे

महापाषाणीय संस्कृतीची तेथे मिळालेल्या काळ्या- आणि-तांबड्या खापरांवरून व इतर अवशेषांवरून कल्पना करता आली. (Dikshit 1968 : Deo & Dhavalikar 1968 : *IAR* 1978 - 79; 81 - 82 : 84 - 85 etc )

**वैशिष्ट्ये**

महापाषाण संस्कृतीच्या आतापर्यंत घेतलेल्या आढाव्यावरून काही वैशिष्ट्ये महाराष्ट्राच्या संदर्भात स्पष्ट होतात. त्यांचा उल्लेख केल्याने महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये या संस्कृतीचे योगदान कशा प्रकारचे होते याची कल्पना येते.

(१) या संस्कृतीचा आढळ प्रामुख्याने विदर्भाच्या पूर्व भागामध्ये होतो. पश्चिम विदर्भ आणि त्याही पश्चिमेच्या महाराष्ट्रात या संस्कृतीची स्थले नगण्य आहेत. मात्र उत्तर आणि मध्य महाराष्ट्रामध्ये या संस्कृतीचा थोडाफार प्रभाव ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीच्या शेवटच्या कालखंडात पडल्याचे जाणवते.

(२) या संस्कृतीच्या लोकांनी विदर्भामध्ये लोखंडाचे तंत्रज्ञान आत्मसात करून लोखंडाच्या विविध वस्तूंचा वापर रूढ केला. यांचा कालखंड इसवीपूर्व ८०० किंवा त्याहून थोडा आधीचा ते इसवीपूर्व ५ वे ४ थे शतक असा निश्चित करता आलेला आहे.

(३) खैरवाडा आणि कौंडिण्यपूर येथे या संस्कृतीचा, तिच्या उत्तरकालात, इतर प्राचीन ऐतिहासिक लोकांशी संपर्क आल्याची सूचना मिळते.

(४) या संस्कृतीच्या लोकांच्या दफन-स्थलांची संख्या वस्तीच्या स्थलांपेक्षा संख्येने कितीतरी मोठी आहे. याचे प्रत्यंतर विदर्भात येते. यावरून हे लोक काहीसे शेतकरी परंतु बरेचसे फिरते होते असे मत मांडले गेले आहे.

(५) दफनामध्ये सर्वसाधारणपणे शिळावर्तुळ या पद्धतीचा वापर प्रचलित असला तरी त्यात आतील रचनेमध्ये काहीशी विविधता होती असे जाणवते. हे वेगळेपण याच संस्कृतीमध्ये असणाऱ्या काही गटांचे अथवा पोटभेदाचे अस्तित्व दर्शवित असावे असे अनुमान करता येते.

(६) दफनामध्ये संपूर्ण सांगाडे क्वचितच सापडले आहेत. त्याचप्रमाणे अगदी लहान मुलांची दफनेही नाहीतच, तसेच वृद्धांचीही दफने नाहीत. जी दफने उपलब्ध आहेत ती बहुतांशी दुय्यम स्वरूपाची म्हणजे मृताची उपलब्ध असणारी हाडेच पुरणे या स्वरूपाची आहेत. या लोकांच्या शारीरिक ठेवणीची कल्पना फारशी करता येत नाही.

(७) मृताबरोबर ठेवलेल्या वस्तूंमध्ये लोखंडाच्या वस्तूंची संख्या सर्वात जास्त आहे. यामध्येही शस्त्रास्त्रांची संख्या, दररोजच्या वापरातील किंवा शेतीस उपयोगी पडणाऱ्या वस्तूंपेक्षा तुलनेने जास्त आहे. शस्त्रांचा आणि घोड्यांचा वापर असल्यामुळे हे लोक मुलुखगिरी करणारे असावेत असे अनुमान करता येते. असे असूनही यांच्यातील एक गट शेतीचा अवलंब करून विविध पिकांचे उत्पादन करीत होता असे दिसते. याशिवाय लोखंडाचे शुद्धीकरण करून त्यापासून विविध वस्तू बनविणाऱ्या कारागिरांचा ( लोहारांचा ) एक वर्ग या समाजामध्ये होता. लोखंडाच्या शुद्धीकरणासाठी वापरलेले लोहखनिज विदर्भातच उपलब्ध होते हे शास्त्रीय पृथःकरणावरून सिद्ध झाले आहे. या शिवाय सुवर्णकार, मणिकार, लाकूडकाम करणारे सुतार, पाथरवट असे कारागीरही तत्कालीन समाजात होते.

(८) या समाजामध्ये सधन आणि साधारण असे आर्थिक वर्ग निश्चित असले पाहिजेत. याचे प्रत्यंतर दफनामध्ये ठेवलेल्या विविध वस्तूंमध्ये आणि त्यांच्या संख्येमध्ये दिसून येते. फक्त काही दफनामध्येच अलंकार घातलेल्या घोड्याचा बळी दिल्याचा पुरावा, तर इतर काहींमध्ये सोन्याच्या दागिन्यांची आणि वैशिष्ट्यपूर्ण मण्यांची संख्या हेच दर्शविते. काही वेळा एका दफनामध्ये एकापेक्षा जास्त व्यक्तींचे

अवशेष आढळल्याने त्या व्यक्ती एकाच कुटुंबातील असाव्यात असे अनुमान करता येते.

(९) सोने, तांबे इत्यादी धातू वा वस्तू मिळविण्यात या लोकांचा इतर प्रदेशांशी संबंध आला असावा. विदर्भात आणि उर्वरित महाराष्ट्रामध्ये सोने व तांबे नगण्य स्वरूपात आहे. ्या उलट हे धातू आंध्र - कर्नाटकामध्ये उपलब्ध आहेत. लोखंडाचा आणि तांब्याचा वापर एकाच वस्तूच्या बनावटीत करण्याचे कसब या लोकात होते हे घोड्याच्या साजावरून त्याचप्रमाणे तांब्याच्या गडव्याचे तीन भाग लोखंडी पिनांनी जोडण्याच्या तंत्रावरून ( फलक ३४ : अ ) व लोखंडी पाते व तांब्याची मूठ असलेल्या कट्यारीच्या बनावटीवरून स्पष्ट होते.

(१०) या लोकांच्या धर्मविषयक कल्पनांचा अंदाज उपलब्ध पुराव्यावरून फारसा येत नाही. मृतात्म्याबद्दल आदर आणि मृत्यूनंतर मृत व्यक्तीला काही गरजा असतात अशा तऱ्हेच्या रूढ कल्पना, ही दोन वैशिष्ट्ये स्पष्ट होतात.

(११) या संस्कृतीची, प्राचीन ऐतिहासिक काळातील नागरी संस्कृतीच्या उदयामुळे पिछेहाट झाली असावी. दक्षिण भारतामध्ये या संस्कृतीची दफने इसवीच्या पहिल्या - दुसऱ्या शतकापर्यंत प्रचलित होती हे या संदर्भात लक्षात घेणे जरूर आहे.

* * *

# निवडक संदर्भ ग्रंथ व लेख

## (मराठी)


कर्वे, इरावती

– मराठी लोकांची संस्कृति (पुणे, १९६२)

कर्वे, चिं. ग. आणि जोगळेकर, स. आ.

– महाराष्ट्र परिचय (पुणे, १९५८)

केतकर, श्री. व्यं.

– प्राचीन महाराष्ट्र ('शातवाहन पर्व' विभाग पहिला) (पुणे, १९३५)

गोयल, श्रीराम

– प्राचीन भारतीय अभिलेख संग्रह (जयपूर, १९८२)

जोगळेकर, स. आ.

– सह्याद्रि (पुणे, १९५२)

जोशी, शं. बा.

– मराठी संस्कृती (पुणे, १९५२)

डिसकळकर, द. बा.

– महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास व संस्कृति (पुणे, १९६४)

ढवळीकर, म. के.

– पुरातत्वविद्या (मुंबई १९८०)
– 'प्रागैतिहासिक महाराष्ट्र' : भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, त्रैमासिक, ६२ : १-४, १९८३-८४ पृ. १७-३६

दास्ताने, सं. व हार्डीकर, ब.

– 'महाराष्ट्र १९८३' (पुणे, १९८३)
– 'महाराष्ट्र १९९२' (पुणे, १९९२)

देव, शां. भा.

– महाराष्ट्रातील उत्खनने (नवी दिल्ली १९६२)
– पुरातत्वविद्या (पुणे, १९७६)
– महाराष्ट्र - एक पुरातत्वीय समालोचन (मुंबई १९६८)
– महाराष्ट्र व गोवे शिलालेख व ताम्रपटांची वर्णनात्मक संदर्भ सूची (मुंबई १९८२)
– प्राचीन महाराष्ट्र : भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे त्रैमासिक वर्ष ६२, अंक १-४, शके १९०५-०६, पृ. ५८ पासून पुढे

देशपांडे, चं. धुं.

– महाराष्ट्राचा भूगोल (मराठी अनुवाद : मो. द. तावडे) (नवी दिल्ली, १९७६)

पप्पू, स. सु.

– 'अश्मयुगीन महाराष्ट्र - नवे संशोधन' : भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे त्रैमासिक, वर्ष ६२, अंक १-४, १९८३-८४, पृ. ४५-५७

पेंडसे, शं. दा.
– महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास (पुणे, १९६५)

राजगुरू, श. न. आणि अभ्यंकर, हेमांगी
– 'महाराष्ट्रातील प्रागैतिहासिक पर्यावरण' : भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, त्रैमासिक, वर्ष ६२, अंक १-४, १९८३-८४ पृ. ३७-४४

सरदार, गं. बा. व इतर (संपा.)
– महाराष्ट्र : जीवन परंपरा, प्रगती आणि समस्या (पुणे, १९६०)

सांकलिया, ह. धी. व माटे, म. श्री. (संपा.)
– महाराष्ट्रातील पुरातत्व (मुंबई १९७६)

* * *

# निवडक संदर्भ ग्रंथ व लेख

## ( इंग्रजी )


**Agrawal, D. P.**
1971 : The Copper Bronze Age In India ( New Delhi )
1981 : The Archaeology of India ( London )
**-- and Ghosh. A (ed.)**
1973 : Radiocarbon and Indian Archaeology (Bombay)

**Allchin, B. and Allchin, R.**
1982 : The Rise of Civilization in India and Pakistan (London)

**Allchin, F. R.**
1963 : Neolithic Cattle-keepers of South India (Cambridge)

***Ancient India,***
Bull. of the Archaeological Survery of India (New Delhi)

**Badam, G. L.**
1979 : Pleistocene Fauna of India ( Poona )

**Banerjee, N. R.**
1965 : The Iron Age in India ( Delhi )

**Bhagwat, A. K. (ed.)**
1977 : Maharashtra - A Profile : V. S. Khandekar Felicitation Volume ( Kolhapur)

**Bhandarkar, R. G.**
1895 : Early History of the Deccan ( Calcutta )

**Blanford W. T.**

1872 : 'Geology of Nagpur and Its Neighbourhood' in *Mem. Geo Surv. of India*, Vol. 9, Pt. II, PP. 295-325

***Bulletin of the Deccan College Post - Graduate & Research Institute, Poona.***

**Corvinus, G. K.**

1970 : ' A Report on the 1968-69 excavations at Chirki on Pravara

*Quaternaria*, XIII, pp. 169-76

**Deglurkar, G. B. and Lad, Gouri, P.**

1992 : Megalithic Raipur (1985-90), ( Pune )

**Deo, S. B.**

1969 : Songaon Excavation (1965), ( Poona )

1970 : Excavations at Takalghat and Khapa (1968-69), ( Nagpur )

1970 .: Archaeological Congress and Seminar Papers (ed.) ( Nagpur )

1973 : Mahurjhari Excavation ( Nagpur )

1973 a : Problem of South Indian Megaliths (Dharwar)

( in press ) : Borgaon Excavation

: Excavations at Khairwada

: Excavations at Bhagimahari

: Further Excavations at Mahurjhari

**-- and Ansari, Z. D.**

1965 : Chalcolithic Chandoli ( Poona )

**-- and Dhavalikar, M. K.**

1968 : Paunar Excavation (1967), ( Nagpur )

1970 : (ed.) Studies in Indian Archaeology : Sankalia Felicitation Volume (Bombay)

**-- and Dhavalikar, M. K. and Ansari, Z. D.**
1976 : Apegaon Excavations ( Poona )

**-- and Jamkhedkar, A. P.**
1982 : Naikund Excavations (1978-80), (Bombay)

**-- and Paddayya, K.**
1985 : (ed.) Recent Advances in Indian Archaeology ( Poona )

**Deshpande, C. D.**
1948 : Western India : A Regional Geography ( Dharwar )

**Dhavalikar, M. K.**
1988 : The First Farmers of the Deccan ( Poona )

**Dhavalikar, M. K. , Sankalia, H. D. and Ansari, Z. D.**
1988 : Excavations at Inamgaon ( Poona )

**Dikshit, K. R.**
1971 : Maharashtra Region in India - A Regional Geography ( Varanasi )
1976 : " Geomorphic Features of the West Coast of India between Bombay and Goa, " *Geographical Review*, Vol. 38, No. 3, PP. 260-81
1986 : Maharashtra in Maps (Bombay)

**Dikshit, M. G.**
1968 : Kaundinyapura (Bombay)

**Ghosh, A. (ed.)**
1989 : Encyclopaedia of Indian Archaeology (New Delhi) 2 Vols.

**Government of Maharashtra**
1968 : Geology and Mineral Resources of Maharashtra (Nagpur)

**Gupta, S. P.**
1972 : Disposal of the Dead and Physical Types in Ancient India (Delhi)

*Indian Archaeology - A Review* (1953 - 54 ff.)
(*IAR*) Archaeological Survey of India, New Delhi.

**Jain, J. C.**
1947 : Life in Ancient India as depicted in the Jaina canon (Bombay)

**Kajale, M. D.**
1974 : Ancient Grains from India *Bulletin of the Deccan College Res. Instt. Poona* XXXIV, 1-4, pp. 55-74
1988 : Ancient . Plant Economy at Chalcolithic Tuljapur Garhi, Dist. Amaraoti, Maharashtra, *Current Science*, pp. 377-79

**Badam, G. L. and Rajaguru, S. N.**
1976 : Late Quaternary History of the Ghod Valley, Maharashtra, *Geophytology*, 6, I. pp. 122-32

**Karve, I.**
1968 : Maharashtra, : Land and Its People (Bombay)

**Kosambi, D. D.**
: Megaliths in Poona District, *Man*, LXII, pp. 65-67

**Krishnaswami, V. D.**
1949 : Megalithic Types of South India " *Ancient India*, No. 5 (Delhi), pp. 35-45

**Leshnik, L. S.**
1974 : South Indian ' Megalithic ' Burials, (Wiesbaden)
-- **and Sontheimer, G. (ed.)**
1975 : Pastoralists and Nomads in South Asia, (Wiesbaden)

**Majumdar, R. C. and Pusalker, A. D. (ed.)**
1965 : The Vedic Age (Bombay)

**Malik, S. C.**
1959 : The Stone Age Industries of Satara District (Baroda)

***Man and Environment,*** (Journal of the Indian Society for Prehistoric and Quaternary Studies, Pune).

**Misra, V. N.**
1989 : ' Stone Age India : An Ecological Perspective, *Man and Environment*, XIV (I), PP. 17-64
**-- and Bellwood, P. (ed.)**
1985 : Recent Advances in Indo-Pacific Prehistory ( New Delhi : Oxford )

**Narain, A. K. (ed.)**
1969 : Seminar Papers on the Problem of Megaliths in India (Varanasi)

**Padhye, S. S.**
1963 : ' Climate of the Deccan Trap Region of Vidarbha, *Indian Geographical Magazine,* Vol. XXXVIII, No. 3-4

**Pofali, R. M.**
1980 : ' The Geomorphological Features of Nagpur District, Maharashtra ' *Transaction of* I. I. G., Vol. 2, No. 2

**Possehl, G. L.**
1988 : ' Radiocarbon Dates from South Asia ' *Man and Environment* 12, pp. 169-196

***Puratatva,*** Journal of the Indian Archaeological Society (Delhi)

**Rajaguru,, S. N.**

1969 : ' On the Late Pleistocene of the Deccan, India ', *Quaternaria* , XI, PP. 241-53

1971 : ' Chronology and Environment of early Man in Western Maharashtra ', *The Origin of Homo Sapiens : Ecology and Conservation.* 37, P. 101 ff.

**Randhawa, M. S.**

1980 : A History of Agriculture in India, Vol. I (New Delhi)

1982 : Vol. II

1983 : Vol. III

**Rao, Gururaja, B. K.**

1972 : The Megalithic Culture in South Indian (Mysore)

1978 : (ed.) Decade of Archaeological Research in South India (Dharwar)

**Rao, S. R.**

1962/63 : ' Excavations at Rangpur and other Explorations in Gujrat, ' *Ancient India,* No. 18-19, PP. 5-207 (New Delhi)

**Sali, S. A.**

1986 : Daimabad : 1976 - 79 (New Delhi)

**Sankalia, H D.**

1939 : Megalithic Monuments near Poona, *Bull. of the Deccan Coll. Res. Instt.* I, PP. 178-84

1952 : The Godavari Palaeolithic Industry (Poona)

1961 : Technical Report on Archaeological Remains (Poona)

1963 : ' New Light on the Indo-Iranian or Western Asiatic Relations between 1700 BC - 1200 BC ' *Artibus Asiae,* XXVI, pp. 312 - 332

1969 : ' Iranian Influence on early Indo-Pakistan Cultures , ' *Indica,* 6, 2, pp. 60-80

1974 : Prehistory and Protohistory of India and Pakistan (Poona)

1976 : ' Ecological Background of the Chalcolithic Cultures of India, ' *Ecological Background of South Asian Prehistory :* Ed. K. A. R. Kennedy and Possehl, G., Cornwell, P. 132-65

1977 : Prehistory of India, (New Delhi)

1977a : New Archaeology : Its Scope and Application to India (Lucknow)

1978 : Indian Archaeology Today, ( Delhi )

**-- and Deo, S. B.**

1955 : Report on the Excavations at Nasik and Jorwe (Poona)

**Deo, S. B. and Ansari, Z. D.**

1969 : Excavations at Ahar (Tambavati) (Poona)

1971 : Chalcolithic Navdatoli (Poona)

**Deo, S. B., Ansari, Z. D. and Ehrhardt, S.**

1960 : From History to Prehistory at Nevasa ( Poona )

**Subbarao, B and Deo, S. B.**

1958 : Excavations at Maheshwar and Navdatoli (1952-53), (Poona)

**Sircar, D. C.**

1966 : Indian Epigraphical Glossary ( Delhi )

**Subbarao, B.**

1958 : The Personality of India (Baroda)

**Sundara, A.**

1975 : The Early Chamber Tombs of South India ( Delhi )

**Thapar, B. K.**

1964 : 'Relation of the Indian Chalcolithic with West Asia,' in Misra V.N. and Mate, M. S. (ed.). *Indian Prehistory,* (Poona)

1964-65 : ' Prakash - A Chalcolithic Site in Tapti Valley, *Ancient India,* Nos. 20-21 (1964-65) New Delhi

1985 : Recent Archaeological Discoveries in India (Tokiyo)

**Tikekar, S. R.**

1971 : Maharashtra (New Delhi)

**Vishnu-Mittre**

1989 : 'Forty Years of Archaeobotanical Research in South Asia,' *Man and Environment,* Vol. XIV, No. 1 (Jan.-Jun.), PP. 1-6

**Wheeler, R. E. M.**

1947-48 : Brahmagiri and Chandravalli - 1947 : Megalithic and other Cultures in Mysore State, *Ancient India,* No. 4, PP. 180-310 (New Delhi)

1959 : Early India and Pakistan (London)

**Yazdani, G.**

1960 : Early History of the Deccan (Oxford)

* * *

परिशिष्ट : १

# पाषाणयुगीन अवशेष सापडलेली स्थले

( *Indian Archaeology - A Review* : 1953 - 54 ff. )

---

पाषाणयुगाच्या विविध कालखंडातील हत्यारे व अश्मीभूत झालेली जनावरांची हाडे सापडलेल्या जवळपास तीनशे स्थलांची नोंद आतापर्यंत झालेली आहे. यातील बरीच हत्यारे वरवर – म्हणजे स्तरीय संदर्भात नव्हे – सापडलेली आहेत. या सर्व स्थलांची यादी देण्यापेक्षा केवळ निवडक महत्वाच्या स्थलांची नोंद खाली दिलेली आहे. ही यादी इंडियन अर्किऑलॉजी - ए रिव्ह्यू, एन्शन्ट इंडिया, उत्खनन वृतांत, लेख व 'एन्साइक्लोपीडिया ऑफ इंडियन अर्किऑलॉजी' इत्यादी ग्रंथाच्या आधारे तयार करण्यात आली आहे.

**हत्यारे येथे बनविली जात असा पुरावा देणारी स्थले :**

**अहमदनगर जिल्हा**

(१) चिरकी नाला (२) दैठण गुंजाळे

**औरंगाबाद जिल्हा**

(१) डोंगरगाव

**कुलाबा जिल्हा**

(१) कोतुर्डे

**चंद्रपूर जिल्हा**

(१) रामडिगी

**धुळे जिल्हा**

(१) धवलापाडा (२) रणाळे खुर्द (३) रायगड
(४) वाडजेरवाण (५) सारंगखेडा (६) शिरवाड

**नागपूर जिल्हा**

(१) कोराडी

**नाशिक जिल्हा**

(१) गंगापूर

**पुणे जिल्हा**

(१) डेक्कन कॉलेज परिसर (२) दत्तवाडी (३) बोरी

**रत्नागिरी जिल्हा**

(१) मालवण

**वैशिष्ट्यपूर्ण स्थले**

विदर्भातील प्रख्यात ताडोबा सरोवराच्या उत्तर तीरावर पुराश्मयुगाची ॲश्यूलियन वर्गाची हत्यारे सापडली आहेत. नैसर्गिक तळ्याच्या काठी सापडलेले या कालखंडातील महाराष्ट्रातील बहुधा हे पहिलेच स्थल असावे ( *IAR*. 1979-80. p. 57 )

अहमदनगर जिल्ह्यातील नेवाशापासून सुमारे १४ किलोमीटर अंतरावर असलेल्या संगम या ठिकाणी संपूर्णपणे अश्मीभूत अवस्थेतील लाकडाचा तुकडा सापडला. नोंद झालेला या प्रकारचा महाराष्ट्रातील हा बहुधा पहिला पुरावा असावा. ( *IAR*. 1955-56. p. 5 )

पुरापर्यावरणतज्ज्ञांनी केलेल्या शास्त्रीय पाहाणीनुसार ठाणे जिल्ह्यातील भुइगाव आणि गास या ठिकाणी समुद्र सध्यापेक्षा सुमारे दोन किलोमीटर आत होता असे आढळून आले आहे. ( *IAR*. 1980-81. p. 43 )

* * *

## परिशिष्ट : १ अ

# प्राण्यांची अश्मीभूत अवस्थेतील हाडे सापडलेली स्थले

**गोदावरी**

| | |
|---|---|
| गंगावाडी | – बैलाचा जबडा (*Bos* / sp.) |
| नांदूर मघमेश्वर | – हत्ती (*Elephas namadicus*) |
| | पाणघोडा (*Hippopotamus*) |
| निफाड | – बैलाच्या डोक्याचा भाग (*Bos* / sp. 2) |
| | (बहुधा) गेंड्याचे मणके (Rhinoceros) |
| बोरगाव (पैठणजवळ) | – हत्तीची हाडे (*Elephas Maximus*) |
| मुंगी (पैठण) | – हत्तीची कवटी (*Elephas namadicus*) |
| | हत्तीचा सुळा |

**घोड**

| | |
|---|---|
| इनामगावजवळ | – पाणघोडा, हत्ती, बैल, घोडा (?) |

**तापी**

| | |
|---|---|
| धुळे जिल्हा | – बैलाची हाडे (*Bos* / sp.) |

**प्रवरा**

| | |
|---|---|
| नेवासे, महेंदुरी, अकोला, संगमनेर, प्रवरासंगम, खुपटी, काळेगाव, दावणगाव विभाग | – आद्य बैल (*Bos* / *namadicus*) |
| | हत्ती (*Elephas namadicus*) |

म्हैस (*Bubalus palaeindicus*)

आद्य हत्ती (*Palaeoloxodon antiqus*)

हरीण (*Stegodon Insignis*)

सांबर (*Cervus* sp.)

गोड्या पाण्यातील कासव (*Trionyx* sp.)

कासव (*Batagur* sp.)

मगर (*Crocodilus* sp.)

गवा (*Bisob*)

**मांजरा**

मुगाव (मान्याड नदी) –

बैल (*Bos* sp.)

हरीण (*Cervus* sp.)

डुक्कर (*Sus* sp.)

धनेगाव, गंजापूर, वागदरी – हत्ती, रेडा, हरीण, घोडा, गाय, बैल

**मुळा**

मुळा धरण – बैल

हत्ती

* * *

परिशिष्ट : २

# महाराष्ट्रातील ताम्रपाषाणयुगीन अवशेष सापडलेली स्थळे

( *Indian Archaeology - A Review* : 1953 - 54 ff. )

**अमरावती जिल्हा**

तुळजापूर - गढी

**अहमदनगर जिल्हा**

काप्रे
कोल्हार खुर्द
खळशिंदे
खेड
खेडले परमानंद
गंगारगाव
गाटेवाडी
चिंचविहिरे
चिंचोली
जवळे
जाटप
जातेगाव
'जोर्वे
टोके (प्रवरासंगम)
ताराबाद
तिळापूर
दायमाबाद
निघोज
नेवासे
पाडेगाव
पाथ्रे खुर्द
पालवे खुर्द
पिंपरी वळाण
फत्त्याबाद
महिसगाव
महेंदुरी
माजरी
मुसळवाडी
वाजेवाडा
शिरस वडगाव
सात्रळ
सिन्नर
सुलतानपूर

**उस्मानाबाद जिल्हा**

करंजे
भूम

औरंगाबाद जिल्हा
- आपेगाव
- कंदारी
- कौसान (पैठण)
- जालना
- घास्ला
- वाळदगाव

कुलाबा जिल्हा
- रेवदंडा


चंद्रपूर (चांदा) जिल्हा
- अष्टी
- कुरूळ
- माडा
- मासलारिथ

जळगाव जिल्हा
- चित्तेगाव
- टेकवडा
- धानोरा
- नेरी बुद्रुक
- बोरवळ

धुळे जिल्हा
- उंटावद
- उद्धमगड
- उपारपिंड
- उंबरपाडा
- ओसरेल
- करंजकोप
- कवठे
- काकसवाडे
- काठोरा
- कांग्रा
- कापरखेडा
- कामगरखास
- कारडा
- कुकुरमुंडा
- कोठाळी
- कोपर्ली
- कोरट
- कोल्डे
- खापरखेडा
- खैरावा
- खोडसगाव
- खोळज
- गंगटे
- गिघाडे
- गोंडास
- घिरसगाव
- घोडद
- चिकसे
- चिंचखेडे
- चिंचोडे
- छाडवेल

धुळे जिल्हा (चालू)

जालवड खुर्द
जैतना
टाकळपाडा
टिटाणे
तापीखडकुले
तिसी
तिळाली
थाळमेर
दहिदुला खुर्द
दहिदुला वुद्रुक
देव्हाळे
धाडणे
धामदाह
धामदोद
धुळे
धुळोद
नाशिंद
नासरपूर
नाळवाक वुद्रुक
निझार
निमेळ
न्याहाळी
पथराह
पातोंडा
पारगाव
पिंपळस
पिंपळोद
पीर
प्रकाश
मोंडगाव
मुदवाड
मेदाणे
येसार
रंजाळे
राक्षसवाडा
रूणमाळी
रोजगाव
लेकुरवाळे
लोणखेड
लोणखेडा
वरूळ
वाघोडा
वारसुस
वालखेडे
वीरवली
वेके
वेहेरगाव
वेदाणे
शहादा
शिंदे
शेलू
शेवरवल्ली
सर्वाळे
साक्री
सातोळे





(डेक्कन कॉलेज)

फलक ३

पूर्व - पुराश्मयुगीन हत्यारे, नेवासे

(१ - ३ हातकुऱ्हाडी; ४ - ५ फरशा; ६ - ८ तासण्या)



फलक ४

(डेक्कन कॉलेज)

मध्य - पुराश्मयुगीन हत्यारे
( तासण्या आणि टोचे )

**धुळे जिल्हा (चालू)**

सामोडे
सारंगखेडा
सावल्डा
सुरपाण
सुळवाडा
सैताणे
सैदनगर
हागरीपाडा
हातनूर
हातळखिंडी
हातोडा
हिंगीर
हिंगोणी बुद्रुक

**नागपूर जिल्हा**

नगरधन

**नाशिक जिल्हा**

कातरपाडा
तामसवाडी
नाशिक
पिंपळदरे

**पुणे जिल्हा**

इनामगाव
कारेगाव
चांडोली
थेऊर
भिंगडेवाडी
वाळकी
सर्डेवाडी
साष्टेवाडी
सोनगाव

**बीड जिल्हा**

दारवंत
दारवंते
मंकापुरी
हिंगणगाव

**सोलापूर जिल्हा**

नारायण चिंचली

* * *

परिशिष्ट : ३

## महाराष्ट्रातील महापाषाण संस्कृतीची अवशेष सापडलेली स्थले

( *Indian Archaeology - A Review* : 1953 - 54 ff. )

**अमरावती जिल्हा**

कौंडिण्यपूर

**कोल्हापूर जिल्हा**

ऐनापूर हरळी

गडहिंग्लज

**गडचिरोली जिल्हा**

असोंडा

**चंद्रपूर जिल्हा**

आत्रुडी

उदापूर

उमरी

कहाळी

कुकुड चिमडा

खेमजाई

चकलपट

चाक विठलवाडा

चेकू कोसंबी

जोघोळी

डोंगरगाव

बांडेगाव

मसला टुकुन

रणपासोंडी

रावी

वरोरा

सिंधळे

सेलूर

हिरापूर

**नागपूर जिल्हा**

उदासा

उमरेड

कामटी

कुही

कुही तल

खापा

गंगापूर

चक्की खापा

चिंचोली

टाकळघाट - खापा

टाकळी

डोंगरमौदा

थरसा
दुधा
दुर्गमा
देवळी
देवळीभेट
नागपूर
नागलवाडी
नागाइवाडी
नैकुंड
बाडेगाव
बोरगाव
भागीमाहरी
मांढळ
माहुरझरी
रायपूर
वानाडोंगरी
वाग
वेलतूर
व्याड
संगम
सुकळी
सुकळी टाकळी
सोनेगाव
हिंगणे किन्ही

नांदेड जिल्हा
कोलनूर

पुणे जिल्हा
थेऊर
पिंपळसुटी
भोसरी

भंडारा जिल्हा
पिंपळगाव

यवतमाळ जिल्हा
अर्णि

रत्नागिरी जिल्हा
मासवी (?)

वर्धा जिल्हा
खैरवा
खैरवाडा

## परिशिष्ट : ४

# महाराष्ट्रातील उत्खनित स्थलाबद्दलची प्रकाशने


**अर्णि ( यवतमाळ )**

Indian Archaeology - A Review : 1978 - 79 ; 1981 - 82
Archaeological Survey of India, New Delhi.

**आपेगाव ( औरंगाबाद )**

**Deo, S. B., Dhavalikar, M. K. and Ansari, Z. D.**
Apegaon Excavations
Deccan College, Poona, 1976

**इनामगाव ( पुणे )**

**Dhavalikar, M. K., Sankalia, H. D. and Ansari, Z. D.**
Inamgaon Excavations
Deccan College, Poona, 1988

**कवठे ( धुळे )**

**Shinde, V. S.**
Bull. Deccan College, Res. Inst., ( 1985 ), 44 : 173 - 77

**कौंडिण्यपूर ( अमरावती )**

**Dikshit, M. G.**
Kaundinyapura
Bombay, 1968

**कौसान ( औरंगाबाद )**

Indian Archaeology - A Review : 1965 - 6
Archaeological Survey of India, New Delhi

**खैरवाडा (वर्धा)**

Indian Archaeology - A Review : 1981 - 82
Archaeological Survey of India, New Delhi

**चांडोली (पुणे)**

**Deo, S. B. and Ansari, Z. D.**
Chalcolithic Chandoli
Deccan College, Poona, 1965

**जुनापानी (नागपूर)**

Indian Archaeology - A Review : 1969-70
Archaeological Survey of India, New Delhi

**जोर्वे (अहमदनगर)**

**Sankalia, H. D. and Deo, S. B.**
Report on the Excavations at Nasik and Jorwe (1950-51)
Deccan College, Poona, 1955

**टाकळघाट (नागपूर)**

**Deo, S. B.,**
Excavations at Takalghat and Khapa (1968-69)
Nagpur, 1970

**टेकवडा**

Indian Archaeology - A Review : 1956-57
Archaeological Survey of India, New Delhi

**तुळजापूर - गढी (अमरावती)**

Indian Archaeology - A Review : 1963-64, 1965-66 anu 1984-85
Archaeological Survey of India, New Delhi

**थाळनेर (धुळे)**

Indian Archaeology - A Review : 1957-58,
Archaeological Survey of India, New Delhi

थारसा (नागपूर)

Indian Archaeology - A Review : 1984-85
Archaeological Survey of India, New Delhi

थेऊर (पुणे)

Indian Archaeology - A Review : 1969-70
Archaeological Survey of India, New Delhi

दायमाबाद (अहमदनगर)

**Sali S. A.**
Daimabad : 1976-79
Archaeological Survey of India, New Delhi (1986)
Indian Archaeology - A Review 1958-59 and 1974-75

नाशिक (नाशिक)

**Sankalia, H. D. and Deo, S. B.**
Report on the Excavations at Nasik and Jorwe (1950-51)
Deccan College, Poona, 1955

नेवासे (अहमदनगर)

**Sankalia, H. D., Deo, S. B., Ansari, Z. D. and Ehrhardt, S.**
From History to Prehistory at Nevasa (1954-56)
Deccan College, Poona, 1960

नैकुंड (नागपूर)

**Deo, S. B. and Jamkhedkar, A. P.**
Naikund Excavations : 1978-80,
Dept. of Archaeology & Museums,
Govt. of Maharashtra, Bombay and
Deccan College, Poona, 1982.

पवनार ( वर्धा )

**Deo, S. B. and Dhavalikar, M. K.,**
Paunar Excavations,
Nagpur University, Nagpur, 1968

पैठण ( औरंगाबाद )

- **Dikshit, M. G.**
Indian Archaeology - A Review, 1955 - 56
Archaeological Survey of India, New Delhi

- **Oldham, T.,**
Records of the Geological Survey of India.
I, pp. 65-69 (1868)

- **Pilgrim, G. E.,**
Records of the Geological Survey of India,
32, pp. 199-218 (1905)

- **Sankalia, H. D.,**
in Bulletin of the Deccan College, 4 - 3 (1944 )

- **Wynne, A. B.,**
Geological Magazine, 3 (1866)

- **Yazdani, G.,**
Ann, Rep. , Hyderabad Arch. Dept., 1936 - 7

प्रकाश ( धुळे )

Thapar, B. K.
Prakash - 1955 : A Chalcolithic Site in The Tapi Valley,
Ancient India, No. 20-21 (1964-65)
Archaeological Survey of India, New Delhi

बहाळ ( जळगाव )

Indian Archaeology - A Review : 1956-57
Archaeological Survey of India, New Delhi

**बोरगाव (नागपूर)**

Indian Archaeology - A Review : 1980-81
Archaeological Survey of India, New Delhi

**भागीमाहरी (नागपूर)**

Indian Archaeology - A Review : 1982-83, 1983-84
Archaeological Survey of India, New Delhi

**माहुरझरी (नागपूर)**

**Deo, S. B.,**
Mahurjhari Excavations,
Nagpur University, Nagpur, 1973

**रंजाळे (धुळे)**

Indian Archaeology - A Review : 1960-61
Archaeological Survey of India, New Delhi

**रायपूर (नागपूर)**

**Deglurkar, G. B., and Lad, Gouri, P.**
Megalithic Raipur (1985-90)
Deccan College, Pune, 1992

**वाळकी (धुळे)**

Indian Archaeology - A Review : 1985-86 ; 1986-87
Archaeological Survey of India, New Delhi


**सावल्डा (धुळे)**

Indian Archaeology - A Review : 1959-60
- Archaeological Survey of India, New Delhi

**सोनगाव (पुणे)**

**Deo, S. B.**
Songaon Excavation - 1967
Deccan College, Poona, 1969

* * *





फलक ५ (डेक्कन कॉलेज)

नवाश्मयुगीन हत्यारे

(१ - २ कुऱ्हाडी; ३ छिन्नी)


गारगोटीच्या छिलक्यांची हत्यारे (४ ते ३०)



(अर्कि. स. इं.)

फलक ६

ताम्रपाषाणयुगीन खापरे, सावल्डा वर्ग (१ - ८);
उत्तर हडाप्पा वर्ग (९ - १३)





फलक ७ (अर्कि. स. इं.)

ताम्रपाषाणयुगीन मडकी

दायमाबाद वर्गाची मडकी (१, २, ३, १०)


माळवा वर्गाची मडकी (४-९; ११-१२)




(अर्कि. स. इं.)

फलक ८

ताम्रपाषाणयुगीन मडकी, जोर्वे वर्गाची मडकी (१ - ५); राखी रंगाचे दफनकुंभ (६ - ७)





(डेक्कन कॉलेज)

फलक ९

तान्प्रपाषाणयुगीन वस्तू


१ : तांब्याची कट्यार, चांदोली
२ : तांब्याची कुऱ्हाड, चांदोली
३ : तांब्याची छिन्नी, चांदोली
४ : तांब्याचा वाळा, सोनगाव
५ : तांब्याचे गळ, नेवासे
६ : 'बैल - बाटली', चांदोली
७ : तांब्याची छिन्नी, चांदोली



फलक १०

(अर्कि. स. इं.)

ताम्रपाषाणयुग व महापाषाणयुग संस्कृती यांचा संपर्क दर्शविणारी दफनातील मडकी, टेकवडा.



फलक ११

महापाषाणयुगीन संस्कृतीचे अवशेष


(डेक्कन कॉलेज व म. रा. पु. सं. विभाग)

१ - ३ चित्रित खापरे

४ - ५ अभ्रकयुक्त तांबडी खापरे

६ - ७ काळी - आणि - तांबडी खापरे

८ - १० तांब्याची भांडी



अ

ब



फलक १२ (डेक्कन कॉलेज)

अ : आद्य बैलाच्या कवटीचा अश्मीभूत अवशेष, घोड खोरे, इनामगाव

ब : आद्य पाणघोडा, खालच्या जबड्याचे दात, घोड खोरे, इनामगाव

(सु. २०,००० वर्षपूर्व)



अ

ब



(डेक्कन कॉलेज)

फलक १३

अ : आद्य म्हैस, कवटीचा भाग, मांजरा खोरे, लातूर जिल्हा
(सु. २६,००० ते ३५,००० वर्षपूर्व)


ब : आद्य हत्ती, खालचा दात, मांजरा खोरे, लातूर जिल्हा
(सु. २६,००० ते ३५,००० वर्षपूर्व)



फलक १४ (डेक्कन कॉलेज)

ताम्रपाषाणयुग, माळवा संस्कृतीच्या घराचे अवशेष, इनामगाव

(इ. पूर्व सु. १६०० – १४००)



अ




ब

(डेक्कन कॉलेज व
अर्कि. स. इं.)

फलक १५

अ : ताम्रपाषाणयुग, मडकी भाजण्याची भट्टी, पूर्व-जोर्वे कालखंड, इनामगाव

ब : ताम्रपाषाणयुग, माळवा वर्गाचा चित्रित घडा, प्रकाश



अ

ब



फलक १६ (अर्कि. स. इं. व
डेक्कन कॉलेज)

अ : ताम्रपाषाणयुग, गारगोटीच्या छिलक्यांची हत्यारे, प्रकाश

ब : ताम्रपाषाणयुग, तांब्याच्या कुऱ्हाडी, चांदोली



अ



ब

(डेक्कन कॉलेज)

फलक १७

अ : ताम्रपाषाणयुग, खापरावर कोरलेली बैलगाडी, पूर्व - जोर्वे कालखंड, इनामगाव

ब : ताम्रपाषाणयुग, जोर्वे वर्गाच्या तोटीच्या मडक्यावर चितारलेली नाव, इनामगाव

ब



अ




फलक १८ (डेक्कन कॉलेज)

अ : ताम्रपाषाणयुग, उत्तर - हडाप्पाकालातील प्रौढाचे दफन, दायमाबाद

ब : ताम्रपाषाणयुग, चार पायाच्या कच्च्या रांजणातील दफन, पूर्व - जोर्वे कालखंड, इनामगाव



अ



ब




क

फलक १९


(डेक्कन कॉलेज;
अर्कि. स. इं.)


अ : ताम्रपाषाणयुग, पूर्व - जोर्वे कालखंडातील प्रौढाचे दफन, इनामगाव
ब : ताम्रपाषाणयुग, उत्तर - जोर्वे कालखंडातील प्रौढाचे दफन, इनामगाव
क : ताम्रपाषाणयुग, जोर्वे कालखंड, राखी रंगाच्या मडक्यातील मुलाचे दफन, दायमाबाद





अ ब





ड

क

फलक २०

(अ : अर्कि. स. इं.
ब, ड : डेक्कन कॉलेज)


अ : ताम्रपाषाणयुग, विविध प्राण्यांसह मानवाचे चित्रण असलेला माळवावर्गाचा रांजण, दायमाबाद

ब : ताम्रपाषाणयुग, मातीच्या डबीतील 'मातृका', जोर्वे कालखंड, इनामगाव


क : ताम्रपाषाणयुग, 'मातृका' मूर्ती, जोर्वे कालखंड, नेवासे

ड : ताम्रपाषाणयुग, बैलावर आरूढ होणारी 'मातृका', पूर्व - जोर्वे कालखंड, इनामगाव


अ




ब



क



ड



(अर्कि. स. इं.)


फलक २१

अ : ताम्रपाषाणयुग, 'रथ', दायमाबाद

ब : ताम्रपाषाणयुग, चाकावरील हत्ती, दायमाबाद

क : ताम्रपाषाणयुग, चाकावरील रेडा, दायमाबाद

ड : ताम्रपाषाणयुग, चाकावरील गेंडा, दायमाबाद





अ




ब

क



ड



(डेक्कन कॉलेज)


फलक २२

अ : ताम्रपाषाणयुग, जोर्वे कालखंड, लहान मुलाच्या दफनातील वाखाच्या धाग्यात ओवलेली तांब्याच्या मण्यांची माळ, चांदोली

ब : ताम्रपाषाणयुग, जळालेले सातूचे दाणे, इनामगाव

क : ताम्रपाषाणयुग, जळालेला वाटाणा, इनामगाव


ड : ताम्रपाषाणयुग, जळालेली खेसरी डाळ, इनामगाव



फलक २३ (नागपूर विद्यापीठ)

महापाषाण संस्कृती, पांढरीचे टेकाड, टाकळघाट

अ



ब




(डेक्कन कॉलेज)

फलक २४

अ : महापाषाण संस्कृती, शिळावर्तुळ, खैरवाडा


ब : महापाषाण संस्कृती, शिळेवरील उथळ गोल चिन्हें, रायपूर



फलक २५ (डेक्कन कॉलेज)

अ : महापाषाण संस्कृती, शिळावर्तुळातील वर्तुळ, भागीमहारी

ब : महापाषाण संस्कृती, शिळावर्तुळातील चौक व मार्ग, भागीमहारी



फलक २६ (डेक्कन कॉलेज)

अ : महापाषाण संस्कृती, शिळावर्तुळातील दगडी हौद (?), बोरगाव

ब : महापाषाण संस्कृती, शिळावर्तुळातील फरशांची पेटिका, रायपूर

क : फरशांच्या पेटीचे जवळून घेतलेले चित्र, रायपूर



अ

ब




क



फलक २७

(अ : डेक्कन कॉलेज,
ब - क : नागपूर विद्यापीठ)

अ : महापाषाण संस्कृती, शिळावर्तुळातील शिळांची कुंडी - रचना, रायपूर
ब : महापाषाण संस्कृती, मांडीवर कट्यार ठेऊन पुरलेला प्रौढ, माहूरझरी
क : महापाषाण संस्कृती, शिळावर्तुळात बळी देऊन पुरलेल्या घोड्याचे दात व लोखंडी 'कांटाळे' माहूरझरी





फलक २८

(अ - ब : अर्कि, स. इं.
क : नागपूर विद्यापीठ)

अ : महापाषाण संस्कृती, काळी - आणि - तांबडी मडकी, रंजाळे

ब : महापाषाण संस्कृती, काळी - आणि - तांबडी झाकणी, रंजाळे

क : महापाषाण संस्कृती, खापरावर कोरलेली चिन्हे, टाकळघाट-खापा





फलक २९

(अ - ब : नागपूर विद्यापीठ
क - ग : डेक्कन कॉलेज)

महापाषाण संस्कृती : विविध मृद्‌भांडी



ब




अ

फलक ३०　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　(डेक्कन कॉलेज)

अ : महापाषाण संस्कृती, शुद्ध लोखंड तयार करण्याची भट्टी, नैकुंड

ब : महापाषाण संस्कृती, दांड्यावर बसविण्यासाठी पट्टे असलेल्या लोखंडाच्या कुऱ्हाडी, बोरगाव



अ




ब



क

ड



(डेक्कन कॉलेज)


फलक ३१

अ : महापाषाण संस्कृती, लोखंडी छिन्न्या व पटाशी, माहूरझरी

ब : महापाषाण संस्कृती, लोखंडी खनित्रे, माहूरझरी

क : महापाषाण संस्कृती, लोखंडी विळा व रापी, बोरगाव


ड : महापाषाण संस्कृती, घोड्याच्या तोंडात बसविली जाणारी 'व्हटाळे', माहूरझरी



फलक ३२

(डेक्कन कॉलेज,
नागपूर विद्यापीठ)


महापाषाण संस्कृती : थाळ्या आणि कट्यार



अ




ब



क

फलक ३३ (अ - क : डेक्कन कॉलेज,
ब : नागपूर विद्यापीठ)


अ : महापाषाण संस्कृती, घोड्याच्या मुखावरील तांब्याचा साज, रायपूर
ब : महापाषाण संस्कृती, घोड्याच्या मुखावरील तांब्याचा साज, खापा
क : महापाषाण संस्कृती, घोड्याच्या मुखावरील तांब्याचा साज, माहूरझरी



फलक ३४


(नागपूर विद्यापीठ,
डेक्कन कॉलेज)

महापाषाण संस्कृती : गडवा, घंटा आणि अलंकार




अ

ब



क




फलक ३५

(अ : मो. गं. दीक्षित
ब - क : डेक्कन कॉलेज)

अ : पांढऱ्या रंगात नक्षी केलेले कार्नेलियनचे मणी, कौंडिण्यपूर

ब : महापाषाण संस्कृती, दगडी वत्ते, बोरगाव

क : महापाषाण संस्कृती, जळलेला तांदूळ, भागीमाहरी



**शां.भा. देव,** एम.ए. पीएचडी.
(जन्म १९२३-मृत्यू १९९६)

पुणे येथील फर्ग्युसन (१९३९-४७) आणि डेक्कन कॉलेज रिसर्च इन्स्टिट्यूट (१९४८-५२) येथे उच्च शिक्षण. संशोधन व अध्यापन डेक्कन कॉलेजमध्ये (१९५२-६६, १९७४-८५); संस्थेचे संचालक (१९७८-८५) असताना अभिमत विद्यापीठाचा दर्जा प्राप्त करून देण्याचा यशस्वी प्रयत्न. पुणे येथील टिळक महाराष्ट्र विद्यापीठात जिज्ञासू विद्यार्थ्यांसाठी मराठी माध्यमातून ' पुरातत्व ' या विषयाचे अध्यापन आणि मार्गदर्शन (१९७८-१९९६). नेपाळ येथील त्रिभुवन विद्यापीठात (१९६३-६५) आणि नागपूर विद्यापीठात (१९६६-७४) पुरातत्व विभागाचे प्रमुख. दिल्ली येथील भोगीलाल इन्स्टिट्यूट ऑफ जैनालॉजीचे संचालक (१९८९-९०) नेपाळ व भारतात २५ ठिकाणी उत्खनने आणि त्यावरील वृतांत प्रसिद्ध ' आर्यांचा प्रश्न ' (१९९१) व ' युगायुगातील नासिक ' (१९९६) या परिसंवादाचे अध्वर्यु. आर्य प्रश्नाला नवे वळण देण्याचा यशस्वी प्रयत्न. नेपाळ, रशिया, जर्मनी, इंग्लंड आणि अमेरिकेत व्याख्यान दौरे व चर्चासत्रात सहभाग. इंग्रजी व मराठी माध्यमातून ३४ ग्रंथ आणि १०० संशोधन लेख प्रसिद्ध ; काही ग्रंथांना पारितोषिके, त्यातील काही महाराष्ट्र शासनाची. महाराष्ट्रातील उत्खनने (१९६२), महाराष्ट्र एक पुरातत्वीय समालोचन (१९६८). आणि पुरातत्व विद्या (१९७६) ही पुरातत्त्व विषयावरील ग्रंथसंपदा प्रथमच मराठीतून प्रसिद्ध. २० विद्यार्थ्यांना पीएच. डी. साठी मार्गदर्शन, त्यांच्याकरवी भारतीय संस्कृतीची सेवा घडत राहील हे पाहणे ; अंतरीचा ज्ञानदीप तेवत ठेवण्याचा निवृत्तीनंतरच्या काळातील हा सुयोग्य मार्ग.

पुरातत्व, भारतीय कला, स्थापत्य, पुराभिलेख, प्राचीन साहित्य आणि जैनधर्म ही प्रमुख संशोधन क्षेत्रे. महाराष्ट्रातील ताम्रपाषाणयुग, लोहयुगातील महापाषाण संस्कृती (विदर्भ) आणि सातवाहन कालीन महाराष्ट्र या संदर्भात विपुल संशोधनामुळे प्रागैतिहासिक आणि प्राचीन महाराष्ट्राच्या इतिहासात महत्त्वपूर्ण योगदान. लेखकाची विशेष रुची तसेच संशोधनाचा परिपाक असलेला ग्रंथ " इंडियन बीडस " (२०००)—डेक्कन कॉलेजतर्फे नुकताच प्रकाशित. विद्यार्थ्यांनी व चहात्या विद्वानांनी मिळून द्विखंडातील प्रसिद्ध केलेला स्पेक्ट्रम ऑफ इंडियन कल्चर (१९९६) हा गौरव ग्रंथ म्हणजे विद्यादानाचे रसाळ फळ !